# एम.ए. इतिहास

## सत्र - IV (CBCS)

## अभ्यासपत्रिका क्र. ७

# समकालीन भारतातील सामाजिक समस्या

## विषय संकेतांक - 91553

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.



**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **डॉ. अजयकुमार लोखंडे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
के. व्ही. पेंढारकर महाविद्यालय (स्वायत्त),
डोंबिवली (पू.), जि. ठाणे.

**लेखक** : **डॉ. मनोज इंगोले**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव - ४२५००१.

: **डॉ. गणेश वाघ**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
स्व. बाबूरावजी काळे महाविद्यालय, अजिंठा,
ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद - ४३१११७.

: **प्रा. नागसेन रामराव सोनुले**
इतिहास विभाग प्रमुख,
भारती कला आणि विज्ञान महाविद्यालय,
हदगाव, जि. नांदेड - ४३१७१२.



**फेब्रुवारी २०२३, प्रथम मुद्रण**

**प्रकाशक**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय, सांताक्रुझ, मुंबई

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | प्रकरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | भारतातील महिलांची स्थिती | १ |
| २. | स्त्री शोषणाचे स्वरूप आणि प्रकार | १४ |
| ३. | महिलांवर होणारे अत्याचार | ३० |
| ४. | भारतातील अल्पसंख्याक | ४८ |
| ५. | जमातवादाचा उदय आणि वाढ | ६० |
| ६. | जमातवादी हिंसाचार | ७७ |
| ७. | मानवाधिकार आयोग | ९४ |
| ८. | जातिव्यवस्थेची वैशिष्ट्ये | १०५ |
| ९. | जातिभेदाचे स्वरूप आणि प्रकार | १२० |
| १०. | निवडक जातीभेद अत्याचार (ॲट्रॉसिटी) प्रकरणांचा अभ्यास | १३५ |
| ११. | संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगार | १५३ |
| १२. | महिला कामगारांच्या समस्या | १८२ |
| १३. | बालकामगारांच्या समस्या | २०५ |
| १४. | उदारीकरणांचा प्रभाव | २२४ |
| १५. | खाजगीकरण | २४० |
| १६. | जागतिकीकरण | २५८ |


*****

**Paper-VII**

# Social Issues in Contemporary India

**Objectives**: To explore social issues of Depressed classes in India and develop awareness about constitutional safeguards. To understand forms of exploitation of depressed classes. To promote studies with regard to social issues.

**Module**

**1. Women's Issues**
(a) Status of Women in India
(b) Forms of Exploitation
(c) Atrocities on Women

**2. Issues of Minorities**
(a) Minorities in India
(b) Rise and growth of Communalism
(c) Communal Violence and Human Rights Commission

**3. Caste Discrimination**
(a) Features of Caste system
(b) Nature and forms of Discrimination
(c) Case studies of Atrocities

**4. Issues of Labour**
(a) Labour in Organized and Unorganized Sector
(b) Issues of Women and Child Labour
(c) Impact of Liberalization, Privatization and Globalization

## References:

Ambedkar B.R., *Annihilation of Caste with Reply to Mahatma Gandhi*, Dr. Babasaheb Ambedkar Source Material Publication Committee Higher Education Department, Government of Maharashtra, Mumbai, 2013.

Gautam., Ashwani Kant, *Human rights and Justice system*, APH Publishing Corporation, New Delhi,2013.

Vadackumchery James., *Human rights friendly police: A myth or reality*, APH Publishing corporation, New Delhi,2015.

Meshram N G., *Tragedy of masses*, The Buddhist International Center, Mumbai, 2004.

Pandye P.K..*Human rights*, APH publishing corporation, New Delhi, 2012.

Ramashray Roy., *Dalits Development and Democracy*, Shipra publications, Delhi, 1999.

Krishna Sangeeta , *Women , Social Exclusion and inclusion*,Kalpaz publications, New Delhi,2015.

Kumar Vivek, *Caste and Democracy in India*, Gyan Publishing House, New Delhi,2014.

Wagh Sandesh M., *Socio-Political Conditions in the Nineteenth Century India*, Sandesh Publications, Mumbai, 2012.

Wankhede Deepak M., *Socio Economic Development of Scheduled Caste*, Gautam Book Centre, New edelhi,2008.

# १

# भारतातील महिलांची स्थिती

**घटक रचना**

१.० उद्दिष्टे
१.१ प्रस्तावना
१.२ भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती
१.३ भारतातील कर्तुत्ववान महिला
१.४ भारतीय महिलांसामोरील आव्हाने
१.५ उपाययोजना
१.६ सारांश
१.७ प्रश्न
१.८ संदर्भ

## १.० उद्दिष्टे

- समकालीन भारतातील सामाजिक समस्यांचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.
- भारतीय स्त्री समस्यांवर प्रकाश टाकणे.
- भारतातील समाजातील स्त्रियांची स्थिती समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, "कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे मोजमाप त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीच्या आधारे केले जाते." म्हणजेच कोणत्याही राष्ट्रातील स्त्रियांची स्थिती त्या राष्ट्रातील सामाजिक, आर्थिक आणि मानसिक स्थिती दर्शवते. प्राचीन भारतीय समाज व संस्कृतीचा विचार केला असता, मातृसत्ताक समाज व्यवस्था जोपर्यंत अस्तित्वात होती तो पर्यंत समाजात स्त्री पुरुष असा भेद दिसून येत नाही मात्र आर्य संस्कृतीच्या प्रभावातून आलेल्या पितृसत्ताक व्यवस्थेकडून स्त्रियांना समानतेचे हक्क नाकारण्यात आले होते. त्यांना पुरुषांच्या तुलनेत विषम वागणूक दिली जात असे. आर्य संस्कृतीच्या पुरुषी प्रधानेतेने भारतीय समाजातील स्त्रियांचा समावेश शुद्र वर्णात करून त्याच्या नैसर्गिक अधिकारांवर बंधने लादली. पुढे भगवान बुधाच्या धम्म क्रांतीने स्त्री आणि शुद्र वर्णाला आपल्या शिकवणुकीचा भाग बनवून समता प्रथापित केली. मात्र त्यानंतर घडलेल्या प्रतीक्रांतीने मानुस्मृतीसारख्या हिंदू संहितांच्या आधारे शुद्र व स्त्रियांचे बंदिस्तीकरण केले. या प्रघातातून भारतीय समाजात स्त्री शोषणाच्या अनेक प्रथांचा जन्म

झाला. सतीप्रथा, बालविवाह, हुंडा, स्त्री भ्रूणहत्या यासारख्या सामाजिक प्रथांचा सुरुवातीच्या काळात मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला होता.

ब्रिटीश आगमनामुळे भारतात पुनर्जागरणाची चळवळ सुरु झाली. या चळवळीतून भारतात प्रबोधन युग अवतरले. प्रबोधन युगात स्त्री सुधारणा व स्त्री शिक्षण या सारख्या सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक समाज सुधारक पुढे आले. या काळातील प्रारंभिक फळीतील महात्मा फुले सोडता सर्व स्त्री सुधारकांचा सुधारणावाद धर्म शास्त्रांच्या जोखडात अडकलेला होता. पुढे डॉ. बाबासाहेबांनी स्त्री व शुद्र वर्णाची गुलामीतून मुक्तता करण्याकरिता लढे उभारले. त्यांच्या या लढ्याचे सार त्यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानात दिसून येते. भारतीय संविधानाने समता, बंधुता, स्वातंत्र्य, न्याय या मुल्यांचा स्वीकार करून भातीय समाजातील स्त्री पुरुष विषमता झुगारून समता प्रस्थापित केली.

वर्तमान कालीन महिला सक्षम झाल्या आहेत. तसेच, त्या प्रत्येक क्षेत्रात प्रगतिपथावर आरूढ झाल्या आहेत. मात्र खरे स्त्री स्वातंत्र्य तेव्हाच प्राप्त होते जेव्हा लोक स्त्रियांबद्दलची त्यांची प्रतिबंधात्मक वृत्ती आणि मानसिकता बदलतील.

**आपली प्रगती तपासा:**

१] भारतीय समाज हा पुरुषप्रधान समाज आहे चर्चा करा?

______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________

२] भारतातील पुरुष आणि स्त्रियांच्या संदर्भात आकडेवारीचे परीक्षण करा.

______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________

## १.२ भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती

भारतीय इतिहासाचे अवलोकन केले असता असे दिसून येते कि, प्राचीन काळापासून भारतीय समाजात स्त्रियांना दुय्यम लेखण्यात आले आहे. मानव उत्पती शास्त्रानुसार विचार केला असता स्त्री व पुरुष यांच्यामध्ये निसर्गतः शारीरिक भेद वगळता स्त्रिया पुरुषांपेक्षा कोणत्याही क्षेत्रात कमी नाहीत असे दिसून येते. भारतीय समाज हा पुरुषसत्ताक असल्यामुळे प्राचीन काळापासून येथील धर्मव्यवस्थेने स्त्रियांना काही अपवाद वगळता कायम दुय्यम लेखले आहे. प्राचीन कालखंडातील पुनर्जागरणाच्या चळवळीने पुरुषी सत्तेला आव्हान उभे केले मात्र त्या नंतरच्या काही शतकांमध्ये स्त्रियांची परिस्थिती खालावत जाऊन त्यांना समाजात गौण स्थान प्राप्त झाले. पूर्वी स्त्रियांना घरकाम करणारी म्हणून संबोधले जायचे. स्त्रियांनी लग्न करणे, घर आणि सासरची काळजी घेणे आणि आपल्या

पती आणि मुलांची स्वप्ने साकार करण्यासाठी आपल्या सर्व आकांक्षा त्याग करणे. असा विचार केला गेला व तो पिढीदर पिढी इतरांपर्यंत पोचवला गेला.

शिवाय, पितृसत्तेची समाजावरील मक्तेदारी कायम ठेवण्याकरिता स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले; कारण पितृसत्तेचा आधार असणाऱ्या कुटुंब संस्थेचा असा विश्वास होता की, केवळ मुलेच शिक्षित होण्यास पात्र आहेत. स्त्रीचे विश्व चूल आणि मुल एवढेच मर्यादित आहे. स्त्रियांवर नियंत्रण मिळविण्याकरिता बालवयात आणि कधीकधी त्यांच्या संमतीशिवाय त्यांची लग्ने लावून दिली जात असत. त्यांच्यावर मर्यादा घालण्यासाठी बनवलेल्या अनेक अमानवीय प्रथा, सामाजिक चालीरीती, धार्मिकविधी यांचाही उपयोग केला जात असे. एकूण या कालखंडात स्त्री ही मनुष्याऐवजी वस्तू मानली जात असे.

एकंदर भारतीय समाजाचा विचार केला असता, कामाचे स्वरूप आणि व्याप्ती, राजकीय सहभाग, शिक्षणाचे स्तर, आरोग्याची स्थिती, निर्णय घेणाऱ्या संस्थांमध्ये प्रतिनिधित्व, मालमत्तेचा हक्क इ. बाबी समाजातील सदस्यांच्या स्थितीचे निर्देशक आहेत.

भारतीय संविधानात स्त्री-पुरुष समानतेचे तत्व अंतर्भूत केले आहे. राज्यघटना केवळ स्त्रियांना समानतेची हमी देत नाही तर त्यांचे एकत्रित सामाजिक-आर्थिक आणि राजकीय शोषण कमी करण्यासाठी स्त्रियांच्या बाजूने सकारात्मक उपाययोजना करण्याचे अधिकार राज्याला प्रदान करते. भारतीय घटनेच्या अनुच्छेद १५ नुसार लिंगाधारीत भेदभाव न करण्याचा मूलभूत अधिकार स्त्रियांना बहाल केला आहे. तसेच कलम १४ नुसार कायद्यानुसार समान संरक्षण मिळवून देते. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला अपमानित करणाऱ्या प्रथांचा त्याग करणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य देखील नमूद केले आहे.

आधुनिक काळात स्त्रियांचे समाजतील स्थान पूर्णपणे बदलले आहे, विशेषत: शहरी स्त्रिया केवळ गृहिणी बनण्यापासून आधुनिक काळातील मल्टीटास्किंग स्त्रिया, निर्भयपणे जबाबदारी सांभाळत आहेत. आजकालच्या स्त्रिया घरातील त्यांची कर्तव्ये आणि कामे सांभाळतात, घराबाहेर करिअर सांभाळतात, मुलांचे पालनपोषण करतात आणि कौटुंबिक जीवन त्यांच्या व्यवसायांसोबत संतुलित करतात. आज बहुतेक शहरी घरांमध्ये हेच दृश्य आहे. आधुनिक काळातील महिला स्वतंत्र आहेत, धैर्याने योग्य निर्णय घेतात, त्यांच्या हक्कांसाठी उभ्या राहतात आणि यशाच्या मार्गावर चालतात. कल्पना चावला, इंद्रा नूयी, किरण मुझुमदार शॉ आणि इतर अनेक महिला कर्तृत्ववान उदाहरणे आहेत.

ग्रामीण पार्श्वभूमीतील स्त्रियांना शहरी भागातील स्त्रियांच्या तुलनेत अजून बरेच काही मिळविणे बाकी आहे. याचा अर्थ ग्रामीण स्त्रिया मागास आहेत असे नाही, परंतु शहरी स्त्रियांमध्ये जे बदल आणि परिवर्तन दिसून येते ते ग्रामीण स्त्रियांच्या बाबतीत नक्कीच थोडे कमी आहे. आधुनिक काळात स्त्रियांच्या स्थितीत सातत्याने विकास होत आहे. भारतामध्ये अनेक महिला सुधारक होऊन गेले, ज्यांनी स्त्री वर्गाच्या उन्नतीसाठी आणि सुधारण्यासाठी कार्य केले. याच काळात स्त्रीशिक्षणाचे उदात्तीकरण झाले. ब्रिटीश प्रभावामुळे भारतीय समाजात विविध स्त्री लेखिका उदयास आल्या. आधुनिक काळात, भारतातील स्त्रियांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समानता व शिक्षणाचा अधिकार यासारखे स्वातंत्र्य आणि अधिकार दिले गेल्यामुळे, स्त्रिया विविध क्षेत्रातील 'लेडीज फर्स्ट' ची सुविधा ते उपभोगत आहेत.

तथापि, हुंडा, घरगुती हिंसाचार, लैंगिक अत्याचार, गर्भपात, स्त्रीभ्रूणहत्या अशा काही समस्या अजूनही आपल्या समाजात प्रचलित आहेत.

समकालीन समाजातील विद्यमान सामाजिक समस्यांबद्दल जागरुकता, कौटुंबिक समस्या, मुलांसाठी चांगल्या शिक्षणाची योजना आखणे आणि प्रोत्साहन देणे, वृद्ध आणि मुलांच्या आरोग्याची काळजी घेणे यासह सामाजिक फायद्यांबद्दल स्त्रियांना शिक्षित केले जाते. सध्या बहुतांश महिलांना पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्याची संधी दिली जाते.

अशा विविध शिष्यवृत्ती योजना आहेत, ज्याचा फायदा भारतातील स्त्रियांना विविध प्रशिक्षण संस्थाच्या माध्यमातून आपले करिअर साध्य करण्यासाठी होतो, जिथे त्या त्यांचे शिक्षण पुढे करू शकतात. भारतातील अनेक स्वयंसेवी संस्था महिलांना शिक्षणात फायदा व्हावा म्हणून त्यांना पाठिंबा देतात. भारत सरकार तसेच राज्य सरकारे महिला सक्षमिकरणासाठी निधी राखून ठेवत आहेत. ज्या महिलांना त्यांचे जीवन सुधारण्याची इच्छा आहे त्यांना उच्च शिक्षणासह सक्षम करण्यासाठी सरकार आणि स्वयंसेवी संस्थांकडून अनुदान स्वण्य्त देण्यात येते.

भारत सरकारने काही ठराविक रक्कम महिलांच्या व्यावसाईक उन्नतीसाठी राखून ठेवली आहे. या राक्कमेतून महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज दिले जाते. स्त्रियांना स्वतःचे उत्पन्नाचे साधन मिळावे म्हणून लहान व्यवसाय सुरु करण्यास प्रोत्साहन दिले जाते. विविध खाजगी व स्वयंसेवी संस्था देखील भारतातील स्त्रियांना आर्थिक सहाय्य देतात आणि त्यांना विविध व्यावसायिक क्षेत्रामध्ये कौशल्य निर्माण करण्यासाठी प्रोत्साहित करतात. त्यामुळे समकालिन भारतीय महिलांच्या स्थितीत सुधारणा घडून आली आहे. आज अनेक महिला आहेत ज्या सरकारी कार्यालये आणि खाजगी कंपन्यांमध्ये उच्च आणि प्रतिष्ठित पदावर विराजमान आहेत. भारतातील सध्याच्या अर्थव्यवस्थेच्या सर्व बाजूंनी महिलांचे कार्य महत्वाचेआहे. यावरून हे सिद्ध झाले आहे की, महिलांना संधी दिली तर पुरुषापेक्षाही सरस ठरू शकतात. भारतातील केंद्र आणि राज्य सरकारने महिलांना त्यांच्या पुरुष समकक्षांप्रमाणे समान संधी उपलब्ध करून दिल्यामुळे हा बदल घडून आला आहे.

जागतीक महिला दिन हा केवळ महिलांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी नाही तर, महिलांच्या सुरक्षेबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. महिलांनी त्यांची आंतरिक शक्ती निर्माण करून स्वतःला बळकट बनवण्याची गरज आहे. त्यांनी आपली नैतिक ताकद वाढवण्याचे काम केले पाहिजे आणि न घाबरता जगाला सामोरे जावे. आधुनिकतेच्या या काळात स्त्रियांना धाडसी आणि बाहेर जाण्यास शिकवले आहे.

**स्वातंत्र भारतातील स्त्रियांची स्थिती:**

**लिंग समानता:**

आज महिला व्यवसाय आणि काम करण्यास उत्सुक आहेत. त्यामुळे त्यांना कुटुंबात समान आदर आणि प्रतिष्ठा मिळते. स्वतंत्र भारतातील महिलांना पुरुषांच्या तुलनेत समान कामासाठी समान वेतन मिळते. तसेच, त्यांच्यासाठी प्रसूती रजेची तरतूद करण्यात आली

आहे. शिवाय, भारतीय राज्यघटनेच्या कलम १६ अन्वये महिलांना दर्जाची आणि संधीची समानता प्रदान करण्यात आली आहे.

**शैक्षणिक स्थिती:**

शहरी भागातील मुली शिक्षणात मुलांच्या बरोबरीने आहेत. परंतु ग्रामीण भागात महिलांची संख्या कमी आहे. याचा परिणाम ग्रामीण भारताच्या सामाजिक आणि आर्थिक विकासावरही झाला आहे. शाळेतील निकृष्ट (स्वच्छता सुविधा) सुविधा आणि महिला कर्मचाऱ्यांची कमतरता यामुळे शिक्षणावर याचा परिणाम झाला आहे. मात्र केरळ आणि मिझोराममध्ये सार्वधिक साक्षरता दर दिसून आला आहे.

**महिला आणि राजकारण:**

जगात सर्वाधिक महिला राजकारणी भारतातील आहेत. राष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभेचे अध्यक्ष आणि इतर उच्च पदे महिलांनी भूषवली आहेत. इंदिरा गांधी ह्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान होत्या, ज्यांनी अनेक वर्षे पंतप्रधानपद भूषवले. श्रीमती प्रतिभा पाटील या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होत्या. संसदेच्या स्पीकर म्हणून मीरा कुमार यांनी कार्य केले. तसेच नुकतीच द्रौपदी मुर्मू यांची भारताच्या राष्ट्रपतीपदी निवड झाली आहे.

**महिला हिंसाचार:**

भारतातील महिलांवरील हिंसाचारामध्ये हुंड्यासाठी जाळणे, लैंगिक अत्याचार, बलात्काराची प्रकरणे, वेश्याव्यवसाय, ॲसिड हल्ला यांचा समावेश होतो. तसेच बालविवाह यासारख्या घटना आजही मोठ्या प्रमाणावर घडतांना दिसून येतात. स्त्री भ्रूणहत्या आणि ऑनर किलिंग सारख्या घटनामुळे महिलांच्या दु:खात अधिक भर पडली आहे. तसेच, लिंग-निवडक, गर्भपात या सारख्या समाज मानसिकतेत रुजलेल्या वाईट प्रथांमुळे लिंग गुणोत्तरामध्ये असमानता निर्माण झली. याचा परिणाम महिला हिंसाचाराच्या वृद्धित घडून आला आहे.

**स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती:**

स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजातील स्त्रिया घराबाहेर पडू लागल्या. या काळात स्त्रियांच्या मोठ्या संख्येला शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली. सध्या भारतात वैद्यकीय, तांत्रिक, अध्यापन, कायदीय किंवा इतर कोणत्याही व्यवसायात महिलांची कमतरता नाही. भारतामध्ये विविध कार्यालये आणि संस्थांमध्ये उच्च पदांवर असलेल्या सशक्त महिलांच्या संख्येत देखील वाढ झाली आहे.

महिला विविध व्यवसायांमध्ये अग्रगणी आहेत आणि तंत्रज्ञान, कायदा, प्रशासन, अध्यापन इत्यादी विविध विषयांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्पर्धा करत आहेत. पारंपारिक व्यवसायां व्यतिरिक्त, खेळांमध्ये देखील स्त्रियांनी मोलाची कामगिरी केली आहे, जसे पी.टी. उषा, सानिया मिर्झा, पी.व्ही. सिंधू, मिताली राज, मेरी कोम, सायना नेहवाल, दीपा कर्माकर आणि इतर, ज्यांनी भारतातील अनेक महत्वाकांक्षी क्रीडा क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व केले आहे. त्याचबरोबर भारतात अशा स्त्रिया देखील आहेत ज्यांनी आपला कला आणि

मनोरंजन उद्योगांवर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकला आहे. इंदिरा गांधी, विजय लक्ष्मी पंडित, ॲनी बेझंट, महादेवी वर्मा, नीता अंबानी, सचेत कृपलानी, अमृता प्रीतम, सुषमा स्वराज, पद्मजा नायडू, कल्पना चावला, मदर तेरेसा, सुभद्रा कुमारी चौहान, आणि इतर काही महान भारतीय महिला नेत्या, सामाजिक सुधारक, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासक आणि साहित्यिक स्त्रियांनी भारतीय स्त्रीयांच्या स्थितीत लक्षणीय बदल घडून आला आहे.

**आपली प्रगती तपासा**:

१] प्राचीन भारतीय समाजातील स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन करा.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

२] सद्यकालीन भारतीय स्त्रियांच्या स्थितीचा आढावा घ्या.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## १.३ भारतातील कर्तुत्ववान महिला

वर्षानुवर्षे महिलांनी समाजाचा अन्याय आणि पूर्वग्रह सहन केला आहे. पण आज बदलत्या काळानुसार त्यांनी स्वतःचे नाव कमावले आहे. त्यांनी लैंगिक रूढींच्या बेड्या तोडून आपली स्वप्ने आणि ध्येये साध्य करण्यासाठी प्रयत्न केला आहे. २०२१ मध्ये पद्मश्री पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांचे उदाहरण आपल्यासमोर आहे. त्यांनी अनाथ मुलांचे संगोपन करून समाजासाठी योगदान दिले आहे. पर्यावरणाच्या क्षेत्रात २०२१ मध्ये पद्मश्री पुरस्कार प्राप्त पर्यावरणवादी तुलसी गोडवा यांची चमकदार कहाणी आहे. त्यांना वन विश्वकोश म्हणून ओळखले जाते.

या पद्धतीने संरक्षण क्षेत्रात अवनी चतुर्वेदीचे नाव डोळ्यासमोर येते. एकल लढाऊ विमान (मिग-२१ बायसन) उडवणारी ती पहिली भारतीय महिला आहे. क्रीडा क्षेत्रात मेरी कोम यांनी ऑलिम्पिकमध्ये बॉक्सिंग क्रीडा प्रकारात पदक जिंकणारी ती देशातील पहिली महिला ठरली. पी. व्ही. सिंधू ही दोन ऑलिम्पिक पदके (कांस्य- टोकियो २०२०) आणि (रौप्य- रिओ २०१६) जिंकणारी पहिली भारतीय महिला होय. कॉमनवेल्थ गेम्स २०२२ मधील सांघिक खेळांमध्ये भारतीय महिला क्रिकेट संघ अंतिम फेरीत पोहोचला होता.

आंतरराष्ट्रीय संस्थांच्या क्षेत्रातही भारतीय महिला मागे नाहीत. गीता गोपीनाथ यांनीIMF (आंतरराष्ट्रीय नाणेनिधी) मधील पहिली महिला मुख्य अर्थशास्त्रज्ञ होण्याचा मान मिळाला आहे. अग्नी-५ क्षेपणास्त्र प्रकल्पातील भूमिकेसाठी स्पेस टेक्नॉलॉजीच्या क्षेत्रात टेसी थॉमस यांना भारताची मिसाइल वुमन म्हणून ओळखले जाते. शैक्षणिक क्षेत्रातही आमच्याकडे सुपर

वूमन अचिव्हर्स आहेत. शकुंतला देवी यांच्या नावावर सर्वात वेगवान मानवी गणनेचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आहे.

शानन ढाका हिनॅशनल डिफेन्स अकादमी प्रवेश परीक्षेत (NDA ची पहिली महिला बॅच) पहिली आली. UPSC नागरी सेवा परीक्षा २०२१मध्ये महिला उमेदवारांनी टॉप ३ अखिल भारतीय रँक प्राप्त केली.

**आपली प्रगती तपासा:**

१] भारतातील संरक्षण क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या महिलांची नावे सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

२] आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये यश मिळवणाऱ्यांची भारतीय महिलाची माहिती लिहा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १.४ भारतीय महिलांसमोरील आव्हाने

भारतात महिलांसाठी अनेक क्षेत्रत आव्हाने उभी आहेत. भारतीय समाजातील सर्व स्तरातील महिलांचे सक्षमीकरण हे अजूनही दूरचे स्वप्न आहे. सशक्तीकरण ही अशी प्रक्रिया आहे जी व्यक्तींमध्ये त्यांच्या स्वतःच्या जीवनावर, समाजावर आणि त्यांच्या समुदायावर शक्ती निर्माण करते. शिक्षण, व्यवसाय आणि जीवनशैली यासारख्या मर्यादा आणि निर्बंधांशिवाय त्यांच्यासाठी उपलब्ध संधीं प्राप्त करण्यास सक्षम असणारे लोक सक्षम होतात.

ब्रिटिश काळात, शिक्षण, रोजगार, सामाजिक आणि राजकीय अधिकारांच्या बाबतीत स्त्री-पुरुष असमानता दूर करण्यासाठी काही भरीव कार्य केले गेले. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि शिक्षणाचा प्रसार या बदलत्या समाज जीवनामुळे महिलांच्या सामाजिक स्थितीवर विविध प्रकारे परिणाम झाला. महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षण हे प्रमुख साधन म्हणून आहे, याची जाणीव प्रारंभिक समाज सुधारकांनी निर्माण करून दिली. महात्मा फुले, राजा राम मोहन राय, ईश्वरचंद्र विद्यासागर यांसारख्या काही समाजसुधारकांनीही स्त्री शिक्षणावर भर दिला. त्यांच्या आस्थेवाईक प्रयत्नांमुळे काही प्रमाणात सामाजिक कुप्रथा दूर होण्यास मदत झाली.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१, द प्रोव्हिजन ऑफ द प्रोटेक्शन ऑफ वुमन फ्रॉम डोमेस्टिक व्हायोलन्स ऍक्ट २००५, असे अनेक कायदे लागू करण्यात आले आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांचा

लैंगिक छळ (प्रतिबंध, प्रतिबंध आणि निवारण) कायदा (२०१३) हा महिलांना सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील, संघटित किंवा असंघटित अशा सर्व कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून संरक्षण प्रदान करतो. भारतीय संविधान देखील लैंगिक समानतेवर भर देत, महिलांच्या बाजूने सकारात्मक भेदभावाचे उपाय अवलंबण्याचे अधिकार राज्याला प्रदान करते. कलम १५(३) हे अशा तरतुदींपैकी एक उदाहरण आहे. कलम १६, महिला आणि पुरुष दोघांनाही रोजगाराच्या बाबतीत समान संधी प्रदान करते.

इतके कायदे असूनही भारतात महिला अजूनही सुरक्षित नाही. भारतीय समाजात आजही महिलांवरील विविधजन्य गुन्हे प्रचलित आहेत. द नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) द्वारे जारी करण्यात आलेल्या भारतातील वार्षिक गुन्हे अहवाल २०१७ नुसार भारतात महिलांविरुद्ध एकूण ३,५९,८४९ प्रकरणे नोंदवली गेली. यामध्ये बलात्कार आणि लैंगिक अत्याचारासारख्या भीषण घटनांनी मुली आणि महिलांना असुरक्षित केले आहे. या गुन्ह्यांपासून महिला सुरक्षित करण्यासाठी कायदिया तरतुदी आणि विविध उपक्रम वर्तमान भारतीय प्रशासनाकडून राबविले जाता असले तरी, अशा जघन्य गुन्ह्यांमधील गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे, गुन्हेगार त्या घटनांची पुनरावृत्ती करण्यास प्रोत्साहन पाप्त होतांना दिसून येते.

आज बलात्कारासारख्या गुन्ह्यांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने आणि अशा इतर घटनांमुळे महिलांच्या मनात नेहमीच असुरक्षिततेची भावना निर्माण होते ज्यामुळे त्यांना नोकरी, व्यवसाय किंवा इतर कामे करण्यास पुढे येण्यास विरोध होतो. नोव्हेंबर २०१९ मध्ये कामावरून परतत असताना एका पशुवैद्यकीय डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याची हैदराबाद मध्ये घडलेली घटना म्हणजे भारतात नोकरी करण्यासाठीही महिला सुरक्षित नाहीत याचा पुरावा आहे. अशा घटनांमुळे इतर महिलांना नोकरी किंवा करिअर करण्यापूर्वी दोनदा विचार करायला लावतात. ज्या देशाच्या राजधानीत एका मुलीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या केली जाते आणि तिच्या कुटुंबातील सदस्यांना आपल्या मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी सात वर्षांहून अधिक काळ रात्रंदिवस झगडावे लागते, अशा देशासाठीही हि लज्जास्पद बाब आहे. न्याय विलंब म्हणजे न्याय नाकारणे अशी एक म्हण आहे. सुस्त न्यायव्यवस्था न्यायव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास पुन्हा निर्माण करण्यात कमालीची अपयशी ठरली आहे. न्यायपालिकेच्या खराब कामकाजामुळे भारतातही सवयीचे गुन्हे करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. या वाईट परिस्थितींमुळे कुटुंबातील सदस्यांना देखील कधीकधी त्यांच्या मुलींना त्यांच्या स्वप्नांचा आणि करिअरचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांचे मूळ शहर किंवा गाव सोडण्याची परवानगी देण्याची धमकी दिली जाते ज्यामुळे त्यांचा यशाचा मार्ग अधिक संघर्षपूर्ण आणि कठीण बनतो. अशी वाईट परिस्थिती असतानाही काही महिलांनी धाडस दाखवून समाजात आपले स्थान निर्माण केले आहे, तरी खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणासाठी भारताला अजून मोठा पल्ला गाठायचा आहे.

**भारतातील महिला साक्षरतेचे प्रमाण:**

आपल्या समाजात स्त्री आणि पुरुष दोघांनाही शिक्षणाच्या संधीची समानता सुनिश्चित करण्याचा सरकारचा प्रयत्न असूनही, भारतातील, विशेषत: ग्रामीण भागातील महिलांचा

साक्षरता दर अजूनही खूपच कमी आहे. ग्रामीण भारतातील शाळा बऱ्याच अंतरावर आहेत, शैक्षणिक सुव्यवस्थेच्या अभावी, महिलांना शालेय शिक्षणासाठी लांबचा प्रवास करणे या मुळे त्यांच्या सुरक्षिततेची जोखीम वाढते. याचा परिणाम स्त्री शिक्षणावर घडून येतो. स्त्रीभ्रूण हत्या, हुंडाबळी आणि बालविवाह यासारख्या पारंपारिक प्रथा देखील या समस्येला कारणीभूत आहेत; कारण अनेक कुटुंबांना मुलीला शिक्षण देणे आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य वाटते.

**समाजीकरण प्रक्रियेत फरक:**

भारताच्या ग्रामीण भागात, अजूनही पुरुष आणि स्त्रियांसाठी भिन्न समाजीकरण मानदंड निर्धारित केली जातात. भारतीय समाजात महिलांनी मृदुभाषी, शांत आणि संयमी असणे अपेक्षित आहे. स्त्रियांचे चालणे, बोलणे, बसणे विशिष्ट पद्धतीने असले पाहिजे असे मानले जाते. तर पुरुषांनी आत्मविश्वास, मोठ्या आवाजात आणि त्यांच्या इच्छेनुसार कोणतेही वर्तन प्रदर्शित करण्यास मुभा दिली जाते.

**संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व:**

भारतभर विविध विधान मंडळांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व कमी आहे. इंटर-पार्लियामेंटरी युनियन (IPU) आणि UN Women च्या अहवालानुसार, संसदेत निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींच्या संख्येत भारत १९३ देशांमध्ये १४८व्या क्रमांकावर आहे.

**सुरक्षितता:**

भारतात महिला सुरक्षिततेच्या क्षेत्रात सतत प्रयत्न करूनही, महिलांना भ्रूणहत्या, कौटुंबिक हिंसाचार, बलात्कार, तस्करी, जबरदस्ती वेश्याव्यवसाय, ऑनर किलिंग, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ इ. विविध कृत्यांमुळे भारतातील महिला कायम असुरक्षित राहिली आहे.

**आपली प्रगती तपासा:**

१] भारतातील महिला साक्षरतेचे प्रमाण कमी का यावर चर्चा करा.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

२] संसदेत महिलांच्या प्रतिनिधीत्वाच्या संदर्भात भारतातील परिस्थितीची चर्चा करा.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## १.५ उपाययोजना

**उत्तम शिक्षणाच्या संधी:**

स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे संपूर्ण कुटुंबाला शिक्षण देणे होय. स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षण हे मानवाला समाजात त्यांची स्थिती बदलण्यास सक्षम बनविते. शिक्षण व्यक्तीला अधिक चांगल्या पद्धतीने निर्णय घेण्यास सक्षम बनविते. मुलींना शिक्षणाचा अधिकार आणि शैक्षणिक संस्थांमध्ये भेदभावापासून मुक्त राहण्याचा हक्क सुनिश्चित करण्यासाठी शिक्षण धोरण अधिक समावेशक असण्याची गरज आहे. तसेच, शिक्षण धोरणाने तरुण पुरुष आणि मुलांनी मुली आणि महिलांबद्दलचा दृष्टिकोन सकारात्मक बनविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

**स्किलिंग आणि मायक्रो फायनान्सिंग:**

स्किलिंग आणि मायक्रो फायनान्सिंगमुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्थिरता मिळू शकते. आर्थिक स्थैर्य मुले स्त्रियांची समाजातील परावलंबिता नाहीसी होईल. स्त्रियांना बाजार मागणीसह अपारंपरिक कौशल्यांमध्ये प्रशिक्षण देणे, महिलांसाठी अधिक सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील नोकऱ्या निर्माण करणे आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे आहे.

**महिलांची सुरक्षा:**

देशभरातील महिलांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सध्याच्या सरकारी उपक्रमांबद्दल आणि यंत्रणांबद्दल महिलांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी बहु-क्षेत्रीय धोरण आखले गरजेचे आहे. पॅनिक बटण, निर्भया पोलिस पथक ही महिलांच्या सुरक्षेच्या दिशेने उचललेली काही चांगली पावले आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, प्रतिबंध आणि निवारण) कायदा, २०१३ महिलांसाठी सुरक्षित कामाच्या जागा सुनिश्चित करण्यासाठी आणि महिलांच्या समानतेच्या दर्जाच्या आणि संधीच्या अधिकाराचा आदर करणारे सक्षम वातावरण तयार करण्यासाठी लागू करण्यात आला आहे. त्याची योग्य ति अंमलबजावणी करणे.

**शासनाच्या सर्वात खालच्या स्तरावर विनिर्दिष्ट कृती:**

शासनाच्या सर्वात खालच्या स्तरावर प्रकल्प आखणे, समर्थन देणे आणि प्रोत्साहन देणे, शासनामध्ये अधिक समावेशकता आणणे आणि भारतातील महिलांची स्थिती सुधारणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ:

**स्वागतम नंदिनी (कटनी, मध्य प्रदेश):**

मुलींचा जन्म साजरा करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला. मुलीच्या आगमनाचा आनंद साजरा करण्यासाठी छोट्या मिरवणुकीने, लाडली लक्ष्मी योजनेंतर्गत नवजात बालकांच्या पालकांचा बेबी किट देऊन सत्कार केला जातो.

**नन्हे चिन्ह (पंचकुला, हरियाणा):**

अंगणवाडी सेविकांनी (AWW) प्रोत्साहन दिल्याने, लहान मुलींना त्यांच्या कुटुंबियांनी स्थानिक अंगणवाडीत आणले. त्यांच्या पावलांचे ठसे एका चार्ट पेपरवर रेखाटलेले आहेत आणि AWC च्या भिंतीवर आई आणि लहान मुलींच्या नावांसह लावले आहेत.

**शिक्षणातील प्रोत्साहन:**

मुलींमधील उच्च गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी, उच्च शिक्षणासाठी तुलनेने उच्च आर्थिक प्रोत्साहन देण्याची गरज आहे. शिक्षण, माहिती आणि संपर्क मोहिमेद्वारे समान बाल लिंग गुणोत्तर गाठण्यासाठी सक्षम असलेल्या गावांना/जिल्ह्यांना पुरस्कार देण्यात यावे. ई-गव्हर्नन्सवर अधिक भर द्यायला हवा, जेणेकरून केंद्र आणि विविध राज्य सरकारांनी मुलींच्या शिष्यवृत्तीसाठी जाहीर केलेल्या खर्चाची वेळेवर तपासणी होईल.

**ग्रामीण स्तरावर मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा:**

मूलभूत/ पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्यास घरगुती कामाचा भार कमी होऊ शकतो. उदाहरणार्थ, ग्रामीण महिलांसाठी घरगुती कामामध्ये पाणी आणि इंधन आणणे यासारखी कठीण कामे असतात. नळाद्वारे पिण्याचे पाणी आणि स्वच्छ नैसर्गिक वायू या सारख्या उपाय योजना स्त्रियांना सक्षम बनविण्यासाठी प्रोत्साहित करतात.

**महिलांच्या नेतृत्वाखालील विकास:**

महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाचे परिणाम निर्विवाद आहेत कारण एक शिक्षित आणि सशक्त महिला भविष्यातील पिढ्यांसाठी शिक्षण आणि सक्षमीकरण सुनिश्चित करेते.

सरकारने महिलांच्या बाजूने अनेक नियम आणि कायदे स्वीकारले आहेत. भारत सरकारने देशातील महिलांचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने अनेक उपक्रम सुरू केले. यातील प्रत्येक योजना महिला आणि त्यांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहे, जेणेकरून भारतीय महिला, जगभरातील महिलांप्रमाणे, त्यांची सर्व उद्दिष्टे साध्य करू शकतील आणि समान दर्जाच्या जीवनाचा आस्वाद घेऊ शकतील. सर्वात सुप्रसिद्ध योजनांपैकी आहेत:

- बेटी बचाओ बेटी पढाओ
- महिला हेल्पलाइन योजना
- नारी शक्ती पुरस्कार
- निर्भया
- महिला पोलीस स्वयंसेविका
- महिला शक्ती केंद्रे (MSK)

**आपली प्रगती तपासा:**

१] भारतातील महिलांची स्थिती सुधारण्यासाठी आधारभूत काही उपायांचे वर्णन करा.

२] महिला साक्षमिकरणासाठी शासकीय स्तरावर सुरु करण्यात आलेल्या योजनांचा थोडक्यात आढावा घ्या.

## १.६ सारांश

शिक्षण आणि इतर सामाजिक प्रगतीमुळे भारतिया स्त्रियांचा समाजतील दर्जा स्थान उंचावला आहे. स्त्रियांना शिक्षण घेण्याचे आणि त्यांची नोकरी करण्याचे (आर्थिक सक्षम बनण्याचे) उद्दिष्टे प्रत्यक्षात आणण्याचे स्वातंत्र्य वर्तमान समाजात प्राप्त झाले आहे. आज भारतातील महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव झाल्यामुळे त्या राजकीय, सामाजिक, आर्थिक किंवा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या राहिल्या नाहीत. त्यांना इतरांप्रमाणेच संधी आणि अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यामुळे समाज जीवनात स्त्रिया कोणतेही स्थान किंवा दर्जा प्राप्त करण्यास सक्षम बनल्या आहेत.

भारतीय समाज जीवनाच्या पूर्वीच्या काळाच्या तुलनेत महिलांच्या स्थितीत सातत्याने बदल होत जाऊन, आज स्त्रिया राजकारण, लष्करी क्षेत्रे, आर्थिक सेवा आणि तंत्रज्ञान क्षेत्र यासारख्या क्षेत्रात महत्वपूर्ण  जबाबदाऱ्या पार पाडतांना दिसून येतात. शिवाय, त्यांचे क्रीडा क्षेत्रातही महत्वपूर्ण योगदान दिले आहे. अशा प्रकारे, समकालीन भारतीय समाजात स्त्रियांनी कुटुंब आणि समाजात एक सन्माननीय स्थान प्राप्त केले आहे.

मात्र, महिलांविरोधातील गुन्हे संपूर्णपणे संपवणे, हे अजूनही मोठे आव्हान आहे. भारतातील महिलांच्या अधिकारांमध्ये लक्षणीय वाढ झाली असली तरीही, बलात्कार, लैंगिक भेदभाव (लिंगभाव) यासारख्या विविध मार्गांनी स्त्रियांचे शोषण केले जाते. महिलांची स्वायत्तता सुनिश्चित करून, कौटुंबिक आणि सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा सहभाग, निर्णय घेण्याची क्षमता वाढवून स्त्री शोषणावर प्रतिबंध केला जाऊ शकतो.

## १.५ प्रश्न

१. भारतातील महिलांच्या स्थितीचे विश्लेषण करा.

२. भारतातील महिलांच्या आव्हानक्षेत्रांची चर्चा करा.

३. भारतातील महिलांची स्थिती सुधारण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचे परीक्षण करा.

## १.८ संदर्भ


- भागवत विद्युत (अनु.), लिंगभाव आणि अनेकविध लैंगिकता परीप्रेक्ष्ये आणि प्रश्न, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यासकेंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, २०१३.
- समस्या सोडविताांना, स्त्रीमुक्ती संघटना प्रकाशन, मुंबई, २०१३.
- डॉ. पांगुळ – बाराहाते नंदा, महिलांवरील लैंगिक अत्याचार, आर. बी. प्रकाशन नागपूर, २०१४.
- जाधव निर्मला (संपा.), भारतीय स्त्रीप्रश्न आकलनाच्या दिशेने, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, २०१५.
- शर्मा राम, एम. के. मिश्रा, भारतीय नारी वर्तमान समस्याएँ और भावी समाधान, अर्जुन पब्लीशिंग हाऊस, नई दिल्ली. २०१०.
- Barnali Barman, Women Empowerment: A Distant Dream in India, https://www.sentinelassam.com/north-east-india-news/assam-news/women-empowerment-a-distant-dream-in-india/
- Gunin Borah, Status of Women in Indian societyhttps://www.sentinelassam.com/north-east-india-news/assam-news/status-of-women-in-indian-society/
- https://vikaspedia.in/social-welfare/women-and-child-development/women-development-१/status-of-women-in-india#:~:text=Related%२0resources-,Population,are%२0949%२0and%२09२9%२0respectively.
- https://www.drishtiias.com/daily-updates/daily-news-editorials/status-of-women-in-india


*****

# २

# स्त्री शोषणाचे स्वरूप आणि प्रकार

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ भारतातील स्त्री शोषणाचे विविध प्रकार

२.३ मी टू चळवळ

२.४ महिला सुरक्षा आणि उपाय

२.५ भारतातील महिलांसाठी कायदे

२.६ सारांश

२.७ प्रश्न

२.८ संदर्भ

## २.० उद्दिष्टे

- समकालीन भारतातील सामाजिक समस्यांचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.
- समकालीन भारतातील स्त्री समस्यांवर प्रकाश टाकणे.
- भारतातील स्त्रियांच्या शोषणाचे विविध प्रकार अभ्यासणे.

## २.१ प्रस्तावना

भारतीय संमाजात स्त्रियांची स्थिती विरोधाभासी आहे. एकीकडे त्यांची देवी म्हणून पूजा केली जाते, तर दुसरीकडे हुंड्यासाठी जाळले जाते. भारतीय समाजात मुलांकडे म्हातारपणात आधार म्हणून पाहिले जाते, कुटुंब, वंश चालविण्यासाठी मुलगा आवश्यक मानला जातो. याउलट, मुलगी दुर्लक्षित असूनही कुटुंबाच्या 'सन्मानाला' मूर्त स्वरूप देते. मुली किंवा स्त्रियांसाठी हे दुहेरी बंधन आहे कारण त्यांना समाजात केवळ हा कौटुंबिक 'सन्मान' जपायचा नाही, तर अत्याचार, हिंसाचार, बलात्कार, बाल विवाह असे विविध अत्याचार घडतात तेव्हा गप्प बसायला शिकविले जाते. स्त्री आणि पुरुष हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोघेही एकमेकांना पूर्ण करतात. व्युत्पत्ति शास्त्रानुसार, 'स्त्री' या शब्दाचा अर्थ - पुरुषाचा अर्धा. स्त्री-पुरुष संबंध हे आपल्या न्याय दर्शनात मन आणि पदार्थाच्या साधर्म्याने अतिशय चांगल्या प्रकारे स्पष्ट केले आहेत, म्हणजे स्त्री आणि पुरुष हे आत्मा आणि शरीर या नात्याने एकमेकांशी संबंधित आहेत. त्यामुळे स्त्रियांचा आदर केला पाहिजे.

**आपली प्रगती तपासा:**

१] भारतीय स्त्रियांच्या वर्तमान स्थितीचा आढावा घ्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## २.२ भारतातील स्त्री शोषणाचे विविध प्रकार

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात महिलांचे शोषण होत आहे. वैयक्तिक सुरक्षेपासून ते व्यावसायिकापर्यंत, घरापासून कामाच्या ठिकाणापर्यंत, शारीरिक ते भावनिकतेपर्यंत, स्त्रीच्या आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात तिला प्रत्येक रूपात आणि प्रत्येक भूमिकेत त्रास दिला जातो, महिलांचे खालील प्रकारे शोषण केले जाते.

### १. कौटुंबिक हिंसाचार (घरेलू हिंसा):

महिलांचे शोषण घरातूनच सुरू होते, मग ते शारीरिक असो वा मानसिक. पुरुषांमधील नशेली पदार्थाच्या सेवनासारख्या वाईट सवयी त्यांना घरातील महिलांवर अत्याचार करण्यास प्रवृत्त करतात, कधीकधी यातून मारहाण देखील घडते. कौटुंबिक हिंसाचाराच्या संदर्भात दररोज बरीच प्रकरणे नोंदवली जातात, मात्र त्यापैकी बरीच प्रकरणे नोंदवली जात नाहीत. भारतीय समाज हा पितृसत्ताक असल्यमुळे स्त्री कायम दुय्यम लेखली गेली आहे, या दुय्यमत्वाच्या धारणेने स्त्री प्रतिमा सोशिक बनविली गेली. त्यामुळे कुटुंबातून 'स्त्रीजातीने सहन कराव' असे शिकविले जाते. यामुळे कौटुंबिक हिंसाचाराला स्त्रिया दररोज बळी पडतात.

### २. हुंडाबळी:

भारतीय समाजात हुंड्यासाठी महिलांचे पूर्वीपासून शोषण होत आले आहे. परंतु वर्तमान काळात हुंडा हा एका व्यवहारात बदलला आहे, आलिशान कार, पंख्यापासून एअर कंडिशनरपर्यंत, भरपूर दागिने आणि रोख रकमेत स्वरुपात त्याचे प्रचलन आहे, यावर विश्वास ठेवणे कठीण आहे, परंतु हे एक कटू सत्य आहे की, वराची पात्रता आणि व्यवसाय हुंड्याची रक्कम निर्धारित करते. वराची पात्रता जास्त आहे, हुंड्याची रक्कम जास्त निश्चित होते. या धनलालसेमुळे  महिलांचा शारीरिक तसेच मानसिक छळ केला जातो. हुंड्याच्या लोभापोटी अनेक तरुण विवाहित मुलींना मारले जाते किंवा त्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले जाते. समाजातील ह्या कुविचाराला बळी पडून आपले प्राण गमावे लागलेल्या स्त्रीला हुंडाबळी संबोधले जाते.

### ३. लैंगिक शोषण:

प्रत्येक क्षेत्रात महिलांवर बलात्कार आणि लैंगिक छळ होत असल्याच्या बातम्या आपल्याला दररोज ऐकायला मिळतात, त्यामुळे स्त्री कुठेही सुरक्षित नाही असे दिसुन येते. स्त्री ही भोग विलासाची वस्तू आहे या समज मानसिकतेमुळे स्त्रीच्या संमतीशिवाय तिला

स्पर्श केला जातो. अथवा लैंगिक सुख पूर्ण करण्यासाठी बलात्कारानंतर त्यांची निर्घृण हत्या केली जाते. दिल्लीतील निर्भया प्रकरण हे अशाच क्रूरतेचे उदाहरण आहे. शिमल्यातील कोटखाई बलात्कार आणि हत्या प्रकरणही त्यातच आहे. वर्तमान समाजात दिवसेंदिवस ही क्रूरता आणि शोषण वाढत चालले आहे.

**४. कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण:**

भारतीय समाज मानसिकतेने स्त्री ही शोषिक मानल्यामुळे तिचे कामाच्या ठिकाणी होणारे शोषण हे केवळ श्रमापुरते मर्यादित नसून मानसिक व लैंगिक देखील असते. विशाका विरुद्ध राजस्थान स्टेट, खटल्याच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, जेव्हा महिला कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी त्रास दिला जातो तेव्हा त्यांच्या समानता आणि सुरक्षिततेला गंभीरपणे आव्हान दिले जाते. यासाठी महिलांच्या कामाची परिस्थिती सुधारण्यासाठी आणि सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी सर्वोच्च न्यायालयाने विशाखा मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहेत. विशाखा खटला, हा एक सार्वजनिक हित वर्ग-कृती खटला असून, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या विरुद्ध सर्वोच्च न्यायालयासमोर आला होता, ज्यामध्ये वैयक्तिक सामाजिक कार्यकर्ते आणि गैर-सरकारी संस्था (एनजीओ) यांचा देखील समावेश होता. महिलांच्या सुरक्षेसाठी या पद्धतीच्या तरतुदी उपलब्ध असल्या तरी त्याची अंमलबजावणी योग्य प्रमाणात होत नाही, असा त्यांचा आरोप होता, त्यामुळेच त्यांनी भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यातून कामाच्या ठिकाणी होणाऱ्या स्त्रियांच्या लैंगिक छळाच्या विरुद्ध सर्वोच्च न्यायालयाने विशाखा मार्गदर्शक तत्वे निर्माण झाली, मात्र तरी देखिल स्त्रियांचे कामाच्या ठिकाणी होणारे मानसिक व लैंगिक शोषण पूर्णपणे थाबले नाहीत.

**५. सायबर शोषण:**

केवळ शारीरिकच नव्हे तर आभासी जगात देखील महिलांचे शोषण घडून येते. तेथेही त्यांची सुटका नाही. सोशल नेटवर्कवर महिलांचा पाठलाग केला जातो आणि त्यांचा अवाजवी फायदा घेतला जातो. त्यांची खाती हॅक करून त्यांच्या नावाने अश्लील गोष्टी प्रसिद्ध केल्या जातात. त्यांचे अकाउंट हॅक करून त्यांची छायाचित्रे बनावट पॉर्न सामग्रीमध्ये वापरली जातात. आणि त्यानंतर महिलांना ब्लॅक मेल करून त्रास दिला जातो, यातून त्यांचा मानसिक छळ केला जातो.

**आपली प्रगती तपासा:**

१] कौटुंबिक हिंसाचारा विषयी चर्चा करा.

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

२] महिलांच्या सायबर शोषणाचे परीक्षण करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## २.३ मी टू चळवळ

मी टू चळवळ ही विविध क्षेत्रांत, कार्यालयीन वातावरणात अथवा कामाच्या ठिकाणी विशेषतः महिलांवरील होणाऱ्या लैंगिक अत्याचारा विरोधात प्रथम ट्विटरद्वारे '**#मीटू**' असा हॅशटॅग वापरून, आवाज उठवण्यासाठी अमेरिकेत सुरू करण्यात आली. लैंगिक शोषणाला वाचा फोडण्यासाठी जगभरात सुरू असलेली 'मी-टू' (#me too) ही एक स्त्रीशोषणाला वाचा फोडणारी चळवळ आहे. या चळवळीचा प्रारंभ ५ ऑक्टोबर २०१७ रोजी न्यू यॉर्क टाइम्स या वृत्तपत्रात ॲशले ज्यूड (Ashley Judd) या अभिनेत्रीची मुलाखत प्रसिद्ध झालेल्या मुलाखतीपासून झाला. या मुलाखतीत ॲशलेने 'प्लप फिक्शन, गुड विल हंटिंग, शेक्सपियर इन लव्ह' अशा सुमारे सहा ऑस्कर पारितोषिक प्राप्त चित्रपटांची निर्मिती करणाऱ्या निर्माता हार्वे वेनस्टेईन यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप केला होता. न्यूयॉर्क टाइम्सने केलेल्या अधिक चौकशीत अनेक अभिनेत्री तसेच हार्वे याच्या मीरामॅक्स कंपनीतील कर्मचारी स्त्रियांनी अशा अनेक घटना कथित केल्या. वृत्तपत्रांत आलेल्या या बातम्यांमुळे हार्वे यांची त्याच्या द वेनस्टेईन कंपनी मधून संचालक मंडळाने हकालपट्टी केली.

ट्विटर संकेत स्थळावर जरी आलीस मिलानो हिने #मी टू (#MeToo) चा वापर प्रचलित केला असला तरी हे शब्द लैंगिक शोषणा संदर्भात वापरण्याचे श्रेय तराना बर्क या स्त्री हक्क कार्यकर्तीला जाते. १९९७ साली एका तेरा वर्षाच्या लैंगिक शोषणाची शिकार बनलेल्या मुलीशी त्या बोलत होत्या. "तिला कसा प्रतिसाद द्यावा हेच मला सुचत नव्हते. 'मी सुद्धा' अशा अत्याचाराची शिकार आहे हे सुद्धा मी तिला सांगू शकले नाही. अनेक वर्ष हा प्रसंग माझ्या मनात घर करून राहिला." या संभाषणानंतर १० वर्षांनी तराना बर्क यांनी 'जस्ट बी' (Just Be) या ना-नफा संस्थेची स्थापना केली. लैंगिक अत्याचाराची आणि हिंसेची बळी ठरलेल्या स्त्रियांच्या मदतीसाठी ही संस्था काम करते. तराना यांनी या चळवळीला "मी टू" नाव दिले आहे.

### भारतातील मी टू चळवळ:

भारतात या चळवळीचे पडसाद अवघ्या वर्षभारत दिसू लागले, सप्टेंबर २०१८ मध्ये अभिनेत्री तनुश्री दत्ता हिने झूम टी व्ही या दूरचित्रवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये अभिनेते नाना पाटेकर यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप केले. २००९ मध्ये "हॉर्न ओके प्लीज" या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी नाना पाटेकर यांनी असभ्य वर्तन करून त्रास दिल्याचा आरोप तनुश्री दत्ता हिने केला. या आरोपानंतर भारतातील अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी त्यांच्या विरुद्ध झालेल्या लैंगिक शोषणाच्या कहाण्या जगासमोर यायला सुरुवात झाली. त्यानंतर आलोकनाथ या चरित्र अभिनेत्याविरुद्ध त्यांच्या एका चित्रपटाच्या

निर्मातीने, "विनता नंदा" यांनी, बलात्काराचे आरोप केले आहेत. ही घटना सुमारे १९ वर्षांपूर्वी घडल्याचे तिने कथित केले आहे.

या चळवळीने केवळ सिनेसृष्टीतील लैंगिक छळाची प्रकरणे समोर आली असे नाही, तर भारताचे परराष्ट्र राज्यमंत्री व प्रख्यात पत्रकार एम. जे. अकबर यांच्याही विरुद्ध तुशिता पटेल या पत्रकार महिलेने असे आरोप केल्यावर अनेक इतरही महिला पत्रकार पुढे आल्या. आरोपांच्या या गदारोळात एम. जे. यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा १७ ऑक्टोबर २०१८ रोजी दिला. तसेच विनोद दुवा या ज्येष्ठ पत्रकाराविरुद्धही अशाच प्रकारचे आरोप केले गेले आहेत.

**भारतातल्या मीटू चळवळीची २०१९ मधील स्थिती:**

एक वर्षात भारताती मीटू चळवळ मरणासन्न झाली. नाना पाटेकर, गौरांग दोशी, विकास बहल, सुभाष कपूर, अन्नू मलिक, साजिद खान, सुभाष घई, कैलाश खेर, राजकुमार हिरानी, विनोद दुआ, आलोकनाथ, रजत कपूर वगैरेंना मीटू चळवळ जेव्हा जोरात होती तेव्हा काही कामे मिळत नव्हती. ती मिळणे सुरू झाले. नाना पाटेकर यांच्या बाबतीत मुंबई पोलिसांनी कोर्टाला 'चौकशीचा बंद रिपोर्ट' सादर केला. तनुश्री दत्ता परदेशात जिथे होती, तिथे निघून गेली. जेव्हा जेव्हा भारतात येते तेव्हा तेव्हा पत्रकारांना 'मी शेवटपर्यंत लढणार आहे' ची बातमी देऊन परत जाते. ज्या गौरांग दोशीवर फ्लोरा सैनीने आरोप केले होते, त्याला अबू धाबीच्या शाही फॅमिलीकडून मोठी गुंतवणूक मिळाली.

२०१९ सालच्या सुरुवातीलाच 'सुपर ३०' चित्रपट ज्या कंपनीने बनवला तिने 'अंतर्गत चौकशी चालू आहे' चा बहाणा करून दिग्दर्शक विकास बहाल याला 'क्लीन चिट' दिली. आमिर खानसारख्या बड्या चित्रपट निर्मात्याने सुभाष कपूरला आपल्या चित्रपटांत घेतले आहे. आमिर खानच्या कृतीचा परिणाम असा झाला की मीटूचे सर्वात गंभीर आरोप ज्याच्यावर आहेत तो अन्नू मलिक याच्यासाठी 'लॉबीइंग' सुरू झाले. त्याला संगीत स्पर्धांमध्ये परत आणण्यात आले. अन्नू मलिकवर कोणत्याही कोर्टात दावा उभा न झाल्याचे या स्पर्धांच्या आयोजकांनी दाखवून दिले. साजिद खानवर तीन अभिनेत्रींनी आरोप केले होते. त्याचे पुनःस्थापन करण्याचे प्रयत्न चालू आहेत. या प्रयत्नांची सुरुवात तमन्ना भाटियापासून झाली. चंकी पांडेनेही त्याला 'क्लीन चिट' दिली. जॉन अब्राहम, साजिद खानच्या एका चित्रपटाची निर्मिती करीत आहे. सुभाष घई हे जॅकी श्रॉफ आणि अनिल कपूर यांच्याबरोबर 'रामचंद किशनचंद' नावाचा चित्रपट बनवत आहेत. कैलाश खेर हे सरकारी कार्यक्रमांतून गाणी गात आहेत. राजकुमार हिरानी 'मुन्नाभाई' मालिकेला तिसरा चित्रपट बनवण्यात दंग आहेत. बाकी आरोपींचे वकील रेंगाळत चाललेल्या कोर्टांच्या कारवायांनंतर आरोपींची सोडवणूक करण्याच्या बेतात आहेत.

मी टू क्रांतीच्या आगमनाने स्त्रियांना त्यांच्या कथा सांगणे सोपे झाले. आता महिलांना हे समजले आहे की अशा शोषणाला आपण एकट्याच बळी पडलेल्या नाहीयेत. सर्वसाधारणपणे महिलांना असा विश्वास बसवला जातो की याला आपणच जबाबदार आहोत किंवा त्यांना अशा लैंगिक छळाचा सामना करावा लागला ही त्यांची चूक आहे. त्यांच्या मनात असा विचार आहे की, शांत राहणे आणि अशा प्रकरणांची तक्रार न करणे आणि अशा पीडित व्यक्तीला आयुष्यभर सहन करणे. पण मी टू चळवळीने एकमेकांच्या

कथा ऐकून स्त्रिया ताकद गोळा करून बाहेर येऊन तक्रारी मांडण्याचे बळ दिले. लैंगिक अत्याचार होणे ही लाज वाटण्यासारखी बाब नाही हे त्यांच्या लक्षात येऊ लागले आहे. मी टू चळवळीने एक गोष्टीकडे सूचित केली आहे, ती म्हणजे आपल्या देशातील न्याय व्यवस्थेचे अपयश. याचा अर्थ असा होतो की भारतात लैंगिक छळासाठी कायद्यात समाविष्ट केल्या गेल्या तरतुदी अपुऱ्या आहेत.

मी टू चळवळीवरील मुख्य आरोप असा आहे की, येथे महिला न्यायालयात किंवा कायदेशीर व्यवस्थेत जाण्याऐवजी, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर स्वतःला सांगण्यास प्राधान्य देतात ज्याचा अर्थ असा होतो की आमच्या औपचारिक कायदेशीर व्यवस्थेवर विश्वास ठेवत नाहीत.

**आपली प्रगती तपासा:**

१] भारतातील मी टू चळवळीची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

२] मी टू चळवळीने महिलांना लैंगिक शोषणा विरुद्ध आवाज उठवण्यास प्रोत्साहित केले आहे, चर्चा करा.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## २.४ महिला सुरक्षितता

भारतात प्रत्येक व्यक्तीला सर्व प्रकारच्या अत्याचारांपासून संरक्षण मिळण्याचा अधिकार भारतीय संविधानाने प्रदान केला आहे. इतर कोणत्याही व्यक्तींप्रमाणे महिलांना देशाच्या कायद्याद्वारे समान रक्षण आणि संरक्षण दिले जाते. भारतात महिलांना संरक्षण देण्याकरिता विविध कायदे तयार करण्यात आले आहेत जसे की: विशेष विवाह कायदा, १९५४, हुंडा प्रतिबंध कायदा, १९६१, भारतीय घटस्फोट कायदा, १९६९, मातृत्व लाभ कायदा, १८६१, गर्भधारणा वैद्यकीय समाप्ती कायदा, १९७१, बालविवाह प्रतिबंध कायदा, २००६, हे सर्व कायदे महिलांच्या हक्कांच्या रक्षणासाठी निर्माण करण्यात आले आहेत. त्यापैकी काही पुढील प्रमाणे:

### १. राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९०:

राष्ट्रीय महिला आयोग किंवा NCW, थोडक्यात, ही एक भारत सरकारची कायदेशीर संस्था आहे. या संस्थेची स्थापना भारत सरकारने जानेवारी १९९२ मध्ये केली. हा महिला संरक्षण कायदा भारतातील महिलांच्या हक्कांचे प्रतिनिधित्व करतो आणि त्यांच्या

समस्यांसाठी आवाज उठविण्याचे कार्य करतो. भारतीय महिलांची स्थिती सुधारणे आणि त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणावर काम करणे हे या आयोगाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या कायद्याचे उद्दिष्ट:

- महिलांसाठी घटनात्मक आणि कायदेशीर सुरक्षा उपायांचे विश्लेषण करणे
- सुधारात्मक न्यायिक कृती पुढे आणणे
- महिलांशी संबंधित सर्व धोरणात्मक बाबींवर सरकारला मार्गदर्शन करणे.

**२. स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंधक कायदा, १९८६:**

हा कायदा कोणत्याही प्रकारच्या जाहिरातीद्वारे किंवा सार्वजनिक अहवालाद्वारे स्त्रीचे कोणत्याही प्रकारचे अश्लील चित्रण करण्यास मनाई करतो, मग ते लेखन, छपाई, आकृती किंवा इतर कोणत्याही प्रकारे असो. हा कायदा समाजातील स्त्रियांचा सन्मान आणि प्रतिष्ठा जपण्याची आणि टिकवून ठेवण्याची हमी देतो. तंत्रज्ञान दिवसेंदिवस प्रगत होत चालले आहे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या प्रगतीमुळे आणि इंटरनेट प्रत्येकापर्यंत पोहोचल्याने अशा बदलाची आणि क्रांतीची गरज होती.

**३. कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, २०१३ (विशाखा मार्गदर्शक तत्त्वे):**

१९९७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने विशाखा खटल्याच्या आधारे काही शिफारशींचा प्रचार केला, ज्याला विशाखा मार्गदर्शक तत्त्वे म्हणून ओळखले जाऊ लागले. लैंगिक छळाच्या प्रकरणांसाठी भारतासाठी विहित केलेल्या नियमांचा हा एक संच होता. २०१३ मध्ये या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आणखी सुधारणा करण्यात आली, या पद्धतीने कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ (प्रतिबंध आणि निवारण) कायदा २०१३, अस्तित्वात आला. या कायद्याचा हेतू कामाच्या ठिकाणी महिलांना लैंगिक अत्याचार आणि छळापासून सुरक्षा प्रदान करणे आहे. हा कायदा खोट्या आणि दुर्भावनापूर्ण आरोपांपासून देखील स्त्रियांना संरक्षण प्रदान करतो. विशाखा विरुद्ध राजस्थान राज्यामध्ये, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्यानुसार, जेव्हा कामगार स्त्रियांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी त्रास दिला जातो तेव्हा त्यांच्या समानता आणि सुरक्षिततेला गंभीरपणे आव्हान दिले जाते. यासाठी महिलांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी आणि त्यांना सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी विशाखा मार्गदर्शक तत्त्वे सर्वोच्च न्यायालयाने घालून दिली आहेत.

**४. महिलांसाठी इतर मानवी हक्क:**

भारतातील महिलांसाठी उपलब्ध असलेले इतर मानवाधिकार खालीलप्रमाणे आहेत. या सर्वांचा समावेश भारतीय राज्यघटनेत मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरूपात किंवा मूलभूत अधिकारांच्या स्वरूपात केला आहे.

**(१) महिलांना समान वेतन मिळण्याचा अधिकार:**

समान काम समान वेतन कायदा, १९७६ हा सरकारी, गैर-सरकारी, संघटीत, असंघटीत अश्या सर्व क्षेत्रातील महिलांना समान कामासाठी समान वेतन सुनिश्चित करतो. समान काम समान वेतनाचा संबंध लैंगिक आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही. या भारतीय घटनेतील सर्व नागरीकांना बहाल केलेल्या अधिकाराचा भाग आहे.

**(२) स्त्रीयांचा सन्मान आणि शालीनतेचा अधिकार:**

स्त्रियांना सन्मानाने वागवले पाहिजे. महिलांसोबत अशी कोणतीही घटना घडल्यास, तिची वैद्यकीय तपासणी दुसऱ्या महिलेच्या उपस्थितीत करावी लागेल.

**(३) महिलांना कौटुंबिक हिंसाचारा पासून संरक्षणाचा अधिकार:**

महिलांना छेडछाडीपासून संरक्षण देण्याकरिता अथवा लैंगिक छळ किंवा घरगुती हिंसा या पासून संरक्षणा करिता, भारतीय दंड संहितेचे कलम ४९८ नुसार स्त्रीला संरक्षण देण्यात आले आहे. घरेलू हिंसा कायद्यांतर्गत पत्नी, आई, बहीण या प्रत्येक स्वरूपातील स्त्रीला हिंसाचारापासून संरक्षण देण्याचे कार्य केले जाते. हा हिंसाचार भावनिक, शारीरिक, लैंगिक किंवा इतर कोणत्याही प्रकारचा असू शकतो. भादवि ४९८ नुसार नोंविण्यात आलेला गुन्हा अजामीनपात्र असून आरोपीला तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा व दंडा च्या स्वरुपात शिक्षा दिली जाते.

**(४) लैंगिक अत्याचार पीडित महिलांना त्यांची ओळख गुप्त ठेवण्याचा अधिकार:**

ज्या महिलेला लैंगिक अत्याचाराच्या घटनेला सामोरे जावे लागले आहे आणि अशा वाईट अनुभवांना सामोरे जावे लागले आहे, तिला तिच्या गोपनीयतेचे रक्षण करण्याचा अधिकार आहे. लैंगिक अत्याचार झालेल्या महिलांना जिल्हा दंडाधिकाऱ्यांसमोर जबाब नोंदवताना महिला अधिकाऱ्याच्या उपस्थितीत तसे करण्याचा अधिकार आहे.

**(५) महिलांना मोफत कायदेशीर मदत मिळण्याचा अधिकार:**

विधी सेवा प्राधिकरण कायद्यात बलात्कार पीडितेला मोफत कायदेशीर मदत देण्याची तरतूद आहे. त्यांना आवश्यक असल्यास प्राधिकरणाकडून वकील दिले जातात.

**(६) महिलांना रात्री अटक न करण्याचा अधिकार:**

सीआर. पी. सी. चे कलम ४६ (४) नुसार सूर्यास्तानंतर आणि सूर्योदयापूर्वी स्त्रीला अटक केली जाऊ नये अशी तरतूद आहे. काही अपवादात्मक प्रकरणी या अधिकाराचा वापर करता येत नाही. महिला हवालदार आणि कुटुंबीय किंवा मित्रांच्या उपस्थितीतच महिलेची चौकशी केली जाऊ शकते, अशी तरतूद कायद्यात आहे.

**(७) महिलांना आभासी (Virtual) तक्रारी नोंदवण्याचा अधिकार:**

कोणत्याही कारणास्तव एखादी महिला तक्रार दाखल करण्यासाठी पोलिस स्टेशनमध्ये शारीरिकरित्या उपस्थित राहण्यास सक्षम नसेल, तर त्यांना आभासी तक्रार दाखल

करण्याचा अधिकार आहे. महिला ई-मेलच्या स्वरूपात किंवा पत्राच्या स्वरूपात देखील तक्रार दाखल करू शकतात.

**(८) चोरून पाठलाग करणाऱ्या व्यक्ती विरुद्ध तक्रार करण्याचा अधिकार (IPC ३५४ डी):**

भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ डी नुसार, जर एखाद्या महिलेचा पाठलाग केला जात असेल किंवा कोणीतरी एखाद्या प्रकारच्या परस्पर संवादासाठी महिलेचा पाठलाग करत असेल आणि त्या महिलेला त्यात रस नसेल, तर भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ डी नुसार संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**(९) महिलांना शून्य एफआयआरचा अधिकार:**

सीआर. पी. सी. कलम १५४ नुसार महिलां संदर्भातील गुन्ह्याची प्रथम माहिती अहवाल (FIR) जो गुन्हा ज्या ठिकाणी घडला आहे त्याची नोंद महिला ते ठिकाण ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत आहे त्या ठिकाणी अथवा कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये करू शकतो किंवा ज्या पोलीस स्थानकात प्रकरण येते त्या पोलीस ठाण्यात शून्य एफआयआर दाखल करू शकतो.

**महिला संरक्षण व अधिकारासाठी कार्यरत संस्था:**

शेवटी, सर्व सांप्रदायिक अशांततेचे मूळ कारण म्हणजे देशभर पसरलेले जमातवादी वातावरण आणि विविध समुदायांमध्ये निर्माण झालेला जमात तणाव. सांप्रदायिक वातावरण जमातवादी विचारसरणीच्या लोकांना जमातवादी द्वेषाची बीजे पेरण्यासाठी आणि जमातवादी हिंसाचाराचे कटू पीक येईपर्यंत त्यांचे पालनपोषण करण्यासाठी तयार माती प्रदान करते. विकसित होत असलेला समाज म्हणून आपण, विशेषत: तरुणांनी, जमातवादी शक्तींशी लढण्यासाठी आणि मानवतेसाठी आणि आपल्या महान राष्ट्राच्या सुरक्षेसाठी क्षुद्रतेच्या वरती एकत्र येण्याची गरज आहे.

## ६.१२ प्रश्न

१. जमातवादी हिंसाचारांचे स्वरुप स्पष्ट करा.

२. जमातवादी हिंसाचारांची विविध कारणे सविस्तर लिहा.

३. जमातवादी हिंसाचार रोखण्यासाठी उपाय-योजना स्पष्ट करा.

४. जमातवादाची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

५. जमातवादी हिंसाचाराचे परिणाम स्पष्ट करा.

## ६.१३ संदर्भ


- आचार्य डॉ. दुर्गादास बसु भारत का संविधान
- डॉ. साबळे आर.डी. भारतीय शासन आणि राजकारण
- डॉ. होशियार सिंह भारतीय प्रशासन
- डॉ. लांडगे पी. एस. भारतीय शासन आणि राजकारण
- डॉ. लांडगे पी. एस. भारतीय राजकारणाचे बदलते स्वरुप व उपाय
- ps://en.wikipedia.org/wiki/Communal_violence
- https://www.sudharak.in/२०१५/०७/४९४/
- https://lotusarise.com/communal-violence-upsc/
- https://www.sudharak.in/१९९३/१२/७६७८/
- http://www.sahityasanskruti.com/node/२२८
- धार्मिक दंगली का होतात? -दैनिक लोकसत्ता संकेतस्थळ Archived २००४-०४-२९ at the Wayback Machine. १२ ऑगस्ट २०१११ भाप्रवे १९.४५ वाजता जसे दिसले
- बिपिन चंद्र आधूनिक भारत का इतिहास.


*****

# ७

# मानवाधिकार आयोग

**घटक रचना**

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ राष्ट्रीय मानवाधिकार आयोग म्हणजे काय ?

७.३ मानवी हक्क काय आहेत ?

७.४ राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना

७.५ राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची रचना

७.६ आयोगाचे कार्य आणि अधिकार

७.७ आयोगाचा कार्यात्मक दृष्टीकोन

 ७.७.१ तपास विभाग

 ७.७.२ तक्रारींची चौकशी

 ७.७.३ चौकशीनंतरचे टप्पे

७.८ सांप्रदायिक हिंसाचाराची प्रकरणे हाताळण्यासंदर्भात NHRC ची भूमिका: उदाहरणात्मक प्रकरणे

 ७.८.१ राष्ट्रीय मानवाधिकार आयोग विरुद्ध अरुणाचल प्रदेश राज्य

 ७.८.२ पंजाब सामूहिक अंत्यसंस्कार आदेश

 ७.८.३ गुजरात जातीय दंगली

 ७.८.४ मुझफ्फरनगर दंगल २०१३

७.९ राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या मर्यादा

७.१० सारांश

७.११ प्रश्न

७.१२ संदर्भ

## ७.० उद्दिष्टे

या सदरील घटकाच्या अभ्यासामध्ये आपण :

- राष्ट्रीय मानवाधिकार आयोगची कार्यपद्धती समजणे.
- मानवी हक्क काय आहेत ते माहीती होईल.
- राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची रचना समजणे.

- सांप्रदायिक हिंसाचाराची प्रकरणे हाताळण्यासंदर्भात NHRC ची भूमिका समजून होणे.
- राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या मर्यादा समजणे घेणे.

## ७.१ प्रस्तावना

मानवाधिकारांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी राष्ट्रीय संस्थांवरील पहिल्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत स्वीकारण्यात आली होती आणि संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १९९१ रोजी स्वीकारली होती. २० डिसेंबर १९९३ ठराव ४८/ १३४ मध्ये समर्थित होते.

## ७.२ राष्ट्रीय मानवाधिकार आयोग म्हणजे काय ?

भारताचा राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (NHRC) ही एक स्वायत्त वैधानिक संस्था आहे. याची स्थापना १२ ऑक्टोबर १९९३ रोजी झाली. मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ अंतर्गत त्याची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची घटना पॅरिसच्या तत्त्वांशी सुसंगत आहे जी ऑक्टोबर, १९९१ मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या मानवाधिकारांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी राष्ट्रीय संस्थांवरील पहिल्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत स्वीकारण्यात आली होती आणि संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १९९१ रोजी स्वीकारली होती. २० डिसेंबर १९९३ ठराव ४८/ १३४ मध्ये समर्थित होते. हा आयोग मानवी हक्कांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी भारताच्या काळजीचे प्रतीक किंवा मार्गदर्शक आहे.

मानवी हक्क संरक्षण कायद्याचे कलम १२(१)(d) मानवी हक्कांना घटनेने हमी दिलेले किंवा आंतरराष्ट्रीय करारांमध्ये समाविष्ट केलेले आणि भारतातील न्यायालयांद्वारे लागू करण्यायोग्य व्यक्तीचे हक्क म्हणून परिभाषित करते. हा आयोग देशातील मानवी हक्कांचा पाळत ठेवणारा आहे, तो संविधानाने निश्चित केलेल्या आणि आंतरराष्ट्रीय करारांमध्ये केलेल्या वैयक्तिक हक्कांचे रक्षक आहे. ही एक बहुसदस्यीय संस्था आहे. त्याचे पहिले अध्यक्ष न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा होते. सध्या (२०१८) न्यायमूर्ती एच.एल.दत्तू हे सध्याचे अध्यक्षपद भूषवत आहेत. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची घटना पॅरिसच्या तत्त्वांशी सुसंगत आहे जी मानवाधिकारांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी राष्ट्रीय संस्थांवरील पहिल्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेने स्वीकारली होती. ऑक्टोबर, १९९१ मध्ये पॅरिसमध्ये आयोजित करण्यात आला होता. २० डिसेंबर १९९३ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने ४८/१३४ ठराव म्हणून स्वीकार केला आणि त्याला मान्यता दिली.

## ७.३ मानवी हक्क काय आहेत ?

मानवी प्रतिष्ठा हे मानवी हक्कांचे सार आहे. या पैलूचे व्यापक आकलन आणि व्यक्तीच्या प्रतिष्ठेच्या विशालतेचे कौतुक, मानवी कुटुंबाचे एकक, ज्याने मानवी हक्कांची खरी व्याप्ती परिभाषित केली पाहिजे. 'सर्वांसाठी सर्व मानवी हक्क' आणि 'जग हे एक कुटुंब आहे' या संकल्पना आहेत ज्या मानवी हक्कांच्या विस्तारित अर्थावर अवलंबून आहेत आणि जागतिक गावातील मानव जातीच्या प्रत्येक सदस्याला संपूर्ण मानवी सन्मानाची हमी देतात. मानवी हक्कांचे जागतिकीकरण करून ते सर्वत्र स्वीकारले जाणे आणि जागतिक

विषमता नष्ट करणे हे सध्याच्या मानवी हक्क चळवळीचे स्पष्टीकरण आहे. नवीन सहस्रकामधील मानवी हक्क चळवळीचा अजेंडा हा साध्य करणे आवश्यक आहे.

UN चार्टर, मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा आणि अनेक आंतरराष्ट्रीय करार तसेच भारतीय राज्यघटनेमध्ये मानवी प्रतिष्ठेवर भर देण्यात आला आहे, ज्यात त्याच्या प्रस्तावनेत 'व्यक्तीचा सन्मान' हे मुख्य मूल्य म्हणून नमूद केले आहे. मानवी हक्क अविभाज्य, परस्परावलंबी आणि परस्परसंबंधित आहेत आणि त्यांचा मानवी विकासाशी निश्चित संबंध आहे; दोघेही समान उद्देशाने एक समान दृष्टी सामायिक करतात. या हक्कांच्या वेगवेगळ्या पिढीवर आधारित मानवी हक्कांच्या वर्गीकरणावरील वादविवाद पूर्णपणे शैक्षणिक आहे कारण ते सर्व एकत्र असणे आवश्यक आहे. मानवी हक्कांचा आदर हा मानवी विकासाचा आणि प्रत्येक व्यक्तीच्या पूर्ण क्षमतेच्या प्राप्तीचा मार्ग आहे, ज्यामुळे राष्ट्राच्या प्रगतीसह मानवी संसाधनांमध्ये वाढ होते. मानवी विकासाद्वारे लोकांचे सक्षमीकरण हे मानवी हक्कांचे उद्दिष्ट आहे.

## ७.४ राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना

मानवाधिकारांच्या संवर्धनासाठी आणि संरक्षणासाठी स्वतंत्र संस्था स्थापन करण्याची गरज भारत सरकारला जाणवली. भारत सरकारद्वारे स्वायत्त राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (कमिशन) ची स्थापना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय साधनांअंतर्गत मानवाधिकार तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बांधिलकी दर्शवते. १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला स्थापन झालेल्या राष्ट्रीय मानवाधिकार संस्थांपैकी काही दक्षिण आशियाई देशांमध्येही हा आयोग आपल्या प्रकारचा पहिला आहे. हा आयोग १२ ऑक्टोबर १९९३ रोजी मानवाधिकार संरक्षण कायदा १९९३ च्या आधारे अंमलात आला. चौदा भारतीय राज्यांनी त्यांच्या राज्यांमधील उल्लंघनांचा सामना करण्यासाठी स्वतःचे मानवाधिकार आयोग देखील स्थापन केले आहेत. कायद्यामध्ये त्याचे कार्य आणि अधिकार, रचना आणि इतर संबंधित पैलूंशी संबंधित व्यापक तरतुदी आहेत.

## ७.५ राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची रचना

१. आयोगाच्या घटनेने कायद्याच्या कलम ३ मध्ये म्हटले आहे, “केंद्र सरकार राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाला या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी ज्ञात असलेली एक संस्था स्थापन करेल.

२. आयोगाचा समावेश असेल:

(a) सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश राहिलेले अध्यक्ष.

(b) एक सदस्य जो सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा राहिला आहे.

(c) एक सदस्य जो उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश आहे किंवा राहिला आहे.

(d) मानवी हक्कांशी संबंधित बाबींचे ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्या व्यक्तींमधून दोन सदस्य नियुक्त केले जातील.

३. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती राष्ट्रीय आयोग आणि राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षांना खंड (b) ते (j) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कार्ये पार पाडण्यासाठी आयोगाचे सदस्य मानले जातील. कलम १२.

४. एक सरचिटणीस असेल जो आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि तो अशा अधिकारांचा वापर करेल आणि आयोगाची अशी कार्ये पार पाडेल जी आयोग त्याला सोपवेल.

५. आयोगाचे मुख्यालय दिल्ली असेल आणि आयोग, केंद्र सरकारच्या पूर्वीच्या मान्यतेने, भारतातील इतर ठिकाणी कार्यालये स्थापन करू शकेल.

६. **लोकशाहीचा चौथा स्तंभ:** भारतीय लोकशाही तीन स्तंभांमधील सत्ता पृथक्करणाच्या तत्त्वावर आधारित आहे. हे तीन स्तंभ म्हणजे कायदेमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका. यातील प्रत्येक स्तंभ एकमेकांशी 'चेक अँड बॅलन्स' या तत्त्वानुसार कार्य करतो.

तथापि, सध्या शासन आणि प्रशासनाच्या गुंतागुंतीसाठी स्वतंत्र संस्थांची आवश्यकता आहे, जी तपासणीसारख्या महत्त्वाच्या कार्यांसाठी विशेष आहेत. या स्वतंत्र संस्थांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणतात.

अनेकदा माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो, परंतु राष्ट्र-राज्याच्या आधुनिक संकल्पनेत घटनात्मक आणि वैधानिक (निवडणूक आयोग, नियंत्रक आणि महालेखा परीक्षक, केंद्रीय आणि राज्य माहिती आयोग, केंद्रीय आणि राज्य मानवी हक्क आयोग) संस्थांचाही विचार केला जातो. लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो.

## ७.६ आयोगाचे कार्य आणि अधिकार

कायद्याच्या कलम १२ अन्वये आयोगाला व्यापक अधिकार आणि कार्ये देण्यात आली आहेत. कलम १२ च्या परिच्छेद (अ) मध्ये अशी तरतूद आहे की, ज्या लोकसेवकाविरुद्ध मानवी हक्कांचे उल्लंघन केल्याची तक्रार नोंदवली गेली आहे अशा कोणत्याही लोकसेवकाविरुद्ध आयोग स्वतःहून चौकशी करू शकतो. कलम १२(b) अशी तरतूद करते की अशा न्यायालयाच्या मान्यतेने न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा कोणताही आरोप असलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये आयोग हस्तक्षेप करू शकतो.

कलम १२(c) आयोगाला मुख्यत्वे कारागृह किंवा कोठडीतील न्यायशास्त्राचे निरीक्षण करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारला कोणत्याही तुरुंगात किंवा इतर संस्थेला भेट देण्याचे अधिकार देते. आयोग अशा भेटींच्या आधारे राज्य सरकारांना शिफारसी करू शकतो. आयोगाने अनेक तुरुंगांना भेटी दिल्यानंतर असे आढळून आले की, ज्या तुरुंगांमध्ये कैद्यांना राहावे लागते, तेथे दयनीय परिस्थिती आहे. त्याच्या मते, हे कल्पनांच्या

अभावामुळे नाही तर तुरुंगातील परिस्थिती आणि कैद्यांचे हक्क आणि खटल्यांच्या अधीन असलेल्या उदासीनतेमुळे आणि प्राधान्याच्या अभावामुळे आहे. आयोगाने भारतातील तुरुंगातील परिस्थिती सुधारण्यासाठी आधीच कार्यवाही सुरू केली आहे, आणि तुरुंगांशी संबंधित सर्व प्रचलित अहवालांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली आहे. आयोगाने नवीन अखिल भारतीय जेल मॅन्युअल तयार करण्याची शिफारस केली आहे आणि १८९४ च्या जुन्या भारतीय तुरुंग कायद्यात सुधारणा करण्याची शिफारस देखील केली आहे. जेव्हा एखादी व्यक्ती तुरुंगाच्या दारात प्रवेश करते तेव्हा मानवी प्रतिष्ठा सोडली जाऊ नये असे मानणाऱ्या सर्वांकडून आयोगाने मदत मागितली.

कलम १२(d) आयोगाला मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी संविधानात किंवा सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या सुरक्षेचे पुनरावलोकन करण्याचा आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपायांची शिफारस करण्याचा अधिकार देते. कलम १२(e) अंतर्गत मानवी हक्कांचा उपभोग रोखणाऱ्या दहशतवादाच्या कारणांचे पुनरावलोकन करण्यासाठी आणि योग्य उपाययोजनांची शिफारस करण्यासाठी स्वतंत्र तरतूद आहे. कलम १२(f) मध्ये आंतरराष्ट्रीय मानवाधिकार साधनांशी संबंधित सर्व करारांचा अभ्यास करणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारसी करणे आवश्यक आहे. कलम १२ (जी) मध्ये मानवी हक्कांच्या क्षेत्रात संशोधनाला चालना देण्याची तरतूद आहे. कलम १२(h) आयोगाला समाजाच्या विविध घटकांमध्ये मानवी हक्क साक्षरता पसरवण्याचा आणि प्रकाशन, माध्यमे, चर्चासत्रे आणि इतर उपलब्ध माध्यमांद्वारे या अधिकारांच्या संरक्षणासाठी उपलब्ध संरक्षणाची जागरूकता वाढविण्याचे अधिकार देते. कलम १२(i) आयोगाला मानवाधिकारांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्थांच्या (एनजीओ) प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी अधिकार देते. शेवटी, कलम १२(j) मानवी हक्कांच्या संवर्धनासाठी आवश्यक वाटेल अशी इतर कार्ये प्रदान करते.

## ७.७ आयोगाचा कार्यात्मक दृष्टीकोन

१९९३ च्या कायद्यांतर्गत आयोगावर सोपविण्यात आलेली जबाबदारी आयोग आणि स्वयंसेवी संस्था यांच्यातील घनिष्ठ संबंध विकसित केल्याशिवाय पुरेशा प्रमाणात पार पाडली जाऊ शकत नाही. आयोगाच्या सुरुवातीच्या काळापासूनचे सर्व काम, एका अर्थाने, देशात "मानवी हक्कांची संस्कृती" निर्माण करण्याच्या उद्देशाने आहे. तथापि, गेल्या नऊ वर्षांच्या कालावधीत, आयोगाने विशेषत: मानवी हक्कांच्या शिक्षणासाठी अनेक पावले उचलली आहेत. या चरणांमध्ये, इतर गोष्टींसह, समाविष्ट आहे:

शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांवर शिक्षणासाठी साहित्य तयार करण्यासाठी मनुष्यबळ विकास मंत्रालय, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (NCERT) आणि राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) सोबत काम करणे;

विद्यापीठ स्तरावरील अभ्यासक्रमांच्या विकासासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) सोबत काम करणे; बंगळुरू येथील नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटीमध्ये मानवी हक्कांसाठी खुर्ची प्रदान करणे;

सार्वजनिक सेवक, पोलीस, निमलष्करी दल आणि सैन्य यांच्यासाठी प्रशिक्षण संस्थांमध्ये मानवी हक्कांवरील अभ्यासक्रमांना प्रोत्साहन देणे; न्यायिक अधिकाऱ्यांसाठी हँडबुक तयार करणे;

वैद्यकीय व्यावसायिकांपासून रोटेरियन आणि राजकीय पक्षांचे नेतृत्व अशा विविध गटांशी संवाद साधत, त्यांना त्यांच्या संबंधित अजेंड्यावर मानवी हक्कांचे मुद्दे ठेवण्याचा आग्रह करतात.

गैर-सरकारी संस्थांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना पाठिंबा देणे, कारण देशातील मानवाधिकारांच्या चांगल्या संरक्षणासाठी त्यांची भूमिका केंद्रिय महत्त्वाची आहे.

### ७.७.१ तपास विभाग:

आयोगामध्ये एक सुव्यवस्थित तपास विभाग आहे. आयोगाकडे आलेल्या तक्रारींची तपासणी करणे हे या तपास विभागाचे प्राथमिक कर्तव्य आहे. यासाठी तपास पथक घटनास्थळी तपास करत आहे. या कायद्यात आयोगाच्या तपासाची भूमिका स्पष्ट केली आहे. कलम ११ च्या उपकलम १(b) मध्ये अशी तरतूद आहे, "असे पोलीस आणि तपासी कर्मचारी आणि पोलीस महासंचालक पदाच्या खाली नसलेले अधिकारी आणि आयोगाच्या कार्याच्या कार्यक्षम कामगिरीसाठी आवश्यक असे इतर अधिकारी आणि कर्मचारी. "

### ७.७.२ तक्रारींची चौकशी:

आयोगाच्या कार्याबाबत जनजागृतीमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये आयोगाला प्राप्त झालेल्या मानवी हक्क उल्लंघनाच्या तक्रारींच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. आयोगाला प्राप्त झालेल्या प्रकरणांपैकी अनेक प्रकरणे अतिशय मार्मिक होती, परंतु आयोगाच्या नियमन ८ मुळे ती आयोगाला विचारात घेता आली नाहीत. आयोगाने या प्रकरणांची विस्तृतपणे खालील श्रेणींमध्ये विभागणी केली आहे:

१) कोठडीतील मृत्यू;

२) पोलिसांचा अतिरेक (छळ, बेकायदेशीर अटक\ बेकायदेशीर अटक, खोटे आरोप इ.;

३) खोट्या चकमकी;

४) महिला आणि मुलांशी संबंधित प्रकरणे;

५) दलितांवरील अत्याचार/अल्पसंख्याक समाजाचे सदस्य\ अपंग

६) बंधपत्रित कामगार

७) सशस्त्र दल\ निरा लष्करी दल आणि

८) इतर महत्त्वाची प्रकरणे.

एकदा आयोगाने तक्रार स्वीकारली की, तो तक्रारीबाबत संबंधित सरकार किंवा प्राधिकरणाकडून अभिप्राय मागतो. संबंधित प्राधिकरणाच्या टिप्पण्या मिळाल्यानंतर, प्रकरणाच्या गुणवत्तेची तपशीलवार नोंद आयोगाच्या विचारासाठी तयार केली जाते. त्यानंतर, निर्देश आणि कायद्याच्या कलम १८ आणि १९ अंतर्गत आयोगाच्या शिफारशी संबंधित सरकारला कळवल्या जातात.

**७.७.३ चौकशीनंतरचे टप्पे:**

चौकशी पूर्ण झाल्यावर, आयोग या कायद्याच्या कलम १८ अंतर्गत खालीलपैकी कोणतीही पावले उचलू शकतो, म्हणजे:

१) जेथे मानवी हक्कांचे उल्लंघन किंवा सार्वजनिक सेवकाने मानवी हक्कांचे उल्लंघन रोखण्यात निष्काळजीपणा केल्याचा खुलासा होतो, तेव्हा तेथे संबंधित सरकारला किंवा अधिकार्यांना खटला चालवण्याची किंवा अशा इतर कारवाईची कार्यवाही सुरू करण्याची शिफारस करू शकते. आयोगाला संबंधित व्यक्ती किंवा व्यक्तींविरुद्ध योग्य वाटेल.

२) न्यायालयाला आवश्यक वाटेल अशा निर्देश, आदेश किंवा युनिट्ससाठी सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाकडे संपर्क साधा.

३) आयोगाला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे पीडित व्यक्तीला किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांना अशी तात्काळ अंतरिम मदत मंजूर करण्यासाठी संबंधित सरकार किंवा प्राधिकरणाकडे शिफारस करणे;

४) खंड (५) च्या तरतुदींच्या अधीन राहून याचिकाकर्त्याला किंवा त्याच्या प्रतिनिधीला चौकशी अहवालाची प्रत प्रदान करा.

५) आयोग त्याच्या चौकशी अहवालाची प्रत त्याच्या शिफारशींसह संबंधित सरकारला किंवा प्राधिकरणाला पाठवेल, जो एक महिन्याच्या आत, किंवा आयोगाने अनुमती दिल्याप्रमाणे, अहवालावर आपल्या टिप्पण्या पुढे पाठवेल, आयोगाकडे करण्यात आलेल्या किंवा प्रस्तावित केलेल्या कारवाईचा समावेश आहे.

६) आयोग आपला चौकशी अहवाल संबंधित सरकार किंवा प्राधिकरणाच्या टिप्पण्यांसह प्रकाशित करेल, जर असेल तर, आणि आयोगाच्या शिफारशींवर संबंधित सरकार किंवा प्राधिकरणाने केलेली किंवा प्रस्तावित केलेली कारवाई आयोगाने अनेक प्रकरणांमध्ये कायद्याच्या कलम १८(१) अंतर्गत मानवी हक्कांच्या उल्लंघनासाठी जबाबदार असलेल्या लोकसेवकावर खटला चालवण्याची शिफारस केली आहे. मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास, आयोग कायद्याच्या कलम १८ (३) अंतर्गत संबंधित राज्याने पीडित व्यक्तीला किंवा कुटुंबातील सदस्यांना तात्काळ अंतरिम मदत देण्याची शिफारस करू शकते.

वरील तरतुदींवरून असे दिसते की आयोग कोणतीही परिस्थिती हाताळण्यासाठी पूर्णपणे सुसज्ज आहे, परंतु जेव्हा राज्य सरकार त्याच्या शिफारशींचे पालन करण्यास नकार देते

तेव्हा प्रत्यक्षात आयोग शक्तीहीन असतो. आयोगाला केवळ शिफारसी अधिकार आहेत आणि आयोगाच्या शिफारशी कायदेशीररित्या बंधनकारक नाहीत. तथापि, बहुतेक प्रकरणांमध्ये आयोगाच्या शिफारशींचे पालन संबंधित सरकार किंवा प्राधिकरणाने केले आहे, जसे की अनेक पोलिस अधिकार्यांवर केलेल्या खटल्यांवरून आणि विविध प्रकरणांमध्ये पीडितांना दिलेली भरपाई यावरून स्पष्ट होते.

## ७.८ सांप्रदायिक हिंसाचाराची प्रकरणे हाताळण्यासंदर्भात NHRC ची भूमिका: उदाहरणात्मक प्रकरणे

### ७.८.१ राष्ट्रीय मानवाधिकार आयोग विरुद्ध अरुणाचल प्रदेश राज्य:

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये आयोगाने भारताच्या सर्वोच्च न्यायालयासमोर जनहित याचिका म्हणून रिट याचिका दाखल केली आहे. आयोगाने ही याचिका मुख्यत्वे संविधानाच्या अनुच्छेद २१ अन्वये सुमारे ६५,००० चकमा \ हाजोंग आदिवासींच्या मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी दाखल केली आहे. .या प्रकरणात कप्तान जल प्रकल्पामुळे १९६४ मध्ये पूर्वीच्या पूर्व पाकिस्तानातील मोठ्या संख्येने निर्वासित विस्थापित झाले. या विस्थापित चकमांनी भारतातील ईशान्य राज्यांमध्ये म्हणजे आसाम आणि त्रिपुरामध्ये आश्रय घेतला होता.

युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने अरुणाचल प्रदेश सरकारला राज्यात राहणाऱ्या प्रत्येक चकमाचे जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्य सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले. निर्वासितांना मूलभूत अधिकार लागू होण्याबाबतच्या शंकांचे निरसन करण्यातही या निकालाचे महत्त्व आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ अन्वये परकीयांना जगण्याच्या आणि स्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण मिळण्याचा अधिकार या निर्णयानुसार आहे. आयोगाने वेळीच केलेल्या हस्तक्षेपामुळे AAPSU मधील हजारो निष्पाप चकमा निर्वासितांचे प्राण वाचले आहेत.

### ७.८.२ पंजाब सामूहिक अंत्यसंस्कार आदेश:

भारताच्या सर्वोच्च न्यायालयासमोर दोन रिट याचिका दाखल करण्यात आल्या होत्या ज्यात पंजाब पोलिसांनी "चकमक" म्हणून संबोधल्या गेलेल्या कथितरित्या मारल्या गेलेल्या व्यक्तींच्या मोठ्या प्रमाणावर अंत्यसंस्कार केल्याबद्दल गंभीर आरोप आहेत. रिट याचिकांचा मुख्य जोर असा होता की तेथे न्यायबाह्य फाशी आणि घाईघाईने आणि गुप्त अंत्यसंस्कार करण्यात आले ज्यामुळे राज्य कारवाईसाठी जबाबदार होते. या याचिका मुख्यत्वे शिरोमणी अकाली दलाच्या मानवाधिकार शाखेने १६ जानेवारी १९९५ च्या प्रेस नोटवर "गायब" "स्मशानभूमी" या मथळ्याखाली अवलंबून होत्या.

पंजाब पोलिसांनी अनोळखी असे लेबल लावल्यानंतर मोठ्या प्रमाणात मानवी मृतदेहांवर अंत्यसंस्कार केल्याचा आरोप या चिठ्ठीत करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यासंदर्भात सादर केलेल्या अहवालाची तपासणी केल्यानंतर, अहवालात असे आढळून आले की ५८५ मृतदेह पूर्णपणे ओळखले गेले, २७४ अंशतः ओळखले गेले आणि १२३८ अज्ञात आहेत.

अहवालात स्पष्टपणे उल्लंघन केल्याचा खुलासा करण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणावर मानवी हक्क. १२ डिसेंबर १९९६ रोजी न्यायालयाने आयोगाला या प्रकरणाची कायद्यानुसार तपासणी करून खटल्याशी संबंधित सर्व मुद्दे निश्चित करण्याची विनंती केली. प्रकरण अद्याप आयोगासमोर अंतिम विचारासाठी प्रलंबित असले तरी, आयोगाने काही प्रकरणांमध्ये ८९ मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना दोन लाख पन्नास हजार रुपये (रु. २,५०,०००/-) नुकसानभरपाई मंजूर केली. मंजूर करताना भारतातील न्यायालयांनी विकसित केलेल्या कायद्यांच्या आधारे आयोगाने मानवाधिकारांच्या उल्लंघनासाठी उपचारात्मक, प्रतिपूर्ती, दंडात्मक आणि अनुकरणीय नुकसान भरपाईसाठी विकसित केलेल्या कायद्यांवर अवलंबून आहे.

### ७.८.३ गुजरात जातीय दंगली:

२००२ च्या सुरुवातीला गुजरातमध्ये झालेल्या जातीय दंगलीवर आयोगाने स्वतःहून कारवाई केली, कारवाई करण्याचा निर्णय हा छापील आणि इलेक्ट्रॉनिक अशा दोन्ही माध्यमांच्या अहवालांवर आधारित होता. आयोगाला हस्तक्षेप करण्याची विनंती करणारा ई-मेल देखील प्राप्त झाला. आयोगाच्या एका चमूने १९ ते २२ मार्च २००२ दरम्यान गुजरातला भेट दिली होती आणि एक गोपनीय अहवाल तयार केला होता, जो नंतर लोकांसमोर आला होता. गुजरात सरकारला त्यातील मजकुरावर भाष्य करण्याची संधी देण्यासाठी गोपनीय अहवालाचे प्रकाशन सुरुवातीला रोखण्यात आले होते, त्यात असलेल्या आरोपांची संवेदनशीलता लक्षात घेता. दुर्दैवाने राज्य सरकारने या अहवालाची फारशी दखल घेतली नाही. आयोगाने असे निरीक्षण नोंदवले की, ज्यांनी ते स्थापन केले आहे त्यांच्या सर्वांचे जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठेच्या हक्कांचे रक्षण करण्याची आपली प्राथमिक आणि अटळ जबाबदारी पार पाडण्यात राज्य अपयशी ठरले आहे.

२७ फेब्रुवारी २००२ रोजी गोध्रा येथे घडलेल्या शोकांतिकेपासून आणि त्यानंतर झालेल्या हिंसाचारापासून सुरू होऊन, गुजरातमधील मानवी हक्कांच्या परिस्थितीवर टिप्पणी केल्याशिवाय आयोगाच्या मुख्य कार्याचा कोणताही लेखाजोखा पूर्ण होऊ शकत नाही.

आयोगाची मते १ आणि ६ मार्च २००२, १ एप्रिल २००२, ३१ मे २००२ आणि १ जुलै २००२ च्या कार्यवाहीमध्ये तपशीलवार नमूद केली आहेत, हे सर्व आयोगाच्या वेबसाइटवर (www.nhrc.nic.in) पाहता येतील. .

त्या कार्यवाहीमध्ये, आयोगाने निष्कर्ष काढला की, त्यांच्या मते, जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठेशी संबंधित अधिकारांचे सातत्याने होत असलेले उल्लंघन नियंत्रित करण्यात राज्य सरकारचे सर्वसमावेशक अपयश आले आहे यात शंका नाही. जुलै २००२ च्या सुरुवातीस, आयोगाने नमूद केले की त्यात घट झाली आहे. अलिकडच्या आठवड्यात हिंसाचार आणि काही सकारात्मक घडामोडी घडल्या आहेत. तथापि, जखमा भरून काढणे आणि शांतता आणि सौहार्दाच्या भविष्याकडे पाहणे आवश्यक आहे हे ओळखून आयोगाने या उच्च आदर्शांचा पाठपुरावा न्याय आणि राज्यघटनेच्या मूल्यांचे समर्थन करण्यावर भर दिला.

आयोगाने या प्रकरणावर ताशेरे ओढले असल्याने सध्याच्या लेखात या विषयावर अधिक भाष्य करणे अयोग्य ठरेल. या टप्प्यावर हे लक्षात ठेवणे पुरेसे आहे की, गुजरातमध्ये घडलेल्या दु:खद घटनांचा संपूर्ण देशावर गंभीर परिणाम झाला, ज्याचा त्याचा स्वाभिमान आणि राष्ट्रांच्या समुदायात असलेला सन्मान या दोन्हींवर परिणाम झाला. आयोगाच्या दृष्टीकोनातून, राज्यघटनेवरील निष्ठा आणि कराराच्या जबाबदाऱ्यांबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले. नागरी आणि राजकीय अधिकारांचे संरक्षण तसेच आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकारांच्या संदर्भात स्पष्ट परिणाम होते. परंतु सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आयोगाच्या दृष्टीने, घटनेने भारतीय नागरिकांच्या जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठेच्या मूलभूत हक्कांच्या उल्लंघनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

आयोगाने असे निरीक्षण नोंदवले आहे की, संविधानात हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांचे समर्थन करणे आणि भारत हा राज्य पक्ष असलेल्या करारांचे पालन करणे हे त्याचे वैधानिक दायित्व आहे. त्यामुळे मानवी हक्कांवरील न्यायशास्त्रात सुसंगतपणे योगदान देणे आयोगाचे कर्तव्य आहे.

### ७.८.४ मुझफ्फरनगर दंगल २०१३:

उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर जिल्हा आणि लगतच्या भागात झालेल्या दंगलींबद्दल राष्ट्रीय मानवाधिकार आयोग अत्यंत चिंतेत आहे. या दुर्दैवी परिस्थितीवर मात करण्यासाठी समाजातील सर्व घटकांना शांतता आणि सौहार्द राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दंगलीचा सर्वाधिक फटका सर्वसामान्यांना बसत आहे कारण लोकांना अन्न, पाणी, आरोग्य आदी मूलभूत सुविधा मिळण्यासह विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि सामान्य स्थिती पूर्ववत करण्यासाठी सरकारी यंत्रणा प्रयत्न करत असतानाही घडामोडींवर लक्ष ठेवत आहे.

राज्य सरकार पीडितांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना योग्य ती भरपाई देण्यासाठी आणि दोषींना न्याय मिळवून देण्यासाठी योग्य उपाययोजना करेल अशी आशा आहे. परिस्थिती नियंत्रणात आणून समाजात जातीय सलोखा आणि शांतता प्रस्थापित करून जीवित आणि मालमत्तेची कोणतीही हानी होऊ नये यासाठी राज्य सरकारनेही कठोर पावले उचलली पाहिजेत.

## ७.९ राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या मर्यादा

NHRC कडे तपासासाठी कोणतीही विशेष यंत्रणा नाही. बहुतेक प्रकरणांमध्ये, ते संबंधित सरकारला या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देते.

एनएचआरसीला कोणत्याही विषयासंदर्भात शिफारसी करण्याचा अधिकार आहे, तो निर्णयाची अंमलबजावणी करण्यास कोणावरही सक्ती करू शकत नाही. घटना घडल्यापासून एक वर्षानंतर दाखल झालेल्या तक्रारींची NHRC चौकशी करू शकत नाही आणि त्यामुळे अनेक तक्रारींची चौकशी होत नाही. अनेकदा सरकार NHRC च्या शिफारशी पूर्णपणे नाकारते किंवा त्यांची अंशतः अंमलबजावणी करते. राज्य मानवी हक्क आयोग केंद्र सरकारकडून कोणत्याही प्रकारची माहिती मागू शकत नाहीत, याचा अर्थ

त्यांना केंद्राच्या अंतर्गत असलेल्या सशस्त्र दलांची तपासणी करण्यापासून रोखले जाते. आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्यांची नियुक्ती करणाऱ्या निवड समितीमध्ये राजकीय पार्श्वभूमीच्या लोकांचे प्रतिनिधित्व असते, त्यामुळे हितसंबंधांचा संघर्ष होण्याची शक्यता असते. याशिवाय नियुक्तीच्या निकषांचाही स्पष्ट उल्लेख नाही.

## ७.१० सारांश

२१ वे शतक हे मानवी हक्कांचे शतक आहे. या अधिकारांच्या वापरावर बंदी घालण्याचा किंवा मर्यादित करण्याचा अधिकार कोणत्याही व्यक्तीला, सरकारला किंवा प्राधिकरणाला नाही. जात, पंथ, वंश, लिंग, संस्कृती, सामाजिक आणि आर्थिक स्थिती यातील फरक विचारात न घेता प्रत्येक व्यक्तीला या अधिकारांचा समान उपभोग मिळतो. मानवाधिकार आणि त्यांचे उल्लंघन यांच्याशी संबंधित समस्यांबाबत पूर्ण गांभीर्य दाखवून, भारतातही त्याच्या संरक्षणासाठी प्रभावी पावले उचलली गेली पाहिजेत.

मानवी हक्कांसाठीच्या कार्यासाठी तग धरण्याची आणि दीर्घ दृष्टीची आवश्यकता असते आणि जे अशा अधिकारांच्या संवर्धनासाठी आणि संरक्षणासाठी झटतात ते त्यांच्या प्रयत्नांवर कधीच समाधानी होऊ शकत नाहीत.

## ७.११ प्रश्न

१. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग म्हणजे काय ते सविस्तर लिहा.

२. मानवी हक्क काय आहेत ते स्पष्ट करा.

३. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची रचना स्पष्ट करा.

४. आयोगाचे कार्य आणि अधिकार स्पष्ट करा.

५. आयोगाचा कार्यात्मक दृष्टीकोन स्पष्ट करा.

६. सांप्रदायिक हिंसाचाराची प्रकरणे हाताळण्यासंदर्भात NHRC ची भूमिका स्पष्ट करा.

७. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या मर्यादा संदर्भात थोडक्यात माहीती लिहा.

## ७.१२ संदर्भ


- Thomas Buergenthal, "International Human Rights in an Historical Perspective," in Janusz Symonides (ed) Human Rights: Concepts and Standards (New Delhi: Rawat Publications, for UNESCO, २००२), p. ३ and p. २५.

- Scott Walker and Steven C. Poe, "Does Cultural Diversity Affect Countries' Respect for Human Rights?" Human Rights Quarterly, Vol. २४ (१) २००२, p. २३.

- Makau Mutua, "A Noble Cause Wrapped in Arrogance", Boston Globe, April २९, २००१.
- https://www.mpscacademy.com/२०१५/०६/national-human-rights-commision.html
- Vishuka v. State of Rajasthan (AIR १९९७ SC ३०११).
- Francis Coralie Mullin o. Union Territory of Delhi (AIR १९८१ SC ७४६).
- Nilabati Behara v. State of Orissa (AR १९९३ SC १९६०).
- Vinen Narain & Ors v. Union of India & Anr (AIR १९९६ SC ३३८६).
- (२०००) १० SCC ६६४.
- Granville Austin, Working a Democratic Constitution The Indian Experience (New Delhi: Oxford University Press, १९९९).
- Article २७ provides.- "No person shall be compelled to pay any taxes, the proceeds of which are specifically appropriated in payment of expenses for the promotion or maintenance of any particular religion or religious denomination."
- Report of the National Commission for Scheduled Castes and Scheduled Tribes, १९९९-२००० & २०००-२००१, p. १८२.
- Report of the Scheduled Areas and Scheduled Tribes Commission (New Delhi: Government of India, १९६२) Para ८.२९.
- National Commission, Op. Cit., note १, p.१२५.
- B.D. Sharma, Tribal Affairs in India (New Delhi: Sahyog Pustak Kuteer, २००१) p. ६२.
- Report of the Commissioner for Scheduled Castes and Scheduled Tribes (Twenty- ninth), १९८७-८९, Para १८.४७.
- B.D. Sharma, Op. Cit., note ४, p. ३६१.
- B.D. Sharma, The Debt Trap (New Delhi: Sahyog Pustak Kuteer, २०००) p. ४५.


*****

# ८

# जातिव्यवस्थेची वैशिष्ट्ये

**घटक रचना**

८.१ उद्दिष्टे

८.२ प्रस्तावना

८.३ जातीचा अर्थ आणि व्याख्या

८.४ जातीव्यवस्थेचा उदय

८.५ जातीव्यवस्थेचा विकास

८.६ जातीव्यवस्थेची वैशिष्ट्ये

८.७ जातीव्यवस्थेचे कार्य

८.८ सारांश

८.९ प्रश्न

८.१० संदर्भ

## ८.१ उदिष्टे

- जातीची व्याख्या आणि अर्थ समजून घेणे.
- जातीचा उदय आणि विकास यांचा मागोवा घेणे.
- विविध कालखंडात जातिव्यवस्थेत झालेले बदल अभ्यासणे.
- जातीव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांचा आढावा घेणे.
- जातीव्यवस्थेच्या कार्यांचा आढावा घेणे.

## ८.२ प्रस्तावना

जगातील सर्वच समाजामध्ये सामाजिक स्तरीकरण आढळून येते.वंश, जन्म, लिंग, वय, शारीरिक क्षमता, बुद्धिमत्ता, आर्थिक, राजकीय, धार्मिक, आणि व्यवसाय या विविध आधारावर सामाजिकस्तरीकरण अस्तित्वात आले आहे. परंतु भारतातील सामाजिक स्तरीकरण हे प्रामुख्याने जातीव्यवस्थेवर आधारलेले आहे. भारतीय समाजात जातिव्यवस्थेला विशेष महत्त्व आहे. विशेष म्हणजे जातीवर आधारित असलेले स्तरीकरण बंद स्वरूपाचे आहे. जगाच्या पाठीवर कुठेही अशा प्रकारचे जातीवर आधारित असलेले स्तरीकरण आढळून येत नाही. म्हणून सामाजिक स्तरीकरणाच्या व्यवस्थेमध्ये जातिव्यवस्थेचे विशेष महत्त्व आहे.

आर्य समुहामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे तीन वर्ण निर्माण झाले होते. आर्यांनी ज्यांच्यावर स्वामीत्व मिळवले होते अशा येथील मूळच्या स्थानिक रहिवाशांचा समावेश शूद्रांमध्ये करण्यात आला होता. चातुर्वर्ण्य व्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णांचा समावेश होतो. या चार वर्णात अर्थात स्तरात भारतीय समाजाचे विभाजन झाले होते. परंतु नंतरच्या काळात हे चार वर्ण चार जाती बनल्या आणि नंतर शेकडो जाती निर्माण झाल्या. या सुरुवातीची वर्णव्यवस्था आणि जाती व्यवस्था ही जन्माच्या आधारावर नसून कर्माच्या आधारावर अस्तित्वात होती. त्यात परिवर्तनशीलता शक्य होती. परंतु कालांतराने जन्माच्या आधारावर जातिव्यवस्था अस्तित्वात आली आणि त्यात बंदिस्तपणा येत गेला. साधारणतः इसवी सन पूर्व ३०० पासून जातिव्यवस्था अस्तित्वात आली असे मानले जाते. आज संपूर्ण देशभर जात ही सामाजिक स्तरीकरणाचा एक मूलभूत आधार बनली आहे. त्यामुळे जातीव्यवस्था भारतीय समाजव्यवस्थेचा एक अविभाज्य घटक आहे. म्हणून जातीव्यवस्थेच्या अभ्यासाशिवाय भारतीय समाजव्यवस्थेचे यथार्थ आकलन होऊ शकत नाही.

## ८.३ जातीचा अर्थ आणि व्याख्या

'जात' हा मराठी शब्द'जण' या धातूपासून बनला आहे.त्याचा अर्थ 'जन्म' असा होतो. एक प्रकारे जन्माने प्राप्त होणारा समूह म्हणजे जात होय. जातीला इंग्रजीमध्ये 'Caste' म्हणतात. हा इंग्रजी शब्द पोर्तुगीज Casta शब्दावरून बनला आहे. Casta या पोर्तुगीज शब्दाची उत्पत्ती Castus या लॅटिन शब्दातून झाली आहे. Castus या शब्दाचा अर्थ वंशाची शुद्धता असा आहे. 'Caste' हा शब्द पोर्तुगीजांनी वंश शुद्धतेला उद्देशून १५६७ मध्ये गोवा मंडळाच्या हुकूमनाम्यात प्रथम वापरला. पण जाती हे वंशशुद्धतेचे निदर्शक नाही. जातीचा आणि वंशाशुद्धतेचा कोणताही संबंध नाही. तरी देखील जातीला इंग्रजीमध्ये पर्यायी शब्द म्हणून 'Caste' हा शब्द रूढ झाला. (आगलावे प्रदीप, समाजशास्त्र संकल्पना आणि सिद्धांत, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१५, पृ. १२५)

सोप्या अर्थाने जातीचा अर्थ व्यक्त करताना इतकेच म्हणता येईल की, जन्म या निकषावर व्यक्तीला प्राप्त झालेला दर्जा व त्यानुसार त्यांचे ठरलेले ठराविक सामाजिक जीवन जे अजन्म कायम राहते ते म्हणजे जात होय. म्हणजेच जात हा अनुवंशिकतेच्या तत्त्वावर आधारलेला समूह आहे. जाती ही श्रेणी रचना असून त्यात प्रत्येक जातीला एक विशिष्ट श्रेणी प्राप्त झालेली असते व त्यानुसार व्यक्ती ज्या जातीत जन्म घेतो त्यानुसार तिचा दर्जा ठरतो व तो कायमस्वरूपी राहतो यालाच जातिव्यवस्था म्हटले जाते. भारतीय समाजात जातीव्यवस्थेला विशेष महत्त्व आहे. विशेष म्हणजे जातीवर आधारित असलेले स्तरीकरण हे बंद स्वरूपाचे आहे. जगाच्या पाठीवर कुठेही अशा प्रकारचे जातीवर आधारित असलेले स्तरीकरण आढळून येत नाही. जातीव्यवस्थेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की,“जात हा शब्द समान दर्जाचा नाही. जात असमानतेवर आधारित आहे. एक जात दुसऱ्या जातीच्या तुलनेत उच्च किंवा कनिष्ठ आहे आणि मधल्या जाती ह्या उच्च जातींपेक्षा कनिष्ठ आणि कनिष्ठ जातीपेक्षा उच्च आहेत. जातीपद्धती ही श्रेणी पद्धत असून त्यात उच्च जातीला अग्रक्रम आणि कनिष्ठ जातीला इतरांपेक्षा न्यूनक्रम मिळतो. अशा प्रकारे भारतीय समाजाचे वेगवेगळ्या जातीत विभाजन म्हणजेच स्तरीकरण झालेले आहे. परंतु हे स्तरीकरण व्यक्तीच्या जातीवरून निश्चित झाले असून व्यक्तीचा जन्म

ज्या जातीत झाला त्या जातीचा दर्जा व्यक्तीला मिळतो. व्यक्तीला जात बदलता येत नाही. त्यामुळे व्यक्तीचा दर्जा सुद्धा बदलत नाही. म्हणून जातिव्यवस्थेवर आधारित असलेले स्तरीकरण बंद स्वरूपाचे स्तरीकरण आहे. जातीचा नेमका अर्थ स्पष्ट होण्यासाठी काही व्याख्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**जातीच्या प्रमुख व्याख्या:**

**१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर:**

"बहिर्गत विवाह बंधनावर अंतर्गत विवाह बंधनाचे वर्चस्व प्रस्थापित होणे म्हणजे जातीची निर्मिती होय. जात हा एक बंद झालेला वर्ग होय". (The super position of endogamy on exagamy means the creation of caste. Caste is a enclosed class.)

**२) फ्रेंच विद्वान सेनार्ट:**

"तीव्र वांशिक आधारावर एक घनिष्ठ संघटित संस्था, विशिष्ट पारंपारिक आणि स्वतंत्र संघटनांनी युक्त ज्यामध्ये एक प्रमुख पंचायत असते, ज्यांच्या बैठकी वारंवार भरतात. काही उत्सवोप्रसंगी मेळे भरवण्यात येतात. जातीतील सर्व लोकांचा एकसारखा व्यवसाय असलेला ज्यांचे संबंध केवळ रोटीबेटी आधारावर असलेला, जातीत व्यक्तींची मर्यादा जातीनियमांनी ठरवून दिलेली व वेळ प्रसंगी नियम मोडणाऱ्यांना शिक्षा आणि बहिष्कार सुद्धा घडवून आणणारा सक्षम असलेला समाज. त्यातही जाती नियमाबाबत कठोर असलेला समूह म्हणजे जात होय.

**३) नेसफील्ड:**

"जमातीचा एक वर्ग जो अन्य कुठल्याही वर्गाशी कसल्याही प्रकारचा संबंध नाकरतो आणि आपल्या स्वतःच्या जमातीतील लोकांव्यतिरिक्त अन्न कोणाशीही सोयरीक करू शकत नाही वा खानपान करू शकत नाही. त्याला जात असे म्हणतात".

**४) सर एचरिजले:**

"कुटुंब किंवा कुटुंबाचे मिळून बनलेले संघटन. सामायिक नाव असलेले, विशिष्ट व्यवसायाशी संबंधित असलेले, एखाद्या दैवी किंवा पौराणिक पितरांचे वंशज असल्याचा दावा करणारे आणि वंश परंपरागत व्यवसाय अनुसरून करणारे एकजिनसी लोक, म्हणजे जात होय". (आंबेडकर बी. आर., भारतातील जाती, प्रबुद्ध भारत प्रकाशन, नागपूर, २०१२, पृष्ठ ५.

**५) चार्लस कुले:**

"जेव्हा वर्ग अनुवंशिकतेच्या तत्त्वावर आधारलेला असतो, तेव्हा आपण त्याला जात असे म्हणतो".

**६) डॉ. इरावती कर्वे:**

"विस्तृत संबंध असणारा अंतर्गत विवाह समूह म्हणजे जात होय. जेव्हा दर्जा पूर्णपणे पूर्वनिर्धारित असतो आणि दैवाने मिळालेल्या या दर्जात बदल करण्याची कोणतीही अशा नसते, तेव्हा वर्ग जातीचे अत्यंतिक स्वरूप धारण करतो".

**७) डॉ. मुजुमदार आणि डॉ. मदन:**

जात एक बंद वर्ग होय.( Caste is closed class)

**८) डॉ. एस व्ही केतकर:**

जात ही केवळ त्याच समूहात जन्माला आलेल्यांची मिळून बनत असते व कठोर सामाजिक नियमांनी व्यक्तीला समाजाबाहेर विवाह करण्यास सदस्यांना सक्त मनाई असते.

वरील सर्व व्याख्यांवरून जात म्हणजे काय हे पूर्णपणे स्पष्ट होत नसले तरी, त्यातील समान धागा पकडून आपण असे म्हणू शकतो की, “जात हा एक अंतर्गत विवाही गट असून त्याचे सदस्यत्व हे केवळ जन्मानेच प्राप्त होते आणि प्रत्येक जातीचा दर्जा हा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असतो”. बंद सामाजिक स्तरीकरणाचा जातहा एक प्रकार असून तो एक आंतरविवाही समूह आहे, तसेच तो विस्तारित कुटुंब ही आहे , तसेच या दर्जा बदलण्यास मुळीच संधी दिली जात नाही. व्यक्तीचा व्यवसाय, निवास, जीवनाच्या जोडीदाराची निवड ही जातीद्वारे ठरवली जाते. एकंदरीत संक्षिप्त भाषेत बंद वर्गव्यवस्था म्हणजे जात होय.

## ८.४ जातीव्यवस्थेचा उदय

भारतीय समाजव्यवस्थेतील जातींविषयी अनेकांनी अभ्यास केला असला तरी डॉ.घुर्ये यांनी जातीव्यवस्थेच्या उत्पत्ती विषयी सूक्ष्म अध्ययन करून जातिव्यवस्थेच्या निर्मितीविषयी शास्त्रीयदृष्ट्या विवेचन केले आहे. त्यांनी डॉ. रिव्हर्स व हेडन यांच्या मार्गदर्शनाखाली १९२३ मध्ये जातीव्यवस्थेच्या उत्पत्तीशी निगडित संशोधनात्मक प्रबंध केंब्रिज विद्यापीठाला सादर केला. त्याचेच १९३२ मध्ये 'Caste & Race in India’ या ग्रंथात रूपांतर केले. डॉ.घुर्ये यांच्या मते, जातीव्यवस्थेच्या निर्मितीसाठी वंश व जन्म हे दोन मूलभूत घटक अधिक जबाबदार आहेत. प्राचीन भारतातील वर्णव्यवस्था ही विशेषतः त्यातील वर्ण हा शब्द शारीरिक गुणधर्माशी व कातडीच्या रंगाशी निगडित होता. पाश्चात्य राष्ट्रात प्रचलित असणाऱ्या वांशिक संकल्पना कातडीचा रंग, शरीरयष्टी, डोळ्यांची रचना, नाकाची ठेवण, केसांची रचना, डोक्याचा आकार, हनुवटीचा आकार या शारीरिक गुणधर्मावर आधारलेले होते आणि व्यक्तीचा सामाजिक दर्जा ठरवताना या शारीरिक गुणधर्मातील वेगळेपण लक्षात घेतले जाते. आपापली शारीरिक गुणवैशिष्ट्ये अबाधित ठेवण्याच्या उद्देशातून आंतरविवाहाची पद्धत रूढ झाली आणि त्यातूनच जाती उद्भवल्या असे मत ते मांडतात.

त्यांच्या मते, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांच्यातील शारीरिक गुणवैशिष्ट्ये ही वैशिष्ट्यपूर्ण व भिन्नत्व स्पष्ट करणारी असल्याने वांशिक घटक हाच वर्णव्यवस्थेला व जातीव्यवस्थेला बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. संपूर्ण मानवी समाजात कॅकेसाईड, मंगोलाईड, निग्रिटो, प्रोटोऑस्ट्रेलियाईड या विभिन्न वांशिक गटातील लोक आढळतात. प्राचीन भारतातील आर्य व अनार्य यांच्यातील फरक हा प्रामुख्याने वांशिक म्हणजेच शारीरिक गुणवैशिष्ट्यांवर प्रामुख्याने आधारलेला होता. एवढेच नाही तर आपले शारीरिक गुणधर्म आबाधित ठेवण्यासाठी अंतर्विवाहाची पद्धत रूढ झाली. त्यामुळे आपली शारीरिक गुणवैशिष्ट्ये पुढील संततीत उतरत असल्यामुळे वांशिक सातत्य टिकून राहत असे. म्हणूनच जातीव्यवस्थेच्या

निर्मितीमध्ये वांशिक घटक महत्त्वाचा ठरतो. वर्णव्यवस्थेचे जातीव्यवस्थेत रूपांतर झाल्यानंतर अर्जित दर्जापेक्षा आर्पित दर्जा व्यक्तीचा सामाजिक दर्जा निर्धारित करत असे. त्यातूनच श्रेष्ठत्व-कनिष्ठत्त्वाची भावना द्रुढमूल झाली आणि जातीव्यवस्था देखील अधिक द्रुढमूल झाली. म्हणूनच जातीव्यवस्थेच्या निर्मितीस वांशिक घटक कारणीभूत आहेत, असे डॉ.घुर्ये मानतात.

डॉ.घुर्ये जाती उत्पत्तीचा विचार मांडताना जातीप्रथेला ब्राह्मणी अपत्य मानतात. त्यांच्या मते जातीप्रथा इंडो आर्यन संस्कृतीच्या ब्राह्मणांचे अपत्य असून ते गंगेच्या खोऱ्यात विकसित झाले. इंडो आर्यन लोक हे भारतात २५०० वर्षांपूर्वी आले. त्यांनी येथील मूळ रहिवाशांना जिंकून आपले दास बनवले. त्यांना अपवित्र माणून कायमचे दूर केले. इंडो आर्यन वंशातील व येथील मूळ रहिवाशांची शारीरिक गुणवैशिष्ट्ये भिन्न असल्यामुळे आपली शारीरिक गुणवैशिष्ट्ये कायम टिकवण्याच्या उद्देशातून आंतरविवाहाचा पुरस्कार केला आणि आंतरविवाहातूनच जातीप्रथेला मजबुती आली. (डॉ. ज्योती डोईफोडे, समाजशास्त्रीय विचार प्रवाह, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ.१९९)

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या 'भारतातील जाती' या ग्रंथात जातींचा उदय आणि विकास यासंबंधी म्हणतात की, सजातीय विवाह हे जाती व्यवस्थेचे मूळ आहे.डॉ. केतकर यांनी सांगितलेल्या रोटीबंदी व्यवहार आणि बेटीबंदी व्यवहारया जातीच्या वैशिष्ट्यांचाआधारघेऊन ते म्हणतात की, आंतरजातीयविवाह निषेध व सहजातीय विवाहाच्या अवलंब हे जाती उत्पत्तीचे मूळ आहे. भारतातील लोकसमूह सजातीय विवाहाच्या प्रथेचे पालन करतात. भारतातील अनेक प्रजाती ह्या काही निश्चित प्रदेशात वास्तव्य करतात व त्यांच्यात अंतर्गत देवाणघेवाणात सांस्कृतिक एकता आहे. जो सजातीयविवाहाचा मापदंड आहे. अशा सजातीयविवाह समर्थक असलेल्या लोकात आणि जाती असलेल्या समूहात निश्चित भिन्नता आहे.भारतातील जातीचा अर्थ समाजाचे कृत्रिमरित्या विभाजन होय. जे वैवाहिक रीती-संबंधाने एकमेकांपासून वेगवेगळे असले पाहिजेत.अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सहजातीय विवाह टिकावे म्हणून जातीव्यवस्थेची निर्मिती झाली असा निष्कर्ष काढतात. (डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भारतातील जाती,प्रबुद्ध भारत प्रकाशन, नागपूर, पृ. ७.)

याबरोबरच घुर्ये जाती व्यवस्थेच्या उत्पत्ती बद्दल इतर घटकांनाही जबाबदार धरतात. त्यांच्या मते, जातीची मूलभूत संकल्पना ही श्रेष्ठ आणि कनिष्ठतेच्या तत्त्वावर प्रामुख्याने आधारलेली आहे. आपले श्रेष्ठत्व आणि प्रभुत्व सिद्ध करण्यासाठी नेहमीच श्रेष्ठ जातींनी कनिष्ठ जातींना दूर ठेवले, त्यातून जाती विकसित होत गेल्या. याचप्रमाणे व्यवसायाच्या प्रतीवर देखील जातिव्यवस्थेची उत्पत्ती झाली असे मत मांडतात. व्यवसाय हे श्रेष्ठ व कनिष्ठ प्रतीचे मानले जात आणि त्यानुसार व्यक्तीच्या श्रेष्ठ व कनिष्ठ प्रतीच्या व्यवसायात जन्मास आल्यानुसार त्या व्यक्तीचा श्रेष्ठ व कनिष्ठ दर्जा निश्चित होत असे. तसेच ते जातींपासून उपजाती व पोटजाती निर्माण होण्यासाठी प्रादेशिक भिन्नता, मिश्र विवाह, व्यावसायिक भिन्नता, धार्मिक मतभेद, आहार विषयक संकल्पना व रितीरिवाज इत्यादी घटकांना जबाबदार धरतात. अशा रीतीने आंतरजातीय विवाहप्रथा, वंश श्रेष्ठत्व, व्यवसायाची श्रेष्ठता-कनिष्ठता या आधारे वैदिक काळात गंगेच्या खोऱ्यात जातीव्यवस्था उदयास आली व नंतर हे ब्राह्मणी संस्कृतीचे अपत्य भारतभर प्रसारित झाले.

## ८.५ जातीव्यवस्थेचा विकास

जातिव्यवस्थेच्या उदयामध्ये वरील घटक कारणीभूत ठरले असले तरी जातीव्यवस्था परिवर्तनशील राहिलेली आहे. ऐतिहासिक बदलांबरोबर समाजात झालेल्या परिवर्तनानुसार जातीसंस्थेमध्येही अनेक बदल घडून आले. म्हणून जातीव्यवस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहणे महत्त्वाचे ठरते. या अंतर्गत आपण प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडात झालेले जातीव्यवस्थेतील बदल थोडक्यात अभ्यासणार आहोत.

### ८.५.१ प्राचीन कालखंड:

जाती व्यवस्थेचा उदय आणि विकास हा खऱ्या अर्थाने प्राचीन कालखंडात झाला. ऋग्वेदिक काळात वर्णव्यवस्था अस्तित्वात आली. ऋग्वेदामध्ये वर्ण शब्दाचा संदर्भ रंग म्हणून उल्लेख आला आहे, अर्थात आर्य हे गोऱ्या वर्णाचे आणि अनार्य म्हणजेच दास हे काळ्या वर्णाचे होते. या दोन्ही वंशांमध्ये केवळ रंगाच्या दृष्टीने भिन्नता नसून पूजा पद्धती आणि सांस्कृतिक दृष्ट्याही दोन्ही वेगवेगळे होते. ऋग्वेदातील पुरुष सूक्तामध्ये वर्णव्यवस्थेच्या उल्लेख येतो. त्याप्रमाणे ईश्वराच्या मुखातून ब्राह्मण, बाहूंमधून क्षत्रिय, जांघेमधून वैश्य आणि पायांपासून शूद्र यांची उत्पत्ती झाली. परंतु हे वर्ण वंशानुगत नसून कार्याच्या आधारावर याची निर्मिती झाली होती. यांचे व्यवसाय परिवर्तनीय असून अंतरवर्णीय विवाह पण होत असे.शूद्रांनी बनवलेले अन्न सेवन करण्यास कोणताही प्रतिबंध नव्हता, तसेच अस्पृश्यतेला कोणतेही स्थान या कालखंडात नव्हते. परंतु उत्तर वैदिक कालखंडात यज्ञविधीला अत्यंतिक महत्त्व प्राप्त झाले आणि ह्या यज्ञविधी संपन्न करणाऱ्या पुरोहितांना समाजामध्ये मोठा मानसन्मान मिळायला लागला. त्यांना ब्राह्मण म्हणून संबोधल्या जाऊ लागले. काही आर्य पूर्व आणि दक्षिण दिशेला राज्यविस्ताराच्या दृष्टीने पुढे सरकले. त्यामुळे त्यांचा भारतातील मूळनिवासी म्हणजेच अनार्य लोकांशी संघर्ष झाला. त्यांना क्षत्रिय म्हटल्या जाऊ लागले. त्यांचे कार्य जिंकलेल्या प्रदेशाचे रक्षण करणे हे होते.उरलेल्या आर्यांना वैश्य अशी संज्ञा दिली गेली. त्यांचे कार्य व्यापार होता आणि चौथ्या शूद्र वर्णामध्ये अनार्य यांचा समावेश केला. परंतु सुरुवातीला समाजाचे केले गेलेले हे वर्गीकरणबंदीस्त स्वरूपाचे नव्हते, परंतु कालांतराने व्यवसाय परिवर्तनामध्ये बंधने आले. पुरोहित जातीचे असल्याने ब्राह्मणांची शक्ती आणि विशेषअधिकार वाढले. त्यामुळे क्षत्रीय आणि ब्राह्मणांचा वेळोवेळी संघर्ष झाला. या दोन्ही ब्राह्मण आणि क्षत्रिय जातींना विशेषाधिकारप्राप्त होते. परंतु वैश्य आणि शूद्रांना विशेषाधिकारापासून वंचित ठेवल्या गेले. कालांतराने ह्या जातींच्या सदस्यांच्या नामकारणाची एक नवी व्यवस्था समोर आली. हे चार जातीसमूह अनेक उपजातींमध्ये विभागल्या जाऊन व्यवसायाच्या आधारे भेदाभेद आवश्यक मानला गेला. या काळामध्ये जातींमध्ये परिवर्तन होऊ शकत होते, उच्च जातीतील लोक निम्न जातीत विवाह करू शकत होते, मात्र शूद्रांसोबत विवाह करण्यास बंदी होती, शुद्रांना यज्ञ करण्याची अनुमती नव्हती. अस्पृश्यतेची धारणा समोर आली, तरी पण सोबतभोजन करण्यास निर्बंध नव्हते. एकूणच या काळामध्ये जातीप्रथा अस्तित्वात आली असली तरी तिच्यामध्ये कठोरता नव्हती. (शर्मा के एल, भारतीय सामाजिक संरचना एवं परिवर्तन, रावत पब्लिकेशन, जयपुर. )

स्मृति कालखंडात समाजातील विविध भागांचे सुव्यवस्थित वर्गीकरण आणि नियमन करण्याची पद्धती स्वीकारल्या गेली. स्मृतीग्रंथांमध्ये प्रत्येक जाती आणि व्यवसायासाठी नियम बनवल्या गेले. राजा आणि प्रजा, पती आणि पत्नी, गुरु आणि शिष्य यांच्याप्रमाणेच समाजातील प्रत्येक संबंधाचे व कृतीचे नियमन केले गेले. परंतु या नियमांमध्ये आवश्यकतेनुसार बदल केल्या जाऊ शकत होते. गुप्त कालखंडामध्ये जाती आणि उपजाती सक्तीने विभाजित केल्या गेल्या. खानपान, विवाह, स्पर्श आणि धार्मिक कार्यांच्या आधारावर आंतरजातीय संबंधांना परिभाषित केल्या गेले. जाती नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना जातीतून बहिष्कृत केल्या जाऊ लागले. याच कालखंडात जातीव्यवस्थेचा आधार जन्म आणि कर्म बनल्यामुळे भारतीय समाज अनेक जाती आणि उपजातींमध्ये विभागल्या गेला. व्यवसायाच्या आधारावर निर्माण झालेल्या चार वर्णांचे रूपांतर नवीन हस्तउद्योगांची उत्पत्ती झाल्यामुळे त्यातून व्यवसायाच्या आधारावर अनेक जाती आणि उपजाती निर्माण झाल्या. गौतम, बौद्धायन, अपस्तंभ स्मृतींमध्ये आनुवंशिकता, विवाह आणि सहभोजनाच्या बाबतकठोर नियम बनवले गेले. (भारतीय सामाजिक संरचना एवं परिवर्तन, के एल शर्मा, रावत पब्लिकेशन, जयपुर)

अशा प्रकारे अखंडित जनजातीय स्वरूपामधून आर्य आणि अनार्य असे दोन समूह बनले. या दोन समूहांमधून चार वर्ण निर्माण झाले. प्रारंभी व्यवसायाच्या आधारावर झालेले समाजाचे हे विभाजन समाजातील मतभेद दूर करणे, व्यवसायिक स्पर्धा कमी करणे, आणि हितसंबंधाचे संतुलन राखण्याच्या दृष्टिकोनातून जातीव्यवस्था उदयास आली होती आणि ती आवश्यकतेनुसार परिवर्तनशील होती. परंतु गुप्त कालखंडामध्ये जातिव्यवस्थेला बंदिस्त स्वरूप प्राप्त होऊन जात ही वंशानुगत बाब बनली. नवीन हस्तोउद्योगांच्या उदयामुळे व्यवसायाच्या आधारावर अनेक जाती आणि उपजाती निर्माण झाल्या. जातीसंबंधी विस्तृत नियम या काळात स्मृती ग्रंथातून बनवल्या जाऊन समाजात त्याची सक्तीने अंमलबजावणी केली गेली. त्यामुळे भारतीय समाजात बंदिस्तपणा येऊन समाज स्थितीशील बनला.

### ८.५.२ मध्ययुगीन कालखंड:

भारतामध्ये मुस्लिम सत्तेच्या स्थापनेनंतर मध्ययुगाला सुरुवात झाली. या मुस्लिम सत्तांमध्ये वंशाला खूप महत्व दिल्या जात असल्याने शासकीय पदांवर वंश बघूनच नियुक्ती करत. धर्मपरावर्तित मुस्लिमांना खालच्या दर्जाचे मानले जात. परंतु मुस्लिम सत्तेमुळे भारतीय जातीव्यवस्थेमध्ये फार काही फरक पडला नाही. उलट धर्मपरिवर्तन रोखण्यासाठी हिंदूंनी जातिव्यवस्थेचे नियम अजून कठोर केले. जातपंचायतींनी या काळात निर्णायक भूमिका बजावली. आपल्या जाती सदस्यांचे व्यवहार नियंत्रित करण्याचे कार्य तिने केले. या काळातही ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात दिसून येते. क्षत्रियांनी आपले राज्य गमावले असले तरी विदेशी सत्तांशी संघर्ष व समायोजन करण्याचेही त्यांनी धोरण स्वीकारले. या काळातील व्यापार व्यवसायाच्या भरभराटीमुळे वैश्यांची स्थिती अधिक सुदृढ बनली. मात्र शूद्रांच्या सामाजिक अवस्थेमध्ये कोणतेही परिवर्तन झाले नाही. या काळातील व्यावसायिक बदलामुळे अनेक जाती व उपजाती निर्माण झाल्या. लिपिक वर्गातून कायस्थ जातीचा उदय झाला. खत्री यशस्वी अर्थतज्ज्ञ आणि प्रशासक म्हणून प्रभावी बनले. ब्राह्मण आणि चेटिट्यार प्रशासनिक आणि वित्तीय जबाबदारी मिळाल्यामुळे

अधिक प्रभावशाली बनले. तरीसुद्धा भक्ती चळवळीच्या उदयामुळे जातीव्यवस्थेची कठोरता कमी होण्यास सुरुवात झाली.

मध्ययुगाच्या शेवटी पेशवेकाळात जाती आणि उपजाती यामधील तणाव वाढले होते. हिंदू समाजाची रचना जातीय श्रेष्ठत्वावर अवलंबून असल्याने जातीय संघर्ष हे प्राचीन काळापासून निर्माण झालेले आहेत हे भारतीय इतिहास अवलोकन केला असता दिसते. महाराष्ट्राच्या इतिहासात हे जातीय संघर्ष पेशवे काळात अधिक तीव्र झालेले दिसतात. आधुनिक महाराष्ट्रात जे जातीय संघर्ष दिसतात किंवा अधून मधून होतात त्यांची पार्श्वभूमीव जडणघडण पेशवेकाळात झालेली आपणास दिसते. भारतीय जीवनातील जातीयता, अस्पृश्यता, गुलामगिरी, सामाजिक व धार्मिक चालीरीती, जातीय संघर्ष या गोष्टी किंवा संस्था पेशवे काळात जोपासल्या गेल्या. पेशवाईपूर्वी या गोष्टी अस्तित्वात होत्या पण पेशव्यांनी राज्यकर्ते या नात्यांने या सर्व संस्थांचे पुनर्जीवन केले. त्यामुळे पेशवेकाळात जातीभेद सर्वोच्च शिखरावर पोहोचला होता. ( पी ए गवळी, पेशवेकालीन समाज व जातीय संघर्ष, आनंद प्रकाशन, औरंगाबाद)

अशाप्रकारे भारतीय जातीव्यवस्थेच्या समायोजन ह्या विशेष गुणामुळे प्रतिकुल परिस्थितीमध्ये आपल्यामध्ये योग्य ते बदल करून जातीव्यवस्था टिकूनच राहिली नाही तर तिचा आणखी विस्तार होत गेला. त्याचबरोबर जातिव्यवस्थेने इतर कोणत्याही स्तरीकरणास व सामाजिक संबंधांना पर्यायी व्यवस्थेच्या रूपामध्ये पुढे येऊ दिले नाही. म्हणूनच मध्ययूगामध्ये भारतीय समाजातील जातीव्यवस्था अबाधित राहून अजूनच विस्तार पावलेली आपल्याला दिसून येते.

### ८.५.३ आधुनिक कालखंड:

इंग्रजांची सत्ता भारतात प्रस्थापित झाल्यानंतर जातीव्यवस्थेत बदल करण्याच्या संदर्भात विशेष महत्त्वाच्या घटना घडल्या. इंग्रजी शिक्षणामुळे सुशिक्षित लोकांना पाश्चात समाजातील विचारांचा परिचय झाला. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या पाश्चात्य विचारसरणीचा भारतीय लोकांवर फार मोठा प्रभाव पडला. राजा राम मोहनराय, केशव चंद्रसेन इत्यादी सुधारकांनी जातीव्यवस्थेला विरोध केला.१८४९ मध्ये स्थापन झालेल्या परमहंस सभेने अस्पृश्यता निवरण्याचे कार्य हे संस्थेचे उद्दिष्ट मानले. सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा फुले यांनी जाती प्रथेला हादरा देण्याचे कार्य केले. १ जानेवारी १८४८ मध्ये त्यांनी जातीव्यवस्थेतील शूद्रातिशूद्रांच्या मुलींची पहिली शाळा पुणे येथे सुरू केली. शूद्रातिशूद्रांची प्रगती होण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे असल्याचे फुलेंनी स्पष्ट केले. २४ सप्टेंबर १८७३ मध्ये फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून अस्पृश्यता, जातीप्रथा व धार्मिक अंधश्रद्धा दूर करण्याचे कार्य केले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी १८७५ मध्ये आर्य समाजाची स्थापना करून जातीभेद दूर करण्याचा प्रयत्न केला. १८६५ मध्ये शशिपद बंदोपाध्याय यांनी बंगालमधील अनुसूचित जातीमधील श्रमिकांच्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न केला. १८५० मध्ये ब्रिटिश शासनाने विवाहातील जातिबंधन निर्मूलनाचा कायदा केला. शासनाने १८५८ मध्ये एक पत्र काढले. त्या पत्रकात नमूद केले होते की, ज्या शाळेत अस्पृश्य जातीतील मुलांना प्रवेश नाकारण्यात येईल त्यांना शासनाकडून मदत दिली जाणार नाही. १८७२ मध्ये शासनाने विवाह नोंदणी कायदा पास केला. १९२५ मध्ये

मद्रास शासनाने एक कायदा करून धर्मशाळा, विहिरी, तलाव, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे अनुसूचित जातींच्या लोकांसाठी खुली केली. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी अस्पृश्यता आणि जातीभेदाच्या निर्मूलनाबाबत अत्यंत महत्त्वाचे कार्य केले. शाहू महाराजांनी १९०२ मध्ये एक वटहुकूम काढून मागासलेल्या जातींसाठी ५०% जागा राखीव ठेवण्याची क्रांतिकारक घोषणा केली. १९१७ मध्ये काँग्रेसने अस्पृश्यता नष्ट करण्याबाबतचा ठराव पास केला. महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवरण्याच्या कार्यक्रमाला अग्रक्रम दिला होता.महर्षी वीरा शिंदे यांनी 'दलित वर्ग मिशनची' स्थापना करून अस्पृश्यता आणि जातीभेद निवारण्याचे कार्य केले.

विषमतेवर आधारित जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करण्याच्या संदर्भात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. जोपर्यंत भारतातील जातीव्यवस्था व अस्पृश्यता नष्ट होत नाही, तोपर्यंत भारतीय समाजाची प्रगती होऊ शकत नाही, ही गोष्ट लक्षात घेऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या विरुद्ध आपली सामाजिक व राजकीय चळवळ उभी केली. दलितांना त्यांचे हक्क भिक मागून मिळणार नाही ते लढूनच मिळवावे लागतील या उद्देशाने त्यांनी २० मार्च १९२७ ला महाड येथील चवदार तळ्यावर पाणी भरण्याचा हक्क मिळावा म्हणून सत्याग्रह केला. डॉक्टर आंबेडकरांच्या मते, ज्या धर्मग्रंथांनी जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता लोकांच्या मनात रुजवली अशा धार्मिक ग्रंथांना विरोध करणे आवश्यक आहे. त्यामुळे जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता या अमानवी आणि अनिष्ट प्रथांचे समर्थन करणाऱ्या मनुस्मृति या ग्रंथाचा त्यांनी होळी केली. १९३० आणि १९३१ मध्ये लंडन येथील गोलमेज परिषदेत डॉक्टर आंबेडकरांनी भारतातील अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व करून अस्पृश्यांच्या दुःखाची कैफियत ब्रिटिश शासनासमोर मांडली. १९३२ मध्ये ब्रिटिश सरकारने डॉक्टर आंबेडकरांची अस्पृश्यांसाठी विभक्त मतदार संघाची मागणी मंजूर केली होती. परंतु महात्मा गांधी यांनी याविरोधात उपोषण केल्यामुळे त्यांनाही मागणी सोडून द्यावी लागली. हिंदू धर्मातील जातीभेद दूर करणे अशक्य आहे ही गोष्ट लक्षात घेऊन मानवतावादी मूल्यांवर आधारलेल्या बौद्ध धम्माचा डॉक्टर आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी स्वीकार केला आणि लाखो दलितांना बौद्ध धम्माची शिक्षा दिली. (समाजशास्त्र संकल्पना आणि सिद्धांत, प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर)

भारत स्वतंत्र झाल्यानंतर देशाची राज्यघटना तयार करण्यात आली. भारतीय राज्यघटनेत स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाचे तत्व मान्य करून जातिव्यवस्थेच्या आधारावर निर्माण झालेली विषमता दूर करण्याच्या दृष्टीने विशेष व्यवस्था करण्यात आली. भारतीय राज्यघटनेने जातीच्या आधारावर निर्माण झालेली विषमता नष्ट करण्याच्या संदर्भात अनेक तरतुदी केल्या.

## ८.६ जातीव्यवस्थेची वैशिष्ट्ये

डॉ. नूपेंद्रकुमार दत्त यांनी त्यांच्या 'ओरिजिन अँड ग्रोथ ऑफ कास्ट इन इंडिया' या ग्रंथात जातिव्यवस्थेची सहा वैशिष्ट्ये सांगितले आहेत. त्याचप्रमाणे डॉ. जी. एस. घुर्ये यांनी देखील त्यांच्या 'कास्ट अँड क्लास इन इंडिया' या ग्रंथात जातीची एकूण सहा वैशिष्ट्ये स्पष्ट केली

आहेत. त्यांनी जातीच्या संरचनात्मक आणि संस्थात्मक अशा दोन्ही बाजूंचा विचार करून जातीचे वैशिष्ट्य विशद केली. या वैशिष्ट्यावरून जातीचे स्वरूप स्पष्ट होते.

**१. समाजाचे खंडात्मक विभाजन:**

स्वातंत्र्यप्राप्ती बरोबर हिंदू समाजावरील अस्पृश्यतेचा कलंक धूऊन काढण्यासाठी या समस्येच्या मुळावरच कुठराघात करण्याच्या हेतूने भारताच्या राज्यघटनेत आवश्यक त्या तरतुदी करण्याचा निर्णय घटनाकारांनी घेतला. भारतीय राज्यघटनेच्या कलम १७ नुसार अस्पृश्यतेची प्रथा कोणत्याही स्वरूपात पाळणे बेकायदेशीर ठरविले गेले व तो गंभीर शिक्षा पात्र गुन्हा ठरवण्यात आला. या कलमानुसार अस्पृश्यता निर्मूलनाची तरतूद केली असली तरी प्रत्यक्षात तिची अंमलबजावणी पुरेशी होत नाही हे ध्यानात आल्यामुळे त्या कलमाच्या पुष्टीकरणाच्या उद्देशाने १९५५ मध्ये 'द अनटचेबिलिटी ऑफेंस ॲक्ट' करण्यात आला. या कायद्यान्वये अनुसूचित जातीवरील सर्व सामाजिक बंधने बेकायदेशीर ठरविण्यात आली. तसेच हिंदूंच्या सर्व सार्वजनिक संस्था व स्थळे दलितांना खुली करण्यात येऊन या

अधिकारापासून त्यांना वंचित करण्याचा केलेला प्रयत्न हा गुन्हा मानण्यात आला. मुख्य म्हणजे अस्पृश्यता प्रथा पाळणेच नाहीतर, या प्रथेला प्रोत्साहन देणे हा देखील गुन्हा ठरवण्यात येऊन त्यासाठी कारावास व दंडाची शिक्षा निर्धारित करण्यात आली.

प्रचलित कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरिता केंद्र शासनाने ११ सप्टेंबर १९८९ रोजी 'अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९' संमत केला व तो ३० जानेवारी १९९० पासून अमलात आणला. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीवरील अत्याचारास पायबंद बसावा हा या मागचा मूळ उद्देश होता. या कायद्यानुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचा सदस्य नसलेला जो कोणी अनुसूचित जाती अनुसूचित जमातीच्या सदस्यावर अत्याचार करील तो गुन्हा ठरवण्यात आला. या कायद्यातील त्रुटींमध्ये सुधारणा करुन' अनुसूचित जाती व जमाती अत्याचारास प्रतिबंध कायदा-२०१५' हा सध्या अस्तित्वात आहे.

### १०.३.२ आधिनियमातील कलमे:

(१) अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचा सदस्य नसलेला जो कोणी:

१. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या कोणत्याही सदस्यास कोणत्याही अखाद्य किंवा घृणास्पद पदार्थ पिण्याची व खाण्याची जबरदस्ती करणे.

२. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जमातीच्या कोणत्याही सदस्यांच्या जागेमध्ये किंवा तिच्या जवळपास विस्टा, कचरा, मढी किंवा अन्य कोणताही घृणास्पद पदार्थ फेकून त्याला इजा करण्याचा, त्याचा अपमान करण्याचा व त्याला त्रास देण्याच्या उद्देशाने कृती करणे.

३. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीचा सदस्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अंगावरील वस्त्र फेडील किंवा तिची नग्न अवस्थेत व रंगवलेल्या चेहऱ्याने धिंड काढील किंवा मानवी अप्रतिष्ठा होईल अशी कोणतीही तत्सम कृती करणे.

४. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या सदस्याच्या मालकीची किंवा कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याने त्याला नेमून दिलेली जमीन अन्यायाने बळकाविल किंवा लागवडीखाली आणणे किंवा त्याला नेमून देण्यात आलेली जमीन हस्तांतरित करून घेणे.

५. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जमातीच्या एखाद्या सदस्याची जमीन वा जागा त्याच्याकडून अन्यायाने बळकावील किंवा कोणतीही जमीन, जागा व पाणी यावरील त्याच्या उपभोग अधिकारात हस्तक्षेप करणे.

६. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्यास बिगारी वा कोणत्याही तत्सम स्वरूपाचे सक्तीचे व वेठबिगारीचे काम करण्यास भाग पाडील किंवा ते करण्यासाठी त्यास भुरळ पाडणे.

७. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्यास त्याने एखाद्या विशिष्ट उमेदवाराला मत देऊ नये किंवा त्यालाच मत द्यावे अथवा कायद्याने उपबंधित केलेल्या रितीव्यतिरिक्त अन्य रीतीने मतदान करावे यासाठी जबरदस्ती करणे.

८. अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्यांविरुद्ध खोटा द्वेषमूलक किंवा तापदायक दावा अथवा फौजदारी व अन्य वैद्य कारवाई दाखल करणे

९. कोणत्याही लोकसेवकाला कोणतीही खोटी माहिति पुरवील व त्याद्वारे त्या लोकसेवकांकडून अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्याला इजा पोचेल किंवा त्रास होईल अशा तऱ्हेने त्याच्या कायदेशीर शक्तींचा उपयोग केल्या जाण्याची व्यवस्था करणे.

१०. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्याच्या कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी चार चौघात देखत पाणउतारा करण्याच्या उद्देशाने हेतूपूर्वक आव्हान करणे किंवा त्यास धाकधपाटशा दाखवणे.

११. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या कोणत्याही स्त्रीवर तिची बेअब्रू करण्याच्या वा तिचा विनयभंग करण्याच्या हेतूने हल्ला करणे किंवा बळाचा वापर करणे.

१२. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या स्त्रीवर वर्चस्व गाजवण्याच्या स्थितीत असल्यामुळे ज्यासाठी ती एरवी तयार झाली नसती असे तिचे लैंगिक शोषण करण्यासाठी त्या स्थितीचा वापर करणे.

१३. सर्वसाधारणतः अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या सदस्याकडून वापरला जाणारा कोणताही झरा, जलाशय किंवा अन्य कोणताही जलस्त्रोत यामधील पाणी ते सर्वसाधारणपणे ज्या प्रयोजनासाठी वापरले जात असेल त्या प्रयोजनासाठी कमी योग्य ठरेल अशा रीतीने दूषित किंवा खराब करणे.

१४. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्याला सार्वजनिक राबत्याच्या एखाद्या ठिकाणी जाण्याचा रूढीप्राप्त अधिकार नाकारेल किंवा जेथे प्रवेश करण्याचा अधिकार आहे अशा एखाद्या सार्वजनिक राबत्याच्या ठिकाणांचा वापर करण्यास अडथळा आणणे

१५. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्यास आपले घर, गाव किंवा अन्य निवासस्थान सोडून जाण्याची जबरदस्ती करील किंवा त्यास ते सोडावयास लावणे.

**(२) अनुसूचित जातीचा वा अनुसूचित जनजातीचा सदस्य नसलेला जो कोणी:**

१. ज्यामुळे अनुसूचित जातीचा व अनुसूचित जनजातीचा कोणताही सदस्य त्यात्या काळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे देहांत दंड असलेल्या एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरण्याची शक्यता आहे हे माहीत असताना खोटा पुरावा देणे.

२. ज्यामुळे अनुसूचित जातीचा वा अनुसूचित जनजातीचा कोणताही सदस्य देहांत दंड नव्हे पण ज्यासाठी सात वर्षे किंवा त्याहून अधिक कारावासाची शिक्षा दिल्या जाऊ शकते अशा एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरण्याची शक्यता आहे हे माहीत असताना खोटा पुरावा देणे.

३. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्याच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान करण्याच्या हेतूने आग लावणे.

४. अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्य सर्वसाधारणतः प्रार्थना स्थळ म्हणून व मानवी वस्तीस्थान म्हणून एखाद्या किंवा आपल्या मालमत्तेचे ठिकाण म्हणून तिचा वापर करीत असेल अशा कोणत्याही इमारतीचे नुकसान करण्याच्या उद्देशाने आग लावणे.

५. एखादी व्यक्ती अनुसूचित जातीचावा अनुसूचित जनजातीचा सदस्य आहे या कारणावरून त्या व्यक्तीविरुद्ध दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यात येते असा कोणताही अपराध करणे.

६. या प्रकरणाखालील एखादा अपराध करण्यात आला आहे हे माहीत असताना किंवा तसे वाटण्यास कारण असताना वैध शिक्षेपासून अपराध्याला वाचवण्याच्या हेतूने, तो अपराध केल्याचा कोणताही पुरावा नाहीसा करणे अथवा त्या उद्देशाने त्या अपराधा संबंधात खोटी माहिती देणे.

७. लोकसेवक असताना या कलमा खालील कोणताही अपराध करील त्याला शिक्षा देण्यात येईल.

(३) लोकसेवक असून अनुसूचित जातीचा वा अनुसूचित जनजातीचा सदस्य नसलेला जो कोणी या अधिनियमान्वये आवश्यक असलेली कर्तव्य पार पाडण्यात जाणूनबुजून हयगय करणे.

(४) जो कोणी या प्रकरणाखालील एखाद्या अपराध्याबद्दल पूर्वीच दोषी ठरलेला असताना दुसऱ्या अपराधाबद्दल किंवा दुसऱ्या अपराधानंतरच्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरला असेल त्याला वाढीव शिक्षा देण्यात येईल.

(५) –

१. या प्रकरणा अन्वये दंडनीय अशा कोणत्याही अपराधाबद्दल जेव्हा एखादी व्यक्ती दोषी ठरत असेल तेव्हा विशेष न्यायालयाला व्यक्तीच्या मालकीची जंगम व स्थावर मालमत्ता असा अपराध करण्यासाठी वापरण्यात आली असेल तर ती शासनाकडून जप्त करण्यात येईल.

२. या प्रकारणाखाली कोणत्याही अपराधाचा आरोप एखाद्या व्यक्तीवर ठेवण्यात आला असेल तेव्हा विशेष न्यायालयाला तिच्या मालकीची जंगम वास्थावर मालमत्ता आरोप सिद्ध होण्याच्या कालावधीत जप्त करता येईल आणि जेव्हा दोष सिद्ध होईल तेव्हा अशा तऱ्हेने जप्त करण्यात आलेली मालमत्ता या प्रकारांणा अन्वये ठोठवण्यात

आलेल्या कोणत्याही द्रव्य दंडाच्या वसुलीसाठी आवश्यक असेल त्या मर्यादेपर्यंत जप्त करता येईल.

(६) - या प्रकरणा खालील अपराधा संबंधातील खटल्यांमध्ये जर असे सिद्ध करण्यात आले असेल की–

१. या प्रकरणाखालील अपराध केल्याचा आरोप असलेल्या एखाद्या व्यक्तीला आरोपीने कोणतेही आर्थिक साह्य दिले नाहीहे सिद्ध करता आले नाही तर अशा व्यक्तीने त्या अपराध्याला प्रेरणा दिली असे विशेष न्यायालय गृहीत धरेल.

२. या प्रकरणाखालील अपराध व्यक्तींच्या एखाद्या गटाने केला असेल आणि असे सिद्ध करण्यात आले असेल की, करण्यात आलेला अपराध हा जमीन संबंधातील व अन्य कोणत्याही बाबी संबंधातील एखाद्या विद्यमान विवादाच्या परिणामी आहे तर, असे गृहीत धरण्यात येईल की अपराध सामाईक उद्देशाचे लक्ष साध्य करण्याच्या दृष्टीने करण्यात आला आहे. (भारताचे राजपत्र, नवी दिल्ली, २ जुलै १९९२)

हा कायदा भारताच्या संसदेत ११ सप्टेंबर १९८९ रोजी मंजूर करण्यात आला आणि ३० जानेवारी १९९० रोजी अधिसूचित करण्यात आला. त्यात २०१५ मध्ये सर्वसमावेशक सुधारणा करण्यात आली. २० मार्च २०१८च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात नमूद केल्याप्रमाणे या कायद्याच्या गैरवापराची अनेक प्रकरणे देशाच्या विविध भागातून नोंदवली गेली आहेत. या निकालात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अपमान किंवा दुखापत केल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीच्या तात्काळ अटकेवर बंदी घातली.अनियंत्रित अटक टाळण्यासाठी ऑगस्ट २०१८ मध्ये भारताच्या संसदेने कलम 18A(1)(a) समाविष्ट करून या निर्णयाला ओव्हरराईड करण्यासाठी एक दुरुस्त मंजुरी केली की, कोणत्याही व्यक्ती आणि कलमाविरुद्ध एफ आय आर नोंदवण्यासाठी प्राथमिक चौकशीची आवश्यकता नाही. तसेच तपास अधिकाऱ्याला आवश्यक असल्यास या कायद्यान्वये गुन्हा केल्याचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अटकेसाठी मंजुरीची आवश्यकता नाही आणि या अंतर्गत प्रदान केलेल्या व्यतिरिक्त कोणतीही प्रक्रिया नाही. कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाला नजुमानता, अनुसूचित समुदायांवरील अत्याचाराच्या आरोप असलेल्या व्यक्तीसाठी या सुधारणा स्पष्टपणे अटक पूर्व जामीन नाकारतात. एकूणच हा कायदा अनुसूचित जाती - जमातीवरील अत्याचारास प्रतिबंध करतो.

## १०.४ निवडक जातीभेद (ॲट्रॉसिटी) प्रकरणांचा अभ्यास (CASE STUDIES OF ATROCITIES)

काही लोक असे मानतात की, भारतामधील जातिवाद समाप्त झाला आहे. इथे आता जातीच्या आधारावर कुठलेही अत्याचार होत नाही. कारण समाजातील सर्व घटकांमध्ये समानता आली आहे. एवढेच नाही तर आरक्षणामुळे दलित जाती उच्च जातींपेक्षाही पुढारल्या आहेत. वास्तविक परिस्थिती मात्र याच्या उलट आहे. आजही दलितांच्या आणि आदिवासींच्या ताब्यातील उपजीविकेची साधने बळकवण्यासाठीआणि आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी त्यांच्यावर अमानवीय अत्याचार केले जातात. दलितांनी व आदिवासींनी केलेली आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय प्रगती उच्च जातींना सहन होत नाही.

त्यातून आजही बऱ्याच जातीय अत्याचाराच्या घटना घडत आहेत. अशाच काही निवडक घटनांचा आपण अभ्यास करणार आहोत.

### १०.४.१ खैरलांजी हत्याकांड:

खैरलांजी हत्याकांडामुळे आजही अंगावर शहारे येतात, सुरेखा भोतमांगे महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी गावामध्ये राहत होत्या. त्यांचे कुटुंब महार या अस्पृश्य दलित जातीतील होते. त्यांची कौटुंबिक स्थिती इतर दलित कुटुंबाच्या तुलनेत सदन होती. ती सुशिक्षित होती आणि कष्टाने मिळवलेल्या पैशावर आपला उदरनिर्वाह करायची. तिने मेहनत करून आपल्या छोट्या झोपडीचे पक्क्या घरामध्ये रूपांतर केले होते. ४५ वर्षाच्या सुरेखाच्या कुटुंबामध्ये तिचे पती ५१ वर्षीय भैयालाल भोतमांगे आणि दोन मुले २१ वर्षाचा सुधीर, १९ वर्षाचा रोशन आणि एक १७ वर्षाची मुलगी प्रियंका होती. खैरलांजी गावातील कुणबी मराठा जातीतील लोकांना सुरेखाची चांगली आर्थिक स्थिती सहन होत नव्हती. तिच्या कुटुंबाजवळ स्वतःची शेती होती. मुलं शिक्षण घेत होते. मुलगी प्रियंका ही बारावी मध्ये गुणवत्ता यादीत आली होती. गावातील मराठा समाज तिच्या कुटुंबावर वर्चस्व गाजवण्याचा पूर्ण प्रयत्न करीत होते. घरामध्ये वीज कनेक्शन घेण्यापासून ते विहिरीवर पाणी भरण्या पर्यंत तिला अडथळा आणत होते. परंतु निर्भयी सुरेखाने त्यांच्या कोणत्याच गोष्टीचा प्रभाव आपल्या कुटुंबावर पडू दिला नाही. परंतु जेव्हा गावकऱ्यांनी तिच्या शेतातून रस्ता बनवण्याचा विचार केला तेव्हा खरी समस्या उद्भवली.

भोतमांगे कुटुंबाने रस्ता बनवण्यास विरोध केला, तेव्हा गावकऱ्यांनी त्यांच्या शेतामधून जबरदस्ती बैलगाड्या नेल्या. त्यामुळे सुरेखाच्या शेतातील निम्म्यापेक्षा जास्त पीक खराब झाले. म्हणून तिने त्याच दिवशी पोलीस स्टेशनमध्ये या विरोधात तक्रार दिली होती. यानंतर काही दिवसांनी म्हणजेच ३ सप्टेंबर २००६ रोजी गावातील पोलीस हवालदार असलेले सिद्धार्थ गजभिये यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. सिद्धार्थ गजभिये भोतमांगे कुटुंबाचे नातेवाईक होते आणि ते ह्या संघर्षामध्ये भोतमांगे परिवाराच्या बाजूने उभे राहिले होते. त्यांनी अनुसूचित जाती-जमाती कायद्याच्या अंतर्गत मराठा समाजातील लोकांना अटक करण्याची धमकी दिली होती. सुरेखा आणि तिच्या कुटुंबाला घाबरवण्यासाठी सिद्धार्थ गजभिये यांच्यावर प्राण घातक हल्ला केला गेला. त्यामुळे पुन्हा एकदा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल होऊन काही लोकांना अटक केल्या गेली. परंतु काही वेळातच त्यांची जमानत झाली.

२९ सप्टेंबर २००६ रोजी संध्याकाळी सहा वाजता ट्रॅक्टर मधूनआलेल्या जवळजवळ ७० मराठा जातीतील लोकांनी भोतमांगे यांच्या घराला वेढा घातला. यामध्ये बऱ्याच महिलाही सहभागी होत्या. यावेळी घरामध्ये सुरेखा आणि तिचे मुलं हजर होते. तिचे पती भैयालाल शेतामध्ये गेलेले होते. जमावाने सुरेखा आणि प्रियंकाला नग्न करून एका बैलगाडीला बांधले आणि सर्व गावातून तिची धिंड काढल्या गेली. सुधीर आणि रोशनलाही नग्न करून मारहाण केल्यानंतर, त्यांना आपल्या आई आणि बहिणीचा बलात्कार करण्यास सांगितले. परंतु त्यांनी ही गोष्ट करण्यास नकार देताच त्यांचे गुप्तांग कापून त्यांचा खून केला गेला. सुरेखा आणि प्रियंकाचा सामूहिक बलात्कार करून त्यांना मारून टाकले. या सर्वांचे मूर्तदेह जवळच असलेल्या नदीमध्ये फेकून देण्यात आले.

भैयालाल शेतात गेल्यामुळे बचावले. ते घराकडील आरडाओरडा ऐकून पळत आले आणि एका झाडाच्या पाठीमागे लपून त्यांनी झालेला सर्व प्रकार बघितला. त्यांच्या म्हणण्यानुसार मृतदेहांची हालत खूपच खराब झाली होती.त्यांना ओळखणेही कठीण झाले होते. भैयालाल यांनी सांगितले की, मारहाण करताना जमाव जातीवाचक शिव्या देत होते.आणि म्हणत होते की,“हे खूप डोक्यावर चढलेत यांना धडा शिकवला गेला पाहिजेत”. प्रसारमाध्यमांनी या घटनेला प्रसारित करताना जातीचा कोणताच उल्लेख केला नाही. प्रसारमाध्यमांच्या मते ही घटना जातीभेदातून नाहीतर अनैतिक कारणातून घडली होती. वर्तमानपत्रांचे म्हणणे होते की, सुरेखा आणि सिद्धार्थ गजभिये यांचे अनैतिक संबंध होते, जे गावकऱ्यांना मंजूर नव्हते. म्हणून ते या दोघांना मारून टाकू इच्छित होते. या घटनेचा मुद्दा जातीवादी हिंसेपासून पीडित महिलेच्या चरित्रावर आला होता. न्यायालयानेही अनुसूचित जाती-जमाती कायदा लागू केला नाही. कारण न्यायालयाच्या म्हणण्यानुसार ही जातिगत हिंसा नाहीतर व्यक्तिगत वादातून झालेले  हत्याकांड होते.

परंतु पूर्ण महाराष्ट्रात या  हत्याकांडाच्या विरोधात दलित समाज रस्त्यावर उतरला आणि आरोपींना कठोर शिक्षा सुनावण्याची मागणी केली. या विरोध प्रदर्शनामुळे जिल्हा न्यायालयमध्ये ॲट्रॉसिटीची केस दाखल केल्या गेली. तरीही या हत्याकांडामध्ये सामील असलेल्या लोकांपैकी फक्त आठ लोकांना अटक झाली. न्यायालयाने त्यांच्यातील सहा लोकांना मृत्युदंड आणि दोन जणांना आजीवन कारावासाची शिक्षा सुनावली. ही केस जेव्हा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आली, तेव्हा दिलेली सजा कमी करण्यात आली. मृत्यूदंडाच्या ऐवजी २५ वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा सुनावली गेली. ही केस सध्या सर्वोच्च न्यायालयात असून २०१५ मध्ये यावर सुनावणी होणार होती, परंतु झाली नाही. २ जानेवारी २०१७ मध्ये भैय्यालाल भोतमांगे ६२ वर्षाच्या वयामध्ये हृदय विकाराच्या झटक्याने मृत्यू पावले. ते आपल्या मृत पत्नी आणि मुलांना न्याय देऊ शकले नाही.(hindi.feminisminindia.com)

अशाप्रकारे जातीवादाने एका पूर्ण कुटुंबाला समाप्त केले. खूप थोड्या आरोपींना शिक्षा झाली. या हत्याकांडातील सहभागी असलेले बाकी लोक अजूनही बाहेर आहे. ज्यामध्ये अनेक राजकीय नेते पण सामील आहेत.

### १०.४.२ हाथरस बलात्कार प्रकरण:

उत्तर प्रदेशातील हाथरस हे एका दलित मुलीच्या सामूहिक बलात्कार आणि हत्या प्रकरणानंतर चर्चेत आले होते. या गुन्ह्याच्या आरोपात गावातीलच तथाकथित चार उच्चवर्णीय आरोपी तुरुंगात आहेत. या गावात वाल्मिकी समुदायाची चार घरं आहेत. तर उर्वरित लोकसंख्या ही तथाकथित उच्चवर्णियांची आहे. त्यात बहुतांश ठाकूर आणि काही ब्राह्मण आहेत.

१४ सप्टेंबर २०२० रोजी एकवीस वर्षांची तरुणी आईसह घरापासून अर्धा किलोमीटर अंतरावर गवत कापण्यासाठी गेली होती. त्याचठिकाणी गावातील चार आरोपींनी तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप आहे. मुलीजवळ पोहोचले तेव्हा ती जखमी होती आणि तिचे कपडे फाटलेले होते, असं पीडितेच्या आईचं म्हणणं होते. मृत तरुणीची आई आणि मोठा भावाने लगेचच तिला दुचाकीवरून जवळपास दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या चंदपा

ठाण्यात घेऊन गेले होते. त्या ठिकाणाहून तिला जिल्हा रुग्णालयात नेण्यात आलं. त्यानंतर तिला तिथून अलिगड मेडिकल कॉलेजला रेफर करण्यात आलं होतं. तरुणीनं शुद्धीत आल्यानंतर अलिगड मेडिकल कॉलेजमध्ये जबाब दिला होता. त्याआधारे सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. अलिगडहून २८ सप्टेंबरला तिला दिल्लीच्या सफदरजंग रुग्णालयात नेण्यात आलं होतं. त्याठिकाणी दुसऱ्या दिवशी तिचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी कुटुंबाला मुलीचा चेहराही न दाखवता रात्री अंधारातच तिच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले होते. त्यावरून बराच गदारोळ झाला होता.

या प्रकरणाचा तपास आधी उत्तर प्रदेश पोलिस, नंतर उत्तर प्रदेश पोलिसांच्या विशेष तपास पथकानं आणि नंतर सीबीआयनं केला होता. सीबीआयनं या प्रकरणी ११ ऑक्टोबर २०२० रोजी एफआयआर दाखल केला होता. त्यानंतर १८ डिसेंबर २०२० रोजी आरोपपत्र दाखल केलं होतं. सीबीआयने चारही आरोपींवर हत्या आणि सामुहिक बलात्काराचे आरोप निश्चित केले आहेत. आरोपपत्रात उत्तर प्रदेश पोलिसांवरही निष्काळजी पणाचा आरोप करण्यात आला होता. "मला सीबीआयनं सगळ्या प्रकारे प्रश्न विचारले आणि मी त्याची उत्तरंही दिली. सीबीआयनं पुरावे गोळा केले होते आणि आरोपपत्रही सादर केलं होतं. आरोपपत्रात काय आहे, हे सर्वांना माहिती आहे. या बिनबुडाच्या आरोपांना आम्ही घाबरत नाही. आम्हाला न्यायालयावर पूर्ण विश्वास आहे," असं मृत तरुणीच्या भावानं म्हटलं होते. आरोपींकडून अनेकदा जामिनासाठी अर्ज करण्यात आला होता. पण प्रत्येकवेळी त्यांचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला. सध्या चारही आरोपी तुरुंगात आहेत.

आरोपीचे नातेवाईक आणि काही गटांनी हे प्रकरण सामूहिक बलात्काराचं नसून, ऑनर किलिंगचं असल्याचा आरोप केला होता. मृत तरुणीच्या मोठ्या भावावरच हत्येचे आरोप करण्यात आले होते. आरोपींचे कुटुंबीय या प्रकरणी माध्यमं, प्रशासन आणि समाजाबाबत नाराजी व्यक्त करतात. त्यांच्या मुलांना खोट्या आरोपांत फसवण्यात आल्याचा त्यांचा दावा आहे. या कुटुंबांची आर्थिक स्थितीही फारशी चांगली नाही. नातेवाईकांना अद्याप आरोपींना भेटताही आलेलं नाही. कोर्टाची तारीख असते तेव्हा ते त्यांना पाहण्यासाठी न्यायालयात जातात.ते निर्दोष असून एक दिवस तुरुंगातून नक्कीच सुटतील, असं आरोपींचे नातेवाईक माध्यमांशी बोलताना म्हणतात.

देश-विदेशातील माध्यमांनी या घटनेचं वृत्तांकन केलं होतं. त्यानंतर भारतातील दलितांच्या स्थितीबाबत गंभीर चर्चा सुरू झाली होती. मात्र घटनेच्या एका वर्षानंतर बीबीसी या वृत्तवाहिनीने केलेल्या वृत्तांकनानुसार या गावात जातीयवादाची मुळं आणखी खोल पसरली असल्याचं पाहायला मिळाले. अजूनही जातीयवादाचा सामना करावा लागत असल्याचा आरोप पीडितेच्या कुटुंबानं केला. गावात आता त्यांच्या कुटुंबा बद्दल असलेला तिरस्कार पूर्वीच्या तुलनेत वाढला असल्याचं मृत मुलीच्या भावानं बीबीसीबरोबर बोलताना सांगितले. "गावातील उच्चवर्णीय लोक आम्हाला हीन नजरेनं पाहतात. काही दिवसांपूर्वी माझी पुतणी दूध घ्यायला गेली तेव्हा ती त्या ठिकाणच्या खाटेवर बसली, तर तिला तिरस्कारानं तिथून उठवून लावलं," गावातील तथाकथित उच्चवर्णीय कसलाही संकोच न बाळगता ते दलितांना बरोबरीचे समजत नाही. या गावातील एका उच्चवर्णीय महिलेची प्रतिक्रिया अशी होती की, “या लोकांच्या घरासमोर पोलीस बसवले तरीही हे ठाकूर थोडेच बनणार आहेत, ते जे आहेत तेच राहतील”. या महिलेच्या या वाक्यावरून तथाकथित उच्चवर्णीय

असल्याचा अभिमान, दलितांबाबत तिरस्कार आणि देशाच्या संविधान आणि कायद्याबाबतची अनास्था स्पष्टपणे दिसून येते. या गावात कधीही सुरक्षितपणे राहू शकणार नाही आणि भविष्य घडवू शकणार नाही, असं पीडित कुटुंबाचं म्हणणं आहे. कुटुंबातील सर्वांचीच गावं सोडून इतर ठिकाणी स्थायिक होण्याची त्यांची इच्छा आहे.

मृत तरुणीचा लहान भाऊ आधी गाझियाबादमध्ये एका खासगी लॅबमध्ये नोकरी करत होता. त्याची नोकरी सुटली आहे. मोठा भाऊदेखील खासगी नोकरी करत होता. या घटनेनंतर तोही घरीच आहे. छोट्या भावानंही त्याच्या वेदना मांडल्या. "आम्ही तर अजूनही दुःखातच जीवन जगत आहोत. संपूर्ण दिवस असाच घरात निघून जातो. मित्रांनाही भेटता येत नाही. इथं गावात राहून काहीही होऊ शकणार नाही. करिअरसाठी घराबाहेर निघावं लागेल. पण सुरक्षेच्या कारणामुळं आम्हाला घराबाहेरही निघता येत नाही."

पीडित कुटुंब सरकारवरही नाराज आहे. घटनेनंतर सरकारनं पीडितेच्या कुटुंबाला आर्थिक मदत करण्याबरोबरच भावाला सरकारी नोकरी आणि घर देण्याचंही आश्वासन दिलं होतं. पण ते अद्याप पूर्ण झालेलं नाही."सरकारनं हे प्रकरण दाबण्याचा पूर्ण प्रयत्न केला असला तरी, आम्हाला न्यायालयावर पूर्ण विश्वास आहे, आमच्या लेकीला न्याय मिळेल, याचा आम्हाला विश्वास आहे," असं पीडितेच्या वहिनी म्हणाल्या. "प्रशासनानं आम्हाला एवढं हीन समजलं की, आम्हाला चेहराही न दाखवता आमच्या मुलीवर अंत्यसंस्कार केले, त्याचं आम्हाला सर्वाधिक वाईट वाटलं. आता हा केवळ आमच्या मुलीला न्याय मिळण्याचा मुद्दा नाही, तर देशाच्या लेकींबरोबर न्याय आणि त्यांच्या संरक्षणाचा मुद्दा आहे. आम्ही कोणत्याही दबावानं दबणार नाही," असंही त्या म्हणाल्या. सरकारच्या वर्तनावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. "आता निवडणुका येणार आहे. महिला सुरक्षेच्या घोषणा दिल्या जातील. पण आपल्या मुलींसाठी काहीही बदलणार नाही. माझ्या स्वतःच्या तीन मुली आहेत. मुलींना सन्मानानं जगता यावं म्हणून सरकार काहीही करत नसल्याचं दिसतंय. जीवंतपणीच काय, पण मेल्यानंतरही त्यांना सन्मान मिळत नसल्याची परिस्थिती आहे," असं त्यांनी म्हटलं.(maharashtratimes.com)

अशा प्रकारे वरील घटनेवरून असे दिसून येते की, आजही जातीभेदाची भावना समाजामध्ये किती तीव्र आहे आणि त्यांना कशी अमानवीय वागणूक दिली जाते. त्याचबरोबर प्रशासन आणि शासन यांची भूमिका किती अप्रमाणिक होती, हेही दिसून येते.

### १०.४.३ सोनई हत्याकांड –२०१३:

अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सोनई गावात रमेश दरंदले, प्रकाश दरंदले, गणेश उर्फ प्रवीण दरंदले, संदीप कुऱ्हे, पोपट उर्फ रघुनाथ दरंदले व गणेश दरंदले या सहा जणांनी सचिन घरू, संदीप थनवर व राहुल कंडारे या तीन दलित तरुणांची १ जानेवारी २०१३ रोजी अत्यंत क्रूरपणे हत्या केली होती. हा 'ऑनर किलिंग' चा प्रकार होता. पोपट दरंदले यांच्या घरातील सेप्टिक टँक साफ करण्याच्या बहाण्याने दरंदले कुटुंबीयांनी या तिघांना अशोक याच्या करवी बोलावून घेतले आणि त्यानंतर गवत कापायचा विळा व अन्य धारदार शस्त्रांनी त्यांची हत्या केली. इतकेच नव्हे, तर सचिन व राहुल या दोघांच्या मृतदेहांचे तुकडे करून त्यांची विल्हेवाट लावत पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. या घटनेचे कारण त्यांच्या मुलीशी सचिनचे प्रेमसंबंध होते. त्याची माहिती कळल्यानंतर सूड

उगवण्याच्या हेतूने आरोपींनी हे हत्याकांड केले होते. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता.

"उच्च जातीतील मुलीशी प्रेमसंबंध ठेवल्यास कनिष्ठ जातीतील व्यक्तीचे काय होऊ शकते", हा धडा विशिष्ट समाजाला देण्याच्या कुहेतूने या पाचही जणांनी अत्यंत निघृण कृत्य केले आहे. त्यांच्यात सुधारणांसाठी कोणताही वाव दिसत नाही. पाचही दोषींनी केलेल्या गुन्ह्याची तीव्रता व त्याचे स्वरूप हे अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे या प्रकरणात फाशीच्या शिक्षेचा विचार करताना या दोषींची कौटुंबिक पार्श्वभूमी, आधीची नसलेली गुन्हेगारी पार्श्वभूमी व त्यांचे तरुण वय या बाबी गैरलागू ठरतात. या अत्यंत क्रूर हत्याकांडाने समाजमनाला मोठा धक्का बसला आहे. म्हणून आम्ही त्यांची फाशीची शिक्षा कायम करत आहोत', असे खंडपीठाने आपल्या निर्णयात नमूद केले.(maharashtratimes.com)

वरील घटनांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, भारतीय घटनेने व अन्य कायद्यांनी अस्पृश्यता नाहीसे केली असूनही प्रत्यक्ष व्यवहारात अजूनही अस्पृश्यतेचे उच्चाटन झालेले नाही. अजूनही दलितांची दुःखे अखंड चालूच आहे. म्हणून अस्पृश्यता निवारणार्थ केलेल्या कायद्याची प्रत्यक्ष व्यवहारात अंमलबजावणी झाली पाहिजे तरच कायद्याचा हेतू सफल होईल. नाहीतर सरकारने उदात्त हेतूने कायदा करूनही केवळ त्याची अंमलबजावणी होत नाही, म्हणून त्याचा इच्छित फायदा अस्पृश्यांना मिळणार नाही व कायद्याचा हेतूही सफल होणार नाही.

खैरलांजी नंतरच्या आंदोलनाने महाराष्ट्रातील जातीय अत्याचार कमी होतील अशी समजूत होती. परंतु जाती अत्याचारांची, खून व बलात्कारांची संख्या वाढतच आहे. गेल्या दहा वर्षात जाती अत्याचारांच्या हजारो घटना घडत गेल्या हे एनसीआरबीच्या आकडेवारीवरून दिसून येते. त्यात सोनई, खर्डा येथील ऑनर किलिंगच्या घटनांनी पुन्हा हिंसेचा कडेलोट झाला. एनसीआरबीच्या २०१५ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात मागील दहा वर्षात दर दोन आठवड्यात एका दलितांचा खून केला जातो, दर आठवड्यात दोन दलित महिलांवर बलात्कार केला जातात, दररोज तीन दलितांवर गुन्हे दाखल केले जातात. यात २०१५ नंतरचा विचार केल्यास गुन्ह्यात अजूनच वाढ झालेली दिसते. दर आठवड्यात एका दलितांचा खून केला जातो, दर आठवड्यात चार दलित महिलांवर बलात्कार केल्या जातो, दररोज पाच दलितांवर गुन्हे दाखल केले जातात, यातून आपल्याला असे दिसून येते की प्रथमदर्शी प्रस्थापित जातीतील अन्याय अत्याचार करणारे आपल्याला आरोपी दिसत असले तरी शासनाचा अप्रामणिकपणा आणि जाणीवपूर्वक दलित विरोधी वागणूक हे वाढत्या अत्याचाराचे मुख्य कारण आहे. सरकार कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्याला शिक्षा तर देत नाही उलट अशा अधिकाऱ्यांना पदोन्नती देते. म्हणून समाजातील जातीयवादी शक्ती बरोबर शासनव्यवस्थेशी सुद्धा दलितांना न्याय मिळवण्यासाठी लढा द्यावा लागतो. सरकारच्या या भूमिकेमुळे आरोपींना शिक्षेचे प्रमाण देशात व राज्यात पाच टक्क्यांपेक्षा कमी आहे. देशातील जातीय हत्याकांडाच्या निकालातून असे दिसून येते की, न्याय दलित व आदिवासींपासून अजूनही कोसो दूर आहे. (अॅट्रॉसिटी अॅक्ट, सामाजिक आणि आर्थिक न्याय हक्क परिषद, अहमदनगर)

इतिहासकार उमा चक्रवर्ती म्हणतात, "या अमानवीय घटनांमुळे दलितांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. त्यांच्याविरुद्ध होत असलेला सामाजिक भेदभाव या घटनांतून पुन्हा समोर आला. "दलित जाती सामर्थ्यवान होत असल्याचं पाहून उच्च जाती घाबरल्या आहेत. त्यामुळेच त्यांना आपले स्थान धोक्यात आल्याचे आणि वर्चस्व गमावल्याचे भय सतावत आहे. या भीतीपोटी त्या पलटवार करण्याचे प्रयत्न करतात. म्हणून जोपर्यंत लोकांचे विचार बदलणार नाही तोपर्यंत जातीवाद संपणार नाही. याठिकाणी अनेक शतकांपासून हे घडत आलेलं आहे. पूर्वी जसा जातीवाद होता, तसाच आजही आहे.

### १०.४.४ दलित तरुणाची हत्या, छत्तरपूर, मध्य प्रदेश:

८ डिसेंबर २०२० रोजी मध्यप्रदेशातील छतरपूर येथे एका २५ वर्षीय दलित तरुणाला एका समारंभात दिल्या जाणाऱ्या जेवणाला हात लावल्यामुळे उच्चवर्णीय लोकांनी बेदम मारहाण केली होती. आरोपींनी आयोजित केलेल्या पार्टीनंतर मृत देवराज अनुरागीला सफाईसाठी बोलावण्यात आले होते. किशनगंज गावात पार्टी आटोपल्यानंतर आरोपी भुरा सोनी आणि संतोष पाल यांनी तरुणाला सफाईसाठी बोलावले होते. अनुरागीला स्वत:साठी जेवण घेताना पाहून आरोपींनी रागाच्या भरात त्याला लाठ्याकाठ्याने बेदम मारहाण केली. त्यात या दलित तरुणाचा मृत्यू झाला होता.

### १०.४.५ पाणी प्यायल्याबद्दल एका दलित मुलाला शिक्षकाकडून मारहाण, सुरण, राजस्थान:

राजस्थानच्या जालोर जिल्ह्यातील सुरण गावातील सरस्वती विद्या मंदिर या खाजगी शाळेतील नऊ वर्षांचा विद्यार्थी इंद्रा मेघवाल ह्याला २० जुलै २०२२ रोजी त्याच्या शिक्षकाने पिण्याच्या पाण्याच्या भांड्याला हात लावण्याच्या कारणावरून बेदम मारहाण केली. शिक्षकाच्या मारहाणीमुळे मुलाच्या चेहऱ्याला आणि कानाला जखमा होऊन तो जवळपास बेशुद्ध झाला होता. शिक्षकाने मारहाण केल्यामुळे एका मुलाचा मृत्यू झाल्याच्या एका दिवसानंतर निदर्शने करण्यात आली. शिक्षक, चैल सिंग, यांना अटक करण्यात आली आणि भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्याच्या कलमांनुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आंदोलकांना पांगवण्यासाठी सौम्य बळाचा वापर केला. आंदोलकांनी अधिका-यांवर दगडफेक केली आणि मृत मुलाच्या कुटुंबाला भरपाई देण्याची मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यास नकार दिला. ज्या शिक्षकांना बालमानसशास्त्र आणि समानता शिकवली जाते, ते आपल्याच विद्यार्थ्यांमध्ये जातीवादाचा आधार घेत भेद करतात, हे अत्यंत क्लेशदायक आहे.

### १०.४.६ दलित अल्पवयीनाला मंदिरात प्रवेश केला म्हणून मारहाण, राजस्थान:

देश स्वातंत्र्याचे ७५ वे वर्ष साजरे करत असताना अशा घटना आपण कुठे आहोत याचा विचार करायला भाग पाडतात. समाज एकता आणि सौहार्दाने बनलेला असतो आणि आपल्यासाठी समाज सर्वोपरि आहे. राजस्थानातील पाली गावात एका दलित अल्पवयीन मुलाला मंदिरात प्रवेश केल्याबद्दल सवर्णांनी बांधून बेदम मारहाण केली. ही घटना १ जून २०१९ रोजी घडली. याआधीच्या घटनेत, अलिगढमधील नद्रोई गावातील चामंडा मंदिरात

जन्माष्टमीच्या निमित्ताने सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या फुग्यांना स्पर्श केल्याबद्दल पाच मुलांच्या गटाने एका १२ वर्षांच्या दलित मुलाला बेदम मारहाण केली. पीडिताचा मित्र सूरज घटनास्थळी उपस्थित होता. सुरज म्हणाला की, फुगा फुटल्यावर पाच मुलांनी त्याच्या मित्राला मारहाण करण्यास सुरुवात केली. या गुन्ह्यात सहभागी असलेले पाचही संशयित एकाच वयोगटातील आहेत. त्यापैकी एकाने त्याचे हात धरले तर दोघांनी त्याचे पाय घट्ट पकडले आणि इतर दोघांनी त्याच्या पोटात मारण्यास सुरुवात केली. सूरजने तत्काळ त्याच्या घरी धाव घेत आईला माहिती दिली. सुरज घाबरून तिथून पळून गेला होता.

### १०.४.७ दलित माणसाला बेदम मारहाण, श्रीकोट, टेहरी- उत्तराखंड:

एखाद्या समारंभात दलित माणूस त्यांच्यासमोर जेवला तर जातीवादी लोक त्याचा अपमान करतात. उत्तराखंडमधील टेहरी जिल्ह्यातील श्रीकोट गावात २६ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या एका लग्न समारंभात २३ वर्षीय जितेंद्र या दलिताला उच्चवर्णीय लोकांनी बेदम मारहाण केली. कारण त्यांना तो त्यांच्यासमोर जेवताना दिसला. हा माणूस गंभीर जखमी झाला आणि नऊ दिवसांच्या उपचारानंतर डेहराडून येथील रुग्णालयात त्याचा मृत्यू झाला.

### १०.४.८ दलित वराने घोड्यावर बसू नये यासाठी सक्तीचे निर्बंध, शिवपूर, राजस्थान:

जातिव्यवस्थेने खालच्या जातीतील लोकांवर जाचक अटी लादल्या आहेत. आर्थिकदृष्ट्या त्यांना आता स्वतःच्या पैशाने लग्नात घोडेस्वारी करणे परवडत आहे, पंरतु त्यांना याचा उपभोग घेऊ दिला जात नाही. राजस्थानमधील भिलवाडा जिल्ह्यात ९ डिसेंबर २०२० रोजी अशीच जातीय अत्याचाराची घटना नोंदवली गेली. येथील शिवपूर गावात दलित समाजातील वराला घोड्यावरून खाली उतरण्यास भाग पाडण्यात आले होते. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, शिक्षण आणि सेवांमधील आरक्षणामुळे दलित आर्थिकदृष्ट्या सुदृढ होत आहेत, याचा अर्थ त्यांचा जातनिषेध संपला असा नाही. केवळ तरुणाला जबरदस्तीने घोड्यावरून खाली उतरण्यास सांगितले नाही तर लग्नाच्या मिरवणुकीत सहभागी झालेल्या लोकांनाही मारहाण करण्यात आली. याविषयी गुन्हा दाखल करण्यात आला. करेरा पोलीस स्टेशनचे प्रभारी म्हणाले की, गेल्या काही वर्षात देशाच्या विविध भागात दलितांनी लग्नाच्या वेळी घोड्यावर स्वार होऊन लादलेल्या सामाजिक नियमांचे उल्लंघन केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. गुजरात राज्याचा विचार करता, मे २०१९ मध्ये गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यातील ल्होर गावात घोड्यावर स्वार झालेल्या दलिताच्या लग्नाच्या मिरवणुकीवर समाजाने सामाजिक बहिष्कार टाकला होता. फेब्रुवारी, २०२० मध्ये, एका दलित पुरुषाच्या लग्नाच्या मिरवणूकीला गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यात पोलिस संरक्षणात बाहेर काढावे लागले.

### १०.४.९ करमचेदु हत्याकांड, आंध्रप्रदेश-१९८५:

आंध्र प्रदेशातील करमचेडू गावात कम्मा जमीनदार प्रबळ समुदाय होता. त्यांच्याकडे आर्थिक सत्ता आणि राजकीय प्रभाव होता कारण दलित ग्रामस्थ तुटपुंज्या पगारावर शेतमजूर म्हणून काम करत होते. त्यांच्यावर सामाजिक आणि आर्थिक अत्याचार होत होते. सुपीक जमीन आणि सिंचनाच्या चांगल्या सुविधांमुळे (कृष्णा नदी कालव्याद्वारे) स्वातंत्र्योत्तर काळात (नागार्जुन सागर कालव्यांद्वारे) या खेड्यातील कम्मा शेतकरी खूप

संपन्न होते. दुसरीकडे दलितांमध्ये बहुतांश शेतमजुरांचा समावेश होता. पालेरूचे (शेतमजूर) वार्षिक उत्पन्न फक्त ₹२००० होते. पुरुष आणि महिला कृषी कामगारांना (ज्यांनी दिवसाचे १६ तास काम केले) दैनंदिन मजुरी अनुक्रमे ₹१०-१२ आणि ₹६-८ होती, जी त्या प्रदेशासाठी कायदेशीररित्या निर्धारित केलेल्या किमान वेतन दरांपेक्षा खूपच कमी होती. कम्मा जमीनदारांनी दलित मजुरांची निष्ठा सुनिश्चित करण्यासाठी बळाचा वापर केला. मजूर काही कारणास्तव कामावर गैरहजर राहिल्यास, गावातील जमीनमालक स्वतः त्यांच्या घरी जाऊन त्यांना मारहाण करायचे आणि कधी-कधी जमीनमालक मजुरांना नऊ महिन्यांपर्यंत कामावरून निलंबित करून आणखी शिक्षा करत. याच गावातील दलितांनी निवडणूकीसाठी पारंपरिक काँग्रेस पक्षाला पाठिंबा दिला. विद्वान के. श्रीनिवास लिहितात की, यामुळे वर्चस्व असलेल्या कम्मा जातीच्या सामूहिक अभिमानाला धक्का बसला. त्यांनी सूड घेण्यासाठी वाट पाहिली. १६ जुलै १९८५ रोजी, एक कम्मा मुलगा पाण्याच्या टाकीजवळ आपली म्हैस धुत असताना टाकीमध्ये घाण पाणी सोडले. एका माडिगा मुलाने यावर आक्षेप घेतला. त्याचा कम्मा मुलाला राग आला. त्याने गुरांच्या चाबकाने माडिगा मुलाला मारहाण केली. मारहाणीचा विरोध केल्याने पाणी आणण्यासाठी आलेल्या मडिगा तरुणीलाही चाबकाने मारहाण करण्यात आली. एका वृद्ध दलिताने हस्तक्षेप करून परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला. या सर्वांना धमकी देऊन कम्मा मुलगा घटनास्थळावरून निघून गेला. यानंतर या भागातील कम्मानी मडिगांना धडा शिकवण्यासाठी  संघटित हल्ल्याची योजना आखली. माडिगांना गाफील करण्यासाठी त्यांनी तडजोडीसाठी एक टीम पाठवली. ही तडजोड माडीगांच्या एका वर्गाने मान्य केली. परंतु १७ जुलैच्या सकाळी, कुऱ्हाडी, भाल्यांसह शेकडो सशस्त्र कम्मा लोकांनी माडिगा मधील रहिवाशांवर अनपेक्षित हल्ला केला, संपूर्ण वस्तीचे नुकसान केले, गर्भवती महिला आणि लहान मुलांना देखील सोडले नाही.

श्रीनिवासुलु म्हणतात की, हा हल्ला पूर्वनियोजित होता जो तासंतास चालला. ज्यामध्ये माडिगांच्या वय आणि लिंग यांचा विचार न करता त्यांच्या पाठलाग करण्यात आला. माडिंगा  जीव वाचवण्यासाठी  सैरावैरा धावत होते. शेतातील गड्डी वामुलू (चाऱ्याचे ढीग) येथे लपण्याची अधिक शक्यता होती. तिथेही त्यांची सुटका झाली नाही. विविध सत्यशोधन समित्यांनी आणि प्रेसमध्ये नोंदवलेल्या सहानुभूतीपूर्ण खात्यांमध्ये याविषयीचे भयंकर तपशील पुरेशा प्रमाणात नोंदवले गेले आहेत. पण लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, शेवटी सहा दलितांची हत्या झाली, तीन दलित महिलांवर बलात्कार झाला आणि अनेक जखमी झाले, झोपड्या जाळल्या, त्यांच्याजवळ जे काही होते ते लुटले गेले. करमचेडू येथील पोलिसांनी पीडितांचे संरक्षण केले नाही आणि सुमारे ८ किलोमीटर दूर असलेल्या शेजारच्या चिराला गावात पोहोचले. जिथे त्यांच्यापैकी अनेकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही जण जखमी होऊन मरण पावले. चिरलाच्या स्थानिक पोलिसांनी सुरुवातीला घाबरून गावात पोहोचलेल्या काही दलितांना मदत करण्याऐवजी त्यांना मारहाण  आणि अटक केली. स्थानिक दलित कार्यकर्ते आणि नेत्यांनी शहरातील एका चर्चमध्ये आश्रय घेतलेल्या पीडित लोकांना मदत करण्यासाठी निर्वासित शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात सुमारे ५०० दलितांचा समावेश होता, त्यांनी कमरचेडूला न परतता चिरला येथे स्थायिक होणे पसंत केले. करमचेडू हत्याकांड ही एक महत्त्वाची घटना म्हणून पाहिली जाते. जिने जातिभेद ही "भूतकाळातील गोष्ट" असल्याचा समज मोडला.

डॅग-एरिक बर्ग यांनी आधुनिक कृषी अर्थव्यवस्थेत जातीच्या तीव्रतेचे चित्रण केले आहे. ज्यामध्ये स्तरीकरण प्रणालीतील "स्थिती" आणि "सन्माना" ची भूमिका, आर्थिक आणि राजकीय शक्तीचे महत्त्व आणि खोलवर रुजलेल्या कल्पनांवर जोर दिला आहे. वसाहतोत्तर काळात ब्राह्मणांपासून गैर-ब्राह्मण जातींमध्ये (जसे रेड्डी, कम्मा) जमीनीच्या मालकीमध्ये लक्षणीय बदल झाल्यानंतर, कम्मा, ज्यांनी विसाव्या शतकापूर्वीच एक संपन्न आणि राजकीयदृष्ट्या शक्तिशाली गट तयार केला होता आणि त्यांना पारंपारिक पद्धतीने शूद्र म्हणून वर्गीकृत केले गेले होते. त्यांनी आर्थिक आणि राजकीय सामर्थ्याने सामाजिक वर्चस्व वाढवले. बर्ग म्हणतात की जातीच्या श्रेष्ठतेचा त्यांचा दावा दलितांच्या संबंधावर अवलंबून होता ज्यांना पारंपारिक विधी वर्गीकरणात 'वगळण्यात आले' होते. ज्यात त्यांना "अस्पृश्य" म्हणून वागवले जात. एम.एन. श्रीनिवास म्हणतात की "स्थानिक स्तरावर राजकीय सत्ता मिळविणारी कोणतीही जात क्षत्रिय असल्याचा दावा करू शकते". त्यानुसार, या प्रकरणात, स्थानिक कम्मा इतिहासकार त्यांच्या क्षत्रिय दर्जाचा दावा करण्यासाठी 'पुरावा' प्रदान करण्यात गुंतले होते. तथापि, कम्मांचे हे विधी श्रेष्ठत्व पूर्णपणे स्वयंस्पष्ट नव्हते. म्हणून बर्ग म्हणतात, त्यांना हिंसेद्वारे त्याची अंमलबजावणी करावी लागली. त्यांच्या दैनंदिन वर्चस्वामध्ये भौतिक शोषण आणि शक्तीचा वापर समाविष्ट होता. बर्ग नोंदवतात की दलित अभिव्यक्ती स्वयं-प्रतिपादन आणि समतावाद या संघर्षाला आणखी तीव्र करतात. करमचेडू येथील हत्याकांड हे दलितांनी कम्मांच्या अन्यायकारक वागणुकीला विरोध केल्याचा परिणाम होते. बर्ग आणि के श्रीनिवासुलु दोघेही सांगतात की कम्मांच्या श्रेष्ठत्वाला आव्हान दिले गेले म्हणून त्यांना दलितांना 'धडा शिकवायचा' होता.

## १०.४.१० गुजरातमधील पानखान गावातील क्रूरता, १९९९:

२७ नोव्हेंबर १९९९ रोजी गुजरातमधील जुनागढ जिल्ह्यातील पानखान गावातील हाटी दरबार, म्हणजेच उच्चवर्णीय राजपूतांनी गावातील दलितांवर भयंकर हल्ला केला. ५०० हुन अधिक हाटी दरबारांनी १०० दलितांना घेरून त्यांच्यावर हल्ला केला होता. ते जमीन लागवडीयोग्य करण्यासाठी काटेरी झुडपे साफ करत होते. अनेक तरुण आणि स्त्रिया जवळच्या गावात पळून जाण्यात यशस्वी झाल्या. त्यामुळे मारहाण आणि बलात्कार होण्यापासून ते वाचले. परंतु उच्चवर्णीय दरबारांच्या रोषातून वाचण्याइतके सर्वच भाग्यवान नव्हते. जयाबेन सोंडारवा हिच्यावर तेरा जणांनी सामूहिक बलात्कार करून बेदम मारहाण केली. अत्याचाराचा आघात इतका गंभीर होता की अनेक दिवस ती वेदनांनी ओरडत राहिली. तिच्या अंगावर कुऱ्हाडीने केलेल्या जखमेच्या खुणा अजूनही ताज्या आहेत. दरबारी सशस्त्र होते, त्यांच्याजवळ भाले, तलवारी आणि कुऱ्हाडी यांसारखी पारंपारिक शस्त्रेच नाहीत तर त्यांच्याकडे आधुनिक बंदुकही होती. या संघटित हल्ल्यामुळे पानखानच्या दलितांना केवळ अपमान आणि शारीरिक छळच सहन करावा लागला नाही तर आता त्यांना आर्थिकदृष्ट्या वंचित राहावे लागले. मुळजीभाई गोविंदभाई हे ८ सदस्यांच्या कुटुंबाचे एकमेव कमावते होते. मात्र सात महिन्यांपासून ते अंथरुणाला खिळून होते आणि त्यांना मोठ्या प्रमाणात वैद्यकीय सेवेची गरज होती. त्यांचा अल्पवयीन मुलगा जो शिकत होता, त्याला कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी अभ्यास सोडावा लागला. पीडितांपैकी तिघांना उपचारासाठी जामनगरच्या रुग्णालयात दाखल करावे लागले. त्यामुळे, त्यांना उच्च व्याजदराने पैसे उधार घ्यावे लागले. अमरभाई सोंदरवा यांना बेदम मारहाण करण्यात आली. कारा सिसोदिया यांनी त्यांच्या डोळ्यावर दगड मारला आणि

त्यामुळे त्यांना डावा डोळा गमवावा लागल्याचे त्यांना स्पष्टपणे आठवते. सात महिन्यांच्या यातनानंतरही त्याला आठवते की वसूर लाखाने त्याच्यावर बंदुकीने गोळीबार केला होता. जेव्हा त्याच्या पत्नीने हल्लेखोरांना त्याच्यावर हल्ला करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांनी तिचे हात आणि पाय फ्रॅक्चर केले.

पाणखण गावात सुमारे ३२५ एकर गायरान होते. यातील २०० एकर जमीन दरबारांनी बळकावली होती. गतवर्षी त्यांनी जमिनीत बाजरी पेरली होती पण परंतु पावसाने दगा दिल्याने उत्पादन झाले नाही. यावर्षी त्यांनी काटेरी झुडपे काढून  जमीन लागवड करण्यायोग्य बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी ४० भूमिहीन दलित कुटुंबांसाठी भूखंडांचे सीमांकनही केले होते. दलितांचा हा क्षीण प्रयत्न दरबारांना सहन झाला नाही. रमाबाई म्हणाल्या, “पिढ्यानपिढ्या आपण दरबारांचे  कामगार म्हणून कष्ट करत आलो आहोत. आम्ही आर्थिकदृष्ट्या त्यांच्यावर अवलंबून असल्याने त्यांनी आमच्याशी अनेक प्रकारे वाईट वर्तन केले. या बंधनातून सुटण्यासाठी आपण काहीसे स्वतंत्र व्हावे म्हणून गायरानाची जमीन साफ करत होतो. पण हा प्रयत्नही दरबारांनी हाणून पाडला आहे.” पंचायतीच्या एका माजी सदस्याने असे सांगितले की पडीक जमीनीची विल्हेवाट कायदेशीररीत्या पंचायतीकडे असल्याने दलितांनी जमीन देण्याबाबत पंचायतीमध्ये निवेदन दिले होते. जेणेकरून ते जमिनीवर शेती करू शकतील आणि त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करू शकतील. परंतु उच्चवर्णीय दरबारी वर्चस्व असलेल्या पंचायतीने त्यांची ही विनंती सतत फेटाळून लावली. पंचायतीमध्ये दलितांना न्याय नाकारण्यात आल्याने त्यांनी जिल्हा प्रशासनाकडे याप्रकरणी लक्ष घालण्याची विनंती केली होती. पण दलितांच्या याचनेकडे कोणी लक्ष दिले नाही. पण जेव्हा दलितांनी जमिनी बळकावायला सुरुवात केली तेव्हा दरबारांनी कोर्टात केस दाखल केली आणि कोर्टाने  नेहमीप्रमाणे  या समस्येच्या मुळाशी न जाता कलम १४४ लावले. विशेष म्हणजे, जिल्हा प्रशासनातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने बढाई मारली, “आम्ही पाणखण येथे घडलेल्या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. आम्ही या संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर अहवाल तयार केला असून दलितांना गायरानाची जमीन देण्याची शिफारस राज्य सरकारला केली आहे. सुमारे ३००० लोकसंख्या असलेल्या गावात यापूर्वी कोणतीही गंभीर चकमक झाली नव्हती. गावातील भूमीहीन शेतमजूर असलेले दलित उच्चवर्णीय हाटी दरबारासाठी काम करायचे. गोविंदभाई म्हणतात, “पाच पिढ्यांहून अधिक काळ आम्ही इथे एकोप्याने राहिलो. आम्ही कधीच दरबारांची आज्ञा मोडली नाही. दरबारांनी आमचा अपमान केला तरी आम्ही शांतपणे सहन केला. पण जेव्हा आम्ही गायराणात काम करू लागलो तेव्हा दरबारांना धोका निर्माण झाला. म्हणून आम्हाला घाबरवण्यासाठी त्यांनी हा भयानक गुन्हा केला आहे.” फारशी मुले शाळेत जात नसत, कारण त्यांना त्यांच्या पालकांना शेती आणि इतर घरातील कामात मदत करावी लागत असे. या घटनेनंतर शाळेत जाणाऱ्या मोजक्या मुलांनीही शाळेत जाणे बंद केले होते.

## १०.५ सारांश

प्राचीन काळापासून भारतीय समाजाला लागलेली कीड म्हणजे अस्पृश्यता मिटवण्याचे प्रयत्न स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सुरू झाले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अस्पृश्यतेचा हा कलंक मिटवण्यासाठी राज्यघटनेमध्ये अनेक तरतुदी केल्या गेल्या. ह्या तरतुदी पुरेसा

नसल्यामुळे त्यात वेळोवेळी अनेक बदल केले. संसदेने 'अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आत्याचार प्रतिबंधक अधिनियम-१९८९' संमत करून अस्पृश्यता प्रतिबंधक कायदा अधिक व्यापक आणि कठोर करण्याचा प्रयत्न केला. या कायद्याची व्यापक व्याख्या करून शिक्षेचे स्वरूपही विस्तारित केले. या कायद्याचा हेतू अनुसूचित जाती-जमातींवर होणारे जातीय अत्याचार थांबावेत असा होता. परंतु इतके व्यापक आणि कडक कायदे करूनही जातीय अत्याचार थांबले नाहीत. हे वेळोवेळी घडलेल्या विविध घटनांमधून दिसून येते. अगदी अलीकडच्या काळामध्ये महाराष्ट्रातील खैरलांजी हत्याकांड, सोनई हत्याकांड आणि उत्तर प्रदेशातील हाथरस बलात्कार प्रकरण या जातीय अत्याचाराच्या प्रातिनिधिक घटना आहे. या घटनांमधून असे दिसून येते की, कायद्याने अस्पृश्यता जरी नष्ट केली असली तरी जनमानसातील जातीभेदाची भावना अजून होती तशीच आहे. त्यामुळेच कनिष्ठ जातींनी केलेली प्रगती उच्च जातींना सहन होत नाही. म्हणून आपले उच्च जातीय वर्चस्व अबाधित राखण्यासाठी दलित व आदिवासींचे खून करणे, महिलांचा बलात्कार करणे, प्रेमप्रकरणातून ऑनर किलिंग सारख्या हत्या करणे,सामाजिक आणि आर्थिक बहिष्कार टाकणे इत्यादी माध्यमातून सर्रास जातीभेदाचे पालन केले जाते. हे सर्व थांबवायचे असेल तर फक्त कायदे करून भागणार नाही, प्रशासकीय यंत्रणांना आपले काम प्रामाणिकपणे करावे लागेल तसेच जनमानसातून जातीभेदाची भावना समाप्त करावी लागेल.

## १०.६ प्रश्न

१. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आत्याचार प्रतिबंधक कायद्या-१९८९ची पार्श्वभूमी विशद करा ?

२. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आत्याचार प्रतिबंधक कायद्या-१९८९च्याप्रमुख कलमांचा आढावा घ्या ?

३. समकालीन भारतातील प्रातिनिधिकस्वरूपात जातीय अत्याचार प्रकरणांची चर्चा करा ?

४. जातीय अत्याचार प्रतिबंधावर भाष्य करा ?

## १०.७ संदर्भ


- भारताचे राजपत्र- २ जुलै १९९२
- ॲट्रॉसिटी ॲक्ट- सामाजिक आणि आर्थिक न्याय हक्क परिषद , अहमदनगर
- अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम- शंकरराव खरात
- आधुनिक भारताचा इतिहास- शांता कोठेकर
- आजादी के बाद का भारत - बिपिन चंद्र
- वेबसाईट– १) feminisminindia.com २) maharashtratimes.com

- INDIAUpdateCollective
- Times of India, December, 9, 2020
- The New Indian Express, 10th December, 2020
- May, 07,2019, NDTV
- India.com, 5th June, 2019
- Dr. Wagh Sandesh, A study of Atrocities against Scheduled Caste and Scheduled Tribes in Maharashtra, Indian. Council of Social Science Research.
- Ghurye G.S., Caste and Race in India, Popular Prakashan, 1996.


*********

# ११

# संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगार

**घटक रचना**


११.० उद्दिष्टे

११.१ प्रस्तावना

११.२ भारतातील कामगार चळवळ

११.२.१ भारतीय कामगार चळवळीचे जनक- नारायण मेघाजी लोखंडे

११.२.२ कामगार चळवळीतील डाव्यांची पोकळी कोण भरून काढणार ?

११.२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कामगार संघटना बद्दलचा दृष्टिकोन

११.३ संघटित कामगारांच्या मागण्या राष्ट्रहितविरोधी आहेत का?

११.४ संघटित आणि असंघटित क्षेत्रातील फरक

११.४.१ संघटित क्षेत्राचा अर्थ

११.४.२ अनुपालन

११.४.३ फायदे

११.४.४ वाढ

११.४.५ देयके

११.५ असंघटित क्षेत्र: सुविधा, वेतन आणि नोकरीच्या सुरक्षिततेच्या समस्या

११.५.१ असंघटित क्षेत्र

११.५.२ असंघटित कामगार

११.५.३ असंघटित क्षेत्राची वैशिष्ट्ये

११.५.४ असंघटित क्षेत्रातील कामगार

११.५.५ असंघटित क्षेत्रावरील कामगार निविष्ठाचा वाटा

११.६ असंघटित क्षेत्राच्या समस्या

११.६.१ कर्मचाऱ्यांच्या समस्या

११.६.२ महिला कामगार आणि 'बिडी' कामगारांच्या समस्या

११.६.३ शासना समोरील समस्या

११.६.४ किमान वेतन देखील सुरक्षित ठेवण्यास असमर्थता

११.६.५ आजची वेतने

११.६.६ कामाच्या ठिकाणी योग्य शारीरिक वातावरणाचा अभाव

११.६.७ अपघातामुळे उत्पन्नाचे नुकसान

११.६.८ ट्रेड युनियन किंवा लेबर युनियनचे ज्ञान नाही

११.६.९ कामाचे दीर्घ तास

११.६.१० आरोग्य आणि व्यावसायिक जोखीम
११.६.११ आजारपणामुळे उद्भवणारी असुरक्षितता
११.६.१२ वृद्धत्व सुनिश्चित करण्यात अयशस्वी
११.६.१३ सामाजिक सुरक्षा उपायांची अंमलबजावणी करण्यात अयशस्वी
११.६.१४ गरिबी आणि कर्ज
११.६.१५ नोकरीची असुरक्षितता
११.६.१६ नैसर्गिक आपत्तींपासून असुरक्षितता
१०६.१७ भारतात लॉकडाऊन: असंघटित क्षेत्राला सर्वाधिक फटका बसला आहे
११.७ असंघटित क्षेत्रासाठी समाज कल्याण योजना
११.७.१ असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना
११.८ असंघटित क्षेत्रातील मजुरांना भेडसावणारी समस्या
११.९ असंघटित कामगारांचे भवितव्य अंधारातच
११.१० समस्या, आव्हाने आणि संधी
११.१०.१ जागृतीचा अभाव
११.१०.२ सामाजिक सुरक्षा अभिसरण योजना
११.१०.३ लाभार्थी लक्ष्य
११.१०.४ योग्य पाठपुरावा करण्यात अयशस्वी
११.१०.५ मक्तेदारीचे परिणाम
११.१०.६ देशातली एकूण परिस्थिती
११.१०.७ महागाई भत्ता किती असावा ?
११.१०.८ उत्पादनक्षमतेचा प्रश्न
११.१०.९ कमी वेतनाचा फायदा कोणास मिळेल ?
११.१०.१० स्वतंत्र संघटनेचे महत्त्व
११.१०.११ स्वातंत्र्याच्या मर्यादा
११.१०.१२ संपबंदी
११.११ सूचना
११.११.१ भारतातील असंघटित मजुरांच्या हक्कांचे संरक्षण
११.१२ कामगार चळवळीचा अस्त..?
११.१३ सारांश
११.१४ प्रश्न
११.१५ संदर्भ

## ११.० उद्दिष्टे

अधिक विशिष्टपणे या अभ्यासात खालील उद्दिष्टे ठेवून उत्कट प्रयत्न केला जातो:

- असंघटित क्षेत्राच्या समस्या ठळकपणे मांडणे.
- असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी कल्याणकारी आणि सामाजिक सुरक्षा तरतुदींचा अभ्यास करणे,
- असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी केंद्रीय मंडळाच्या उपक्रमांचे विश्लेषण करणे.
- असंघटित कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी काही उपाय सुचवणे.

## ११.१ प्रस्तावना

भारतामध्ये उद्योगधंद्यांची सुरुवात जरी १८५० च्या सुमारास झाली, तरी स्थायी स्वरूपाच्या कामगार संघटना स्थापन व्हावयाला जवळजवळ साठ वर्षे उलटावी लागली. आधुनिक स्वरूपाची पहिली कामगार संघटना १९१८ साली मद्रास येथे 'मद्रास लेबर युनियन' या नावाने स्थापन झाली.

१९१८ नंतर अनेक ठिकाणी कामगार संघटनांचा उदय झाला. कामगार संघटना बनू लागल्या, पण त्या कामगारांनी स्वयंस्फूर्तीने अगर स्वतःच्या प्रयत्नांनी बनविल्या नाहीत. त्या बनल्या त्या कामगारांबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्या, वृत्तीने कामगार नसलेल्या, सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांमुळे. त्यांनी जर पुढाकार घेतला नसता, तर कामगार संघटना आणखी कितीतरी वर्षे स्थापन झाल्या नसत्या. संघटना बनविण्यासाठी आणि त्यांचे कार्य वाढविण्यासाठी या कार्यकर्त्यांना खूप यातना सहन कराव्या लागल्या. बाहेरच्या कार्यकर्त्यांची राजकारण ही पहिली निष्ठा होती. साहजिकच त्यांचे राजकारण संघटनांच्या चळवळीत शिरले आणि पुढच्या काळात ते दुहीला कारणीभूत ठरले. शिवाय कामगारांमधून नेतृत्व निर्माण झाले नाही. पन्नास वर्षे उलटून गेली, तरी अद्यापि संघटनांना नेतृत्वासाठी बाहेरच्या कार्यकर्त्यांवरच अवलंबून रहावे लागत आहे.

## ११.२ भारतातील कामगार चळवळ

भारतातील संघटित कामगार चळवळीचे AITUC (The All India Trade Union Congress) चे संस्थापक नारायण मल्हार जोशी (नामजोशी) ( ५ जून १८७९ - ३० मे १९५५) हे नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे शिष्य होते. ते मराठी लेखक वामन मल्हार जोशी आणि संस्कृत पंडित महादेव मल्हार जोशी यांचे बंधू होते. वडील भाऊ महादेवराव यांच्या आग्रहावरून ते १८९३ मध्ये इंग्रजी शिक्षणाकरिता पुण्याला गेले. न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रिक व १९०१ मध्ये डेक्कन कॉलेजातून बी. ए. उत्तीर्ण झाले. पदवी मिळविल्यानंतर जोशींनी सहा महिने अहमदनगर येथे दुष्काळपीडितांसाठी काढलेल्या सरकारी अन्नछत्रात काम केले. १९०१ - १९१० या काळात अहमदनगर व पुणे येथे खाजगी शाळांमधून, तर मुंबई व रत्नागिरी येथील शासकीय विद्यालयांमधून अध्यापन केले.

हा अध्यापनाचा अनुभव जोशींना १९२२ - ४७ या काळात मुंबईमध्ये प्रौढांसाठी व औद्योगिक कामगारांकरिता प्रशिक्षणवर्ग चालविण्यास फार उपयोगी पडला.

ना. म. जोशी यांनी कामगारांचे नेते म्हणून कामगारांच्या कल्याणासाठी १९११ मध्ये 'बॉम्बे सोशल सर्व्हिस लीग' ही संघटना स्थापन केली.

विशिष्टतेच्या आधारे, भारत सरकारने असंघटित कर्मचाऱ्यांचे वर्गीकरण केवळ चार श्रेणींमध्ये केले आहे.

१. चामडे कामगार, माफ, मत्स्यपालन, विडी निर्माता, बांधकाम कामगार, ऑइल मिल, पेपर मिल, सॉ मिल इ. विटा यासारख्या विविध उद्योगातील कामगार. निर्माता, भूमिहीन शेतमजूर.

२. रोजगाराचे स्वरूप, करार, अनौपचारिक आणि बंधपत्रित कामगार

३. विशेष त्रासदायक श्रेणी- हेड आणि शोल्डर लोडर्स, सफाई कामगार, विविध प्रकारचे कामगार.

४. सेवा श्रेणी - हॉटेल बॉय, मिडवाइव्हज, एअर होस्टेस, बारबार, मालिश करणारा इ. वरील श्रेणी व्यतिरिक्त हस्तकला कारागीर, मोची, हातमाग विणकर, शारीरिकदृष्ट्या अपंग स्वयंरोजगार, महिला टेलर, रिक्षाचालक, सुतार, टॅनरी मजूर, यंत्रमाग कामगार आणि शहरी गरीब, ट्रक आणि ऑटो चालक देखील असंघटित कामगार वर्गात येतात.

कामगार संघटनांनी १९२० मध्ये आपली ‘अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस’ (आयटक) ही संस्था स्थापन केली होती. आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या वार्षिक परिषदेला भारतीय प्रतिनिधी पाठविण्यासाठी मध्यवर्ती संस्थेची आवश्यकता होती म्हणून ती स्थापन झाली. पहिली नऊ वर्षे तिने कामगार संघटनांची चळवळ संघटित करण्याचे व तिला वळण लावण्याचे कार्य चांगले केले. या संघटनेत नेमस्त व जहाल नेते कार्य करीत होते. साम्यवादी १९२६ पासून संघटनांमध्ये काम करू लागले. चारपाच वर्षांच्या काळात त्यांनी काही प्रबळ संघटना निर्माण केल्या. काही महत्त्वाचे संपही त्यांनी लढविले. आपली क्रांतिकारक धोरणे सर्व कामगार संघटनांनी मानावी असा त्यांचा आग्रह होता. नेमस्त नेत्यांनी हा आग्रह मानला नाही, म्हणून आयटकमध्ये १९२९ साली फूट पडली. ती १९३८ मध्ये सांधली गेली. पण दुसऱ्या महायुद्धाच्या बाबतीत युद्धसहकार्याचे की युद्धविरोधाचे धोरण स्वीकारावयाचे, या प्रश्नावर मतभेद झाल्याकारणाने १९४१ मध्ये पुन्हा फूट पडली. प्रख्यात क्रांतिकारक एम्. एन्. रॉय व त्यांचे सहकारी युद्धसहकार्याच्या बाजूचे होते. त्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून ‘इंडियन फेडरेशन ऑफ लेबर’ या नावाची नवी संस्था काढली. पुढे १९४८ साली ही संस्था ‘हिंद मजदूर सभा’ या संस्थेत विलीन झाली. कामगार संघटनांच्या चळवळीत नंतर जी दुही माजली, ती स्वातंत्र्य समीप आले तेव्हा. भारतातील साम्यवादी गटाला आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीच्या बदलत्या धोरणांनुसार पावले टाकावी लागली. १९४७ साली साम्यवाद्यांबरोबर काम करणे शक्य नाही, अशी राष्ट्रवाद्यांची खात्री पटली आणि राष्ट्रीय काँग्रेसच्या ध्येयधोरणांनुसार चालणारी ‘इंडियन नॅशनल ट्रेड युनियन कॉंग्रेस’ (इंटक) त्यांनी काढली. वर्षभरानंतर समाजवाद्यांनी ‘हिंद मजदूर सभे’ची उभारणी केली. त्यानंतर लवकरच ‘युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस’ निघाली

व पुढच्या काही वर्षांत वरील संघटनांत ‘हिंद मजदूर पंचायत’ व ‘भारतीय मजदूर संघ’ यांची भर पडली. या मध्यवर्ती संस्था पक्षनिहाय बनल्या आहेत. कामगार संघटना पक्षनिष्ठ, त्यामुळे मध्यवर्ती संस्था पक्षनिहाय बनणे अपरिहार्य आहे. पक्षानुसार संघटना बनत राहिल्या, तर त्यांच्या संख्येत कदाचित आणखीही भर पडेल. स्वतंत्र आणि स्वावलंबी अशा संघटना आता निर्माण होऊ लागल्या आहेत, पण त्यांची संख्या अद्याप फार मर्यादित आहे.कामगार संघटनांचा कायदा (ट्रेड युनियन ॲक्ट) १९२६ साली मंजूर झाला होता. या कायद्याने संघटनांना लाभलेले संरक्षण केवळ तांत्रिक स्वरूपाचे होते. कार्यक्षम पद्धतीने काम करण्यासाठी जी मान्यता हवी, ती मिळवून देण्याची सरकारने कोणतीही सोय केली नाही. मान्यता ही कामगार संघटनांची प्राथमिक स्वरूपाची मागणी आहे. ती मागणी अद्यापही मान्य झालेली नाही. मान्यतेबद्दलचा एक कायदा १९४८ साली मंजूर झाला. पण तो अद्यापही कार्यवाहीत आणला गेला नाही.

वेठबिगारीच्या कामासाठी गेलेली मुलगी गौरीच्या निमित्ताने वेठबिगारीमध्ये अडकलेल्या बालकांचे प्रश्न पुन्हा एकदा समोर आले आहेत. नोव्हेंबर २०२१ मध्ये पालघर जिल्ह्यातील मोतीराम आणि मंजुळा पवार यांच्या तीन मुली कोळशाच्या खाणीवर कामाला होत्या. यात त्यांच्या दोन मुलीचा जीव गेला होता. लॉकडाऊनच्या काळात पायी चालत जाणाऱ्या मजुरांसोबत जामलो मकडूम नावाची अकरा वर्षांची मुलगी मिरचीच्या शेतात काम करत होती. उपाशीतापाशी पायी चालत येत असताना गावाच्या वेशीजवळ तिचा मृत्यू झाला. वेठबिगारीमध्ये अडकलेली मुले म्हणून पाहत असताना बहुतांश मुले ही आदिवासी समाजातील असल्याचे दिसते. कामासाठी सौदा करणारा दलाल आणि बालकांचे पालक यांच्यामध्ये आर्थिक व्यवहार ठरवला जातो. यातील वर्षभराची रक्कम पाच हजार ते चाळीस हजार इतकी असते. हा व्यवहार ठरला ही दलाल मुलांच्या पालकांना पैसे देतो आणि मूल त्याच्यासोबत कामासाठी घेऊन जातो. ठरलेल्या कामाच्या व्यतिरिक्त या मुलांकडून अन्य कामेही करून घेतली जातात. यामध्ये अडकलेल्या मुली बहुतांश वेळा लैंगिक शोषणाच्या बळीही ठरतात, ज्याची फारशी नोंद घेतली जात नाही. ही मुलं शिक्षणाच्या प्रवाहापासून कायम वंचित राहतात. चोवीस तास काम करत असताना दोन वेळचे जेवण म्हणून कपभर चहा आणि वडापाव अन् कधीतरी भाकर दिली जाते. या मुलांचे होणारे शोषण याचे वास्तव फार भयानक आहे.

कोणत्याही बालकाला वेठबिगारीसाठी जुंपले जाऊ नये म्हणून ठोस उपाययोजनांची गरज आहे. बालकांच्या विषयावर काम करण्यासाठी राज्यात महिला व बालविकास, बाल न्याय अधिनियम अंतर्गत बालकल्याण समिती, आदिवासी आयुक्तालय, बालहक्क आयोग अशा अनेक यंत्रणा काम करतात. या सगळ्या यंत्रणांनी एकत्रितरीत्या येऊन राज्यातील गरीब, वंचित आणि आदिवासी बालकांच्या विकासासाठी ध्येयधोरणे अमलात आणून राबवण्याची गरज आहे. आदिवासी समाज म्हणून पाहिले तर बहुतांश लोकांकडे मूलभूत दस्तऐवज जसे की, आधार कार्ड, रेशन कार्ड, जॉब कार्ड, आदिवासी दाखला उपलब्ध नाहीत. यामुळे योजनेचा लाभ मिळवण्यास अनेक अडचणी येतात. या सुविधा देण्यासाठी गावपातळीवर सेतू सुविधा केंद्रामार्फत शिबिरे लावून ग्रामसेवकाच्या मदतीने सुविधा उपलब्ध करून दिली गेली पाहिजे. तसेच बालसंगोपन योजनेसारखी योजना आदिवासी मुलांसाठी राबवता आली पाहिजे. आदिवासी वाड्या-वस्तीवरील प्रत्येक मूल शाळेत जाईल आणि शाळा सोडणार नाही यासाठी अशा शाळांमध्ये शालेय सामाजिक कार्यकर्त्यामार्फत सातत्याने मार्गदशन-समुपदेशन योजना कार्यान्वित केली पाहिजे. आदिवासी वाड्या-वस्तीवरील लोकांना मनरेगासारख्या योजनेत शाश्वत उपजीविका उपलब्ध झाली पाहिजे.

## १३.११ सारांश

जगभरात झालेल्या विविध सर्वेक्षणातून आता सिद्ध झाले आहे की, जी मुले शाळेत जात नाहीत, ती कुठे ना कुठे बालकामगार म्हणून काम करत असतात. खेडोपाडयातच नव्हे तर मुंबई पुण्यासारख्या शहरांमध्ये गॅरेज, हॉटेल, कचराकुंडया, बांधकाम, वीटभट्टी, खाणकाम अशा अनेक ठिकाणी मोठया संख्येने अल्पवयीन मुले काम करत आहेत.

बालकामगारांना आळा घालण्यासाठी सर्वप्रथम समाजाचे मानसिक विचार सारणा बदलायला हवी. बाल कामगार संपवण्यासाठी सर्वप्रथम कुटुंबातील सदस्यांनी याची

जबाबदारी घ्यायला हवी आपल्या मुलांना कामावर न ठेवता त्यांना योग्य ते शिक्षण दिले पाहिजे. बालकामगार रोखण्यासाठी कठोर आणि कडक कायदे केले पाहिजे जेणेकरून कोणताही व्यक्ती बालमजुरांना कामाला ठेवण्यासाठी घाबरला पाहिजे. समाजातील कोणत्याही व्यक्तीला बालमजुरी काम करताना दिसल्या तर त्यांनी त्याची माहिती त्वरित जवळच्या पोलिस स्टेशनला द्यायला हवी. आपल्या समाजाला बालकामगार याबद्दल जागृत करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करून संपूर्ण देशाला बालकामगार रोखण्यासाठी जागृत केले पाहिजे. गरीब कुटुंब आणि देखील मुलांना कामाला पाठवला त्यांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे कारण सरकारने आता इयत्ता आठवी पर्यंत मुलांना मोफत शिक्षणाची सोय करून दिलेली आहे. बालकामगार रोखण्यासाठी सर्वप्रथम देशातील भ्रष्टाचार रोखायला हवा.

## १३.१२ प्रश्न

१. बालकामगार म्हणजे काय ? ते सांगून बाल कामगार प्रथाचे विविध दुष्परिणाम लिहा.

२. बाल कामगार थांबवण्यासाठी सरकारने घेतलेले निर्णय स्पष्ट करा.

३. बालकांचे हक्क या बद्दल सविस्तर माहिती लिहा.

४. बाल हक्क दिन साजरा करण्याचा उद्देश स्पष्ट करा.

५. वेठबिगार बालकामगार आणि आपली नैतिक जबाबदारी या बद्दल तुमच्या शब्दात स्पष्टीकरण द्या.

## १३.१३ संदर्भ


- Varandani G.(१९९४): "Child Labour and Women Worker, Ashish Publishing House, New Delhi. Page no. ५५.
- रोडे विजयकुमार (२०१३) “आर्थिक विकास एक चिंतन", चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. पृष्ठ क्र. ३१४.
- शिवचरण सिंह 'पिपिल'(२०१२). “आधुनिक भारत में बाल श्रमिक", तरुनम पब्लिकेशंस, नोएडा, पृष्ठ क्र. ०७. भारतीय जनगणना १९७१ ते २०११.
- मुजुमदार प्रमोद (२००२). “अस्तित्वाचे प्रश्न", अक्षर प्रकाशन, मुंबई, पृष्ठ क्र. ७२. पाठेकर रवी (२०१२).
- “भंडारा जिल्ह्यातील बाल कामगारांचा आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास", पीएच.डी. शोधप्रबंध, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. पृष्ठ क्र. १७, १८.
- फडणवीस मुणलिनी, देशपांडे प्राची (२००२) “श्रम अर्थशास्त्र", पिंपळापुरे ॲन्ड कं. नागपूर. कुलकर्णी शालिनी (२००९).

- “भारतीय व पाश्चात्त्य शिक्षणतज्ज्ञ”, नित्य नूतन प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्र. ८१.
- बोधनकर सुधीर, चव्हाण साहेबराव (२००८). "श्रम अर्थशास्त्र", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- Chhina S.S. (२००९): "Child Labour Problem and Policy Implication",Regal Publications, New Delhi.
- बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, कुळकर्णी मृणाल (२०१४). “सामाजिक संशोधन पद्धती", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. गुप्ता लक्षता (२००६).
- “भारतीय समाज और शिक्षा”, वंदना पब्लिकेशन्स, नई दिल्ली.
- त्रिपाठी मधुसूदन (२००८): “भारत में मानवाधिकार”, ओमेगा पब्लिकेशन्स, नई दिल्ली. १४.
- मंजु पाण्डेय (१९९८), "भारत में बालश्रमिक", मानक पब्लिकेशन्स, प्रा. लि. नई दिल्ली.
- यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (२००९), “बालमजुरी निर्मलन प्रकल्प-संदर्भ साहित्य", बाल हक्क कक्ष-संशोधन व प्रलेखन विभाग.
- डॉ. वायदंडे शशिकांत, टि. म. विद्यापीठ, पुणे (एप्रिल २०११), “महाराष्ट्रातील असंघटित क्षेत्रातील बालमजुरी निर्मुलनासंबंधी धोरणांचा चिकित्सक अभ्यास", विद्यावाचस्पती (समाजशास्त्र) पदवीसाठी प्रबंध, पुणे. पान नं.६ व ७, १८ ते २२.
- १६. Barman Bhupen' and Barman Nirmalendu? (Feb.२०१४), "A Study on Child Working Population in India", IOSR Journal of Humanities And Social Science (IOSR-JHSS) Volume १९, Issue २, Ver. I, PP ०१-०५ e-ISSN: २२७९. ०८३७, p-ISSN: २२७९-०८४५. www.iosrjournals.org
- तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर (जाने २०११), "भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया-खंड १”, युनिक ॲकॅडमी प्रकाशन, पान क्र.५४,५८,५९,७२.
- डॉ. वैद्य शांता (२००५), "बालकांचे हक्क", मराठी अनुवादीत पुस्तिका, युनिसेफ प्रकाशन.


*****

# १४

## उदारीकरणांचा प्रभाव

**घटक रचना**

१४.० उद्दिष्टे

१४.१ प्रस्तावना

१४.२ उदारीकरण म्हणजे काय?

१४.३ भारतातील उदारीकरण

१४.४ भारताने उदारीकरण स्वीकारण्याची कारणे

१४.५ उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे

१४.५.१ १९९१ नंतर झालेले बदल

१४.५.२ उद्योग क्षेत्रात झालेले बदल

१४.५.३ करविषयक सुधारणा

१४.५.४ बँकिंग क्षेत्रातील सुधारणा

१४.५.५ विमा क्षेत्रातील सुधारणा

१४.५.६ अप्रत्यक्ष करातील सुधारणा

१४.५.७ विदेशी विनिमयातील सुधारणा

१४.५.८ कृषी क्षेत्रातील सुधारणा

१४.६ उदारीकरणातून अपेक्षाभंग

१४.७ उदारीकरण होऊनही भारत मागे का ?

१४.८ उदारीकरणाची वेळ आणली गेली का?

१४.९ उदारीकरण म्हणजे अनिर्बंध खासगीकरण नव्हे!

१४.१० १९९१ नंतरची अर्थिक उदारीकरणाची अमंलबजावणी

१४.११ उदारीकरणाचे परिणाम (प्रभाव)

१४.११.१ कृषी क्षेत्र/ शेती क्षेत्र

१४.११.२ उद्योगधंदेः (Industry)

१४.११.३ उदारीकरणाने विषमता वाढली?

१४.११.४ राजकोषीय सुधारणा

१४.११.५ चलन विषयक धोरण सुधारणा

१४.११.६ औद्योगिक सुधारणा

१४.११.७ कर सुधारणा

१४.१२ सारांश

१४.१३ प्रश्न
१४.१४ संदर्भ



## १४.० उद्दिष्टे

- भारतातील उदारीकरण धोरणाचा मागोवा घेणे.
- उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे स्पष्ट करणे.
- उद्योग क्षेत्रात झालेल्या सुधारणाचा आढावा घेणे.
- उदारीकरणांच्या परिणामांचा अभ्यास करणे.
- उदारीकरण होऊनही भारत मागे का ? याचा उलगडा करणे.

## १४.१ प्रस्तावना

भारताने १९९१ मध्ये नवीन अर्थिक कार्यक्रम सुरू केले. नवा अर्थिक कार्यक्रम नवा तसेच धाडसी मानला जातो. यामध्ये अर्थिक उदारीकरण या घटकाला महत्त्वाचे स्थान आहे. १९८० नंतर जगातील अनेक राष्ट्रांनी अर्थव्यवस्थेत शिथिलीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पनांचा स्वीकार केला. उदारीकरण म्हणजे आपल्या देशाचा जगातील इतर राष्ट्रांशी खुला व्यापार असणे आणि देशांतर्गत खाजगी क्षेत्रावर कोणतेही बंधन नसणे होय. सीमाशुल्क आणि वाटप पद्धती नष्ट करणे हा शिथिलीकरणा मागचा हेतू आहे. उदारीकरणाची संकल्पना ही बाजार यंत्रणा आणि खुला(मुक्त) बाजार आणि मुक्त स्पर्धा यांवर आधारित आहे.

२४ जुलै १९९१ रोजी मा. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी परमिटराज- समाप्तीची घोषणा केली आणि भारतात उदारीकरणाला सुरुवात झाली. उदारीकरणाला सुरुवात होऊन आता तीन दशकांचा काळ लोटतो आहे. या तीन दशकात आपण काय कमावलं आणि काय गमावलं याचा लेखाजोखा मांडला तर आपले चुकले कुठे आणि अजून काय केलं तर पुढील दशकात भारत एक सशक्त महासत्ता होऊ शकेल याचा उहापोह करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

## १४.२ उदारीकरण म्हणजे काय?

उदारीकरण ही संकल्पना व्यापक असल्याने त्याची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे. ही संकल्पना अर्थव्यवस्थेतील व्यापक स्वरुपाच्या आर्थिक सुधारणांची प्रक्रिया आहे.

**१) डॉ. व्ही. एम्. अत्री:**

आर्थिक उदारीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की जिच्यामुळे निर्यातीस आणि आयातीस प्रतिबंध करणाऱ्या घटकांची तीव्रता कमी करण्यासाठी बाजाराधिष्ठीत किंमतयंत्रणेचा स्वीकार केला जातो.

**२) डॉ. एस रामनजनेयुल:**

आर्थिक उदारीकरण म्हणजे आयात, निर्यात आणि उत्पादक गुंतवणुकीवरील अनिष्ट निबंध, नियंत्रणे, परवाने शिथिल करणे होय. अर्थव्यवस्थेत निकोप स्पर्धा वाढीला लावण्यासाठी, बाजाराधिष्ठीत किंमत यंत्रणेचा स्वीकार, ही यंत्रणा म्हणजे मागणीपुरवठा यांच्या आधारे उत्पादन व उपयोग याबाबतचे निर्णय घेणारी यंत्रणा होय. ती अधिक सुलभ झाली तर अर्थव्यवस्थेची गती वाढते. त्यासाठी सरकारने बाजारव्यवस्थेतील आपला हस्तक्षेप क्रमाक्रमाने कमी करणे आणि खुल्या स्पर्धेला वाव देणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय.

उदारीकरण हा शब्द अर्थ व्यवस्थेच्या संदर्भात आपण वापरणार आहोत. अर्थव्यवस्थेच्या बाबतीत उदार धोरण स्वीकारणे म्हणजे उदारीकरण. उदार धोरण म्हणजे मुक्त अर्थ व्यवस्थेचे धोरण, खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण - थोडक्यात उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्था खुली करणे. किंमतींवरचे सरकारी नियंत्रण काढून टाकणे, परवाने आणि लायसन्स ची पद्धत रद्द करणे, परकीय भांडवलाचे स्वागत करणे. उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्था देशी आणि विदेशी खाजगी संस्थांसाठी खुली करणे. काही वेळेस काही देशांमध्ये देशी आणि विदेशी संस्थांसाठी वेगळे नियम लागू केले जातात. देशी संस्थांना संरक्षण देण्याचा मुख्य उद्देश त्यामधे असतो. या प्रक्रियेचा वेग किती ठेवायचा तेही संबंधित सरकारच ठरवते.

उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेतील शासकीय हस्तक्षेप व नियंत्रण कमी करण्याकडे कल असणाऱ्या धोरणांचा अवलंब करणारी प्रक्रिया होय. या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेमध्ये खासगी क्षेत्राला अधिक सहभागी करून घेण्यात येते. सामान्यपणे, या धोरणांमध्ये उद्योगधंद्यांच्या खासगीकरणावर भर देण्यात येतो. औद्यौगिक सुधारणा, राजकोषीय सुधारणा, कारसुधारणा, नियोजनातील सुधारणा, बँकिंग सुधारणा अशा विविध बृहतलक्षी सुधारणा राबवून भारतीय अर्थव्यवस्थेत मोठे संरचनात्मक बदल घडत आहेत, अशा बदलांमधून अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रावरील निर्बंध कमी केले जाता आहेत. याला उदारीकरण असे म्हणतात.

जागतिकीकरण हे लक्ष्य गाठण्यासाठी उदारीकरण ही एक दिशा आहे उदारीकरणाला शिथिलीकरण असाही एक पर्यायी शब्द आहे. २४ जुलै १९९१ मध्ये तेव्हाचे पंतप्रधान नरसिंह राव आणि अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी ऐतिहासिक अर्थसंकल्प सादर करून देशात उदारीकरणाचं रणशिंग फुंकलं. त्या निमित्ताने उदारीकरणाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर नेमका काय परिणाम झाला, उदारीकरणाचे फायदे कोणते आणि तोटे कोणते? याचं विश्लेषण तज्ज्ञांकडून करून घेण्याचा बीबीसी मराठीचा हा प्रयत्न. १९४७ ते १९९१ केंद्र सरकारने अर्थव्यवस्था हाताळण्याचे धोरण "जे नियमबद्ध केलं होतं, ते मोकळं करण्याचा" निर्णय झाला. याला लिबरलायझेशन किंवा उदारीकरण असं म्हणतां येईल.

## १४.३ भारतातील उदारीकरण

१९८० च्या दशकात जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे उदारीकरणाच्या प्रक्रियेला सुरवात झाली. आज भारतात पेट्रोलियम, दूरचित्रवाणी, रेडीओ, दूरसंचार, वीजनिर्मिती, विमा इत्यादी क्षेत्रे खाजगी क्षेत्रासाठी खुली करण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्यानंतर लगोलग भांडवलाची कमतरता आणि पायाभूत सुविधांचाही अभाव असल्याने तत्कालीन बडे उदयोगपती टाटा, बिर्ला, बांगर यांनी BOMBAY PLAN द्वारे नेहरू सरकारला खाजगी क्षेत्राच्या विकासाकरिता सरकारने सरकारी क्षेत्राचा नियोजनपूर्वक विकास करून हस्तक्षेप करण्याचा आग्रह केला होता. भारतीय अर्थव्यवस्थेचं उदारीकरण नरसिंहराव सरकारने केलं आणि नियतीशी नेहरू सरकारने केलेल्या कराराला आमुलाग्र वेगळं वळण दिलं. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने स्वीकारलेल्या औद्योगिक धोरणामुळे सरकारी नियंत्रण आणि सरकारी उद्योगांना प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले होते. परंतु त्यामुळे अर्थव्यवस्थेत अनेक दोष निर्माण झाले परिणामी १९८० च्या औद्योगिक धोरणाने उदारीकरणाला मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार मोठ्या उद्योगांच्या परवाना धोरणाबाबत शिथिलता आणि भारत सरकारने १९८६ मध्ये २३ उद्योगांना मक्तेदारी नियंत्रण, विदेशी विनिमय नियंत्रण कायद्यातून परवाना मुक्त केले. औद्योगिक परवान्याचे शिथिलीकरण करण्यात आले. जुलै १९९१ मध्ये नव्या औद्योगिक धोरणाने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. जागतिक अर्थव्यवस्थेशी आपली अर्थव्यवस्था एकरूप होण्यासाठी उदारीकरणाचे धोरण स्वीकारले तसेच प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीतील नियंत्रणे दूर केली. देशांतर्गत उद्योगांना मक्तेदारी नियंत्रण कायद्यातून मुक्त करण्यात आले. या औद्योगिक धोरणामुळे भारतात विविध आर्थिक सुधारणा सुरू झाल्या १९९३ मध्ये सरकारने सक्तीच्या परवाना पद्धतीमध्ये १८ राखीव उद्योगांपैकी अनेक राखीव उद्योग मुक्त केले. उदारीकरण प्रक्रियेत अर्थव्यवस्था मुक्त करता करता, आता मोकाट अर्थव्यवस्था होऊन देशाची परिस्थिती अधिक संकटग्रस्त झाली आहे काय? हा संदर्भ तपासावा लागेल.

## १४.४ भारताने उदारीकरण स्वीकारण्याची कारणे

१) १९८८ ते ९१ या काळात सरकारला आयात-निर्याती मी करण्यात अपयश आले. त्यामुळे महसूलातील तूट तीव्रतेने वाढ लागली लागताच सरकारला सर्व बाजूंनी कर्ज घ्यावे लागले. कर्ज वाढल्याने देशा संकट आले. या आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी सरकारला उदारीकरण मार्ग अवलंबावा लागला.

२) आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात प्रगती होणे आवश्यक होते. भारतातील उद्योगधंद्यांवर सरकारी नियंत्रणे बरीच होती: ती शिथिल करून परवानामुक्त धोरण अवलंबिणे सरकारला अत्यावश्यक होते.

३) कृषी क्षेत्रातही बदल करणे आवश्यक होते. कारण देशातील कृषिमालाची निर्यात नगण्य होती. कृषी क्षेत्राला फारसे महत्त्वही दिले गेले नव्हते. त्यामुळे कृषी उत्पन्नावरील नियंत्रणेही दर करणे निकडीचे होते.

४) भांडवल बाजारातही कमालीचे औदासिन्य होते. सर्वसामान्य माणस शेअर बाजारापासून तसेच भांडवल बाजारापासून चार हात लांबच होता. त्यामळे उद्योगधंद्यातील गंतवणूकही अत्यल्प अशीच होती. भारत सरकारने परकीय भांडवलाच्या आयातीवर निर्बंध घातल्याने भारतीय उद्योगाच्या क्षेत्रात परकीय भांडवल विशेष गुंतलेले नव्हते. सरकारने उदारीकरणाचे धोरण अवलंबिले असते तरच गंतवणुकीतील निर्बंध शिथील झाले असते. जागतिक व्यापारवती करण्यावर भर देणेही

आवश्यक होते. कारण १९९१ पूर्वी भारताचा जागतिक व्यापार अत्यल्प होता, निर्यातीपेक्षा आयातीचे प्रमाण अधिक होते. निर्यातीत वाढ करावयाची असल्यास भारताला उदारीकरणाचे धोरण पत्करणे आवश्यक होते.

५) याशिवाय मंदगतीने असणारी भारतीय अर्थव्यवस्था अधिक गतिमान करणेही तितकेच निकडीचे होते. त्यासाठी काही ठोस पावले उचलणे आवश्यक होते. भारताची फारशी निर्यात होत नसल्याने त्याला व्यापारात सतत तूट सहन करावी लागत होती. तुटीमुळे परकीय चलन विशेष उपलब्ध होत नव्हते. परकीय चलन उपलब्ध नसल्यामुळे नवीन तंत्रज्ञान आयात करण्यासाठी भारताला अनेक अडचणीना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे लवकरात लवकर उदारीकरणाची प्रक्रीया सुरू करणे भारताला आवश्यक होऊन बसले.

६) बहुराष्ट्रीय कंपन्या आपली आगेकूच अधिक गतीने करीत होत्या. त्याच्यासमोर भारतीय कंपन्या टिकणे अशक्य झाले होते. ही स्पर्धा देशांतर्गत नसून आंतर्राष्ट्रीय स्वरूपाची बनल्याने उदारीकरण आवश्यक झाले होते. १९९१ पतप्रधान नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहनसिंग यांनी उदारीकरणाचे धार राबविण्यास मंजुरी दिली. १९९१ मध्ये (New Economic Policy) - धोरण सरकारने घोषित केले. त्यानुसार-

१) नवे औद्योगिक धोरण

२) नवीन शा व्यापार धोरण

३) विनिमय दर धोरण या गोष्टींवर आधारित १९९१-९२ चे केंद्रीय अंदाजपत्रक घोषित करण्यात आले व भारतात उदारीकरणाला प्रारंभ झाला.

## १४.५ उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे

३०- ३५ च्या तरुणांना हे वाचून कदाचित आश्चर्य वाटेल की १९९१ च्या पूर्वीच्या काळात स्कुटर म्हणजे बजाज, बूट म्हणजे बाटा, चारचाकी गाडी म्हणजे अँबॅसेडर किंवा प्रीमियर पद्मिनी, दूध म्हणजे सरकारी योजनेचे काचेच्या बाटलीत विविध रंगी बुचाचे झाकण असलेले, बँका म्हणजे सरकारी किंवा सहकारी बँका, विमा म्हणजे एलआयसी, विमानसेवा म्हणजे एअर इंडिया, टीव्ही म्हणजे दूरदर्शन, रेडिओ म्हणजे ऑल इंडिया रेडिओ म्हणजेच आकाशवाणी. तसेच रेशनच्या दुकानासमोर रांगेत उभे राहून मिळणारे गहू, तांदूळ, साखर इतकेच काय तर केरोसीन देखील तिथेच विकत घ्यावे लागायचे अशी भारताची स्थिती होती. खासगी क्षेत्र म्हणजे कामगारांचे शोषण करणारे, वाजवीहून अधिक नफा कमावणारे, समाजहिताच्या विपरीत काम करणारे देशद्रोही. नफा कमावणे म्हणजे गुन्हा-या विचारसरणीने देशाचे नेतृत्व भारून गेले होते.

१९९० च्या सुमारास भारताचा परकीय चलनाचा साठा इतका कमी झाला होता की पंधरवड्यानंतर लागणारे परकीय चलन सुद्धा रिझर्व्ह बँकेकडे शिल्लक नव्हते. आपल्याकडील ४७ टन सोन्याचा साठा जागतिक बँकेकडे तारण ठेवावा लागण्याची नामुष्की भारतापुढे ओढवली होती. अशा अगतिकतेच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी जागतिक बँकेकडून कर्ज घेणे भाग होते. त्यावेळी कर्ज देतांना आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष

(IMF) आणि जागतिक बँकेने घातलेल्या अटी मान्य करण्यावाचून भारताला गत्यंतर नव्हते.

परमिट राज संपविणे, खाजगी क्षेत्रावरील निर्बंध उठवणे, उद्योगातील सरकारचा हस्तक्षेप कमी करणे, इतर देशांबरोबर व्यापार करतांना घातलेले निर्बंध कमी करणे, विदेशी गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे अशा काही अटींवर भारताला त्यावेळी कर्ज पुरवठा झाला. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असून देखील अत्यंत नाईलाजाने भारतात नवी पहाट झाली असे म्हणणे गैर होणार नाही.

### १४.५.१ १९९१ नंतर झालेले बदल:

समाजवादाच्या रुळावरून जाणारी गाडी रूळ बदलून दिशा बदलून जायला लागली. गाडी रूळ बदलते तेव्हा खडखडाट हा होतोच. पण तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी सरकार अल्पमतात असूनदेखील अत्यंत कुशलतेने ही परिस्थिती सांभाळली.

पुढील पाच वर्षे काँग्रेस पक्षातील आणि मित्र पक्षातील समाजवादी विचारसरणी असलेल्या पुढाऱ्यांना बाजूला सारून किंवा त्यांची समजूत काढून त्यांनी उदारीकरणाची प्रक्रिया चालू ठेवली आणि उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या रुळावरून भारताची घोडदौड सुरू झाली.

जीडीपी वाढीचा दर २-३ टक्क्यांवरून वाढून ६-७ टक्क्यांवर आला. पाच वर्षानंतर आलेल्या वाजपेयी सरकारनेही त्याच मार्गावरून वाटचाल केली किंबहुना त्यांच्या काळात या धोरणांना बळ प्राप्त झाले कारण त्यांचा पक्षच मुळी "उजव्या" विचारधारेचा असल्याने नरसिंहराव यांना जसा पक्षांतर्गत विरोधाचा सामना करावा लागला तसा वाजपेयींना करावा लागला नाही. पुढील दहा वर्षं युपीए सरकारने तोच मार्ग अवलंबला आणि सकल उत्पन्न वाढीचा दर २०१० साली चक्क ८.५% झाला. २०१४ साली भाजपचे सरकार आल्यावर तर नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यावर जाहीरच केलं की सरकाराचे काम व्यापार / उद्योग करणे हे नसून त्यांना प्रोत्साहन देणे हे आहे -" Government has no business to do business."  उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण मागील ७ वर्षांत जेवढे झाले तेवढे आधीच्या २३ वर्षांत झाले नाही असे दिसून येते. कोणत्या क्षेत्रात काय काय बदल झाले हे बघायचे झाले तर प्रामुख्याने औद्योगिक क्षेत्रातील बदल, आर्थिक क्षेत्रातील बदल, कर-प्रणालीतले बदल, परकीय चलन बाजारातील बदल, कृषी क्षेत्रातील बदल आणि विदेशी गुंतवणुकीस चालना देणारे बदल आणि त्यांचे परिणाम या विषयी जाणून घ्यावे लागेल.

### १४.५.२ उद्योग क्षेत्रात झालेले बदल:

१९९१ पूर्वी उद्योग सुरू करण्यासाठी लायसन्स किंवा परवान्याची गरज असे. तो मिळवण्यासाठी तुम्ही कोणते उत्पादन घेणार, किती घेणार, कामगार किती ठेवणार, वगैरे तपशील दिल्यावर उद्योग निरीक्षक दहा खेटे घालायला लावणार, वीस आक्षेप घेणार आणि नशीब चांगले असले आणि निरीक्षकाला "खुश" करू शकलात तरच उद्योगास परवाना मिळत असे. परवाना कधी मिळेल, याची कोणीही खात्री देऊ शकत नसे. Ease of doing

business याची परिभाषा निरीक्षकास माहीत नव्हती. उद्योग हे केवळ सरकारी संस्थांनीच करायचे, खाजगी गुंतवणूकदारांना, उद्योजकांना अनेक उद्योग निषिद्ध होते. काही उत्पादने ही केवळ लघु उद्योगांसाठी राखीव होती. उत्पादनांची किंमत ठरवायची मुभा देखील अनेकदा उद्योजकांना नसे. १९९१मध्ये मनमोहन सिंग हे केंद्रीय अर्थमंत्री होते. १९९१ मध्ये नवे औद्योगिक धोरण जाहीर झाले आणि यामध्ये अमुलाग्र बदल झाला. अनेक निर्बंध हटविले गेले, "इन्स्पेक्टर राज" मधून मालकांची सुटका झाली, उद्योग परवाना न घेताही अनेक उद्योग सुरू करण्याची मुभा मिळाली.

### १४.५.३ करविषयक सुधारणा:

आयकराचे दर कमी करण्यात आले. कॉर्पोरेट टॅक्स केवळ कमीच करण्यात आला असे नाही तर ३० टक्क्यांहून अधिक असलेला कर-दर टप्याटप्याने कमी होईल आणि तो २५% होईल अशी घोषणा अर्थमंत्रानी संसदेत केली आणि त्याबरहुकूम कॉर्पोरेट टॅक्स चे दर कमी केले देखील. वैयक्तिक आयकराचे दर पण कमी झाले, कर आकारणी सुलभ झाली. आपण आयकर भरतो याचा अभिमान वाटायला हवा अशी वागणूक त्यांना आयकर अधिकाऱ्यांकडून मिळायला हवी अशा स्पष्ट सूचना पंतप्रधानांनी दिल्या. या सर्वांचा परिणाम आयकर विवरण भरणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय अशी वाढ दिसून आली आणि कर संकलन देखील बरेच वाढले. असे जरी असले तरी याच काळात पूर्वलक्षी कर आकारणीच्या व्होडाफोन सारख्या केसेसने भारताची बदनामी झाली.

### १४.५.४ बँकिंग क्षेत्रातील सुधारणा:

स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये इतर स्टेट बँकांचे विलीनीकरण करण्यात आले तसेच राष्ट्रीयीकृत बँकांची संख्या कमी करण्यात आली. बँकांचे विलीनीकरण झाल्याने अनुत्पादित खर्चात आणि अनुत्पादित कर्जात कमी होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे बॅंकांमधील कम्युनिस्ट प्रणित कामगार संघटनांच्या विरोधाला न जुमानता सरकारने बँकांचे विलीनीकरण केले. दोन सरकारी बँकांची विक्री करण्याची घोषणा करण्यात आली आहे. आयडीबीआय बँकेतील हिस्सेदारी आधी कमी करून आता ती बँक पूर्णपणे खाजगी करण्याच्या हालचाली सुरू आहेत. महाराष्ट्र बँक, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि इंडियन ओव्हरसीज बँक या बँकांचे यथावकाश खाजगीकरण करून सरकार या बँकांमधील आपली हिस्सेदारी पूर्णपणे काढून टाकणार आहे. भारतीय बॅंकांमधील विदेशी गुंतवणुकीची मर्यादा ७४% पर्यंत वाढवण्यात आली तसेच नवीन शाखा विस्तारासाठी आता रिझर्व्ह बँकेची परवानगी लागत नाही.

### १४.५.५ विमा क्षेत्रातील सुधारणा:

विमा कंपन्यांमधील विदेशी गुंतवणूकीची मर्यादा वाढवून ७४% करण्यात आली. सरकारी स्वामित्वाच्या साधारण विमा कॉर्पोरेशन (GIC ) आणि न्यू इंडिया अशुरन्स कंपनी यांची शेअर बाजारात नोंदणी करण्यात आली. या वर्षीच्या शेवटच्या तिमाहीत एलआयसीचा आयपीओ (IPO) येऊ घातला आहे. त्या निर्गुंतवणुकीद्वारे सरकार रु. ८०,००० ते १,००,००० कोटी उभे करेल असे दिसते. ही आतापर्यंतची सर्वाधिक रकमेची प्रारंभिक विक्री होण्याची शक्यता आहे. एलआयसीची नोंदणी भांडवली शेअर बाजारात झाल्यावर

नोंदणी झालेल्या कंपन्यांमध्ये एलआयसीचे भांडवली बाजारमूल्य सर्वाधिक असण्याची शक्यता आहे. तसेच पुढील पाच वर्षांत सरकार एलआयसीतील आपली हिस्सेदारी २५ टक्क्यांनी कमी करणार आहे.

### १४.५.६ अप्रत्यक्ष करातील सुधारणा:

"एक देश : एक कर" या तत्त्वानुसार जुलै २०१७ पासून जीएसटीची अंमलबजावणी करण्यात आली. पेट्रोलियम उत्पादने, दारू असे काही अपवाद वगळता सर्व वस्तू आणि सेवा चार दरात विभागण्यात आल्या असून त्यात सुसूत्रता आणण्यात आली आहे. त्यामुळे कर संकलनात भरीव वाढ होऊन आता दर महिन्याला १ लाख कोटीहून अधिक कर संकलन होत आहे. सध्या होत असलेल्या चार दरांऐवजी दोनच दराने आकारणी करणे गरजेचे आहे तसेच केंद्राने राज्यांचा वाटा वेळच्या वेळी राज्यांना देणे आवश्यक आहे. नजीकच्या काळात कुठल्याही अपवादाशिवाय सर्व सेवा आणि वस्तू जीएसटीच्या अंतर्गत आणणे गरजेचे आहे.

### १४.५.७ विदेशी विनिमयातील सुधारणा:

१९९१ मध्ये रुपयाचे अवमूल्यन केल्याने विदेशी विनिमयातील तूट कमी झाली. रुपया - डॉलर चा विनिमय दर (Exchange Rate) पूर्वी नियंत्रित असे, तो बाजारमूल्याशी निगडित झाला. रिझर्व्ह बँकेचा विनिमयदरातील हस्तक्षेप कमी झाल्याने मोठ्या प्रमाणात शेअर बाजारात, म्युच्युअल फंडात, बँकात, विमा कंपन्यात, उद्योगात विदेशी गुंतवणूक होऊ लागल्याने १९९१ साली केवळ १५ दिवस पुरेल इतका परकीय चलनाचा साठा होता तो वाढून १८ महिने पुरेल इतका म्हणजे म्हणजे ६ बिलियन डॉलर वरून वाढून ६०० बिलियन डॉलर इतका झाला. निर्यातीवरील कर पूर्णतः काढून टाकल्याने १९९१ मध्ये असलेले ४ बिलियन डॉलर चे उत्पन्न वाढून १६५ बिलियन डॉलर इतके झाले. माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्राने तर दरवर्षी २१% चक्रवाढ दराने १५० बिलियन डॉलर इतके प्रचंड विदेशी विनिमय भारतात आणले.

### १४.५.८ कृषी क्षेत्रातील सुधारणा:

राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे कृषी क्षेत्रातील बदल आणि कृषी कायद्यातील बदल लांबणीवर पडले. अनेक पुढाऱ्यांचे हितसंबंध गुंतले असल्याने कृषी कायद्यांतील सुधारणा करणे दुरापास्त झाले होते. पण विद्यमान सरकारने अत्यंत कुशलतेने या कायद्यांना होणार विरोध मोडून काढला आणि आता पंजाब आणि हरियाणा या केवळ दोनच राज्यांमधील शेतकरी आंदोलन करताना दिसताहेत.

## १४.६ उदारीकरणातून अपेक्षाभंग

उदारीकरणाचा अभ्यास तौलनिकही करावा लागेल. आपण हे धोरण अवलंबलं तेव्हाच इतर देशही किंबहुना आपल्या आधी इतर देश या वाटेवरून गेले होते. चीनने उदारीकरणाच्या तीस वर्षांत जेवढी प्रगती केली त्याच्या निम्मीपण आपण करू शकलो नाही. रोजगार निर्मिती ज्या प्रमाणात व्हायला हवी होती, त्याहून खूपच कमी प्रमाणात रोजगार निर्मिती झाली. मोठे उद्योगधंदे सुरू झाले नाहीत. Ease of doing business या क्षेत्रात लक्षणीय

अशा सुधारणा झाल्या नाहीत. दरडोई उत्पन्न वाढलं असलं तरी ते अजून किमान दुप्पट वाढायला हवं होतं. या वर्षीच्या शेवटच्या तिमाहीत एलआयसीचा आयपीओ येऊ घातला आहे. कर प्रणालीत सुसूत्रता आणणे गरजेचे आहे. लोकांच्या मानसिकतेत बदल घडवणे जरुरी आहे त्यासाठी मोठ्या प्रमाणावर संवाद साधायला हवा. "सरकारने बँका विकायला काढल्या आहेत," ही मानसिकता बदलून अशा सुधारणांची आवश्यकता आम जनतेला पटवून देणे गरजेचे आहे.

हळुहळू या मानसिकतेत बदल झालेला दिसून येतोय. एके काळी सिंगूर मधून टाटांना पळवून लावणाऱ्या बंगालच्या मुख्यमंत्री मा. ममतादीदींनी नुकतेच टाटांना बंगालमध्ये प्रकल्प सुरु करण्याचे आवाहन केले आहे. चीनने आपल्या आधी केवळ १२ वर्षं म्हणजे १९७८ पासून उदारीकणाला सुरुवात केली तेव्हा भारताचे आणि चीनचे दरडोई उत्पन्न जवळपास सारखे होते. आज  चीनचे दरडोई उत्पन्न भारतातून ५ पटीहून अधिक आहे याचे कारण म्हणजे तिथे आर्थिक सुधारणा मनापासून करण्यात आल्या. कम्युनिस्ट शासन असल्याने विरोधाला वाव नव्हता. भारतात मात्र लोकशाही असल्याने व समाजवाद खोलवर रुजला असल्याने नव-विचाराला होणार विरोध मोडून काढणं कठीण जातं. शिवाय महत्त्वाचे म्हणजे आपण उदारीकरणाचे धोरण केवळ इष्टापत्ती होती म्हणून मान्य केलं, मनापासून नव्हे. एवढे असले तरी भारताचे सकल उत्पन्न जे स्वातंत्र्य मिळाले तेव्हा १० बिलियन डॉलर होते ते १००० बिलियन डॉलर व्हायला ६० वर्षं लागली मात्र उदारीकरणानंतर पुढचा हजाराचा टप्पा आपण केवळ ७ वर्षांत गाठला आणि करोनाने अर्थव्यवस्था मोडकळीस आली असतांना देखील पुढचा हजाराचा टप्पा २०२२-२३ मध्ये आपण गाठू आणि त्या पुढील हजाराच्या टप्प्यातील कालावधी झपाट्याने कमी होईल असे दिसते.

## १४.७ उदारीकरण होऊनही भारत मागे का ?

मानवी विकासाच्या निर्देशांकात चीन पुढे आहे. भारतात उदारीकरण राबविण्यात भारतीय लोकशाहीने अर्थव्यवस्थेत मूठभरांची संपत्ती वाढविण्याचं काम केलं आणि बेसुमार विषमता निर्माण करणारी मोकाट अर्थव्यवस्था जन्माला घातली.

## १४.८ उदारीकरणाची वेळ आणली गेली का?

१९९१ नंतर देशाची संपत्ती आणि जनतेची संपत्ती मूठभर भांडवलदारांना हस्तांतरित करण्याचं धोरण याला जनमान्यता कशी मिळू शकेल? भारतीय अर्थव्यवस्थेत Balance Of Payment आणि RBI कडे अपुरे परकीय चलन साठा या मुद्यावर आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बॅंकेकडून अत्यंत कठोर अटी स्वीकारत देशाच्या अर्थव्यवस्थेची सर्वांगीण पुनर्रचना करण्याचं मान्य करणं ही बाब उदारीकरणाची पूर्व अट बनली. मनमोहन सिंग सरकारने भारत सरकार उदारीकरण करीत असताना मानवी चेहऱ्याने ते राबविलं आणि भारत सरकार बॅंकामधील मालकी हक्क ५१ टक्के राखील तसंच सार्वजनिक क्षेत्रातील बॅंका अबाधित राहतील याची लोकसभेत ग्वाही दिली. युपीए सरकारने हे बंधन पाळलं. बॅंकाप्रमाणे सर्व सार्वजनिक क्षेत्रासाठी सरकारचं हे धोरण होतं.

उदारीकरण भारतीय अर्थव्यवस्थेत सरसकट  वाईट असं मानण्यात चूक होईल. १९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेतील परवाना राज, लाल फितीमध्ये अडकलेली यंत्रणा मोकळी होणे याच बरोबर नवीन उदयोग धोरण, आयात निर्यात धोरण आणि तंत्रज्ञाना वर आधारित उदयोग आणि सेवांचा विकास, भारतीय अर्थव्यवस्थेत उभारी आणणारं ठरलं.

## १४.९ उदारीकरण म्हणजे अनिर्बंध खासगीकरण नव्हे!

३० वर्षांपूर्वी सुरू झालेला उदारीकरण आणि खासगीकरणाचा अपूर्ण अजेंडा आज मोदी सरकार देशाच्या दुर्दशेवर उतारा म्हणून सर्व सरकारी क्षेत्राचा लिलाव करू पाहत आहेत. मोदी सरकारचं हे उदारीकरण धोरण आणि अर्थव्यवस्थेला मुक्त करणे, डॉ. मनमोहन सिंग यांनाही अभिप्रेत नाही. केंद्र सरकारच्या हातात असे काहीही राहणार नाही, ही व्यवस्था भिकेला लावणारी असेल. १९९१ नंतर बँकासाठी नरसिंम्हन कमिटी, कर विमा व्यवसायासाठी मल्होत्रा कमिटीने हे व्यवसाय सरकारी नियंत्रणातून मुक्त करण्याच्या शिफारशी केल्या. ही उदारीकरणाची प्रक्रिया घातक आहे हे सरकारच्या लक्षात आलं. कारण जनतेचा चहूबाजूने विरोध आहे.  भारतीय संसदीय लोकशाही १९५० च्या भारतीय संविधानावर चालते. आपल्या शेजारचा चीन पाहा. १९५० मध्ये माओंच्या नेतृत्वाखाली चीनच्या कम्युनिस्ट पक्षाची सत्ता आली. कॉम्रेड माओंच्या पतनानंतर कॉम्रेड डेंग यांनी १९८० मध्ये भांडवलशाहीची अर्थव्यवस्था चीनमध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली स्वीकारली आणि उदारीकरणाला मिठीच मारली.

चीनच्या उदारीकरणाची ४० वर्षं आणि भारतीय उदारीकरणाची ३० वर्षं ही तुलना अपरिहार्य आहे. चीनने जागतिकीकरण प्रक्रिया नाकारली आणि नंतर स्वीकारली. पण, आज चीनमध्ये ॲपलसहित सर्व अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्यांचा व्यवसाय सर्वाधिक आहे. तरी चीनच्या कंपनीचं उत्पादन चीन आणि जगांतील सर्वच देशांमध्ये विकलं जातं. चीन आज अमेरिकेला आव्हान देत दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे.

१९८०-८५ या कालखंडात कोणत्याही उद्योगाला आपली उत्पादन क्षमता २५% पर्यंत वाढविण्यात परवानगी देण्यात आली. भारतीय उद्योगांची स्पर्धा वृत्ती वाढविणे व उत्पादनातील कार्यक्षमता सुधारणे यासाठी उदारीकरणाचा निर्णय घेण्यात आला. १९८२ मध्ये मक्तेदारी प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (MRTP Act) कंपन्यांना मागास भागात उद्योग सुरू करण्यासाठी परवानगी देण्याचा निर्णय घेतला. विदेशी व्यापारी संबंधी उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. विदेशी सहयोगातून व विदेशी भांडवलातून औद्योगिकीकरण्यासाठी उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. त्यामुळे या कालखंडात उद्योगातील उत्पादन क्षमतेच्या वापरात ७३.२% पासून ७८.८% पर्यंत वाढ झाली. अर्थात, उदारीकरणामुळे आयात वाढल्याने व्यवहार शेषात तूट निर्माण झाली.

१९८५-१९९१ च्या कालखंडात अर्थव्यवस्थेतील कार्यक्षमता सुधारण्यास योग्य वातावरण निर्माण करण्याचा आणि जागतिक अर्थव्यवस्थेशी समन्वय साधण्यासाठी संरचनात्मक बदल करण्याचे धोरण राबविण्यास सुरूवात झाली. उदारीकरणाच्या दृष्टीने काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मागणी प्रमाणे उत्पादन करण्यासाठी उद्योगांना विविधीकरणाचे स्वातंत्र्य देण्यात आले. यामध्ये ऑटोमोबाईल उद्योग पेट्रोकेमिकल उद्योग,

औषध उद्योग निर्मिती इ.चा समावेश होता. १९८६-८७ मध्ये २७ उद्योगांना मक्तेदारी प्रतिबंधक कायद्याच्या कसे बाहेर आणले तसेच मक्तेदारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत कंपन्यांच्या मत्तांची (Assets) मर्यादा २० कोटी रूपयांवरून १०० कोटी रुपयांवर वाढविण्यात आले. इलेक्ट्रॉनिक उद्योगात तंत्रज्ञान आयातीला पूर्ण परवानगी देण्यात आले. म्हणजे १९९१ पर्यंत आर्थिक उदारीकरणाबाबत समाधानकारक प्रगती झाल्याचे दिसून येते.

## १४.१० १९९१ नंतरची अर्थिक उदारीकरणाची अमंलबजावणी

भारतामध्ये खऱ्या अर्थाने आर्थिक उदारीकरणाच्या धोरणाला चालना मिळाली ती पी.व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या धोरणामुळे. त्यांनी औद्योगिक धोरण, व्यापारी धोरण, विनिमयदराचे धोरण आणि १९९१-९२ चे अंदाजपत्रक या विविध धोरणात्मक निर्णयातून आर्थिक उदारी करणाची अंमलबजावणी सुरू केली उदारीकरणासंबंधी सरकारने पुढील महत्त्वाचे निर्णय घेऊन त्यांची अंमल बजावणी केली.

१) औद्योगिक परवाना पद्धती नष्ट केली. राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक उद्योगाव्यतिरिक्त सर्व उद्योग परवाना मुक्त केले.

२) विदेशी गुंतवणूक आणि तंत्रज्ञानात मुक्त प्रवेश दिला. भारतातील औद्योगिक आणि व्यवसायिक कंपन्यांचा समभागात ५१% किंवा त्यापेक्षा जास्त विदेशी गुंतवणूक दारांना परवानगी देण्यात आली. विशेषतः अनिवासी भारतीयांना गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिले.

३) मक्तेदारी व व्यापारी नियंत्रण कायदा, मर्यादा रद्द केली. १९८५ मध्ये या उद्योगांची मालमत्ता १०० कोटी रूपयांपेक्षा जास्त असेल तर ते उद्योग या कायदया खाली येतील असे जाहीर केले. तसेच उपभोक्त्यांना पुरेसे संरक्षण देण्याची तरतूद केली.

४) सार्वजनिक (सरकारी) क्षेत्र कमी केले. सरकारने १९५६ पासून सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवलेल्या उद्योगांची संख्या कमी करून ती ५ वर आणली. तसेच प्रस्थापित उद्योगात नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला. १९९७-९८ पर्यंत सरकारी क्षेत्रातील उद्योगांचे ११३६९ कोटी रू. एवढ्या किंमतीचे भागरोखे वित्त संस्थांना दिले. त्यामुळे खाजगी क्षेत्राचे महत्त्व वाढले.

५) पायाभूत क्षेत्र मुक्त करण्याचा निर्णय घेतला. पायाभूत क्षेत्रात म्हणजेच वीज, रस्ते, पूल, बंदर विकास या सारख्या मूलभूत सेवा क्षेत्रात विदेशी गुंतवणूक दारांना प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला.

६) विदेशी चलनाचे व्यवहार नियंत्रण मुक्त करण्यासाठी रूपया मुक्त करण्यात आला. म्हणजेच चालू खात्यावर रूपया परिवर्तनीय करण्यात आला.

७) 'फेरा' ऐवजी फेमा' असा कायद्यात बदल केला. म्हणजे विदेशी चलन व्यवहार नियंत्रण (फेरा) कायदा या ऐवजी नव्या उदारीकरणाच्या धोरणास सुसंगत अशा विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा(फेमा) असा बदल केला.

८) वित्तीय क्षेत्रात उदारीकरणाचा निर्णय घेण्यात आला. श्री. नरसिंहम समितीच्या शिफारशी स्वीकारून सरकारी बँकांचे खाजगीकरण, बँकांना निर्णय स्वातंत्र्य आणि व्याज दरावरील निर्बंध उठविल्याने बाजारातील व्याजाचे दर बाजाराधिष्टीत आहेत.

९) भारतीय कर पद्धतीत सुधारणाकरून कर पद्धती साधी आणि सोपी करण्यात आली. याबाबत राजा चेलिया समितीच्या ८५% शिफारशी सरकारने स्वीकारल्या.

१०) भांडवल बाजार व नाणे बाजारात सुधारणा केल्या. त्यामध्ये विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विविध उपाय योजून पारदर्शकता आणली.

## १४.११ उदारीकरणाचे परिणाम (प्रभाव)

भारताने १९९१-९२ पासून स्वीकारलेल्या उदारीकरणाच्या धोरणाचे कृषी उद्योग व व्यापारी क्षेत्रावर झालेले परिणाम पुढील प्रमाणे.

### १४.११.१ कृषी क्षेत्र/ शेती क्षेत्र:

भारतीय कृषी क्षेत्राची दर हेक्टरी उत्पादकता खूपच कमी होती. शेतीवर आजही ७०% लोकसंख्या अवलंबून आहेत. औद्योगिक विकासाच्या मंद वेगाने आणि विस्तृत रोजगार संधीच्या अभावामुळे शेतीवरील ताण वाढतच होता. वारसाहक्कामुळे शेतीचे विभाजन आणि तुकडीकरण वाढत होते. या पार्श्वभूमीवर १९६० नंतरच्या दशकात शेतीबाबत स्वीकारलेल्या आधुनिक धोरणामुळे हरीत क्रांती घडून आली आणि अन्नधान्य उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढले. या पार्श्वभूमीवर उदारीकरणाची शेतीवरील परिणामांची चर्चा करणे गरजेचे आहे. उदारीकरणाचा कृषी क्षेत्रावरही परिणाम झाला. उदारीकरणामुळेही भारतातून निर्यात होणाऱ्या अनेक कृषी उत्पादनावरील नियंत्रणे दूर झालीत.अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेने अन्नधान्याच्या निर्यातीला सरकारने प्रोत्साहन दिले. रासायनिक खतावरील अनुदान कमी केले. सरकारने धान्यांच्या खरेदी-किंमतीत वाढ केली. शेती क्षेत्राला पुरेसा वित्तपुरवठा व्हावा असा प्रयत्न करण्यात आला. मात्र उदारीकरणानंतर शेतीतील गुंतवणूक घटल्याचे दिसून आले.

अनेक अर्थशास्त्रज्ञांनी उदारीकरणाने भारतीय कृषी क्षेत्राला लाभ होण्याची शक्यता असल्याची प्रतिपादन केले. कृषी क्षेत्राचे नवे तंत्रज्ञान, सिंचन व्यवस्था, उच्च उत्पादन बियाणे, खते, किटक नाशके यांचा उपयोग केल्यामुळे भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबन प्राप्त केले. शेतीक्षेत्राशी पावसावरील अवलंबित्व कमी केले. १९९६-९७ मध्ये शेतीच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २६% इतका होता. आजही कृषी क्षेत्राचा अर्थव्यवस्थेवर प्रभाव आहे. १९९३ नंतर शेती उत्पादनात फळे, भाज्या यांची निर्यात करण्याचे धोरण स्विकारले. १९९६-९७ मध्ये शेतमालाची निर्यात २४२३९ कोटी रूपयापर्यंत वाढली. शेती क्षेत्राच्या प्रगतीला चालना मिळाली.

### १४.११.२ उद्योगधंदे (Industry):

१९९१ च्या उदारीकरणाच्या धोरणाने औद्योगिक क्षेत्रात अनेक मूलभूत बदल घडून आले. उदारीकरणाच्या धोरणाने परवाना मुक्त धोरण राबविण्यास सुरवात झाली. विशेषतः

औद्योगिक परवाना पद्धत अत्यंत सुलभ केली. सार्वजनिक क्षेत्रातील राखीव उद्योगांची संख्या कमी करण्यात आली. खाजगी उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले. सरकारी क्षेत्रातील उद्योगांच्या समभागांची अपगुंतवणूक करण्यात आली त्यामुळे खाजगीगुंतवणूकीला चालना मिळाली. विदेशी गुंतवणूकी बाबतही उदार धोरण स्वीकारण्यात आले. विदेशी उद्योजकांना देशात उद्योग सुरू करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण केले. १९९१ मध्ये कायदेशीर परवाना पद्धत नष्ट केली. रूपयाचे चालू खात्यावर अंशतः परिवर्तन केले. १९९३ नंतर उद्योगात १००% गुंतवणूकीस विदेशी गुंतवणूकदारांना परवानगी दिली. १९९१-९५ काळात ३५१ अब्ज रूपयांच्या विदेशी गुंतवणूकीस मान्यता देण्यात आले. सर्वात जास्त गुंतवणूक २८.४% इतकीउर्जा क्षेत्रात होती. १९९१ च्या नव्या औद्योगिक धोरणामुळे अनेक चांगले परिणाम झाले. नोंदणी पद्धत रद्द केली. विदेशी तंत्रज्ञान आणि ५१% विदेशी भागभांडवलाला मान्यता दिल्यामुळे गुंतवणुकीचे प्रमाण वाढले या धोरणामुळे उद्योगांची स्थापना, वाढ आणि विस्तार यावरील नियंत्रणे कमी केली. मक्तेदारी कायद्यात शिथिलता आणली. उद्योगांच्या आधुनिकरणासाठी कामगार कायद्यात बदल करण्यात आले. राष्ट्रीय नवाकरण निधी स्थापना करून १९९४९५ मध्ये २५२ कोटी रूपये व १९९५-९६ मध्ये २१७ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली. आज अखेर १ लाख कामगारांनी स्वखुशीने निवृत्ती स्वीकारली. (स्वेच्छानिवृत्ती) लघु उद्योगांच्या विकासासाठी विदेशी गुंतवणुकीवरील २४% गुंतवणूकीची मर्यादा काढून टाकली. लघुउद्योगांचे विकासातील महत्त्व विचारात घेऊन धोरण आखले.

### १४.११.३ उदारीकरणाने विषमता वाढली?:

उदारीकरण करताना निर्माण झालेली विषमता कमी करणे, लहान उद्योग मोठया उद्योगाने गिळंकृत करणे या प्रक्रियेत स्पर्धेतून मक्तेदारी निर्माण होणे किती धोक्याचे आहे याकडे सरकारचं दुर्लक्ष झालं. नवीन निर्माण झालेले रोजगार याची भलामण करताना किती बंद कंपन्यांमधील रोजगार विनाश झाला याची खबर ही न घेणे, उदारीकरणाचे समाजावरील दुषपरिणाम अधोरेखित करणारे होते. मानवी विकासाकरिता रोजगार, अन्न सुरक्षा, शिक्षण आणि आरोग्य यावर सरकारने किती कमी खर्च करावा आणि ही क्षेत्रं खाजगी भांडवल आधारिताच मोकळी ठेवणं यांत तीन दशकांच्या उदारीकरणांत मानव विकासांचे, सामाजिक न्यायव्यवस्थेचे प्रश्न पायदळी तुडविणे सुरू राहिले आहे. उदारीकरणाच्या प्रक्रियेत देशाच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर सरकारने विदेशी भांडवलाला प्रवेश देणे हे देशाच्या सुरक्षेला नख लावणारे होत आहे. खनिजे, कोळसा, तेल, वायु, पाणी व संरक्षण कारखान्याचे महत्त्व बॅंका आणि विमा व्यवसाय सारखेच राष्ट्रीय महत्त्वाचे आहे.

उदारीकरण खासगीकरणाचा हा मार्ग देशाची सार्वभौम लोकशाही व्यवस्था कायम ठेवण्यात संविधानाने बजावलेली भूमिका कमकुवत करतो. या संदर्भात खासगीकरण हा 'नीजिकरण एक धोका है,' हे सिध्द होतं.

अशा उदारीकरणात भारतात यापुढे तंत्रज्ञानाच्या विकासाच्या टप्प्यात बॅंका आणि विमा, बंदरे आणि रेल्वे, तेल आणि वायु तसंच नैसर्गिक संपती मूठभरांच्या ताब्यात जाणे यांत लोकशाही व्यवस्थेलाच धाेका आहे. उदारीकरण करणाऱ्या शक्ती कोण? आणि उदारीकरणाचे उद्दिष्ट स्पष्ट असणे आवश्यक आहे.

## १४.११.४ राजकोषीय सुधारणा:

१९९० पर्यंत भारताचा सार्वजनिक खर्च सतत वाढत होता. १९९० मध्ये महसुली खर्चाचे जीडीपी शी प्रमाण २३ %पर्यंत वाढले तर भांडवली खर्च ३०% पर्यंत वाढला. याला खर्चाचा विस्फोट असे देखील संबोधले जाते. १९८६ नंतर केंद्रात व काही राज्यांमध्ये शून्याधारित अर्थसंकल्प मांडले गेले. याचा उद्देश शासकीय खर्च कमी करणे असाच होता. रिझर्व बँकेने अतिरिक्त कोषागार बिले बंद केली याऐवजी शासनाला ९१ दिवसांची कोषागार बिले उभारण्याची परवानगी देण्यात आली. सार्वजनिक खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा हा प्रयत्न होता. वर्तमान तसेच भविष्यातील राजकोषीय तूट कमी करण्यासाठी दीर्घकालीन उपाय योजने म्हणजे राजकोषीय द्रुढीकरण होय. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेच्या नियमावलीनुसार राजकोषीय तूट तीन टक्के किंवा त्यापेक्षा कमी असेल तर संकटापासून वाचता येते. अर्थसंकल्प व्यवस्थापन कायदा (Fiscal Responsibility And Budget management Act)२००३ हा कायदा ५ जुलै २००४ ला अंमलात आला.या कायद्यानुसार राजकोषीय व्यवस्थापन, कर्जांचे आदर्श व्यवस्थापन व राजकोषीय स्थैर्य या संदर्भात सरकारला वैधानिक आधार मिळाला. या कायद्यानुसार सरकारला अनुदानाच्या मागणी सोबत विवरणपत्रे संसदेत मांडणे अनिवार्य करण्यात आले.

## १४.११.५ चलन विषयक धोरण सुधारणा:

रिझर्व बँकेने चलनविषयक धोरणात सुधारणा केली १९९९ मधील १५ टक्के रोख राखीव प्रमाण होते ते २०१३ मध्ये चार टक्के वर आणले. वैधानिक रोखता प्रमाण १९९१ मधील ३८.५ टक्के वरून ऑक्टोबर २०१८ मध्ये १९.५ टक्के वर आणले. १९९४ नंतर व्याजदर विनियंत्रित करण्यात आला. यामुळे बँकांना स्वतःचा व्याजदर निश्चित करण्याची मुभा मिळाली. या सुधारणांमुळे उदारीकरणाला मदत झाली. नियोजन सुधारणा – १५ मार्च १९५० रोजी स्थापन झालेल्या नियोजन आयोगामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत नियोजन आयोग केंद्रीय भूमिका बजावत असे. मात्र हळूहळू विकेंद्रीकरणाला सुरुवात झाली. चौथ्या पंचवार्षिक योजनेपासून केंद्र व राज्यांच्या योजना वेगवेगळ्या करण्यात आल्या. १९९१च्या उदारीकरणानंतर खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण आला गती मिळाली. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून स्थानिक स्तरावरील नियोजनाला घटनात्मक दर्जा मिळाला.१ जानेवारी २०१५ रोजी निती आयोगाची स्थापना करण्यात आली.विकास प्रक्रियेत योग्य दिशा व धोरणात्मक आदाने पुरविणे नीती आयोगाचे प्रमुख कार्य आहे.

## १४.११.६ औद्योगिक सुधारणा:

१९९१ पूर्वी १७ महत्त्वाच्या उद्योगावर केंद्र सरकारचा एकाधिकार होता. १९९१ च्या नवीन औद्योगिक धोरणानुसार सध्या यातील दोनच क्षेत्रे म्हणजे अनु ऊर्जा आणि रेल्वे शासकीय नियंत्रणात आहेत. उर्वरित सर्व क्षेत्रात खाजगी उद्योग स्थापण्यास परवानगी आहे. उद्योगांच्या परवाना धोरणावर नियंत्रण ठेवणारा एमआरटीपी कायदा रद्द करण्यात आला. गुंतवणुकीस १९९९ मध्ये नवीन FEMA कायदा करण्यात आला.सध्या उद्योगावर नियंत्रण ठेवण्यात ऐवजी स्पर्धात्मकता वाढवण्यावर भर देण्यात आला आहे.२५ सप्टेंबर २०१४ ला मेक इन इंडिया अभियान सुरू करण्यात आले. १६ जानेवारी २०१६ ला स्टार्टअप इंडिया ही योजना नवीन उद्योगांसाठी सुरू करण्यात आली.

**१४.११.७ कर सुधारणा:**

१९९१ चे आर्थिक संकट त्यामागे मुख्य कारण वाढती राजकोषीय तूट हे होते. राजकोषीय तूट कमी करायची असेल तर महसुली उत्पन्न वाढविले पाहिजे. यासाठी कर रचनेत सुधारणा आवश्यक असते.विकसनशील देशांमध्ये एकूण करांमध्ये प्रत्यक्ष कराचे प्रमाण ५० ते ६५% असते. १९७४-७५ मध्ये करमुक्त मर्यादा ३५ हजार रुपये होती ती २०१४-१५ पासून २,००,००० आहे.

१ कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या वर २०१६-१७ पासून अधिभार दर १५ % करण्यात आला आहे. २०१७-१८ मध्ये आयकर दर १०%, २०%, ३०% वरून ५%, २०%, ३०% करण्यात आले. १९९०-९१ मध्ये निगम कर ५१% होता तो टप्प्याटप्प्याने कमी करत २०१७ १८ मध्ये ३०% व २५% करण्यात आला. सीमाशुल्क, उत्पादन शुल्क, सेवाकर, विक्रीकर या सर्वांचे विलीनीकरण १ जुलै २०१७ पासून GST मध्ये करण्यात आले. GST मुळे देशातील अप्रत्यक्ष कर सरळ आणि एकत्रित झाले. GST मध्ये 'एक वस्तू प्रकार एक दर' किंवा 'एक सेवा प्रकार एक दर' आहे.

## १४.१२ सारांश

भारतातील आर्थिक उदारीकरणाची सुरुवात १९८४ आणि १९८५ च्या औद्योगिक धोरणाने झाली होती, परंतु या काळात ते पूर्णपणे स्वीकारले गेले नाही. भारतातील आर्थिक सुधारणांचे पहिले आणि सर्वात व्यापकपणे आढळणारे धोरण म्हणजे १९९१ चे औद्योगिक धोरण. या धोरणात आर्थिक सुधारणांच्या तीन प्रक्रियांचा उल्लेख करण्यात आला - उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण. आर्थिक सुधारणांच्या दिशेने उदारीकरण हे एक मोठे पाऊल आहे. मुळात याचा अर्थ अर्थव्यवस्थेतील सरकारी हस्तक्षेप कमी करून बाजार व्यवस्थेवरील अवलंबित्व वाढवणे.

## १४.१३ प्रश्न

१. उदारीकरण म्हणजे काय सांगून भारतातील उदारीकरण स्पष्ट करा.

२. उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे लिहा.

३. उदारीकरणामुळे १९९१ नंतर झालेले बदल लिहा.

४. उदारीकरण होऊनही भारत मागे का ? सविस्तर माहिती लिहा.

५. उदारीकरण म्हणजे खासगीकरण नव्हे स्पष्ट करा.

## १४.१४ संदर्भ


- Social and Economic Problems in India, Naseem Azad, R Gupta Pub (२०११)
- Indian Society and Culture, Vinita Padey, Rawat Pub (२०१६)

- Social Problems in India, Ram Ahuja, Rawat Pub (२०१४)
- Faces of Feminine in Ancient, medivial and Modern India, Mandakranta Bose Oxford University Press
- National Humana rights commission-disability Manual
- Rural, Urban Migration : Trends, challenges & Strategies, S Rajagopalan, ICFAI- २०१२
- Regional Inequilities in India Bhat L SSSRD- New Delhi.
- Urbanisation in India: Challenges, Opportunities & the way forward, I J Ahluwalia, Ravi Kanbur, P K Mohanty, SAGE Pub २०१४)
- The Constitution of India, P M Bakshi २०११
- The Problems of Linguistic States in India, Krishna Kodesia Sterling Pub.


*****

# १५

# खाजगीकरण

**घटक रचना**


१५.० उद्दिष्टे

१५.१ प्रस्तावना

१५.२ खाजगीकरण म्हणजे काय

१५.३ खाजगीकरणांची आवश्यकता

१५.४ रोजगारासांठी एल्गार आणि खाजगीकरण

१५.५ बँकाचे खाजगीकरण

१५.५.१ खाजगीकरणाच्या मुख्य पध्दती

१५.५.२ बँकांचे खाजगीकरण देशहिताचे नाही!

१५.५.३ निकृष्ट दर्जाचे कर्जवितरण

१५.६ सरकारी क्षेत्र व खाजगी क्षेत्र

१५.७ शिक्षणाचे खाजगीकरण

१५.८ वीजेचे खाजगीकरण ?

१५.८.१ खाजगीकरण झाले तर कर्मचाऱ्यांचे काय होणार ?

१५.८.२ खाजगीकरणाला होतोय विरोध ?

१५.९ खाजगीकरण वारे

१५.१० खासगीकरणाचे दुष्परिणाम

१५.११ खाजगीकरण म्हणजे विकास ?

१५.१२ देशातील नोकरीचं खाजगीकरण: एक गंभीर बाब !

१५.१३ खाजगीकरणांचे वास्तव

१५.१४ सारांश

१५.१५ प्रश्न

१५.१६ संदर्भ


## १५.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास:

१. खाजगीकरणांची संकल्पणा स्पष्ट करणे.

२. खाजगीकरणांची आवश्यकता समजून घेणे.

३. खाजगीकरणांचे परिणाम अधोरेखित करणे.

४. खाजगीकरणांचे वास्तव समजून घेणे.

## १५.१ प्रस्तावना

१९९१ च्या नंतर आपल्या देशात सत्तेवर आलेल्या विविध सरकारांनी जागतिकीकरणाचे धोरण अवलंबले आहे. या जागतिकीकरणाचा अविभाज्य भाग म्हणजे सरकारी वा सार्वजनिक क्षेत्रांत असलेले उद्योग मोडून काढून त्याचे खाजगीकरण करणे होय. त्यात सरकारची जबाबदारी असलेल्या जनतेच्या आरोग्याचे खाजगीकरण करणे हेही क्षेत्र त्याला अपवाद राहिले नाही. सार्वजनीक उद्योग तोट्यात आहेत म्हणून ते आपली आर्थिक अडचण भागवण्यासाठी विकणे आणि खाजगीकरणला प्रोत्साहन देणे हा निर्णय विचार पूर्वक वाटत नाही.

## १५.२ खाजगीकरण म्हणजे काय

एखादी इंडस्ट्री किंवा संस्था सार्वजनिक क्षेत्रातून खाजगी क्षेत्रात रूपांतरीत करण्याच्या प्रक्रियेला खासगीकरण म्हणतात. पब्लिक सेक्टर मधील कंपन्या सरकार मार्फत चालवल्या जातात. खाजगीकरणामध्ये सरकार प्रायव्हेट कंपन्या आणि संस्थांवरील बंधने शिथिल करते. यामुळे सरकारी कंपन्या/संस्था ई.ना एक पर्याय उभा राहतो. तसेच सरकारदेखील काही जबाबदाऱ्यांमधून मुक्त होते. जसे कि ऑइल इंडस्ट्री मधील खाजगीकरणाने अंबानी सारखा बिझनेसमॅन स्वतःचे पेट्रोल पंप टाकू शकतो. जेव्हा खाजगीकरण नव्हते (सुमारे १९९० च्या आधी) त्यावेळेस सर्व पेट्रोल पंप सरकारी कंपन्यांचे होते. तसेच शैक्षणिक क्षेत्रातील खाजगीकरणामुळे बऱ्याच खाजगी शाळा आणि खाजगी शैक्षणिक संस्थाना परवानगी मिळाली. यातून कॉम्पिटिशन होऊन काही प्रमाणात शिक्षणाची क्वालिटी सुधारली तसेच सरकारची जबाबदारी देखील थोड्या प्रमाणात कमी झाली.

खाजगीकरणानुसार भागधारकांच्या दृष्टिकोनातून फायदे अपेक्षित आहेत. एकदा खाजगी केले की, भागधारक थेट भागधारक असतात, जे कंपनीला धक्का देतात आणि अशाप्रकारे परिणामकारकता अपेक्षित आहे. याशिवाय, वाढीचा दर्जा वाढवता देखील लाभ म्हणून साजरा केला जाऊ शकतो एकदा खाजगी केले की, सापेक्ष प्रतिस्पर्धींच्या संख्येत वाढ झाल्यास स्पर्धा वाढली आहे. अन्य प्रतिस्पर्धीपेक्षा फायदे प्राप्त करण्यासाठी, खाजगी कंपनीने स्पर्धात्मक धोरणांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे ज्यायोगे त्याच्या स्पर्धात्मक स्थितीत सुधारणा होईल आणि त्यामुळे प्रभावी कार्यपद्धती अपेक्षित आहे.

## १५.३ खाजगीकरणांची आवश्यकता

भारताच्या विकासात खाजगीकरणाचा मोठा वाटा असेल असे तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी म्हटले होते पण त्यांना त्याचा वेग वाढवता आला नाही.

१९९१ साली भारतात समाजवादाचा अंत झाला आणि हळू हळू एक एक सेवा खाजगी व्हायला लागली. पूर्वी जसा समाजवादाने सगळे प्रश्न सुटतील असा भ्रम निर्माण करण्यात

आला होता, तसा आता खाजगीकरणाने सगळे प्रश्न सुटतील असा नवा भ्रम जोपासला गेला. म्हणजे पद्धत कोणतीही असो, विकासाची एक गुरुकिल्ली असते असा लोकांचा भ्रम आहे. प्रत्यक्षात तसे नाही. विचारसरणी किंवा अर्थव्यवस्था कोणत्याही प्रकारची असो ती अर्थव्यवस्था जादूची कांडी फिरवून बदल घडावा तसा बदल घडवू शकत नसते. पण लोक तशी अपेक्षा करतात. आताही नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून खाजगीकरणाची चर्चा वेगात सुरू झाली आहे. मात्र ती होत असताना त्याबाबतीत सुद्धा तारतम्य बाळगावे लागेल याचा विसर पडत आहे.

परिवहन, खाणकाम, वीज निर्मिती, रस्त्यांची निर्मिती या विविध क्षेत्रांमध्ये शेकडो खाजगी उद्योजक पुढे येत आहेत. त्यांच्याकडे पैसा आहे, पण इतके दिवस तो अशा कामात गुंतवला जात नव्हता आता त्यांना संधी आहे. आजवर ज्या सेवा केवळ सरकारच्या मालकीच्या होत्या त्या सेवा खाजगी उद्योजकांना देण्यात काहीही चूक नाही. कारण सरकारकडे पैसा कमी आहे आणि त्यामुळे सरकारला या सेवा अद्ययावत करता येत नाहीत आणि लोकांना चांगली सेवा देता येत नाही. या मर्यादेवर मात करण्यासाठी खाजगीकरण हाच उपाय आहे. मात्र लोकांना अशी भीती वाटते की, या सेवा खाजगीकरणात दिल्या की आपली लूट होईल. पण ही भीती निराधार आहे. कारण एखादे काम खाजगीकरणातून खाजगी उद्योगाकडे सोपवले तरी त्या क्षेत्रात तो खाजगी उद्योजक मनमानी करू शकत नाही. त्याला अनेक नियमांनी बांधलेले असते आणि तरीही त्याच्यावर सरकारचे नियंत्रण असते. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे एखादी सेवा जेव्हा खाजगी होते तेव्हा त्या सेवेत सरकार आणि खाजगी गुंतवणूकदार यांच्यात स्पर्धा होते तसेच दोन खाजगी गुंतवणूकदारांतही स्पर्धा होते आणि जिथे स्पर्धा असते तिथे मनमानी करता येत नसते. आपल्या देशातला अनेक क्षेत्रातला अनुभव तसा आहे आणि जगातही खाजगीकरणाच्या बाबतीत असेच घडलेले आहे. उगाच खाजगीकरण म्हणजे लूट हा समज पसरविण्याची गरज नाही.

## १५.४ रोजगारासांठी एल्गार आणि खाजगीकरण

कर्ज फक्त श्रीमंतांना मिळत होते. भांडवलशाहीचे तत्त्व असे कि बँकामध्ये पैसा जमा होतो तो श्रीमंत भांडवलदारांना द्यायचा म्हणजे ते उद्योग काढतील. त्यातून रोजगार निर्माण होईल व जनतेला चांगले जीवन मिळेल. हे सिद्धांत पूर्णपणे फसवे निघाले. तेव्हा गरीब बँकेकडे फक्त दुरून बघत होता. त्यांना स्वत: रोजगार निर्मिती करण्याची संधी नव्हती; तसेच, शेतकऱ्याला कर्ज मिळवून शेतीतून चांगले उत्पन्न काढण्याची संधी नव्हती. इंदिरा गांधीनी बँकांचे राष्ट्रीयकरण केले आणि गरिबांना बँका खुल्या झाल्या. शेतकऱ्यांना कर्ज मिळायला लागले. त्यामुळे हरित क्रांती देशात आली. शेतकऱ्याला चांगले दिवस आले. आमच्या मुलांना रिक्षासाठी कर्ज मिळाले. छोटी दुकाने घातली. मध्यम आणि छोटे उद्योग सुरु झाले. छोटे उद्योग सर्वात जास्त रोजगार निर्माण करतात. तर मोठे उद्योग नोकऱ्या कमी करतात. आधुनिक तंत्रज्ञान मोठ्या उद्योगात, माणसाचे महत्व कमी करते. म्हणूनच मोठ्या उद्योगांचा समाजाला उपयोग होत नाही. कारण ते नोकऱ्या कमी करतात. पैसे जास्त कमावतात.

ह्या जगात महाकाय MONSENTO सारखी कंपनी पूर्ण जगात बियाणे नष्ट करत आहेत आणि त्यांची बियाणे जगात शेतीवर प्रभुत्व निर्माण करत आहेत. ग्रामीण बियाणे व्यवस्था

संपली. पुन्हा पुन्हा त्याच कंपनीकडे बियाणे घेण्यासाठी जावे लागते. जसे BT COTTON हे GMO बियाणे. म्हणजेच जीनमध्ये बदल करून नवीन बियाणे निर्माण होते. युरोपमध्ये ह्याला बंदी आहे. पण आमच्या नेत्यांनी ते भारतात आणले.बँकेच्या राष्ट्रीयकरणामुळे हरित क्रांती आली आणि बऱ्याच प्रमाणात गरिबी कमी झाली. पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी १९९१ साली बँकांच्या खाजगीकरणाचे धोरण आणले. गरीब कर्ज परतफेड करत नाहीत हे कारण पुढे ढकलण्यात आले. सर्वात भयानक सरकारचे षड्यंत्र म्हणजे बँकांना विकून टाकण्याचे आहे. पैसे गरिबांना देण्याच्या ऐवजी श्रीमंतांची कर्जमाफी करण्यासाठी मोठ्या श्रीमंतांना दिले. त्यामुळे सरकारकडे गरिबांना देण्यासाठी पैसा कमी पडला. बँक खाजगी झाल्या कि लाखो नोकऱ्या नष्ट होतील. तंत्रज्ञानामुळे नोकऱ्या बंद व्हायला लागल्या. जसे ATM झाल्यामुळे बँकेतील लाखो लोक बेकार झाले. त्यात बँका खाजगी झाल्या तर शेतकरी कामगार, छोटे उद्योजक, व्यापारी उद्धवस्त होतील. विद्यमान सरकारने हेच धोरण बेछूटपणे सुरु केले आहे.

ह्या सर्व अपयशापासून लोकांचे लक्ष दूर नेण्यासाठी पुतळे पाडण्याचा धंदा सुरु झाला. त्यात लेनिन आणि पेरीयारचे पुतळे म्हणजे शोषणाविरुध्द लढणाऱ्याचे पुतळे पाडण्यात येत आहेत. हिंदुत्वाच्या नावावर दंगे पेटवण्यात येत आहेत. बॉम्बब्लास्ट, दहशतवादी हल्ले वाढत आहेत. बेकारीच्या बडग्यापासून लोकांचे लक्ष दूर खेचण्यासाठी पाकिस्तानचे भूत पुन्हा उभे करण्यात येत आहेत. देशावर एक जबरदस्त संकट येत आहे, बेकारीचे. युवक रस्त्यावर येत आहेत. MPSC विरुद्ध मोर्चे निघाले. रेल्वे नोकऱ्यासाठी रेल रोको झाले. ही तर सुरुवात आहे. ज्यांना रोजगार नाही ते हत्यारे घेतात. आज एक ठिणगी पडली तर आग लागेल अशी परिस्थिती आहे.

## १५.५ बँकाचे खाजगीकरण

### १५.५.१ खाजगीकरणाच्या मुख्य पध्दती:

१) शेअर वाटप खाजगीकरण. शेअर मार्केट वर शेअर विकायला ठेवले जातात

२) संपत्ती विक्री खाजगीकरण संपत्तीची गुंतवणूकदारांकडे विक्री मुख्यतः लिलावातून किंवा

३) व्हाउचर खाजगीकरण व्हाउचर जे की कंपनीची मालकी संबोधतात त्यांचे नागरिकांमध्ये मोफत वाटप किंवा खुप कमी किमतीत विक्री

४) व्यवस्थापनास किंवा नोकरास विक्री करुन खाजगीकरण कंपनीचे शेअर्स तिथल्या व्यवस्थापनास किंवा नोकरास मोफत किंवा कमी किमतीत विकणे.

सार्वभौम सरकारचीच हमी असल्याने राष्ट्रीयकरणानंतर लोकाचा बँक क्षेत्रावरील विश्वास वाढला त्यामुळे त्यांच्या ठेवी वाढल्या बँक अडचणीत आल्यास सरकार आपणास मदत करेल ही खात्री असल्याने बँकेतील कर्ज वाटप बेजबाबदार पणे वाढले त्यातून बँक व्यवहार तत्व बदलेल या बेजबाबदार पणास नैतिक धोका असे म्हणतात त्यातून हितसंबंध निर्माण झाले याची प्रचिती बँकांच्या थकित कर्जाच्या स्वरूपाने वारंवार आल्यामुळे या बँकांना सातत्याने भांडवल पुरवून सरकारही आत्ता थकले होते म्हणून सरकारला उशीरा सुचलेले

शहाणपण त्याच आपण स्वागत केले पाहिजे राष्ट्रीयकरणानंतर कोणत्याही सामाजिक, आर्थिक निकषांवर सार्वजनिक बँका फारशा यशस्वी झालेल्या दिसून येत नाहीत ग्रामीण शाखांचा विस्तार, कृषी आणि लघुउद्योगाना उपलब्ध झालेले कर्ज यांच्या आडून नेहमीच बँकांच्या राष्ट्रीयकरणाचे समर्थन करण्यात येते. प्रादेशिक ग्रामीण बँका विकसित करण्यात आल्या नाबार्ड चया माध्यमातून पुनवितत सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर संस्थात्मक कृषी पतपुरवठा वाढला आज कृषी पतपुरवठा वाढून सुध्दा कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक फारशी वाढलेली फारशी दिसून येत नाही वारंवार कृषी कर्ज माफ करावी लागते. कृती लघुउद्योग आणि निर्यात क्षेत्राचया गरजांसाठी असलेला पतपुरवठा हा अपुरा अवेळी व नोकरशाही युक्त असा आहे आजही केवळ ४२/टक्के लहान व सीमांत शेतकरयांना बँक कर्ज पुरवठा याचे लाभ मिळतात शिवाय पशूपालन व शेती. मासेमारी या क्षेत्राला अत्यल्प कर्ज पुरवठा होतो. समभाग, मालमत्ता परतावा, पर्याप्त भांडवल, ग्राहक समाधान, तंत्रज्ञान वापर या कार्यक्षमता निकषांवर या राष्ट्रीय कृत बँका खाजगी बँका पेक्षा मागे आहेत ठेवीदारांचे पैसे देण्याकरिता आणि दिलेल्या कर्जाच्या प्रमाणात सवताचे पर्याप्त भांडवल ठेवण्याकरिता या बँकांना आवश्यक ते भांडवल प्रवस्तक म्हणून सरकारला द्यावी लागते. १९९० चे दशकात २० हजार कोटी रुपये भांडवल देण्यात होते उच्च पदांवर असणारे यांच्या संगनमताने प्रभावी व मोठ्या कंपन्यांकडून कर्ज वसुली होत नाही याकरिता जलद उपाय म्हणून २०१६ मध्ये दिवाळखोरी कायदा करण्यात आला बँकिंग व्यवसाय धोक्याचा व्यवसाय असल्यामुळे बँकांनी दिलेली कर्जाची रक्कम व्यवसायिक कारणांमुळे बुडते त्यामुळे खाजगी बँकांची कर्जे बुडतता मात्र खाजगी बँकांच्या थकित कर्जाच्या तीन ते चार पट जास्त प्रमाणात थकित व कर्जाचे प्रमाण सार्वजनिक बँकांमध्ये आहे.प्रभावी कर्ज वसुली करण्यासाठी केलेल्या दिवाळखोरी कायद्यात तरतुदी कडक करण्याबाबत आर बी आय गव्हर्नर आणि सरकार यात मतभेद झाले यावरून हितसंबंध लॉबी किती प्रभावी आहे हे आपल्या ध्यानात आले यांना. शेतकरी. लघुउद्योग, ग्रामीण भाग सहज लपवता येते पण म्हणून खाजगीकरण केलयाणे अशा प्राथमिक क्षेत्राला कर्ज मिळणार नाही ही भीती निराधार आहे नियामक चौकट प्राथमिक क्षेत्र कर्ज पुरवठा करण्याकरिता पुरेशी आहे आवश्यक असेल तर त्यासाठी ती अधिक सर्वसमावेशक करता येते ठेवीवरील विमा सर्वच बँकाना लागू आहे आज खाजगी बँका कर्ज गरजा ४०/टक्के पूर्ण करत आहेत यात शेतकरी. लघुउद्योग, दुर्लभ घटक, निर्यातदार हे सर्व यात येतात.

### १५.५.२ बँकांचे खाजगीकरण देशहिताचे नाही!:

निकृष्ट कर्जांमुळे बँकांचे नुकसान होत असते. या विषयाचा सर्वांगीण विचार करताना, ७० च्या दशकात इंदिरा गांधी यांनी खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करतानाचा त्यांचा राजकीय हेतू बाजूला ठेवूनच मूल्यमापन केले पाहिजे. राष्ट्रीयीकरणापूर्वी प्रामुख्याने शहरातच शाखा असलेल्या बँकांना नंतर खेडोपाडी- संपूर्ण भारतभर शाखा उघडणे भाग पडले. पण, त्यामुळे सर्वच बँकांचा शाखाविस्तार आणि व्यवसाय कैकपटींनी वाढून बँका सर्व जनतेपर्यंत पोहोचल्या. आम जनतेला बँकिंग सेवा प्रथमच उपलब्ध झाल्या, ज्याची खरी गरज होती. केंद्र व राज्य शासनाच्या सर्व आर्थिक सुधारणा आणि योजना केवळ बँकांमार्फतच राबविल्या जातात. कारण, बँकांची विश्वासार्हता व कार्यक्षमता सरकारी कार्यालयांपेक्षा नेहमीच गतिशील, तत्पर व पारदर्शी असते. सरकारी बँकांतील कारकुनाच्या जागाही उच्च अर्हताप्राप्त आणि स्पर्धात्मक परीक्षेद्वारा भरल्या जात असल्याने, त्यांची क्षमता जास्त

असते आणि अधिकारीवर्ग तर आयएएस व आयपीएसच्या बौद्धिक दर्जाचे असतात. त्यामुळे अशा तज्ज्ञ कर्मचाऱ्यांच्या भरवशावरच आज बँकांचे स्पृहणीय कार्य सुरू आहे, हे मानलेच पाहिजे. मात्र, या यंत्रणेतही अनेक दोष आहेत.

### १५.५.३ निकृष्ट दर्जाचे कर्जवितरण:

ज्या कर्जांची नियमित वसुली होत नाही, त्यांची वर्गवारी करून, त्या वर्गवारीनुसार प्रत्येक कर्जखात्यातील रकमेनुसार एका विशिष्ट रकमेची तरतूद बँकांना आपल्या नफ्यातून करावी लागते. ज्या खात्यांना बट्टा खाते (Loss-Assets) म्हणतात. त्यातील संपूर्ण रकमेची तरतूद आपल्या नफ्यातून बँकांना करावी लागते. त्यामुळेच बँकांचे ताळेबंद पारदर्शी होत असतात. त्यासाठी ही व्यवस्था आवश्यकच असते. ही तरतुदीची रक्कम हजारो कोटी रुपयांची असते. कारण, बँकांची कर्जेसुद्धा लाखो कोटी रुपयांची असतात. अशा तरतुदी झालेल्या खात्यांना वेगळे काढून त्यांना Write off म्हणजे बट्टा खाते म्हणतात. विरोधी राजकीय पक्ष यास कर्जमाफी म्हणतात. ते पूर्णपणे चूक आहे. ही माफी नसते. बँकांना अशा खात्यांच्या वसुलीचे संपूर्ण कायदेशीर अधिकार असतात आणि तसे प्रयत्न नेहमीच सुरू असतात. मात्र, दैनंदिन कामाचा रेटा बघता शाखा प्रमुखांना हे वसुलीचे काम शक्य होत नाही. पुरेशा मनुष्यबळाच्या अभावी शाखास्तरावर ही वसुली कार्यवाही तत्परतेने होऊ शकत नाही. त्यासाठी स्वतंत्र, सक्षम प्रभावी यंत्रणा बँक स्तरावर राबविण्याचे दायित्व आता रिझर्व्ह बँकेनेच उचलले पाहिजे व त्यावर नियंत्रणही ठेवले पाहिजे. या वसुलीमुळे सर्व बँकांचा नफाही एकदम वाढणार आहे. आज त्याचीच गरज आहे. भारतासारख्या विस्तीर्ण प्रदेशात जेथे कोरोना आपत्तीमुळे अर्थव्यवस्थेत मंदी आहे तेथेही विकसित देशातील कर्जखात्यावरील तरतुदीचे नियम लागू केल्यामुळे, २०२१ मार्च व त्यापुढील काळात अनेक बँका तोटा दाखवतील. त्यामुळे हे कठोर तरतुदीचे नियम शिथिल करून वस्तुनिष्ठ बनवणे, ही प्राथमिक जबाबदारी रिझर्व्ह बँकेने पार पाडणे आवश्यक झाले आहे. ते दायित्व निभावण्याची नितान्त आवश्यकता आहे. सरकारी बँकांना आता ५० वर्षे झाली आहेत. त्यांनी स्वत:ची सर्वंकष यंत्रणा (Infrastructure) उभी केली आहे. सर्व सरकारी योजना व्यवस्थित राबवून, बँकांचा सर्व व्याप सांभाळून ग्राहकांचे समाधानही प्राप्त करण्यात सरकारी बँका यशस्वी ठरल्या आहेत. त्यामुळे केवळ एखाद्या वर्षीच्या आर्थिक परिणामांच्या आधारे (तोट्यामुळे) ही सर्व भक्कम यंत्रणा खाजगी भांडवलदारांच्या हातात देणे म्हणजे त्यांना आयता गुलाबजामून देण्यासारखे आहे. त्याची काहीही गरज नाही.

## १५.६ सरकारी क्षेत्र व खाजगी क्षेत्र

देशातील साधन-सामग्रीचा विकास आणि त्यांचा सदुपयोग करण्याचे ध्येय तसेच सार्वजनिक हित व गतिशील औदयोगिक प्रगती साधण्याकरिता ज्या क्षेत्रातील उदयोगधंदे सरकारच्या मालकीचे असतात, ते सरकारी क्षेत्र होय. ज्या क्षेत्रात केवळ खाजगी मोठ्या उदयोगधंदयांना प्रवेश असतो, तसेच कमाल नफा मिळविणे, हाच प्रमुख उद्देश ठेवला जातो, ते खाजगी क्षेत्र होय. एकूण औदयोगिक उत्पादनाला गती देण्यासाठी वाहतूक व दळणवळणाची साधने, बँकिंग, लोखंड व पोलाद, वीज, कोळसा, सिमेंट, खनिज तेल यांसारख्या मूलभूत महत्त्वाच्या उदयोगांचा विकास करण्याच्या दृष्टीने त्यांचे उत्पादन शासनाला आपल्या अखत्यारीत घ्यावे लागते. तात्कालिक नफ्याचा विचार बाजूला ठेवून,

सार्वत्रिक आर्थिक विकासाची गरज जाणून, तसेच दीर्घकालीन नफ्याचा विचार लक्षात घेऊन सरकार या क्षेत्रात उतरते; हेच सरकारी क्षेत्र होय. देशातील साधनसंपत्तीचे सुयोग्य उपयोजन, मोठ्या व लहान उदयोगधंदयांचा समतोल विकास आणि विविध उदयोगांचे सम्यक प्रादेशिक विभाजन, हे सरकारी क्षेत्राचे ध्येय असते. सरकारी क्षेत्रामध्ये नवनवीन उदयोगधंदे स्थापण्याची जबाबदारी सरकार उचलते. उदा., संरक्षण साहित्य, यंत्रावजारे, ॲल्युमिनियम, प्रतिजैविक पदार्थ, खते यांचे उत्पादन इत्यादी. खाजगी क्षेत्रामध्ये वरील उदयोगांव्यतिरिक्त इतर उदयोग व पूर्वी चालू असलेले उदयोगही पुढे चालू ठेवण्यास सरकार मुभा देते. सरकारी मालकीच्या अथवा सरकारच्या ताब्यातील जमिनी, रस्ते, सार्वजनिक इमारती, लोकोपयोगी सेवाउदयोग तसेच इतर उदयोग-व्यवसाय यांना 'सरकारी मालकी'च्या असे संबोधिले जाते. एखादया देशातील जमिनी व साधनसंपत्ती ही अखेरीस त्या देशातील लोकांच्या मालकीची असते, म्हणजेच ती सरकारच्या मालकीची असते. हा सिद्धांत पूर्वीपासून चालत आला आहे. त्यावरूनच राज्यातील सर्व जमिनींवर राज्याची पूर्ण सत्ता असते, हा सिद्धांत म्हणजेच सरकारचा आपल्या राज्यातील वा सीमांतर्गत भागातील जमिनी व इमारती यांवर पूर्ण ताबा व मालकी असू शकते, हा यथा उपसिद्धांतर्थ ठरतो. पूर्वीच्या काळात सरकारची अनेक उदयोग-व्यवसायांवर मालकी असे व ते व्यवसाय वा उदयोग सरकार चालवीत असे. उदा., पाणी, करमणूक केंद्रे (चित्रपटगृहे, नाटयगृहे), स्नानगृहे इत्यादी. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांमध्ये सरकारी आस्थापनांद्वारा सार्वजनिक शाळापद्धती, सार्वजनिक महामार्ग व पूल, धरणे (भूसंपादनार्थ व वीज उत्पादनार्थ), वीज वितरणव्यवस्थापन तसेच विक्री आणि अशाच जनहिताच्या उदयोगांचे व्यवस्थापन पार पाडले जाते. टेनेसी खोरे प्राधिकरण हे सार्वजनिक मालकीचे एक नमुनेदार उदाहरण आहे. सार्वजनिक उपयुक्तता उदयोगांचे सामाजिक जीवनात केवढे महत्त्वाचे स्थान आहे, हे विविध नगरपालिकांव्दारे पाण्याचे नियोजन, गटारांची व्यवस्था, वीज वितरण, वाहतूक व्यवस्था, गॅस वितरण इत्यादींवर मालकी व त्यांचे व्यवस्थापन केले जाते, त्यावरून दिसून येते. यूरोपीय देशांमध्ये सरकारी मालकी अमेरिके-पेक्षा अधिक प्रमाणात विस्तृत व अधिक काळ प्रचलित असल्याने तिचा प्रसार रेल्वेचे जाळे, दूरसंचार सेवा, नभोवाणी व दूरचित्रवाणी, कोळसाखाण उदयोग व अन्य शक्तिसाधने आणि बँकिंग उदयोग येथपर्यंत पोहोचला आहे. दुसऱ्या महायुद्धोत्तर काळापासून अनेक पश्चिमी राष्ट्रांनी अनेक व्यवसाय संघटना व उदयोगांचे सरकारी निगमांच्या स्वरूपात व्यवस्थापन केले आहे. सोव्हिएट रशिया व अन्य साम्यवादी देश यांमध्ये सरकारी मालकी मोठया प्रमाणावर अस्तित्वात आहे. या देशांमधील सर्व जमिनी तसेच सर्वनैसर्गिक साधनसामगी, लोकोपयोगी सेवाउदयोग, बँकिंग, वाहतूक व बहुतेक सर्व उदयोगधंदे सरकारी महामंडळांमार्फत चालविण्यात येतात. अनेक विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांमध्येही मोठया प्रमाणावर सरकारी मालकी, विशेषत: महत्त्वपूर्ण उदयोगधंदे व साधनसामगी यांवर दाखविली जाते आणि त्यांचे परिचालन व व्यवस्थापन केले जाते. लोकोपयोगी सेवाउदयोग, व्यवसाय तसेच शेती या क्षेत्रांमधील खाजगी उदयोगांकडून चालविण्यात येणाऱ्या विविध व्यवसायांवर दाखविली जाणारी सार्वजनिक मालकी व सरकारी नियंत्रण यांमध्ये फरक आहे. अमेरिकेत विविध प्रकारची कर्जे, थेट वित्तप्रबंध आणि निगमीय कार्य यांच्यावर विविध कायदेकानू करीत असलेले नियमन व नियंत्रण यांमध्येही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. यूरोपीय देशांत सरकारी क्षेत्रातील सेवा-उदयोगांनी अशा प्रकारच्या सेवा पुरविणे, ही जरी पद्धत असली, तरी अमेरिकेत खाजगी क्षेत्रातील उदयोगांनी (कंपन्यांनी) अशा प्रकारच्या सेवा काही कडक वैधिक

(कायदेशीर) नियम पाळून पुरविण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. काही देशांमध्ये रेल्वे, कोळसाखाण उदयोग, लोखंड व पोलाद, बँकिंग, विमा यांसारख्या उदयोगांचे तात्त्विक कारणांकरिता राष्ट्रीयीकरण करण्यात आले. संरक्षणसाहित्य उत्पादन (शस्त्रास्त्रे, दारूगोळा इ.), विमाननिर्मिती ह्यांसारखे उदयोग संरक्षणात्मक दृष्टिकोनातून सरकारी क्षेत्रामध्ये अंतर्भूत करण्यात आले आहेत. साम्यवादी देशांत उत्पादनाचे बहुतेक सर्व प्रकार व्यापार व वाणिज्य तसेच वित्त व्यवहारांतर्गत उदयोग यांचा समावेश सरकारी क्षेत्रात करण्यात आला असून, स्वातंत्र्यप्राप्त अनेक नवीन तसेच अर्धविकसित देशांत सरकारी क्षेत्राचे अधिक प्राबल्य जाणवते.

सरकारी उदयोगांचा आणखी एक प्रकार म्हणजे सरकारी खाती- उदा., पोस्ट व टेलिगाफ, रेल्वे इत्यादी.

## १५.७ शिक्षणाचे खाजगीकरण !

महाराष्ट्र राज्यात खाजगी विद्यापीठे स्थापन करण्यास परवानगी देणारे विधेयक विधिमंडळाने मंजूर करून शिक्षणक्षेत्रात एक पुढचे पाऊल टाकले आहे. हे 'स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठ' स्थापन करण्यासाठी आताच अनेक बड्या उद्योगसमूहांनी रस दाखविला आहे. अलीकडच्या काळात शिक्षणक्षेत्राकडे व्यापारीवृत्तीने पाहणाऱ्यांची संख्या आपल्याकडे बरीच वाढली आहे. खाजगी शाळांचे फुटलेले पेव आणि त्यांची मनमानी हे त्याचेच द्योतक आहे. या शाळांच्या आर्थिक दडपशाहीला आळा घालणारा कायदा राज्य सरकारने नुकताच मंजूर केला असला, तरी खाजगी क्षेत्राकडून शिक्षणाचा कसा व्यापार केला जातो, हे त्यावेळीच प्रकर्षाने सामोरे आले होते. हा कायदा संमत होऊन काही दिवस उलटतात न उलटतात, तोच आता स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांना परवानगी देण्याचा कायदा मंजूर करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांची वाढती संख्या, शिकविण्याच्या विषयांत सातत्याने होणारी वाढ, ते शिकविण्यासाठी तज्ज्ञ आणि अनुभवी शिक्षकांची गरज, सुसज्ज प्रयोगशाळा अशा अनेक गोष्टींची निकड आता भासत आहे. सध्याच्या विद्यापीठांवरील ताण आणि त्यांचा कारभार पाहता त्यांच्याकडून या गोष्टी कितपत साध्य होतील, याची शंकाच आहे. सध्याच्या जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या काळात विद्यापीठीय शिक्षणाचेही खाजगीकरण करण्याची गरज आपल्याला भासावी, हे एका अर्थाने आपल्या विद्यमान शिक्षणव्यवस्थेचे अपयश आहे. त्या अपयशाचे पालकत्व कोणाकडे आहे, हा वादाचा विषय होऊ शकतो. मात्र खाजगी विद्यापीठांमुळे आजची निकड आणि उद्याच्या गरजा भागून उत्तम दर्जाचे शिक्षण एतद्देशीय विद्यार्थ्यांना मिळू लागले तर ती आनंदाचीच गोष्ट ठरेल. खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी किमान किती जमीन आणि दाननिधी असायला हवा, याबाबतच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. मुंबई किंवा मुंबई उपनगर जिल्हाक्षेत्रामध्ये असे विद्यापीठ उभारायचे असेल तर चार हेक्टर जागा असणे आवश्यक आहे; तर ग्रामीण भागात त्यासाठी ४० हेक्टर जागा गरजेची आहे. मुंबई आणि उपनगर जिल्हाक्षेत्रातील विद्यापीठासाठी दहा कोटीं रुपयांचा आणि या क्षेत्राबाहेरील विद्यापीठासाठी पाच कोटी रुपयांचा दाननिधी अनिवार्य आहे. अशी खाजगी विद्यापीठे स्थापन करण्यामध्ये काही नामवंत उद्योगसमूहांनी रस दाखविला आहे. मात्र आपण लक्ष्मीच्या नाही, तर सरस्वतीच्या दरबारात प्रवेश करणार आहोत, याचे भान त्यांना ठेवावेच लागेल. अन्यथा ही विद्यापीठे धनिक वर्गाचीच अंकित होण्याची भीती आहे. या विद्यापीठांना परदेशांतील

नामवंत विद्यापीठांशी शैक्षणिक करार करता येणार आहेत. मात्र युरोप-अमेरिकेतील सर्वच विद्यापीठे उत्तम आहेत, असे मानण्याचे कारण नाही. तिथेही डावे-उजवे करण्यासारखी स्थिती आहेच. त्यामुळेच करार करताना परदेशांतील शिक्षणसंस्थाही पारखूनच घ्याव्या लागतील. या विद्यापीठांमध्ये प्रवेश देताना 'धर्म, लिंग, वंश, जात, पंथ, वर्ग, मत, जन्मस्थान किंवा धर्मश्रद्धा' यांचा विचार न करता सर्वांना प्रवेश दिला जावा आणि 'विशेष तरतुदींद्वारे समाजातील दुर्बल घटक म्हणजेच स्त्रिया, गरीब, राज्यातील अल्प उत्पन्न गट व रहिवासी यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आधारभूत योजना खाजगी विद्यापीठ तयार करेल आणि यासंदर्भात सकारात्मक कृती करेल' असे नमूद करण्यात आले आहे. हे स्वागतार्हच आहे. मात्र या तरतुदी प्रत्यक्षात येतील, याची काळजी घ्यायला हवी. या विद्यापीठांमध्ये राखीव जागा ठेवण्याची तरतूद नाही. तशी ती असावी, असा आग्रह राज्याच्या मंत्रिमंडळातील काहींनी धरला आहे. तशी तरतूद करता येईल काय, याचा तपास सरकारने करायलाच हवा. दुसरे असे की या विद्यापीठांतील फीवर कोणाचे नियंत्रण असणार आहे किंवा नाही, याबाबतही सरकारने खुलासा करण्याची आवश्यकता आहे. सरकारने आरक्षणाबाबत कायद्यात बदल केला तर उद्योगसमूहांना आज असणारा रस कायम राहील काय हा खरा प्रश्न आहे. तसा तो त्यांनी दाखविला तर शिक्षणातील मक्तेदारी मोडून काढण्यात उद्योगक्षेत्रही आपला वाटा उचलत आहे, असेच सिद्ध होईल आणि दीर्घकालीन वाटचालीसाठी ते उपकारकच ठरेल. या खाजगी विद्यापीठांमुळे आपल्या सध्याच्या विद्यापीठांना आमूलाग्र बदलावे लागेल. सध्याच्या कारभारामुळे अनेक गोष्टींत येणारी अनिश्चितता विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण करून त्यांना नाउमेद करते. हे सर्व लागलीच थांबेल असे म्हणणे भाबडेपणाचे ठरेल. परंतु या विद्यापीठांमुळे निर्माण होणारी स्पर्धा लक्षात घेता आजची विद्यापीठेही खऱ्या अर्थाने 'विद्या'पीठे होतील, अशी आशा करता येते.

## १५.८ वीजेचे खाजगीकरण का ?

केंद्र सरकारने राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांतील सरकारी वीजवितरण कंपन्यांच्या खाजगीकरणासाठी आदर्श निविदा संहितेचा मसुदा राज्यांना पाठवला आहे. निविदा संहितेच्या मसुद्यात १०० टक्के खासगीकरण आणि ७४ टक्के खाजगीकरण असे दोन आर्थिक पर्याय देण्यात आले आहेत. खाजगीकरणानंतर ७ वर्ष सरकारने खाजगी कंपनीला आर्थिक पाठबळ द्यावं असं मसुद्यात नमूद करण्यात आलं आहे. मुंबई सोडून राज्यभर महावितरण ही एकच सरकारी वीज कंपनी आहे. गुजरात, कर्नाटकसारख्या काही राज्यांनी आपल्या वीज कंपनीचे प्रदेशनिहाय वीजवितरण कंपन्यांमध्ये विभाजन केलंय. त्यामुळे काही राज्यांत ४ ते ५ सरकारी वीजवितरण कंपन्या आहेत. देशातील २२ राज्यांमध्ये एकूण ४१ सरकारी वीजवितरण कंपन्या आहेत. केंद्रशासित प्रदेशांतही सरकारी वीजवितरण कंपन्या आहेत.

विजवितरण कंपन्या कृषी,कमी वीज दरवाढ आणि कोरोडो रूपयांची थकबाकी यामुळे सरकारी वीज कंपन्यांवर आर्थिक बोजा येतो त्यामुळे खाजगीकरण हा एक पर्याय म्हणून सरकार पहात आहे. समजा वीजेचं खाजगीकरण झालं तर १०० टक्के खासगीकरण किंवा ७४ टक्के खासगी मालकी आणि २६ टक्के सरकारी मालकी असे दोन पर्याय सुचवण्यात आले आहेत. खासगीकरण करताना संबंधित कंपनीला २५ वर्षांसाठी वीजवितरण परवाना मिळेल. तसेच सरकारी वीजवितरण कंपनीच्या सर्व मालमत्ता नवीन खासगी कंपनीच्या

ताब्यात जातील. खासगी कंपनीला जमीन वापरता येईल, पण तिची मालकी मिळणार नाही, असे या संहितेच्या मसुद्यात म्हटले आहे.

### १५.८.१ खाजगीकरण झाले तर कर्मचाऱ्यांचे काय होणार ?:

### सरकारी कंपनीतील अधिकारी:

कर्मचारी नवीन खासगी कंपनीत गेल्यानंतरही त्यांचे निवृत्तीसमयीचे लाभ देण्याची जबाबदारी सरकारवर असेल. निविदा प्रक्रिया सुरू झाल्यानंतर ३२ आठवड्यांत म्हणजेच आठ महिन्यांत खासगीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे केंद्र सरकारने सूचवलं आहे. वीजक्षेत्रातील विविध तज्ज्ञांनी, संस्थांनी या संहितेबाबतच्या आपल्या हरकती आणि सूचना केंद्र सरकारला सादर केल्या आहेत.

### १५.८.२ खाजगीकरणाला होतोय विरोध ?:

महाराष्ट्रातील विजवितरण कंपन्यातील कर्मचाऱ्यांनी या खाजगी करणाला तीव्र विरोध दर्शवला आहे. काही मोजक्या उद्योपतिंना फायदा देण्यासाठी खाजगीकरणाचा घाट असल्याचा त्यांचा आरोप आहे. चंडीगड या केंद्रशासित प्रदेशात खासगीकरणाची प्रक्रिया सुरू केली पण तेथील वीज कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी त्याविरोधात उच्च न्यायालयात दाद मागितली.खरं तर येथे वीजकंपनी फायद्यात आहे. सरकारी वीजवितरण कंपनी तीन वर्षांपासून नफ्यात असताना आणि वीजगळतीचे प्रमाण १५ टक्के या आदर्श मर्यादेत असताना खासगीकरण कशासाठी, असा सवाल वीज कर्मचारी संघटनेने केलाय. त्याची दखल उच्च न्यायालयाने घेतली असून सुनावणीचे आदेश दिले आहेत केंद्र सरकारला हा एक झटका मानला जातो. कायद्याच्या मसुद्यात नेमकं काय म्हटलंय १०० टक्के खासगीकरण आणि ७४ टक्के खासगीकरणाचे पर्याय खासगीकरणानंतरही पाच ते सात वर्षे संबंधित राज्य सरकारने कंपनीला अर्थबळ द्यावे खासगीकरण करताना संबंधित कंपनीला २५ वर्षांसाठी वीजवितरण परवाना सरकारी वीजवितरण कंपनीच्या सर्व मालमत्ता नवीन खासगी कंपनीच्या ताब्यात खासगी कंपनीला जमीन वापरता येईल, पण तिची मालकी मिळणार नाही कर्मचारी खासगी कंपनीत गेल्यानंतरही त्यांच्या निवृत्ती लाभाची जबाबदारी सरकारवर निविदा प्रक्रिया सुरू झाल्यानंतर आठ महिन्यांत खासगीकरण प्रक्रिया पूर्ण करावी विजेच्या खाजगी करण्याबाबत जनता दलाचे नेते आणि अभ्यासक असलेले प्रताप होगाडे म्हणाले खाजगीकरण झालं तर त्याचा फायदा सामान्य ग्राहकाला होत असेल तर स्वागत आहे. पण सामान्य ग्राहक म्हणजेच कृषी विषयक ग्राहक, शेतकरी आणि सामान्य माणूस मात्र खाजगीकरणामुळे अडचणीत येईल. सरकारकडून शेतकरी बीपीएल धारक आणि घरगुती ग्राहकासाठी सबसिडी दिली जाते. हा तोटा औद्योगिक आणि उद्योगपती यांना वितरित होणाऱ्या वीजेच्या बिलामधून काढला जातो. खाजगीकरण झाले तर कंपन्यांवर कोणतेही निर्बंध राहणार नाही. उलट केंद्रात एक नवीन ऑथॉरिटी सरकार बनवत आहे आणि त्याचा थेट फायदा मोठ्या कंपन्यांना होणार असल्याचं होगाडे सांगतात. खाजगीकरण झाल्यानंतर ज्या कंपन्यांकडून वीज विकत घेतली जाणार आहे त्या कंपन्यांना शंभर टक्के पैसे मिळाले पाहिजेत अशी अट नवीन कायद्यात पाहायला मिळते. सध्या एमईआरसी ही नियंत्रण संस्था असताना वेगळ्या ऑथिरिटी ची गरज काय असा सवालही होगाडे उपस्थित करतात. खाजगीकरण आल्यानंतर खासगी कंपन्यांना गरीब

वर्गाचे काही देणेघेणे असणार नाही महाजनको कडून महावितरण वीज विकत घेते मुळात महाजनको कडून तयार होणारे वीच ही सात रुपये दराने महाजनको तयार करतात आणि महावितरणला मिळते महाराष्ट्रात जास्त किमतीत महावितरण वीज घेत आहे. गुजरात आणि इतर राज्यात मात्र तीन रुपये दराने वीज विकत घेतली जाते. त्यामुळे वीज वितरण कंपनी महाजनको अशा कंपनीच्या अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार यामुळे तब्बल सात हजार कोटींचे नुकसान सरकारला सोसावं लागतं असा प्रताप होगाडे यांनी सांगितले. सुधारित विद्युत कायदापास झाला तर कामगारांचे काय होणार विद्युत मडंळाचे विभाजन होवुन कंपनी म्हणजेच खाजगीकरण झाल्यामुळे दि.३१.३.२०१८ पर्यत वीज उद्योगाचा एकत्रित तोटा रु.३ लाख ३० हजार कोटी झालेला आहे, तो वाढत जाणार. पर्यायाने सरकारी वीज कंपन्या तोटयात जातील व नतंर त्या तोटयात आहे म्हणून बंद करण्यात येतील. त्यात काम करणारे १५ लाख कामगार व अभियंते व २० लाख कंत्राटी व आऊट-सोर्सिंग कामगार यांच्या नौकऱ्या जाणार. सरकारी वीज निर्मिती,वहन व वितरण करणाऱ्या कंपन्याचा तोटा वाढत जाऊन बंद करण्यात येतील.ज्या पध्दतीने आता उदा MTNL, BHEL, Jet, AIr india, BSNL चे झाले तसे होईल.खाजगी वीज निर्मिती कंपन्या तोटयात आहे. म्हणून त्याचे पूर्णजिवन करण्यासाठी हा नविन विघुत कायदा आहे. वीजेचे दर भरमसाठ वाढतील विजेच्या दरावर सरकारचे नियंत्रित राहणार नाही.खाजगी मालकाना ते अधिकारी राहील. सबसिडी बंद झाली व वीजेचे दर वाढल्यामुळे शेतकरी, गरीब वीज ग्राहक, छोटे उद्योजक, वाणिज्य व इतर वीज ग्राहक वीजेचा वापरु शकणार नाही. व वीज ही फक्त श्रीमंताची मक्तेदारी होईल. स्थायी कामगार भरती बंद करुन आऊट-सोर्सिंग व ठेकेदार पध्दतीने कामे करण्यात येणार. कार्यरत कामगार व अभियंते याचे पगार कमी करण्यात येवुन त्याना VRC घेण्यास भाग पाडतील. पाच वर्षाने होणारी पगारवाढ पध्दत बंद करण्यात येईल. खाजगीकरण झाल्यामुळे नोकरी व प्रमोशन मध्ये असलेले आरक्षण बंद करण्यात येईल. पदोऊन्नतीचे मार्ग बंद करण्यात येणार. कामगार कायदे बदल्लण्यात आल्यामुळे कामगार सघंटना निर्माण करण्याचे अधिकार कामगार याना राहणार नाही. कामाचे तासाचे बंधन रहणार नाही. प्रचंड प्रमाणात बेरोजगारीचा वाढेल. खाजगी भाडंवलदार हे खाजगीकरण केल्यानंतर जेव्हा ताबा घेतील तेव्हा कामगार व अभिंयते याना असलेले वेतन देणार नाही. ते ठरवतिल ते वेतन स्विकारावे लागेल. वीज कामगाराचे ज्येष्ठ नेते मोहन शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली कामगारांची एक बैठकही झाली कायद्याचा विरोध करायचा असा निर्णय कामगार संघटनांनी घेतला आहे आणि तो देश पातळीवर आहे. उतरप्रदेश कायद्या पास होण्यापुर्वी अंमलबजावणी सुरु झालेली आहे. महाराष्ट्रात यापूर्वी औरंगाबाद येथे खाजगीकरण करण्याचा प्रयत्नं झाला होता पण तो फसला असं कामगारनेते कृष्णा भोयर यांनी सांगितलं. देशातील १३ राज्य सरकारने व पाच केंद्र शाषित प्रदेशाने सुधारित कायद्या-२०२० ला विरोध केला असताना उडीसा, उतरप्रदेश, आध्रंप्रदेश व पांडेचरी, दादर-नगर-हवेली व चंदिगड येथे खाजगीकरणाची प्रक्रिया सुरु केलेली आहे. तर दुसरीकडे कामगारांनीही विरोध करण्यासाठी दंड थोपटलं आहे.

## १५.९ खाजगीकरण वारे

१९९१ मध्ये जेव्हा भारत आर्थिक संकटात सापडला होता तेव्हा तत्कालीन अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी परकीय गंगाजळी भारतात मोठ्या प्रमाणावर आणण्यासाठी वेगवेगळ्या

आर्थिक उपाययोजना केल्या. त्यामध्ये विविध सरकारी प्रकल्पांचे खाजगीकरण ही देखील एक महत्त्वपूर्ण उपाययोजना होती. त्यानंतर १९९७ ते २००२ अशी पाच वर्षे देशात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी प्रणित भाजप आघाडीचे सरकार केंद्रात सत्तेवर होते. मात्र काँग्रेस सरकारच्या काळात सुरू झालेला खाजगीकरणाचा रेटा हा एवढा प्रचंड होता की भाजपप्रणीत एनडीए सरकारलादेखील खाजगीकरणाचे प्रयोग देशभरात राबवण्याखेरीज पर्याय राहिला नाही. २००४ मध्ये पुन्हा काँग्रेसप्रणीत यूपीए सरकार केंद्रात सत्तेवर आले आणि २०१४ पर्यंत म्हणजेच दहा वर्ष हे सरकार देशावर राज्य करत होते. देशाच्या आर्थिक चक्राला गती द्यायची तर खाजगीकरण याशिवाय पर्याय नाही याची जाणीव काँग्रेस सरकारला सातत्याने होती त्यामुळेच जेव्हा जेव्हा केंद्रात काँग्रेस प्रणित सरकार सत्तेवर होते तेव्हा तेव्हा तत्कालीन केंद्र सरकारने खासगीकरणाचा पुरस्कार करणारेच निर्णय प्रमुख्याने घेतले आहेत. मात्र २०१४ साली देशात राजकीय क्रांती झाली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार बहुमताने केंद्रात सत्तेवर आले.

गेली दीड-पावणेदोन वर्ष देश कोरोनासारख्या जीवघेण्या विषाणूशी लढत आहे. टाळेबंदीमुळे देशभरातील उद्योग कारखाने अक्षरश: दिवाळखोरीत निघत आहेत. विविध करांच्या रूपाने सरकारी तिजोरीत जमा होणारी गंगाजळीदेखील या काळात मोठ्या प्रमाणावर आटली आहे. असे असताना विकास कामे विविध प्रकल्प राबवण्यासाठी केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता आहे हे सत्य नाकारण्यात अर्थ नाही. कोणत्याही विचारसरणीचे सरकार आले तरी जर राज्याचा, देशाचा विकास करायचा असेल तर जनताभिमुख विकास योजना राबवायच्या तर त्यासाठी निधीची तरतूद असणे आवश्यक आहे. मात्र देशातील आर्थिक परिस्थिती चिंताजनक असताना अशा विकास प्रकल्पांकरिता निधी उभा राहणार कुठून असा यक्षप्रश्न केवळ केंद्र सरकारच नव्हे तर देशातील सर्वच राज्य सरकारांना पुढे आणि स्थानिक पातळीवर विचार करायचा झाल्यास अगदी महापालिका नगरपालिका यांच्या समोरही आ वासून उभा ठाकला आहे. त्यामुळेच जरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्वतःची विचारसरणी ही काँग्रेसची विचारसरणीपेक्षा भिन्न असली तरीदेखील देशाचा गाडा चालवण्यासाठी आज मोदींनाही खासगीकरणाचा आधार घ्यावा लागत आहे. त्यासाठीच आता सरकारी मालमत्तांच्या विक्रीतून केंद्र सरकार येत्या काही काळात सहा लाख कोटींचा निधी उभारणार असल्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकतीच दिल्लीत केली. यामध्ये वाराणसी, बडोदा, भोपाळ, चेन्नई यासह देशातील २५ विमानतळ, देशभरातील तब्बल ४०० हून अधिक रेल्वे स्थानके, ९० प्रवासी रेल्वे, ७४१ किलोमीटरपर्यंत धावणारी कोकण रेल्वे त्यावरील १५ रेल्वे स्टेशन, चौदाशे किलोमीटर लांबीचा रेल्वे ट्रॅक, पंधरा रेल्वे स्टेडियम, १६५ रेल्वेचे गुड्स शेड, चार पर्यटनस्थळांवरील रेल्वे आणि काही ठिकाणी तर रेल्वे कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचा अर्थात रेल्वे कॉलनींचाही या विक्रीमध्ये समावेश करण्यात आला आहे. भारतीय रेल्वे ही सध्या केंद्र सरकारकडे असणारी सर्वात मोठी पायाभूत दळणवळण व्यवस्था असलेली वाहतूक यंत्रणा आहे. केंद्रातील भाजप सरकारने तब्बल १.५२ लाख कोटीचा निधी या रेल्वेच्या मालमत्ता विक्रीतून उभारण्याचे निश्चित केले आहे. यामध्ये कोकण रेल्वेची मालमत्ता विकून केंद्र सरकारला तब्बल सात हजार २८१ कोटी इतकी रक्कम मिळणार आहे. तर केंद्र सरकार येत्या काही काळात ज्या सहा लाख कोटींच्या मालमत्ता विकणार आहे. त्यामध्ये एकट्या रेल्वेच्या मालमत्ता विकून केंद्र सरकारला या सहा लाख कोटींपैकी सर्वाधिक २६ टक्के

निधी यामधून प्राप्त होणार आहे. या बरोबरच देशातील महामार्गांची मालमत्ता विकून दीड लाख कोटी ऊर्जा क्षेत्रातून एक लाख कोटी गॅस पाईपलाईन मधून ५९ हजार कोटी तर टेलिकम्युनिकेशनमधून ४० हजार कोटी असा हा सहा लाख कोटींचा निधी केंद्र सरकार उभा करणार आहे. याबाबत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्टीकरण दिले आहे ते फारसे समाधानकारक नाही याचं कारण म्हणजे केंद्रीय अर्थमंत्री म्हणतात की, सरकारी मालकीच्या प्रकल्पांची विक्री होईल. मात्र केंद्र सरकारच्या मोनेटायझेशन धोरणानुसार जरी प्रकल्पांची विक्री झाली तरी जमीन मात्र खाजगी कंपन्यांना विकली जाणार नाही. जमिनीची मालकी केंद्र सरकारकडे राहील, असे अर्थमंत्री सांगत आहेत. हे कोणत्याही सुशिक्षित व अर्थसाक्षर व्यक्तीला फारसे पटण्यासारखे नाही. कारण घर विकायचे मात्र घराची जमीन विकायची नाही असेच केंद्र सरकारचे मोनेटायझेशनचे धोरण आहे असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरू नये. कोरोनामुळे देशासह जगभरात आलेली आर्थिक मंदी यामुळे त्याचा सगळ्याच पातळ्यांवर परिणाम झालेला आहे. भारताचीही त्यातून सुटका झालेली नाही. त्यामुळे विकास कामांसाठी आर्थिक निधी उभारण्याचे आव्हान सत्ताधाऱ्यांपुढे आहे.

## १५.१० खासगीकरणाचे दुष्परिणाम

खाजगीकरणामुळे देश गुलामीत कसा जातो याचे उदाहरण म्हणजे इस्ट कंपनी व्यापाराच्या उद्देशाने भारतात आली आणि बघता बघता भारताला गुलाम बनवून कसे टाकले हेच कळाले नाही. बघता बघता संपूर्ण भारतावर इस्ट इंडिया कंपनीची सत्ता स्थापित झाली. सांगायचे तात्पर्य गुलामीकडे जाण्याचा पहिले लक्षण म्हणजे खाजगीकरण होय. खाजगीकरणामध्ये मुलभूत हक्क व आधिकारांचे हनन होऊन, नागरिकांना फक्त गुलाम म्हणून बघितले जाते आणि तशी त्याला वागणूक दिली जाते. ज्यांच्याकडे दूरदृष्टी नाही वा ज्यांना राष्ट्राबद्दल आपुलकी नाही असेच लोक खाजगीकरणाचे जल्लोष करून आनंदाने स्विकार करतात. खाजगीकरण आणि सार्वजनिक अर्थात सरकारी यामध्ये काय फरक आहे ? हे सुशिक्षित लोकांना याची जाणीव नाही. म्हणून लोक खाजगीकरणाचा हसत हसत स्विकार करून सार्वजनिक मालमत्तेची हानी आणि देशाचे नुकसान करतात. आज सर्वच सार्वजनिक क्षेत्र खाजगीकरणामध्ये गेले आहे. बोटावर मोजण्या इतक्या लोकांना खाजगीकरण व त्याचे दुष्परिणाम माहिती आहेत बाकीच्या लोकांचे काय? खाजगीकरणाची झळ सोसत असताना सुद्धां खाजगीकरण फायद्याचे आहे की तोट्याचे आहे हे कळत नसेल तर याला काय म्हणावे? टेलिकॉम क्षेत्रात पाय ठेवताना जिओने एक वर्षे नेट फ्री देऊन ग्राहकांना आकर्षित केले. अनेक ग्राहक जिओशी जुळल्या गेले, लोकांना सवय झाली आणि आज जिओ सर्वात महाग आहे. भारतीय लोक कोणताच विचार करत नाहीत, काही दिवस वापरून सिम कार्ड फेकून देऊ इथपर्यंत विचारसरणी असलेल्या लोकांमुळे आज जिओ नंबर एक वर आहे. उद्योजक कोणतीही वस्तू वा सेवा कधीच मोफत देत उलट दिलेल्या च्या बदल्यात जास्त वसूल कसे करायचे याचे नियोजन अगोदरच असते. सुरवातीला हवे हवेसे वाटणारे आज खिशाला परवडणारे नाही. याचे कारण समोरचा विचार करण्याची मानसिक कुवत नाही. हीच परिस्थिती शिक्षण, नोकरी, वाहतूक, याविषयी झाली आहे. खाजगीकरण ही संकल्पना आली आणि देश अधोगतीकडे जायला सुरवात झाली. शिक्षणामध्ये खाजगीकरण आले. मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी

सरकारची आहे. असा कायदा असताना सुद्धां मुलांना केजी, ज्युनिअर केजी, सिनिअर केजी यामध्ये हजारो रुपये देऊन प्रवेश घेतला जातो.

अशा प्रकारे खाजगीकरणाचा आपण हसत स्विकार केला तरी त्याचे दुष्परिणाम खूप भयावह आहेत. शाळेच्या फी वाढण्याचे, सरकारी नोकरी कमी होण्याचे, कमी पगारावर जास्त काम करण्याचे, दिवसातून फेरी परत टोलनाका अशा अनेक प्रकारे आपल्याकडून खाजगी सेवेच्या नावाखाली नागरिकांचे खिसे रिकामी करून खाजगीकरणाने देशाला आर्थिक मागास केले आहे. सरकारी तिजोरीत जाणारा पूर्ण पैसा खाजगी लोकांकडे गेला आणि भारत देशाची तिजोरी रिकामी करून देशाला कंगाल केले. राष्ट्रीय संपती कंपनीच्या हाती गेली. त्यामुळे देशातील जनता भिकेला लागली. म्हणून आज खाजगीकरणाचा आनंदाने स्विकार केल्यापेक्षा स्वाभिमानाने विरोध जर झाला तर राष्ट्रीय संपती राष्ट्राच्या मालकीची राहील आणि जास्त दुष्परिणाम बघायला मिळणार नाहीत.

## १५.११ खाजगीकरण म्हणजे विकास ?

आज भारतामध्ये आपण बघितले तर सर्व सार्वजनिक सेवा खाजगी कंपनीच्या घशात चालल्या आहेत. रेल्वे, शाळा, विमान, दवाखाने, पर्यटन, महामंडळ, नोकऱ्या सर्वांचे खाजगीकरण केल्या जात आहे. भारतामध्ये शिक्षीतांचे प्रमाण जास्त असले तरी गुणवत्तेचे प्रमाण खुपच कमी आहे. म्हणून काही लोक स्वतः ला सुशिक्षित समजून ही विशिष्ट नेत्याची भक्ती करतात, अडाणी सांगेन तेच सुशिक्षित माणुस कोणतीही शहानिशा न करता मान हालवून ऐकुन घेतो. शिक्षीत लोकांचे प्रमाण वाढले असले तरी गुणवत्ता ढासाळली आहे म्हणून देश आज अधोगतीला गेलेला आहे.

खाजगीकरण करण्यामागचा सरकारचा एकच उद्देश आहे, तो म्हणजे देशाला दरिद्री बनवून देशाची सर्व सुत्रे एका कंपनीच्या हाती सुपुर्द करून मोकळे होणे. देशातील जनतेचे सर्व प्रकारचे शोषण करून भांडवलदारांचे पोषण करणे हे या व्यवस्थेला कयायचे आहे. आपण जर बारकाईने विचार केला तर खाजगीकरणाच्या माध्यमातून आपल्याला सरकारचा नाकर्तेपणा दिसतो. विमानसेवा नफ्या मध्ये, आरोग्य खाते नफ्यामध्ये नाही, शाळाते विद्यार्थी नाहीत असे कारणे सांगुन सरकार त्याचे खाजगीकरण करत आहे. जर सार्वजनिक सेवा ह्या नफ्यात नाहीत तर नफ्यात आणण्यासाठी सरकारने काय केले? आणि सरकारने काही केलेच नाही तर नफा कसा होईल? एखादे सार्वजनिक क्षेत्र नफ्यात कसे आणायचे हे जर सरकारला कळत नसेल तर सरकार कडे नियोजन आणि गुणवत्ता आहे असे कसे म्हणता येईल? याचा साधा विचार केला तर सरकारच्या अपयशाची मोठी यादीच तयार होते. स्वतः ला चालवता येत नाही म्हणून विकणे याला विकास म्हणायचे म्हणजे किती मानसिक परिपक्वता असायला पाहिजे. फक्त देशातील लोकांना धर्म आणि जाती विषयी गुंतवणूक ठेवणे, धर्म सर्वश्रेष्ठ सांगुन देशातील जनतेच्या समस्या वाढवणे एवढेच काम येथे प्रामाणिक पणे सुरू असल्याचे दिसत आहे. लोकांना गुवणत्ते शिक्षण मिळत नसल्यामुळे लोकांना विचार व तर्क करणे आज अवघड होऊन बसले. आज अनेक लोकांना स्वतः च्या समस्येची जाणीव नाही तर देशातील समस्येची जाणावी कधी होणार? खाजगीकरणामुळे देशातील जनतेचे देशाचे अतोनात नुकसान झालेले आहे. याची जाणीव प्रामाणिक भारतीयाने करणे गरचेचे आहे.

बँकेचे खाजगीकरण करण्यात येत आहे बँका त्याच ग्राहक तेच, जागा तीच मग बदल काय? सरकारचे व्याजदर बंद होऊन कंपनीचे व्याजदर सुरू होतील. रेल्वेचे, बँकेचे किंवा ईतर कोणत्याही क्षेत्राचे खाजगीकरण केले तर कंपनी ग्राहक कोठुन आणते? ग्राहक तेच असतात फक्त मालकी हक्क बदललो, आणि मालकी हक्क बदलल्याणे नागरिकांच्या समस्या वाढत जातात. भक्तांमध्ये कोणी जास्तच हुशार असते त्यांचे काही उत्तरे असतात खाजगीकरण झाल्याने रेल्वेत वाढ होईल जर रेल्वे फायद्यात असती तर सरकारने कशाला विकली असती? आणि तोट्यात आहे तर उद्योगपतीं का रेल्वे वाढवतील हा साधा विचार डोक्यात येत नाही. शिक्षणाचे खाजगीकरणच नाही तर बाजारीकरण सुद्धा केले आहे. सरकारी शाळा बंद करून खाजगी शाळेचा भरणा केला.

## १५.१२ देशातील नोकरीचं खाजगीकरण: एक गंभीर बाब !

देशात खाजीकरणाचं वादळ सुरु झालं आहे. वीज, रेल्वे आणि तत्सम क्षेत्राचं आता खाजगीकरण झालं आणि आता शिक्षणक्षेत्रही खाजगी होवू पाहात आहे. ती अगदी जमेची बाजू आहे. कारण यातून त्या त्या क्षेत्राचा विकास होवू शकतो आणि देशाचाही. देशाला कराच्या स्वरुपात फायदा होचो. परंतू यामधून एक सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे गरीबांची मुलं उच्च शिक्षण घेवू शकणार नाहीत. तसेच खाजगी नोकऱ्याही गरीबांच्या वाट्याला येणार नाही. जरी त्यांच्यात कौशल्य असले तरीही......बेरोजगारी वाढली आहे. देश चरणसीमेला पोहोचलेला आहे. लोकांना शिकावंसं वाटत आहे. लोकं शिकतात आहे. उच्च शिक्षण घेतात आहे. परंतू हे शिक्षण घेतात नोकरीच्या अपेक्षेनं. कोणीही साधा धंदा लावायचा विचार करीत नाहीत. त्यांना असं वाटतं की नोकरी करणे हे उच्च शिक्षण घेणा-यांचे काम आणि धंदा करणे हे निरक्षरांचे काम. मग मी जर निरक्षर नाही तर मी धंदा कशाला करु? शेवटी याच प्रश्नांच्या चक्रव्युहात फसून लोकं उच्च शिक्षण तर घेतात. परंतू नोकरी व्यतिरिक्त इतर कामे करायला धजत नाहीत. मग बेरोजगारी वाढणार नाही तर काय?अलीकडे नोकरीमध्येही स्पर्धा आहेत. नोकरी नोकरी करता करता वय निघून जातं. परंतू नोकरी मिळत नाही. तसेच नोकरी मिळवीत असतांना लाखो रुपये डोनेशन म्हणून द्यावं लागतं. शिवाय शिफारशीही भरपूर लागतात. शेवटी या कितीही शिफारशी असल्या तरी भागत नाही. जवळचा नातेवाईक व जवळची ओळखही असते नोकरी मिळवायला. ती नसल्यानेही नोकरी लागत नाही. आजच्या परिस्थितीत असा विचार केला तर नोकऱ्याच अलिकडे संपलेल्या आहेत. लोकं उच्च शिक्षण घेत आहेत. परंतू नोकरी न मिळाल्यानं ते आत्महत्याही करीत आहेत. कारण शिक्षण घेत असतांना घरी आलेली डबघाईची परिस्थिती.

अलिकडचं शिक्षण एवढं महाग झालं आहे की त्याचा विचारच आपण करु शकत नाही. कोणताही मुलगा सहजपणे दहावी बारावीपर्यंत शिकू शकतो. कारण तेवढं शिकायला तेवढा पैसा लागत नाही. परंतू पुढे मात्र भरपूर पैसा लागतो. कारण सर्व शैक्षणीक संस्था ह्या खाजगी आहेत. याचाच अर्थ असा की मालीक मौजाच्या आहेत. त्या संस्थेचे मालक विद्यार्थ्यांकडून अतोनात शुल्क गोळा करतात नव्हे तर शिक्षण देण्यासाठी व्यापार करतात. मग एवढा पैसा गरीबांजवळ कुठून? तरीही त्यांची मुलं उच्च शिक्षण शिकता यावं म्हणून शिकतात. त्यामुळं आलेली डबघाईची परिस्थिती. त्यातच मुलं शिकली की त्यांना वाटणारी लाज. उच्च शिक्षीत मुलांना कोणतेही काम करायला शरमच वाटते.

## १५.१३ खाजगीकरणांचे वास्तव

भारतीय समाजाला गुलामगिरीच्या चक्रव्युहात ढकलणारी व्यवस्था म्हणजे खाजगीकरण होय. भारत देश जेव्हा पासून प्रजासत्ताक झाला तेव्हा पासून अलोकशाहीवृत्तीवादी भारताला स्वतःच्या मुठीत ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण भारतीय संविधानातील बळकटीमुळे राजकर्त्यांना तसे करता आले नाही. सन १९८५ पासून भारतीय राजनीती नव्या मोडवर आली आहे. बदलत्या युगाचे नवे स्थितंतरे आपल्या पाहायला मिळत आहेत. देशहीतपेक्षा स्वःहीत व पक्षहीत यामध्ये राजकारणी मशगुल असल्याने गरीब हा गरीब तर श्रीमंत हा श्रीमंत होत आहे. भ्रष्टाचारांचे नवे कुरण म्हणजे आजचे राजकिय क्षेत्र पाहायला मिळत आहे. सरकारी सेवावर कुटाराघात करून खाजगी मालकांचे नवे अर्थसम्राट निर्माण झाले आहेत. शिक्षणक्षेत्र, दुरसंचार क्षेत्र, बँक क्षेत्र, कमजोर झाले असून खाजगीकरणाचा उदो उदो सारीकडे वाढला आहे. आजचे वर्तमान केंद्र सरकार भांडवलधार्जिने असल्याने देशातील सर्व सरकारी क्षेत्र विकण्याचा सपाटा सरकारने लावला आहे.

सन १९९१ ते सन २०२१ या कालखंडात देशातील व विदेशी कंपण्यांनी अब्जो रूपयांचे द्रव्यनिःसारण केले आहे. करोडो कामगाराचे शोषण करून गडगंज संपत्ती कमावली आहे. या कमाईवर सरकारला टेकू देऊन देश गुलाम केला आहे. आज लोकशाहीचे लक्तरे वेशीवर टांगवले जात आहे. नव्या कायद्याने भारतीय कामगार व शेतकरी वर्गाला दास्य व गरीबीच्या अंधकारमय आभासी जगात लोटले आहे. नवा भ्रम मेंदूत तयार करून खरे वास्तव लपवून ठेवले आहे. सरकार शेतकऱ्यांचे आंदोलन दडपण्यासाठी नवी रणनीती आखत आहे. तरी शेतकरी स्वतःची जमीन व देश वाचवण्यासाठी जीवाची बाजी लावत आहेत. न्यायालयातील न्यायधिशांनी आरक्षण समाप्त करण्याविषयी सुतोवातन केले आहे. कायद्यानी सत्यता सांगणाऱ्या न्यायधिशांनी असे वक्तव्य करून स्वतःचे पूर्वग्रहदूषितपणाची भावना जाहीर केली आहे. त्याच्या बोलण्यांनी आरक्षणाविषयी भ्रम निर्माण झाला आहे .तर आरक्षणाचे खरे वास्तव जनतेपासून डोळेझाक होत आहे. आरक्षण समाप्त करता येत नसल्याने सर्व सरकारी विभागाचे खाजगीकरण करून व प्रतिआंदोलन करून आरक्षण कमकूवत करणे हे त्यांचे वास्तव आपण समजून घेतले पाहिजे. आज कोविड-१९ च्या महामारीने सारे क्षेत्र प्रभावित झाले आहेत. भारतीय अर्थव्यवस्था ऋण अवस्थेत पोहचली आहे. अनेकांची आयुष्य उध्दवस्त झाली आहेत. अशा कठीण काळात केंद्र सरकारने सरकारी सेवा क्षेत्राचे खाजगीकरण करण्याचा कपटी डाव आखला आहे. खाजगीकरणातून देशहीत असल्याचा भास निर्माण करून स्वतःच्या मित्रांचा फायदा करण्याचा हा डाव दिसून येत आहे. वित्तमंत्री यांनी अर्थसंकल्पात खाजगीकरणाचा आगाज केला आहे. बँक व विमा क्षेत्र, अनेक सरकारी क्षेत्रात खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे.

## १५.१३ सारांश

फायद्यात चालणाऱ्या सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करावे अशी मागणी विविध उद्योगपतींकडून सतत होत असते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणूनच खाजगीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळते.

१९९१ साली नरसिंहराव सरकारने खाजगीकरणाच्या धोरणाची सुरवात केली. त्यानंतर १९९८ ते २००४ या काळात सत्तेवर असलेल्या भाजपप्रणित आघाडीच्या सरकारने वेगाने हे धोरण पुढे नेले. त्यानंतर सत्तेमध्ये आलेल्या काँग्रेस आघाडीने हे धोरण तसेच चालू ठेवले आहे. फक्त त्याचा वेग काही प्रमाणात कमी केला आहे.

मोठ्या उद्योगांना खाजगीकरणामुळे फायदा झाला आहे. फायद्यात चालणाऱ्या मोठ्या सरकारी कंपन्या त्यांच्या ताब्यात येत असल्यामुळे त्यांची ताकद वाढते आहे. मूलभूत साधने त्यांच्या हाती येत आहेत. सरकारची जबाबदारी कमी होते आणि गुंतवणुक कमी होते. सरकारकडे निधी उपलब्ध होतो. त्यामुळे या प्रक्रियेत सरकारचाही फायदा आहे. इतर महत्त्वाच्या विकास कामांसाठी सरकारच्या हाती पैसा येतो असा सरकारचा दावा असतो. खाजगीकरणामुळे शासनाची मक्तेदारी संपून स्पर्धा वाढते त्यामुळे उत्पादनाचा दर्जा वाढतो किंमतींवरही नियंत्रण येते, ग्राहकांना विविध सेवा आणि वस्तूंची निवड करण्याची संधी मिळते आणि त्यामुळे अंतिमतः ग्राहकांचा फायदा होतो असा खाजगी उद्योजकांचा दावा आहे.

## १५.१४ प्रश्न

१. खाजगीकरण म्हणजे काय ?

२. खाजगीकरणांची आवश्यकता का आहे ? नमूद करणे.

३. बँकाच्या खाजगीकरणांचे दुष्परिणाम स्पष्ठ करणे.

४. शिक्षणाच्या खाजगीकरणांचे परिणाम स्पष्ट करणे.

५. वीजेचे खाजगीकरण झाले तर कर्मचाऱ्यांचे काय होणार ?

६. देशातील नोकरींचे खाजगीकरण एक गंभीर बाब आहे सविस्तर लिहा.

## १५.१५ संदर्भ


- कराडे जगन :-'जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने' डॉयमण्ड पब्लिकेशनसदाशिव पेठ, पुणे-३०.
- गायकवाड मुकुंद :-'जागतिकीकरण शाप नव्हे वरदान' कॉन्टीनेटल प्रकाशन,विजय नगर, पुणे-३०.
- जाधव अपेक्षा :-'भारतीय अर्थव्यवस्था आणि नियोजन, निराली प्रकाशन, शिवाजी नगर, पुणे.
- दत्त गौरव, महाजन अश्विनी :- 'भारतीय अर्थव्यवस्था' एस चन्द ॲण्ड कंम्पनी प्रा. लि. रामनगर, नई दिल्ली-११००५५
- भागवत ॲण्ड ॲडमिरल :- 'जागतिकीकरण नविन गुलामगिरी' समता प्रकाशन, समता सैनिक दल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाण पूल-लष्करी बाग, नागपूर-१६

- जिभकाटे, शास्त्री :- स्थूल अर्थशास्त्राचे सिध्दान्त-१ विश्व पब्किास ॲण्ड डिस्टीब्यूटर्ट्स नागपूर-४४००३२
- म्हारेके राहूलः-अर्थसंवाद त्रैमासिक, मराठी अर्थशास्त्र परिषद, खंड ४४ अंक १ भारतीय, मृद्रणालय, शाहपुरी, कोल्हापूर-४३१२०४
- साठे मधुसूदनः-'जागतिक अर्थकारण, नव्या जगाचे अर्थकारण' डायमण्ड पब्लिकेशन्स पुणे-३०
- साठे मधुसूदन :-'भारताच्या आर्थिक समस्या भाग-५, आर्थिक सुधारणा आणि वाढ' डायमण्ड पब्लिकेशन्स, पुणे-३०
- साठे मधुसूदन :-'जागतिक अर्थकारण : आशियातील अर्थव्यवस्था' डायमण्ड पब्लिकेशन, सदाशिव पेठ, पुणे-३०
- वावरे अनिलकुमार, :-'आंतरराष्ट्रिय अर्थशास्त्र' एज्युकेशनल पब्लिशर्स घाटगे लालासाहेब ॲण्ड डिस्टिब्यूटर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.
- लोकमत ई - पेपर मुंबई १२/०६/२०२०
- www.bbc.com.in> १० mar २०२०
- www.bbc.com.in> india.५१८९८२७९१५mar २०२०,
- M. dailyhunt.in> india> marathi> b.... १८ Dec २०१६ नवी दिल्ली : वृत्तसंस्था
- www.bbc.com.India. ५३९७५७४६
- Musselburgh co-op in crisis as privatisation bid fails
- The Pursuit of Reason: The Economist १८४३–१९९३. Harvard Business School Press. p. ९४६. ISBN ०-८७५८४-६०८-४.
- Compare Bel, Germà (२००६). "Retrospectives: The Coining of 'Privatisation' and Germany's National Socialist Party". Journal of Economic Perspectives. २०


*****

# १६

## जागतिकीकरण

**घटक रचना**

१६.० उद्दिष्टे

१६.१ प्रस्तावना

१६.२ जागतिकीकरणाचा अर्थ (Meaning of globalization)

१६.३ जागतिकीकरण संकल्पनेची सुरुवात

१६.४ जागतिकीकरणांची वैशिष्ट्ये (Distinctive Characteristics of Globalization)

१६.४.१ जागतिक अर्थव्यवस्थेची निर्मिती

१६.४.२ जागतिक व्यवस्थेची निर्मिती

१६.४.३ उदारीकरण व खाजगीकरण या प्रक्रियांना चालना

१६.४.४ विविध माध्यमे

१६.४.५ विकसित राष्ट्रांचे प्रभुत्त्व

१६.४.६ गतिशिलतेत वाढ

१६.४.७ आमूलाग्र बदलाची प्रक्रिया

१६.५ जागतिकीकरण आणि जागतिक भांडवलशाही (Globalization and world Capitalism)

१६.५.१ अर्थव्यवस्थेचा अर्थ व व्याख्या

१६.५.२ अर्थव्यवस्थेचे प्रकार

१६.६ जागतिकीकरणाचे फायदे आणि तोटे (Advantages (benifits) and Disadvantages of Globalization)

१६.६.१ जागतिकीकरणाचे फायदे

१६.६.१.१ औद्योगिकीकरणास चालना

१६.६.१.२ बाजारपेठांचा विस्तार

१६.६.१.३ परकीय व्यापारात वृद्धी

१६.६.१.४ उपभोक्त्यांचा फायदा

१६.६.१.५ रोजगार वृद्धी

१६.६.१.६ सेवाक्षेत्राचा विस्तार

१६.६.१.७ साजाजिक-सांस्कृतिक संबंधात वाढ

१६.६.२ जागतिकीकरणाचे तोटे

१६.६.२.१ स्थानिक उद्योगास मारक

१६.६.२.२ बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी

१६.६.२.३ बेरोजगारीत वाढ

१६.६.२.४ विषमतेत वाढ

१६.६.२.५ विकसनशील राष्ट्रांची लूट

१६.६.२.६ कर्जबाजारीपणात वाढ

१६.६.२.७ पर्यावरणाची समस्या

१६.६.२.८ समाजवाद व कल्याणकारी धोरणास सोडचिठ्ठी

१६.६.२.९ सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट प्रभाव

१६.६.२.१० पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष

१६.७ जागतिकीकरणांचे भारतीय क्षेत्रावर पडलेले परिणाम

१६.७.१ जागतिकरणांचे शिक्षण क्षेत्रावरील परिणाम

१६.७.१.१ शिक्षणाच्या मूळ उद्देशाकडे दुर्लक्ष

१६.७.१.२ ज्ञान व समाजधारणा यात तफावत

१६.७.१.३ सामाजिक सांस्कृतिक विविधता नष्ट झाली

१६.७.१.४ वंचितांना शिक्षणाच्या फायदयापासून दूर ठेवणे

१६.७.१.५ पॅरा शिक्षकांचा शोध

१६.७.१.६ नव्या शैक्षणिक धोरणाचे परिणाम

१६.७.१.७ शिक्षणातील खाजगीकरण

१६.७.१.८ केंद्रीय सर्वोच्च संस्थांचे खच्चीकरण

१६.७.१.९ परदेशी विद्यापीठांना भारतात मुक्त प्रवेश

१६.८ जागतिकीकरणांचे कृषी विभागांवर पडलेले परिणाम

१६.९ जागतिक अर्थव्यवस्थेचा सहकारी चळवळीवरील परिणाम (Impact of Global Economy on cooperative movement)

१६.९.१ भाग भांडवल

१६.९.२ उत्पादन खर्च

१६.९.३ बाजारपेठ विस्तार

१६.९.४ शासकीय मदत व अनुदाने

१६.९.५ चळवळीचा गुणात्मक विकास

१६.९.६ व्यवस्थापनात सुधारणा

१६.९.७ संघटनात्मक परिणाम

१६.९.८ ग्राहकांचे समाधान

१६.९.९ ग्रामीण विकास

१६.१० सारांश

१६.११ प्रश्न

१६.१२ संदर्भ

## १६.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास:

- जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करता येईल.
- जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये सांगता येतील.
- जागतिकीकरण व जागतिक भांडवलशाही यांच्यातील संबंधाचे आकलन होईल.
- जागतिकीकरणाचे फायदे व तोटे यांचे आकलन होईल.

## १६.१ प्रस्तावना

जागतिकीकरण ही सद्यःकालीत प्रक्रिया असून ती जगभर सुरू आहे. औद्योगिकीकरण, पाश्चिमात्त्यकरण व आधुनिकीकरण या प्रक्रियांचा विस्तारीत असा पुढचा टप्पा म्हणजे जागतिकीकरण होय. १९८० नंतर इंग्लंड, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशात आर्थिक सुधारणेचे वा पुनर्रचनेचे जे कार्यक्रम सुरू झाले, त्यातून जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. जागतिकीकरण ही संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणारी प्रक्रिया आहे. किंवा जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे ती मूलतः आर्थिक प्रक्रिया ठरते. तथापि, या प्रक्रियेस आर्थिक पैलूबरोबरच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरणविषयक असे अनेक पैलू आहेत. म्हणून ती एक सर्वस्पर्शी व संकीर्ण अशी प्रक्रिया आहे. अशा या प्रक्रियेचे स्वरूप आपण या पहिल्या घटकात समजावून घेणार आहोत. त्यासाठी या घटकाचे चार विभाग पाडले आहेत. पहिल्या विभागात जागतिकीकरणाचा अर्थ, दुसऱ्या विभागात त्याची प्रभेदक वैशिष्ट्ये, तिसऱ्या विभागात जागतिकीकरण व जागतिक भांडवलशाही व चौथ्या विभागात जागतिकीकरणाचे फायदे व तोटे यांचे विवेचन केलेले आहे.

## १६.२ जागतिकीकरणाचा अर्थ (MEANING OF GLOBALIZATION)

जागतिकीकरण चा शाब्दिक अर्थ म्हणजे स्थानिक किंवा प्रादेशिक वस्तू किंवा घटनांचे जागतिक स्तरावर रूपांतरण करण्याची प्रक्रिया. याचा उपयोग एका प्रक्रियेचे वर्णन करण्यासाठी देखील केला जाऊ शकतो ज्याद्वारे जगभरातील लोक एकत्र येऊन एक समाज तयार करतात आणि एकत्र काम करतात. ही प्रक्रिया आर्थिक, तांत्रिक, सामाजिक आणि राजकीय शक्तींचे संयोजन आहे. जागतिकीकरणाचा वापर बऱ्याचदा आर्थिक जागतिकीकरणाच्या संदर्भात केला जातो, म्हणजेच राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थांमध्ये व्यापार, परदेशी थेट गुंतवणूक, भांडवली प्रवाह, स्थलांतर आणि तंत्रज्ञानाचा प्रसार याद्वारे एकत्रीकरण.

जागतिकीकरण ही अत्यंत संकीर्ण व मानवी जीवनाच्या विविध पैलूशी संबंधित असणारी अशी प्रक्रिया आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करणे सोपे नाही. वेगवेगळ्या अभ्यासकांनी जागतिकीकरणाच्या व्याख्या वेगवेगळ्या दृष्टिकोनातून केलेल्या आहेत. त्यापैकी काही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१. दिपक नय्यर:**

एखाद्या राष्ट्राचे आर्थिक व्यवहार त्याच्या भौगोलिक व राजकीय सीमेच्या बाहेर विस्तारीत करण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

**२. श्रवणकुमार सिंग:**

आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करून तेथे जगातील साधनसामग्रीचे व भांडवलाचे सुलभ अभिसरण निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

३. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पश्चिम आशियासाठी असलेल्या आर्थिक व सामाजिक आयोगाच्या मते - वस्तू, भांडवल, सेवा, आणि श्रम यांचा प्रवाह सुलभ करण्यासाठी राष्ट्रांच्या सीमांमधील अडथळे काढून टाकणे वा कमी करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

**४. जागतिक बँक - जागतिकीकरण म्हणजे:**

अ) उपभोग्य वस्तूंच्या सर्व वस्तूंच्या आयातीवरील नियंत्रण समाप्त करणे.

ब) आयात शुल्काचे दर कमी करणे.

क) सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करणे होय.

वरील चारही व्याख्या या आर्थिक दृष्टिकोनातून केलेल्या आहेत. काही विद्वानांनी जागतिकीकरणाची व्याख्या वेगळ्या दृष्टिकोनातून केलेली आहे.

**५. ॲन्थनी गिडेन्स:**

जगातील विविध लोकांमध्ये व क्षेत्रामध्ये वाढत असणारी पारस्पारिकता व परस्परनिर्भरता म्हणजे जागतिकीकरण होय. ही पारस्पारिकता आर्थिक व सामाजिक संबंधातील तसेच स्थळकाळातील अंतर मिटवून टाकते.

**६. एम. अल्ब्रो आणि ई किंग:**

ज्या प्रक्रियेद्वारे जगातील लोक एकाच समाजात एकत्रित होतात, त्या प्रक्रियेस जागतिकीकरण असे म्हणतात.

**७. बायलिस आणि स्मिथ:**

जगातील वेगवेगळया प्रदेशातील लोकांमध्ये वाढत जाणारे आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, व्यापारी व सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

**८. गीलपीन:**

प्रभुत्त्वशाली राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांवर आपली अर्थव्यवस्था व संस्कृती लादण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे जागतिकीकरण होय.

**९. चंद्रकांत खंडागळे:**

जगातील विविध लोक, राष्ट्रे वा समाज यांच्यामध्ये असलेल्या भौगोलिक व राजकीय सीमांचे उल्लंघन करुन त्यांना जागतिक स्तरावर आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व्यवहार मुक्तपणे करण्यास वाव देऊन एकच जागतिक व्यवस्था निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

## १६.३ जागतिकीकरण संकल्पनेची सुरुवात

१९८० च्या दशकापासून "जागतिकीकरण" हा शब्द अर्थशास्त्रज्ञांनी वापरला आहे, जरी तो १९६० च्या दशकात सामाजिक शास्त्रांमध्ये वापरला गेला होता, परंतु १९८० आणि १९९० च्या दशकापर्यंत ही संकल्पना लोकप्रिय झाली नाही. जागतिकीकरणाच्या सर्वात जुन्या सैद्धांतिक संकल्पना अमेरिकन उद्योजक-मंत्री बनलेल्या चार्ल्स टेझ रसेल यांनी लिहिल्या होत्या, ज्यांनी १८९७ मध्ये 'कॉर्पोरेट जायंट्स' हा शब्द तयार केला होता. जागतिकीकरणाकडे शतकानुशतके चालणारी प्रक्रिया म्हणून पाहिले जाते, मानवी लोकसंख्या आणि सभ्यतेच्या विकासाचा मागोवा घेत आहे, ज्याने गेल्या ५० वर्षांमध्ये नाट्यमयपणे वेग घेतला आहे. जागतिकीकरणाचे सर्वात जुने प्रकार रोमन साम्राज्य, पार्थियन साम्राज्य आणि हान राजवंशाच्या काळात सापडतात, जेव्हा चीनमध्ये सुरू झालेला रेशीम मार्ग पार्थियन साम्राज्याच्या सीमेवर पोहोचला आणि पुढे रोमपर्यंत विस्तारला. इस्लामिक सुवर्णयुग हे देखील एक उदाहरण आहे, जेव्हा मुस्लिम शोधक आणि व्यापाऱ्यांनी जुन्या जगात सुरुवातीच्या जागतिक अर्थव्यवस्थेची स्थापना केली, परिणामी पीक व्यापार, ज्ञान आणि तंत्रज्ञानाचे जागतिकीकरण झाले; आणि नंतर मंगोल साम्राज्याच्या काळात, जेव्हा रेशीम मार्गावर तुलनेने जास्त एकीकरण होते. व्यापक संदर्भात, १६ व्या शतकाच्या समाप्तीपूर्वी स्पेन आणि विशेषतः पोर्तुगालमध्ये जागतिकीकरणाची सुरुवात झाली.

## १६.४ जागतिकीकरणांची वैशिष्ट्ये (DISTINCTIVE CHARACTERISTICS OF GLOBALIZATION)

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे वेगळेपण समजण्यासाठी तिची प्रभेदक किंवा व्यवच्छेदक वैशिष्ट्ये अभ्यासणे आवश्यक ठरते. एखाद्या वस्तूचे प्रभेदक वैशिष्ट्य म्हणजे असे वैशिष्ट्य की जे फक्त त्याच वस्तूचे वैशिष्ट्य असते व अन्य वस्तूंचे नसते. किंवा असेही म्हणता येईल की एखादी वस्तू तिच्या ज्या वैशिष्ट्यामुळे इतर वस्तूपासून वेगळी ठरते किंवा ती वस्तू व इतर वस्तूंमध्ये भेद करता येतो त्यास प्रभेदक वैशिष्ट्य असे म्हणतात. जागतिकीकरणाची अशी कांही वैशिष्ट्ये आहेत की ज्यांच्यामुळे ही प्रक्रिया इतर प्रक्रियांपासून वेगळी आहे हे लक्षात येते. जागतिकीकरणाची प्रक्रिया व इतर प्रक्रिया यांच्यात भेद दर्शविणारी जागतिकीकरणाची जी वैशिष्ट्ये आहेत त्यांना जागतिकीकरणाची प्रभेदक वैशिष्ट्ये असे म्हणता येते. जागतिकीकरणाची काही ठळक अशी प्रभेदक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

### १६.४.१ जागतिक अर्थव्यवस्थेची निर्मिती:

संपूर्ण जगासाठी एकच अर्थव्यवस्था म्हणजेच जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणे हे जागतिकीकरणाचे पहिले वैशिष्ट्ये आहे. या प्रक्रियेत जागतिक व्यापारावरील निर्बंध दूर करून विविध राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था ह्या जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्म करणे अभिप्रेत आहे. जागतिकीकरणात विविध राष्ट्रांतील भांडवल, तंत्रज्ञान, बाजारपेठा, श्रम, वस्तू व सेवा इत्यादींचे एकीकरण करून विशाल आकार असलेल्या जगाचे प्रत्यक्ष व्यवहार करण्यासाठी एका लहान खेड्यात रूपांतर होणे अपेक्षित आहे. या प्रक्रियेत देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडल्याने कोणत्याही देशातील उत्पादीत वस्तू जगात कोठेही विक्रीसाठी उपलब्ध होऊ लागली आहे. त्यामुळे संपूर्ण जगासाठी एकच बाजारपेठ तयार होऊन जग हे जणू एक खरेदीविक्रीचे संकुल (Shopping Complex) बनले आहे. भारतासारख्या विकसनशिल देशांच्यादृष्टीने जागतिकीकरण म्हणजे परकीय कंपन्यांना भारतात विविध क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी सोईसुविधा उपलब्ध करून देणे, भारतीय कंपन्यांना परकीय कंपन्यांच्यासहकार्याने उद्योग उभारण्यास परवानगी देणे, जकात व आयात शुल्क कमी करून आयातीच्या उदारीकरणाचे कार्यक्रम राबविणे, परकीय भांडवल, तंत्रज्ञान व कुशल मनुष्यबळ यांचे स्वागत करणे होय. अशाप्रकारे जागतिक बाजारपेठ किंवा अर्थव्यवस्था निर्माण करणे हे जागतिकीकरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट आहे.

### १६.४.२ जागतिक व्यवस्थेची निर्मिती:

साधारणतः जागतिकीकरण ही एक आर्थिक प्रक्रिया मानली जाते. तथापि, आधिक व्यापक दृष्टीने विचार केल्यास ती एक सामाजिक प्रक्रिया आहे हे लक्षात येते. कारण या प्रक्रियेत जगातील विविध समाजांचे एकीकरण करून एक जागतिक व्यवस्था (World or global system) निर्माण करणे अपेक्षित आहे. यासंदर्भात जार्ज मॉडेलस्की म्हणतात की ही जगातील विविध समाजांना एका जागतिक व्यवस्थेत आणणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेने लोकांना जगात कोठेही मुक्तपणे स्थलांतर करण्याचे स्वांतत्र्य मिळवून दिले आहे. वाहतुकीची प्रगत साधने मुबलक प्रमाणात उपलब्ध झाल्याने असे स्थलांतर वाढत चालले आहे. व्यापार, उद्योग, नोकरी, पर्यटन इत्यादीच्या निमित्ताने लोक जगात कोठेही स्थलांतर करु लागले आहेत. त्यांची जीवनशैली एकसारखी बनत चालली आहे. त्यांच्या आकांक्षा, सवयी, मूल्ये यांच्यात समरूपता येऊ लागली आहे. संप्रेषण माध्यमे व माहिती-तंत्रज्ञानाचे जाळे यामुळे विभिन्न राष्ट्रांतील लोकांमध्ये त्वरीत आंतरक्रिया होऊ लागल्या आहेत. जगात कोठेही घडलेल्या घटनेचा प्रभाव संपूर्ण जगावर पडू लागला आहे. एका देशात वा समाजात उद्भवलेली समस्या ही संपूर्ण जगास आपली समस्या वाटू लागली आहे. याचा परिणाम म्हणून विभिन्न समाजातील वा देशातील लोकांत आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित होऊन ते वाढू लागले आहेत. लोकांच्या मानसिक कक्षा रुंदावून त्यांच्यावर असणाऱ्या भौगोलिक व राजकीय सीमा नष्ट होत आहेत. स्थळकाळाचे अंतर कमी होऊन _ “विश्वची माझे घर' हा दृष्टिकोन प्रत्यक्षात साकारू लागला आहे. परिणामी, जागतिक व्यवस्था निर्माण होण्यास चालना मिळाली आहे.

### १६.४.३ उदारीकरण व खाजगीकरण या प्रक्रियांना चालना:

जागतिकीकरणात उदारीकरण व खाजगीकरण यांना मोठी चालना मिळाली आहे. जागतिक बँकेच्या मते तर आर्थिक उदारीकरण करणे व सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करणे म्हणजेच जागतिकीकरण होय. उदारीकरण व खाजगीकरण या दोन जागतिकीकरणाशी संलग्न असणाऱ्या प्रक्रिया आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विविध राष्ट्रांना आर्थिक उदारीकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारणे भाग पडले आहे. कारण या दोन प्रक्रियांशिवाय जागतिकीकरण होणे शक्य नाही. म्हणून या दोन प्रक्रियांचे स्वरूप थोडक्यात समजावून घेऊ.

**उदारिकरण:**

उदारिकरण म्हणजे एखाद्या गोष्टीवरील निबंध वा नियंत्रणे काढून टाकणे किंवा कमी करणे होय. आर्थिक उदारीकरण म्हणजे आर्थिक प्रक्रियेवरील निबंध वा नियंत्रणे काढून टाकणे वा कमी करणे होय. चंद्रकांत खंडागळे यांच्या मते उत्पादन, वितरण, विनिमय, उपभोग, गुंतवणूक, श्रमपुरवठा इत्यादी आर्थिक प्रक्रियांवर असलेले अनावश्यक शासकीय निर्बंध, नियंत्रणे व नियमने अधिकाधिक शिथील किंवा कमी करणे म्हणजे उदारीकरण होय. एम. रामनजनेयुल यांच्या मते आर्थिक उदारीकरण म्हणजे गुंतवणूक, आयात व उत्पादन यावर असलेले अनावश्यक निर्बंध, नियंत्रणे व परवाने मोडीत काढणे होय. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विविध राष्ट्रांनी आर्थिक प्रक्रियांवर असणारे अनिष्ट निर्बंध एकतर शिथील केले आहेत किंवा काढून टाकले आहेत. उदारीकरणाच्या प्रक्रियेत उद्योगांना परवाना मुक्त करणे, परकीय गुंतवणूकीस परवानगी देणे, निर्यातीवरील निबंध उठवून आयात मुक्त करणे, परकीय चलनाचे व्यवहार नियंत्रण मुक्त करणे, विदेशी बँकाना प्रवेश देणे, करपध्दती साधी व सोपी करणे, भांडवल व नाणेबाजारात पारदर्शकता आणून त्याद्वारे परकीय गुंतवणूक आकर्षित करणे इत्यादी तरतुदी केल्या जात आहेत.

**खाजगीकरण:**

संकुचित अर्थाने खाजगीकरण करणे म्हणजे शासकीय (सार्वजनिक) उद्योगाची मालकी खाजगी क्षेत्राकडे देणे तर व्यापक अर्थाने खाजगीकरण करणे म्हणजे शासकीय उद्योगाच्या मालकीहक्कात बदल करून किंवा बदल न करताही त्याचे व्यवस्थापन व नियंत्रण खाजगी क्षेत्राकडे देणे होय. चंद्रकांत खंडागळे यांच्या मते खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक उद्योगाची मालकी खाजगी क्षेत्राकडे किंवा त्याच उद्योगातील कर्मचाऱ्यांकडे देणे किंवा तो उद्योग भाडेपट्टीने खाजगी क्षेत्रास चालविण्यास देणे होय. डी. आर. पेंडसे यांच्या मते देशाच्या आर्थिक व्यवहारातील शासनाचा किंवा सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग कमी करणे म्हणजे खाजगीकरण होय. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विविध राष्ट्र खाजगीकरणाचे धोरण राबवू लागली आहेत. १९७० पूर्वीच इंग्लंडमध्ये अराष्ट्रीयकरण (Denationalization) या नावाने खाजगीकरणास सुरुवात झाली. मार्गारेट थैचर (इंग्लंडच्या तत्कालीन पंतप्रधान) यांनी इंग्लंडमध्ये अनेक सरकारी उद्योग खाजगी क्षेत्राकडे सोपविले. १९८० नंतर फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, जपान, तुर्कस्थान या देशानी तर मिखाईल गार्बोचेव्ह यांनी रशियात हे धोरण राबविले. पुढे इतरही साम्यवादी राष्ट्रांनी (पोलंड, रुमानिया, बल्गेरिया इ.) सरकारी उद्योगाचे खाजगीकरण केले. आज जागतिकीकरणात सहभागी झालेल्या बहुतेक

विकसनशिल राष्ट्रांनी खाजगीकरणास सुरुवात केली आहे. थोडक्यात उदारीकरण व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारणे हे जागतिकीकरणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट आहे.

### १६.४.४ विविध माध्यमे:

जागतिकीकरणाची प्रक्रिया ही विविध माध्यमांच्याद्वारे गतीमान झालेली आहे. ही माध्यमे पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) आंतरराष्ट्रीय संघटना:** उदा. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी.

**ब) प्रादेशिक संघटना:** उदा. अमेरिकन राज्य संघटना, आफ्रिकन ऐक्य संघटना, युरोपियन मुक्त व्यापार संघ, सार्क इत्यादी.

**क) बहुराष्ट्रीय महामंडळे:** उदा. पाँड्स, युनिलिव्हर, पेप्सी, कोका-कोला इ.

**ड) बिगरशासकीय संघटना:** उदा. अम्नेस्टी इंटरनॅशनल, रेडक्रॉस, स्काऊट्स अँड गाईड्स, मानवी हक्क आयोग इ.

**ई) जनसंप्रेषण साधने:** उदा. वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट, इंटरनेट, इत्यादी. वरील विविध माध्यमांमुळे जगातील विविध राष्ट्रांत वा समाजात आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक संबंध मोठया प्रमाणात निर्माण होऊन त्या संबंधात सतत वाढ होत आहे. तसेच राष्ट्राराष्ट्रातील व समाजासमाजातील परस्परावलंबनही वाढत चालले आहे. याचा परिणाम म्हणून सर्व राष्ट्र व समाज हे एकाच जागतिक व्यवस्थेत सामील होऊ लागले आहेत. थोडक्यात विविध माध्यमांच्याद्वारे जागतिकीकरणास चालना मिळाली आहे.

### १६.४.५ विकसित राष्ट्रांचे प्रभुत्त्व:

जागतिकीकरणात सर्व जगाची एकच किंवा सामाईक अशी आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था निर्माण होत आहे. तत्त्वतः या नव्या जागतिक व्यवस्थेत सर्व राष्ट्रांचा समान सहभाग अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र सर्वांचा समान सहभाग आढळत नाही. अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, जपान, इटली, कॅनडा व रशिया या आठ विकसित राष्ट्रांचे जागतिकीकरणात प्रभुत्त्व वा वर्चस्व (Dominance) निर्माण झालेले आहे. संयुक्त राष्ट्रसंघ (UNO) जागतिक बँक (WB) आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF) जागतिक व्यापार संघटना (WTO) इत्यादी.

आंतरराष्ट्रीय संघटना या या आठ विकसित राष्ट्रांच्या प्रभावाखाली आहेत. त्यामुळे ही विकसित राष्ट्र आपली आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक ध्येयधोरणे व मूल्ये इतर राष्ट्रांवर लादत आहेत. इतर राष्ट्रे ही विकसनशिल असल्याने ती त्यांच्या विकासासाठी या विकसित राष्ट्रांवर व आंतरराष्ट्रीय संघटनावर मदतीसाठी अवलंबून आहेत. त्यामुळे त्यांना विकसित राष्ट्राचे वर्चस्व स्वीकारावे लागत आहे. थोडक्यात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसित राष्ट्रांचे विकसनशिल राष्ट्रांवर प्रभुत्त्व निर्माण झाले आहे. त्यामुळे नव्या जागतिक व्यवस्थेत असमतोल आढळतो.

### १६.४.६ गतिशिलतेत वाढ:

जागतिकीकरणात व्यक्तिची व्यावसायिक व भौगोलिक गतिशीलता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत वाहतूकीच्या व दळणवळणाच्या प्रगत साधनांचा मोठा विस्तार घडून आला आहे. परदेश प्रवासावरील निर्बंध शिथील झाले आहेत तसेच हा प्रवास स्वस्तही झाला आहे. त्यामुळे व्यापार, व्यवसाय, शिक्षण, पर्यटन, नोकरी इत्यादीच्या निमित्ताने व्यक्ती जगात कोठेही स्थलांतर करु लागली आहे. राज्यदेखील व्यक्तीला त्यासाठी मदत व प्रोत्साहन देत आहे. तसेच उच्च गुणतत्तेच्या परकीय व्यक्तींना विविध राष्ट्रे आमंत्रित करु लागली आहेत. काही राष्ट्रांनी तर दुहेरी नागरिकत्त्व देणे सुरू केले आहे. याचाच अर्थ असा की, पूर्वी व्यक्तीचा विचार एका विशिष्ट राष्ट्राचा नागरिक म्हणून होत असे. आज मात्र जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत व्यक्तिचा विचार हा अखिल मानव समुदायाचा सदस्य म्हणून होऊ लागला आहे. त्यामुळे व्यक्ती ही अधिक गतिशील (Mobile) व अधिक जागतिक (Global) बनली आहे. याचाच परिणाम म्हणून कुटुंब, गाव, प्रांत, राष्ट्र इत्यादीबाबतचे प्रेम निष्ठा व बांधिलकीची भावना शिथील होत चालली आहे. थोडक्यात व्यक्तीच्या गतिशीलतेत वाढ होणे हे जागतिकीकरणाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ठरले आहे.

### १६.४.७ आमूलाग्र बदलाची प्रक्रिया:

जागतिकीकरण ही संपूर्ण मानव समाजात आमूलाग्र बदल घडवून आणणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत उद्योग, व्यापार, शेती, वित्त, श्रमपुरवठा, तंत्रविद्या, दळणवळण, स्थलांतर, जीवनमान, शासनव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, विवाह, कुटुंब, कला, क्रीडा, मूल्ये, भाषा, संस्कृती, पर्यावरण अशा सर्वच क्षेत्रात वेगाने बदल घडून येऊ लागले आहेत. त्यामुळे जगाचा कायापालट होऊ लागला आहे.

## १६.५ जागतिकीकरण आणि जागतिक भांडवलशाही (GLOBALIZATION AND WORLD CAPITALISM)

जागतिकीकरणाचा अर्थ व वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर आता तुम्ही जागतिकीकरण व जागतिक भांडवलशाही यांचा अभ्यास करणार आहात. आर्थिकदृष्ट्या जागतिकीकरण ही प्रक्रिया देशाची अर्थव्यवस्था ही जगाच्या अर्थव्यवस्थेशी एकात्म करण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत जागतिक व्यापारावरील निर्बंध दूर करून संपूर्ण जगासाठी एकच अर्थव्यवस्था म्हणजेच जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणे अभिप्रेत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत ही जी जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करावयाची आहे ती भांडवलशाही या प्रकारची अर्थव्यवस्था आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की जागतिकीकरण ही संपूर्ण जगात भांडवलशाही अर्थव्यवस्था पसरविण्याची प्रक्रिया आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा जगभर प्रसार व प्रचार किंवा वाढ व विस्तार करणे हे जागतिकीकरणामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे जागतिकीकरण व भांडवलशाही यांच्यातील संबंध समजावून घेणे या ठिकाणी आवश्यक ठरते. त्यासाठी प्रथम अर्थव्यवस्था म्हणजे काय व अर्थव्यवस्थेचे विविध प्रकार थोडक्यात समजावून घेऊ.

### १६.५.१ अर्थव्यवस्थेचा अर्थ व व्याख्या:

मानव आपल्या विविध गरजा भागविण्यासाठी नैसर्गिक साधनसामग्रीचा उपयोग करीत असतो. पण मानवाच्या गरजा अमर्याद असून त्या भागविण्याची साधने मात्र मर्यादित असतात. अमर्याद गरजा व मर्यादित साधने यांचा मेळ कसा घालावयाचा हा मानवापुढील महत्त्वाचा प्रश्न असून या प्रश्नास आर्थिक प्रश्न असे म्हणतात. हा प्रश्न सोडविण्यासाठी मानव जे वर्तन किंवा क्रिया करतो त्यास आर्थिक वर्तन किंवा आर्थिक क्रिया म्हणतात. आणि या आर्थिक वर्तनाचे किंवा क्रियांचे संघटन, नियमन व नियंत्रण करण्यासाठी मानवाने जी व्यवस्था निर्माण केली आहे तिलाच अर्थव्यवस्था असे म्हणतात. अर्थव्यवस्थेचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी तिच्या काही व्याख्या पाहू.

**१) चंद्रकांत खंडागळे:**

मानवी गरजांच्या पूर्ततेसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवा यांचे उत्पादन, वितरण, विनिमय व उपभोग यांच्याशी संबंधित असणाऱ्या संरचनांची व प्रक्रियांची व्यवस्था म्हणजे अर्थव्यवस्था होय.

**२) रूथ बुनझेल:**

मानवाच्या भौतिक अस्तित्वाशी संबंधित असणाऱ्या समस्यांच्या संदर्भात मानवाच्या एकूण वर्तनाचे केलेले संघटन म्हणजे अर्थव्यवस्था होय.

**३) जॉन क्यूबर:**

ज्या व्यवस्थेत समाज त्यांच्या श्रमविभाजनाचे व परस्परावलंबनाचे संघटन घडवून आणतात तिला अर्थव्यवस्था असे म्हणतात.

### १६.५.२. अर्थव्यवस्थेचे प्रकार:

जगातील प्रत्येक समाजाची किंवा देशाची स्वतःची अशी अर्थव्यवस्था असते. जगातील विविध अर्थव्यवस्थांचे तीन प्रकार पाडलेले दिसतात.

**अ) भांडवलशाही अर्थव्यवस्था (Capitalist economy):**

ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांवर खाजगी व्यक्तींची मालकी व नियंत्रण असते तसेच त्यांचा उपयोग खाजगी नफा कमावण्यासाठी केला जातो त्या अर्थव्यवस्थेस भांडवलशाही अर्थव्यवस्था असे म्हणतात. प्रा. लॉक यांच्या मते मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित भांडवलावर खाजगी मालकी असणे व त्याचा उपयोग खाजगी नफा कमावण्यासाठी करणे ही वैशिष्ट्ये असलेल्या आर्थिक संघटन व्यवस्थेस भांडवलशाही म्हणतात. भांडवलशाहीची वैशिष्ट्ये:

१) भांडवलशाहीत उत्पादन साधने ही खाजगी मालकीची असतात.

२) प्रत्येकास खाजगी मालमत्ता धारण करण्याचा, ती वारसाहक्काने संक्रमित करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा हक्क असतो.

३) उत्पादन हे जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी केले जाते.

४) उपभोक्ता (ग्राहक) हा सार्वभौम असतो. म्हणजे उपभोक्त्यांच्या आवडीनुसार उत्पादन केले जाते.

५) किंमत यंत्रणेद्वारे आर्थिक व्यवहाराचे नियंत्रण होत असते.

६) या अर्थव्यवस्थेत व्यापार चक्र (तेजीमंदीचे चक्र) आढळते.

७) मागणी पुरवठ्याच्या तत्त्वानुसार उत्पादन होते.

८) आर्थिक व्यवहारात शासकीय हस्तक्षेप नाकारला जातो.

९) समाजात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात असते इत्यादी.

## १६.६ जागतिकीकरणाचे फायदे आणि तोटे (ADVANTAGES (BENIFITS) AND DISADVANTAGES OF GLOBALIZATION)

जागतिकीकरणाचा अर्थ, वैशिष्ट्ये व जागतिकीकरण व जागतिक भांडवलशाही यांचा संबंध इत्यादींचा अभ्यास केल्यानंतर आता तुम्ही जागतिकीकरणाचे फायदे व तोटे अभ्यासणार आहात. काही अभ्यासकांच्या मते जागतिकीकरणाची प्रक्रिया ही नवीन नाही. ॲडम स्मिथ या इंग्रज अर्थशास्त्रज्ञाने आर्थिक विकासास चालना देण्यासाठी उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचा पुरस्कार केला. स्मिथच्या शिफारसीची अंमलबजावणी करून इंग्लंडने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची सुरुवात केली होती. तथापि, १९८० नंतर जगात जागतिकीकरणाचे वारे जोरदारपणे वाहू लागले. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू होऊन आज सुमारे ३५ वर्षे उलटली आहेत. या ३५ वर्षाच्या अनुभवाच्या आधारे आपणास जागतिकीकरणाचे फायदे व तोटे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १६.६.१ जागतिकीकरणाचे फायदे:

#### १६.६.१.१ औद्योगिकीकरणास चालना:

जागतिकीकरणामुळे विकसनशिल राष्ट्रांत औद्योगिकीकरणास मोठी चालना मिळाली आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उद्योगाची कार्यक्षमता व स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी अनेक इष्ट निर्णय घेण्यात आले आहेत. उदा. परवाना पध्दतीचे निर्मूलन करणे, सार्वजनिक क्षेत्रातील राखीव उद्योगांची संख्या कमी करणे, परकीय गुंतवणूकीस वाव देणे, मक्तेदारी कायद्यात सुधारणा करणे, कर व्यवस्था सुधारणे इत्यादी. या सर्व उदार निर्णयांमुळे नवीन उद्योग उभारणे, जुन्या उद्योगांचे विस्तारीकरण करणे.

#### १६.६.१.२ बाजारपेठांचा विस्तार:

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत परकीय भांडवल, तंत्रज्ञान, तंत्रज्ञ, व्यवस्थापन इत्यादींना एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात सहज प्रवेश मिळू लागला आहे. तसेच प्रत्येक राष्ट्रातील उद्योजकांना परकीय बाजारात भांडवल उभारण्यास व त्यांची उत्पादने परकीय बाजारपेठेत निर्यात करण्यास परवानगी दिल्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निकोप स्पर्धा

निर्माण होण्यास चालना मिळाली आहे. अशाप्रकारे जागतिकीकरणामुळे देशी उत्पादनांच्या दृष्टीने बाजारपेठा विस्तारीत झाल्या आहेत.

### १६.६.१.३ परकीय व्यापारात वृद्धी:

जागतिकीकरणामुळे राष्ट्रांना आपला परकीय व्यापार मुक्त करावा लागत आहे. त्यामुळे आयात-निर्यातीवरील निर्बंध दूर झाले आहेत. तसेच आयात करात कपात करावी लागली आहे. तसेच आपले चलन परिवर्तनीय करावे लागले आहे. या उपायांमुळे राष्ट्रांचा परकीय व्यापार वेगाने वाढला आहे.

### १६.६.१.४ उपभोक्त्यांचा फायदा:

जागतिकीकरणामुळे उपभोक्त्यांचा (ग्राहकांचा) फायदा होत आहे. जागतिकीकरणामुळे आयात दर कमी झाल्याने एखाद्या राष्ट्रात म्हणजेच स्थानिक बाजारपेठेत परदेशातील विविध दर्जेदार वस्तू (उदा. वस्त्रे, खेळणी, बॅग्ज, पादत्राणे, दुचाकी-चारचाकी वाहने, टी.व्ही सेट, वॉशिंग मशिन, फ्रिज, मोबाईल हँडसेट, संगणक, लॅपटॉप इ.) विपूल प्रमाणात योग्य किंमतीत उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामुळे लोकांना आपल्या आवडीच्या वस्तू खरेदी करता येऊ लागल्या आहेत त्यामुळे ग्राहक हा बाजाराचा राजा बनला आहे.

### १६.६.१.५ रोजगार वृद्धी:

जागतिकीकरणामुळे लोकांना विशेषतः उच्चशिक्षीतांना व कुशल व्यक्तींना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध झालेल्या आहेत. उद्योग, व्यापार, व्यवस्थापन, वाहतूक, संप्रेषण, माहिती-तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रात असंख्य नोकऱ्या उपलब्ध झालेल्या आहेत. अशा रोजगार वा नोकऱ्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण देणाऱ्या विविध शिक्षणसंस्थाही सुरू झाल्या आहेत. विकसनशिल राष्ट्रातील उच्चशिक्षीत तरूणांना देशोविदेशात आकर्षक वेतन देणारे रोजगार मिळू लागले आहेत.

### १६.६.१.६ सेवाक्षेत्राचा विस्तार:

जागतिकीकरणामुळे सेवाक्षेत्राचाही मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. वाहतुकीच्या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक सुरू झाल्यान रस्ते व महामार्ग यांची स्थिती सुधारली आहे. हवाई वाहतुकीतही खाजगी व परकीय कंपन्यांनी गुंतवणूक केल्याने हवाई वाहतुकीची सुविधाही सुधारली आहे. लोहमार्ग व जलमार्ग सुविधांमध्येही लक्षणीय सुधारणा झाली आहे. जागतिकीकरणात जगातील नामांकित शिक्षणसंस्थांना इतर राष्ट्रात आपल्या शाखा उघडण्यास परवानगी मिळाल्याने तेथील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शिवाय या परकीय शिक्षणसंस्थाशी होणाऱ्या स्पर्धेत टिकण्यासाठी स्थानिक शिक्षणसंस्थांना आपला शैक्षणिक दर्जा सुधारणे भाग पडत आहे. यातून शिक्षणक्षेत्रातील सुधारणांना गती मिळत आहे. थोडक्यात जागतिकीकरणामुळे सेवाक्षेत्र विस्तारले आहे व त्यामुळेही रोजगार वृद्धी झाली आहे.

### १६.६.१.७ साजाजिक-सांस्कृतिक संबंधात वाढ:

जागतिकीकरणामुळे विभिन्न राष्ट्रातील लोक परस्परांच्या राष्ट्रांना भेटी देऊ लागल्या आहेत. शिक्षण, रोजगार, पर्यटन, इत्यादीच्या निमित्ताने जगात कोठेही स्थलांतरीत होऊ

लागले आहेत. परिणामी जगातील विविध लोक व राष्ट्रे यांच्यात केवळ आर्थिक सहकार्याचेच नव्हे तर सामाजिक-सांस्कृतिक सहकार्याचेही संबंध वाढत चालले आहेत. या संबंधावरील राजकीय व भौगोलिक सीमा दूर झाल्या आहेत. त्यामुळे जग खूप जवळ आले आहे. राष्ट्राराष्ट्रातील या सहकार्यामुळे संपूर्ण जग हे जणू एक खेडे बनले आहे. जागतिकीकरणामुळे जागतिक खेड्याचे (Global village) स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यास चालना मिळाली आहे.

### १६.६.२ जागतिकीकरणाचे तोटे:

जागतिकीकरणाचे तोटे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

#### १६.६.२.१ स्थानिक उद्योगास मारक:

जागतिकीकरण हे स्थानिक उद्योगास मारक ठरत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उत्तम गुणतत्तेच्या परकीय वस्तू मुबलक प्रमाणात व वाजवी दरात स्थानिक बाजारपेठेत उपलब्ध होत आहेत. स्थानिक वस्तूंला या परकीय वस्तूंशी स्पर्धा करणे शक्य होत नाही. त्यामुळे स्थानिक उद्योगात मंदी येऊन ते आजारी पडत आहेत. काही स्थानिक उद्योजकांनी तर आपले उद्योग परकीय कंपन्यांना विकून टाकले आहेत. परकीय कंपन्यांनी जाहिरातीच्या जोरावर स्थानिक बाजारपेठा काबीज केल्याने स्थानिक उद्योगधंद्यांची विशेषतः लघुउद्योगांची स्थानिक बाजारपेठेत पिछेहाट झाली आहे.

#### १६.६.२.२ बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी:

जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांची अनेक क्षेत्रात मक्तेदारी निर्माण होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अमेरिका, पश्चिम युरोपियन राष्ट्र, जपान इत्यादीमधील अनेक कंपन्यांनी विकसनशील राष्ट्रातील महत्त्वाचे उद्योग आपल्या ताब्यात घेऊन स्थानिक उद्योजकांना बाजारपेठेतून हुसकावून लावले आहे. प्रचंड भांडवल, अत्याधुनिक तंत्रज्ञान, उत्तम व्यवस्थापकीय कौशल्य, आकर्षक जाहिरातबाजी इत्यादीच्या जोरावर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जागतिक बाजारातील मोठा हिस्सा काबीज केला आहे.

#### १६.६.२.३ बेरोजगारीत वाढ:

अनेक विकसनशिल राष्ट्रांत मुळातच रोजगाराच्या संधी कमी आहेत. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाणे बरेच आहे. जागतिकीकरणामुळे बेरोजगारीचे हे प्रमाण वाढण्यास हातभार लागला आहे. परकीय वस्तूंशी स्पर्धा करू शकत नसल्याने अनेक स्थानिक उद्योग आजारी किंवा बंद पडून त्यातील कामगार बेरोजगारी (बेकार) बनले आहेत. खाजगीकरणाच्या धोरणामुळेही कामगार कपात होऊन अनेक कामगार बेकार झाले आहेत. लघुउद्योगांची पिछेहाट झाल्यानेही बेकारीत वाढ झाली आहे.

#### १६.६.२.४ विषमतेत वाढ:

जागतिकीकरणामुळे आर्थिक तसेच सामाजिक विषमता वाढली आहे. जागतिकीकरणामुळे ज्या रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत त्यांचा फायदा केवळ उच्च शैक्षणिक

पात्रताधारक व्यक्तींना होत आहे. बडे शेतकरी, उद्योजक व व्यापारी या प्रक्रियेत मालामाल होत आहेत. त्यांच्या तुलनेत लहान शेतकरी, शेतमजूर, अकुशल कामगार, दलित, आदिवासी इत्यादी दुर्बल घटक जागतिकीकरणाच्या फायद्यापासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे श्रीमंत वर्ग अधिक श्रीमंत तर गरीब वर्ग अधिक गरीब होत आहे. श्रीमंत वर्ग चैन करू लागला आहे तर गरीब वर्गास मूलभूत गरजा भागविणेही अवघड झाले आहे. परिणामी, आर्थिक व सामाजिक विषमता वाढत आहे.

### १६.६.२.५ विकसनशील राष्ट्रांची लूट:

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसित देश उदा. अमेरिका व युरोपियन राष्ट्रे ही विकसनशील राष्ट्रांची लूट करीत आहेत. रॉयलटी, नफा, कर्जावरील व्याज इत्यादी रूपाने विकसनशील देशात मिळविलेले उत्पन्न आपल्या देशात पाठवून विकसित राष्ट्रे ही लूट करीत आहेत.

### १६.६.२.६ कर्जबाजारीपणात वाढ:

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसनशील राष्ट्रांच्या कर्जबाजारीपणात वाढ झाली आहे. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून कर्ज घेताना विकसनशील राष्ट्रांना उदारीकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारणे भाग पडते हे धोरण राबविताना परकीय भांडवल, तंत्रज्ञान, वस्तू व सेवा यांची आयात करावी लागते. आयात वाढल्याने कर्ज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज काढावे लागते. परिणामी, ही राष्ट्र कर्जाच्या विळख्यात अडकली आहेत. उदा. मेक्सिको, ब्राझील, चिली, अर्जेंटिना यांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे.

### १६.६.२.७ पर्यावरणाची समस्या:

जागतिकीकरणामुळे पर्यावरणाची समस्या अधिक गंभीर बनली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या व उद्योगपती हे जास्तीत जास्त फायदा वा नफा मिळविण्याच्या हेतुने नैसर्गिक साधनसामग्रीचा स्वैरपणे वापर करीत आहेत. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याऐवजी हवा, पाणी, भूमी, ध्वनी यांचे प्रदूषण वाढवित आहेत, जंगलतोड करीत आहेत. त्यामुळे तापमान वृद्धीची समस्या उग्र बनली आहे.

### १६.६.२.८ समाजवाद व कल्याणकारी धोरणास सोडचिठ्ठी:

जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्र समाजवादी व कल्याणकारी धोरणास सोडचिठ्ठी देऊ लागली आहेत. विकसनशील राष्ट्रांना या अटींचे पालन करणे भाग पडत आहे. त्यातूनच कामगार कपात करणे, कंत्राटी पध्दतीने कामगार भरती करणे, पेन्शन व विमा सुविधा बंद करणे, अन्नधान्य, गॅस, खनीज तेल इत्यादीवरील अनुदान बंद करणे इत्यादी उपाय योजना केल्या जात आहेत. त्यामुळे या राष्ट्रांतील गरीबांना आता कोणीच वाली राहिलेला नाही. महत्त्वाची म्हणजे इतरांना अर्थव्यवस्था मुक्त करण्यास व अनुदाने बंद करण्यास सांगणारी अमेरिका स्वतःमात्र आपल्या उद्योगांना संरक्षण व शेतकऱ्यांना अनुदाने देत आहे. ही दुटप्पी नीती अन्यायकारक आहे.

### १६.६.२.९ सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट प्रभाव:

जागतिकीकरणाचा विकसनशील राष्ट्रांच्या सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट प्रभाव पडत आहे. या राष्ट्रांतील लोकांचे आचारविचार, श्रद्धामूल्ये, सवयी, अभिवृत्ती, जीवनपध्दती इत्यादीत अनिष्ट परिवर्तन होत आहे. व्यक्तीवाद, उपभोक्तावाद, उपयुक्ततावाद या मूल्यांचा प्रभाव वाढत आहे. त्यामुळे समष्टीवाद सामाजिक बांधिलकी, राष्ट्राचे हित, स्वसंस्कृती अभिमान, इत्यादींचा प्रभाव घटत आहे. या राष्ट्रातील नवीन पिढी ही तेथील हवामानास प्रतिकूल ठरेल अशा खाण्यापिण्याच्या व पोषाखाच्या आहारी जात आहे. विकसित राष्ट्रातील वस्तूंचे व चालिरीतीचे अंधानुकरण होऊ लागले आहे. इंग्रजी भाषाचे प्रभुत्त्व वाढून देशी भाषांचे महत्त्व तरुण पिढीस वाटेनासे झाले आहे.

### १६.६.२.१० पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष:

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बहुराष्ट्रीय कंपन्यांना पायाभूत सेवांमध्ये (वीज, पाणीपुरवठा, रस्ते वाहतूक, संप्रेषण इत्यादी) गुंतवणूक करण्यास परवानगी दिली आहे. तथापि, या कंपन्या पायाभूत सेवासुविधांमध्ये गुंतवणूक करण्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्याऐवजी चैनीच्या वस्तूंचे (उदा. वॉशिंग मशिन, टी.व्ही सेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोटार सायकली, मोटार इत्यादी) उत्पादन करण्यावर भर देत आहेत. त्यामुळे गरिबांचा फायदा होण्याऐवजी श्रीमंतांचे चैनीचे चोचले पुरविले जात आहेत.

## १६.७ जागतिकीकरणांचे भारतीय क्षेत्रावर पडलेले परिणाम

### १६.७.१ जागतिकरणांचे शिक्षण क्षेत्रावरील परिणाम:

जागतिकीकरण ही एक बहुआयामी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे शिक्षणव्यवस्थेवर आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिणाम पडून येत असल्याचे दिसत आहेत. यामुळेच उच्च शिक्षणात खाजगी संस्था स्थापन होत आहेत. उच्च शिक्षणाची संधी, समान न्याय, वित्तप्रबंध व गुणवत्ता यासंबंधी आव्हाने उभी राहिली आहेत. याशिवाय राष्ट्राचे सार्वभौमत्व, सांस्कृतिक वैविध्य, दारिद्र्य व टिकावू विकासाचे प्रश्नही निर्माण होत आहेत.युनोस्कोच्या २००३ च्या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शिक्षण या सेवाक्षेत्राचा वापर बाजारतंत्राप्रमाणे होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे शासनाचे उच्चशिक्षणावरील नियंत्रण कमी झाले आहे. त्यामुळे दुर्बल घटक व गरीब यांच्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता वाटते.

### १६.७.१.१ शिक्षणाच्या मूळ उद्देशाकडे दुर्लक्ष:

जागतिकरणाच्या प्रक्रियेमुळे शाळा या गोष्टीची व्याख्या बदलून सरकार पर्यायी “अनौपचारिक शिक्षण केंद्र” अशी करु पाहत आहे. विद्यार्थ्यांना विचार करायला प्रवृत्त करणे, त्यांच्यात संवेदन क्षमता आणि माणूसपणाचा विचार रुजविण्याचा प्रयत्न आजच्या शिक्षणव्यवस्थेत होताना दिसत नाही. तसेच त्यांच्यात कौशल्यवृध्दी व्हावी यासाठीही जाणिवपूर्वक प्रयत्न होत नाहीत. प्रत्यक्ष हाताने काम करण्याच्या अनुभूतीशिवाय ज्ञानाची समज पक्की होणार नाही. परंतु हा विषय आज अभ्यासक्रमात नाही. विद्यार्थ्यांना संपूर्ण आकलनाऐवजी स्मरणशक्तीला महत्वाचे स्थान दिले आहे. यामध्ये त्यांच्या आकलनाची

इतर अंगे समग्रविचार, तर्कसंगती, विश्लेषण, परस्परसंबंध जोडणे यांना पूर्णपणे फाटा दिला आहे. प्रचलित परीक्षा पध्दतीने तर शिक्षणाच्या बाजारीकरणाच्या प्रक्रियेला आणखीनच बळकटी आणली आहे. मूल्यमापन पध्दती आधीच ठरलेली असल्यामुळे मुलांना काय शिकविले जाणार, काय प्रश्न विचारले जातील याचा साचा अगदी बालवाडीपासूनच पक्का होऊ लागला आहे. बोर्डाच्या परीक्षांना असलेल्या महत्वामुळे कुठलाही शाळा शिक्षणात नवनवीन प्रयोग करण्याचे धाडस करु शकत नाही.

### १६.७.१.२ ज्ञान व समाजधारणा यात तफावत:

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे, यात बाजारव्यवस्था मजबुत करण्याचे साधन म्हणून मुलांकडे पाहिले जाते. त्यावरुनच त्यांची किंमत ठरविली जाते. सुसंस्कृत मानवी समाज निर्माण व्हावा असा समग्र दष्टीकोन नाकारला जात आहे. जागतिकीकरणाला आवश्यक तेवढेच शिक्षण महत्त्वाचे मानल्याने समाजाच्या गरजा बाजुला सारल्या जातात आणि जागतिक बाजारव्यवस्थेत ज्याला किंमत आहे अशाच शिक्षणक्रमांना व संशोधनाला आर्थिक मदत मिळ शकते. शिक्षणाच्या शाखा, उपशाखा अगदी कंपन्यासुध्दा ज्यांना बाजारमूल्य नाही त्या टिकून राहणं अवघड आहे. उदा. मानवविद्या, इतिहास, समाजशास्त्र इ.

### १६.७.१.३ सामाजिक सांस्कृतिक विविधता नष्ट झाली:

जागतिकीकरणाला सामाजिक सांस्कृतिक विविधता सोयीची नाही. विविध ठिकाणी विविध प्रकारची रहाणी खाणेपिणे, सौदर्य कल्पना असतील तर त्या त्या ठिकाणी स्थानिक पातळीवरच उत्पादन बाजारात असेल ते सर्व नष्ट करुन सर्वानी एकाच प्रकारचे खाणपिणं घ्याव म्हणजे पैसा एकत्रितपणे ओढून घेता येतो. मात्र दुस-या बाजूला धर्म, जाती, भाषा, लिंग या गोष्टी तशाच रहाव्यात याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. विषमतेची उतरंड आबाधित राहणं बाजारव्यवस्थेला सोईची आहे. उदा. स्त्रियांचा जाहिरातीतील वापर, इंग्रजीतून ज्ञानाचा प्रसार ठराविक आर्थिक गटांना मागास ठेवण्यास उपयोगी ठरतो

### १६.७.१.४ वंचितांना शिक्षणाच्या फायदयापासून दूर ठेवणे:

पंचतारांकित खाजगी शाळापासून ते कमी पैशात चालणा-या वस्तीशाळांपर्यंत त्या त्या आर्थिक गटांच्या मुलांसाठी त्या त्या दर्जाच्या शाळा अशी विषम व्यवस्था उभी राहिली आहे. समान अभ्यासक्रम समान परीक्षा असुनही शिक्षणातील दर्जात तफावत असलयामुळे कमी आर्थिक गटातील मुले १० वी पर्यंत पोहोचणे देखिल अशक्य झाले आहे. याशिवाय उच्च शिक्षणावरील खर्च कमी करुन शालेय शिक्षणाकडे वळवावा असे जामतीन परिषदेत ठरले आहे. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षणाचे व्यापारीकरण झाले आहे. त्यामुळे कनिष्ठ मध्यमवर्ग व वंचित गटातील लोकांना शिक्षणाच्या प्रक्रियेपासून दूर ठेवले जाईल. उच्चवर्गीयांच्या हातात ज्ञानाचे फायदे राहतील व संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचा कल भोगवादाकडे राहिल.

### १६.७.१.५ पॅरा शिक्षकांचा शोध:

जागतिकीकरणामुळे शिक्षणक्षेत्रात पॅरा-शिक्षक नावाची नवीन प्रजाती निर्माण झाली आहे. वेगवेगळया राज्यात वेगवेगळया नावानी ओळखल्या जाणा-या या प्रजातीचा शोध कल्याणकारी योजनावरचा खर्च कमी करण्यासाठीच आहे. भारतातील सरकारी शिक्षणाला स्थायी स्वरुपाचा, प्रशिक्षित योग्य वेतनश्रेणी असलेल्या शिक्षकांपासून वंचित करुन खाजगी शिक्षणाला बाजारात अनुकूल शिक्षकवर्ग निर्माण करणे हे जागतिकीकरणाचे उद्दिष्ट आहे. जागतिक बँकेच्या कर्जावर चालणारे शिक्षण जसजसे पुढे जाईल तसतसे देशातील बालकांना सुयोग्य शिक्षण देण्याचे उद्दिष्ट दूरदूर जाईल. या अभिनयातून एक शिक्षकी शाळांसारख्या नवनवीन चमत्कारीक कल्पना पुढेआल्या आहेत. या शाळेत एक शिक्षक एक ते चार इयत्तांना शिकवेल. अशाप्रकारचे प्रशिक्षणही त्यांना देण्यात आले आहे. भारतासारख्या गरीब देशांत एका इयत्तेसाठी एक शिक्षक मिळू नये यासाठी केलेल्या युक्तीचे हे गोंडस नांव आहे.

### १६.७.१.६ नव्या शैक्षणिक धोरणाचे परिणाम:

जागतिकीकरणाच्या आणि व्यापारीकरणाच्या युगांत शिक्षण ही एक विकावू वस्तू अगर सेवा बनली आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या देशात २००२ मध्ये अंबानी - बिर्ला या कार्पोरेट मंडळींनी एका अहवालाव्दारे शिक्षणव्यवस्थेच्या खाजगीकरणाच्या धोरणाचा पाठपुरावा केला आहे. या मंडळींनी गुणवत्ता हाच निकष ठरवून शिक्षण धोरणांत आमूलाग्र बदल सुचविले आहेत. मोफत व सक्तीचे शिक्षण २००४ च्या मसुद्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात पुढील त्रुटी आढळतात.

i) भारतीय घटनेने मांडलेल्या समानता आणि समाजातील सर्व घटकांना विकासासाठी देऊ केलेली संधी या मसुद्यात नाकारली आहे.

ii) १९८६ च्या घटनादुरुस्ती कायदयाने शासन प्राथमिक शिक्षणासाठी लागणा-या आर्थिक जबाबदारीतून मुक्त होणार आहे.

iii) गुणवत्ता हाच निकष ठरवितांना सामाजिक न्याय आणि समान शिक्षण पध्दती या समाजातील सर्व घटकांसाठीच्या शिक्षणपध्दतीपासून शासन अलिप्त होत आहे.

iv) ६ ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे शिक्षण करतांना ४ ते ६ या शिशुगटातील बालकांना शिक्षणापासून वंचित ठेवले आहे.

v) सक्तीच्या शिक्षणातील सरकारने आपली वैधानिक व आर्थिक मुक्तता करुन घेतली आहे. ग्रामीण ठ दुर्बल घटकांतील मुलांच्या शिक्षणातील जबाबदारी सरकारने नाकारली आहे व एक शिक्षकी शाळा सुचविल्या आहेत.

vi) अपंग व मतिमंद मुलांकडे दुर्लक्ष केले आहे.

vii) बालकामगारांसाठी वेगळी शिक्षणपध्दत सुचवितांना समान शिक्षणपध्दतीकडे दुर्लक्ष केले आहे.

viii) शिक्षण ही विकावू वस्तू अगर सेवा या विचाराला कायदेशीर मान्यता देतांना या संदर्भात निर्माण होणा-या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक बाबींचा विचार केलेला नाही.

### **१६.७.१.७ शिक्षणातील खाजगीकरण:**

सरकारी भागीदारी अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये खाजगी सरकारी भागीदारीमध्ये शिक्षण देण्याचे मॉडेल आणले आहे. म्हणजेच जनतेचा पैसा वापरुन शिक्षणाचे खाजगीकरण व्यापारीकरण करण्याचा हा मार्ग आहे. कोणतीही कंपनी २५ शाळा सुरु करु शकेल. जर ना नफा कंपनी असेल व आधीचा शाळा चालविण्याचा कंपनीला अनुभव असेल तर २५ लाख डिपॉझिट भरावे लागेल. मात्र चांगल्या खाजगी शाळांसाठी इमारत, मैदान, प्रयोगशाळा इ. सोई असाव्या लागतील. यामध्ये वंचित गटातील मुलांच्या फी च्या रुपाने सरकारकडून प्रचंड मोठा खजिना खाजगी शाळांकडे पाठविला जाणार आहे. अशा शाळांना नफ्याचे अमर्याद स्वातंत्र्य आहे. अशा शाळांवर सरकारचा ताबा नाही. फक्त वंचित घटकांतील १००० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची एकमेव अट त्यांच्यावर राहिल. याचा परिणाम असा होणार आहे की, शिक्षणात नफा कमवू नये असे असतानाही नफ्याला उत्तेजन मिळणार आहे. हे एकप्रकारचे खाजगीकरण किंवा व्यापारीकरण आहे यासाठी जनतेचाच पैसा वापरला जाणार आहे.

### **१६.७.१.८ केंद्रीय सर्वोच्च संस्थांचे खच्चीकरण:**

केंद्रसरकारचे नवीन शैक्षणिक धोरण फारच भयानक आहे. यु.जी.सी., ए.आय.सी.टी.ई., आय.एम.सी., एन.सी.टी.ई. इ. भारतातील सर्वोच्च केंद्रीय शिक्षण संस्था आज शिक्षणातील विविध क्षेत्रात महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. वरील सर्व संस्थांच्या जागी एकच सर्वोच्च केंद्रीय संस्था म्हणून राष्ट्रीय उच्च शिक्षण व संशोधन आयोग (एन.सी.एच.ई.आर) आणण्याचे धोरण अवलंबिले जात आहे. हे धोरण फारच घाईगडबडीने व भविष्यातील परिणामांची चिंता न करता विचारशून्य पध्दतीने आखले आहे की भविष्यात शिक्षणामध्ये या मूठभर लोकांची सत्ता राहिल. सध्याच्या सर्वोच्च संस्थांमधील काही अधिकारी भ्रष्ट असल्याने मानव संसाधन मंत्र्यांनी घाईगडबडीने निर्णय घेण्याचे ठरविले आहे.

### **१६.७.१.९ परदेशी विद्यापीठांना भारतात मुक्त प्रवेश:**

२००५ साली भारताच्या संसदेने खाजगी विद्यापीठाचा कायदा मंजूर केला. या बिलांने भारतात विदेशी विद्यापीठांना प्रवेश करणे शक्य झाले. यामुळे विदेशी विद्यापीठांना फीरचना, प्रवेश प्रक्रिया ठरविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असेल. मागासलेल्यांना कोणतेही आरक्षण नसेल. जर खाजगी व विदेशी विद्यापीठांना भारतीय शिक्षण क्षेत्रात मक्त कार्यप्रणाली राबवायला मुभा दिली तर शिक्षण ही एकप्रकारची क्रमवस्तू बनून विविध पदवी व पदविका प्रमाणपत्रांना किमतीचे लेबल लावावे लागेल. त्यामुळे शिक्षणाचे कंपनीकरण, व्यापारीकरण होऊन राष्ट्र उभारणीसाठी उच्च शिक्षण हा उद्देशच बाजूला पडेल.भारतामध्ये शिक्षणव्यवस्थेत येणा-या या विदेशी विद्यापीठांना कोणीच हरकत घेऊ शकणार नाहीत. ही खाजगी व विदेशी विद्यापीठे भारतातील गर्भश्रीमंतांनाच आपल्या पदव्या देतील. त्यामुळे

मोठया पगाराच्या नोक-या श्रीमंतांनाच मिळतील. गरीब व मध्यमवर्गीय यापासून वंचित राहतील.

आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये पाच तथाकथीत तत्वानी धुडघुस घातला आहे. त्यामध्ये:

१) कायम विनाअनुदानित तत्व

२) खाजगी-सार्वजनिक भागीदारी

३) फी देण्याची पात्रता

४) अनुदान कमी करण्याचे तत्व आणि

५) बाजारु शिक्षणपध्दती

या तत्त्वामुळेच शिक्षणव्यवस्थाच पोखरली गेली आहे. या सर्व परिस्थितीचे कारण म्हणजे या जागतिकरणाच्या प्रक्रियेत शिक्षणपध्दतीमध्ये निश्चित असा विचार नाही. जी व्यवस्था परस्पर बनत आहे तिलाच आपण आपली व्यवस्था मानतो. अभ्यासक्रमाबाबतही गोंधळ आहे. त्यामुळे महागडया कोचिंग क्लासेसचे पीक वाढत आहे. या सर्व स्थितीमुळे विद्यार्थी परीक्षार्थी बनतात व शिक्षण ही विक्रीची वस्तू व खरीदण्याची वस्तू बनली आहे.

## १६.८ जागतिकीकरणांचे कृषी विभागांवर पडलेले परिणाम

जागतिकीकरणाच्या स्वीकारामुळे भारतीय शेती क्षेत्रावर अनेक बरे-वाईट परिणाम झाले आहेत. जागतिकीकरणाच्या स्वीकारावेळी भारतवासीयांना, येथील अर्थतज्ञाना आणि समाज्यातील विविध विचारवंत मंडळींना असे वाटत होते की, जागतिकीकरणामुळे आपणाला चांगले दिवस येतील म्हणजे

१) भारतीय शेती उत्पादनाची निर्यात वाढेल.

२) शेती मालाला भारतीय बाजारपेठेतील किंमतीपेक्षा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जास्त किंमती मिळतील.

३) शेतमालाच्या निर्यातीचे प्रमाण वाढुन परकिय चलन मिळेल. त्यामुळे शेती, शेतकरी यांचा विकास होईल परिणामी देशाचा आर्थिक व सामाजिक विकास होईल. जागतिकीकरणातन विदेशी मालांनी आपली बाजारपेठ भरून येईल, श्रीमंताच्या गरजेच्या वस्तुची भरभराट होऊन मुक्त चलन व्यवस्था, उद्योगांचे जाळे, नोकरीच्या असंख्य संधी, याबरोबरच भारताचा चेहरा मोहरा बदलुन जाईल असे वाटत होते. या विचारधारेमध्ये शेतकऱ्याचे नेते, शेतकरी संघटनेचे प्रणेते (शरद पवारांपासून ते शरद जोशीपर्यंत) अशी बतावणी करत होते की, जागतिकीकरण भारताच्या हिताचे आहे. परंतु एनरॉन प्रकल्प येण्यापूर्वी आपले वीजमंडळ नफ्यात होते ते जागतिकीकरणानंतर तोट्यात गेल्याने जागतिकीकरणाची वाहवा करणाऱ्याचे पितळ उघडे पडले आहे.

जागतिकीकरणाच्या स्वीकारामुळे अपेक्षीत असे काहीच घडले नाही तर जागतिकीकरणाच्या स्वीकारामुळे वस्तुवर आयात कर न लावता त्यावर असलेले निर्बंध दुर केले. बहुराष्ट्रीय कंपन्यांना शेतीमध्ये गुंतवणूक करण्यास परवानगी दिली तर याविरोधी शेतीला पुरक व्यवसाय असणाऱ्या दुग्ध व्यवसायामध्येही गळचेपी धोरणे राबविले गेल्याची दिसते ते म्हणजे :

१) दुग्धजन्य पदार्थांच्या निर्यातीवरील अनुदानामध्ये कपात करण्यात आली.

२) आयात केलेल्या दुग्धजन्य पदार्थावरील आयात कर संतुलीत ठेवण्याऐवजी कमी करण्यात आले या विविध नियम व अटीमुळे भारतीय शेतकरी व शेतीसमोर अरिष्ठ निर्माण झाले. या अरिष्टाला सामोरे जाताना येथील शेतकऱ्यांनी आंदोलने केली. तर जिथे शेतकरी वर्ग असंघटीत आहे तेथे शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. सुतगिरण्या, साखर कारखाने बंद पडण्यामुळे तेथील कामगार व सभासद शेतकरी शेतमजुर आज बेकार व कर्जबाजारी झाले आहेत. शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे ते बँकांची थकबाकी परत करू शकत नाही. परिणामी ते कोणत्याही सहकारी संस्थाकडील कर्ज घेण्यास अपात्र ठरतात.

अशा परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना आपला उदरनिर्वाह करण्यासाठी खासगी सावकारांकडून कर्ज घेणे भाग पडते आणि ते कर्ज परत करण्यामध्ये शेतकरी आपले आयुष्य वेचत आहे म्हणजेच आज जागतिकीकरणामुळे शेतीवर गंडातर येऊन शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहिला नाही. भारतीय शेतीवर जागतिकीकरणाच्या परिणामासंदर्भात विचार करता असंख्य बदल झाल्याचे दिसून येतात. जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार साधारणपणे २५% वाढला. जगातल्या अविकसित देशामध्ये साधारपणे २०% लोक राहतात, जागतिककरणामुळे झालेल्या व्यापार वाढीतून मिळालेल्या लाभाचे वितरण समन्यायी पद्धतीने झाले नाही. २५% वाढलेल्या व्यापारातील नफ्यामध्ये अविकसित देशाचा वाटा ०.३% आहे. तर २०% विकसीत देशाचा वाटा या नफ्यामध्ये ८६% आहे. यावरून जागतिकीकरणाच्या भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणामाचे चित्र स्पष्ट होते. दुसऱ्या बाजूला जागतिकीकरणामुळे आपल्याला शेती विकासाच्या असंख्य शक्यता निर्माण झाल्या. कारण आपण पडिक जमीनी वहिवाटी खाली आणु शकतो, उपलब्ध पाण्याचा पर्यांत वापर भुगर्भातील जलसाठ्याचे पुनर्भरण होण्यासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन तसेच पावसाचा पाण्याचे संचयन करण्याच्या पद्धतीचा अवलंब करू शकतो. त्यासाठी जैन तंत्रज्ञानाची मदत होईल.

## १६.९ जागतिक अर्थव्यवस्थेचा सहकारी चळवळीवरील परिणाम (IMPACT OF GLOBAL ECONOMY ON COOPERATIVE MOVEMENT)

जागतिक अर्थव्यवस्था एक वर्तमान वास्तव आहे. आणि हे वास्तव दिवसेंदिवस गडद होत जाणार आहे. म्हणजेच जागतिकीकरणांची प्रक्रिया सधन व सुदृढ होत जाणार आहे. भारतातील सहकारी चळवळ जागतिकीकरणाच्या परिणामांपासून दूर राहू शकत नाही.

**१६.९.१ भाग भांडवल:**

सहकारी संस्थांची स्थापना समाजातील आर्थिक दृष्टया दुर्बल व्यक्तींकडून केली जात असल्याने त्यांच्याकडे भांडवलाची कमतरता असते. जागतिकीकरणाच्या या काळात सहकारी संस्थांना बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करावी लागते. या कंपन्यांकडे प्रचंड भांडवल आहे व त्यांच्याकडून अदयावत तंत्रज्ञानाचा अवलंब केला जातो. भ्रष्टाचार व अकार्यक्षमतेमुळे सहकारी संस्थांची विश्वासहता लयाला गेली आहे. त्यामुळे त्यांना आवश्यक असणारे भांडवल उभे करणे कठीण आहे.

**१६.९.२ उत्पादन खर्च:**

बहुराष्ट्रीय कंपन्या व देशांतर्गत मोठे उदयोग आधुनिक तंत्राचा वापर करुन प्रचंड प्रमाणात वस्तूंचे उत्पादन करतात. त्यामुळे वस्तुंचा उत्पादन खर्च कमी होऊन दर्जा उंचावतो. परंतु सहकारी संस्था मात्र परंपरागत व श्रमप्रधान तंत्राचा वापर करतात. ज्यामुळे उत्पादन खर्च आधिक राहून वस्तूंचा दर्जादेखील कनिष्ठ असतो. जागतिकीकरणानंतर निर्माण झालेल्या तीव्र स्पर्धेत निभाव लागत नाही.

**१६.९.३ बाजारपेठ विस्तार:**

बहुराष्ट्रीय कंपन्या दर्जेदार वस्तूंचे कमी खर्चात उत्पादन करतात. त्यांच्या उत्पादनात वैविध्य असते. तसेच त्या कंपन्या जाहिरातीवर प्रचंड खर्च करतात. म्हणून त्यांच्या वस्तूंच्या बाजारपेठेचा सतत विस्तार होत आहे. सहकारी संस्था बहुतेक वेळा आपल्या वस्तू स्थानिक बाजारपेठेत विकतात. परंतु जागतिक अर्थव्यवस्थेत त्यांना स्थानिक बाजारपेठही टिकवून ठेवणे कठीण बनत चालले आहे.

**१६.९.४ शासकीय मदत व अनुदाने:**

सहकारी चळवळीच्या उदयापासून शासन संस्थांना विभिन्न प्रकारे मदत करत आले आहे. शासन सहकारी संस्थांचे भाग खरेदी करते. तसेच त्यांच्या कर्जरोख्यांची हमी शासन घेते. शिवाय या संस्थांना शासनाकडून करात सूट व अनुदाने दिली जातात. परंतु जागतिकीकरणा नंतर ही अनुदाने व सवलती एक तर बंद केली जातील किंवा त्यात कपात केली जाईल.

**१६.९.५ चळवळीचा गुणात्मक विकास:**

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने दिलेल्या प्रोत्साहन व मदतीमुळे व सहकारी क्षेत्रातील नेत्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे सहकारी चळवळीचा मोठया प्रमाणात संख्यात्मक विकास झाला. चळवळीचा गुणात्मक विकास मात्र दुर्लक्षितच राहिला. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेमुळे अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या स्पर्धेमुळे चळवळीच्या गुणात्मक विकासाची गरज निर्माण झाली आहे.

**१६.९.६ व्यवस्थापनात सुधारणा:**

बहुराष्ट्रीय कंपन्या कुशल, प्रशिक्षित, तज्ज्ञ व्यवस्थापनांकडून चालवल्या जातात. परंतु सहकारी संस्था मात्र अकुशल व अप्रशिक्षित कर्मचा-यांकडून चालवल्या जातात. त्यामुळे

त्यांच्या व्यवस्थापनाचा दर्जा कनिष्ठ आहे. सध्याच्या जागतिक अर्थव्यवस्थेत व स्पर्धात्मक बाजारपेठेत कुशल व प्रशिक्षित कर्मचा-यांची नेमणूक केल्याशिवाय सहकारी संस्थांचा या स्पर्धेत निभाव लागणे अशक्य आहे...

### १६.९.७ संघटनात्मक परिणाम:

सहकारी संस्था आर्थिकदृष्टया कमकुवत आहेत. शिवाय त्यांच्या उत्पादनाचे प्रमाणही अल्प आहे. परंतु बहुराष्ट्रीय कंपन्या आर्थिकदृष्टया बळकट आहेत. शिवाय त्यांच्या उत्पादनाचे प्रमाण प्रचंड आहे. त्यामुळे कुठलीही एकटी सहकारी संस्था प्रचंड आकाराच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करु शकत नाही.

### १६.९.८ ग्राहकांचे समाधान:

स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेत ग्राहक राजा असतो. बहुराष्ट्रीय कंपन्या वस्तूंसाठी कमी किंमती आकारुन व चांगल्या वस्तू पुरवून ग्राहकांना आकृष्ट करण्यात यशस्वी होतात. त्यामुळे सध्याच्या स्पर्धात्मक बाजारपेठेत टिकण्यासाठी सहकारी संस्थांनी देखील कमी किंमतीत चांगल्या दर्जाच्या वस्तू ग्राहकांना पुरविल्या पाहिजेत.

### १६.९.९ ग्रामीण विकास:

साधारणतः गेल्या शंभर वर्षापासून सहकारी चळवळ ग्रामीण भागाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेमुळे सहकारी चळवळीचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. प्रचंड भांडवल, उदयावत तंत्रज्ञान, दर्जेदार व्यवस्थापन, जाहिरातीवरील प्रचंड खर्च, कार्यक्षमता, इत्यादी बाबींमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांची स्थिती सहकारी संस्थांपेक्षा उत्तम आहे. सध्याच्या जागतिक अर्थव्यवस्थेचा सहकारी चळवळीवर विपरित परिणाम घडून आला तर त्याचा ग्रामीण विकासावरही विपरित परिणाम घडून येणार आहे.वरील विवेचनावरुन मुक्त अर्थव्यवस्थेचा सहकार चळवळीवर अनिष्ट परिणाम होत आहे हे स्पष्ट होते. तरीही उदारीरकण, खाजगीकरण, जागतिकीकरणाची प्रक्रिया थोपवणे शक्य नाही. या बदलत्या आर्थिक परिस्थितीत निभाव लागावा म्हणून सहकारी चळवळीने आपल्यात बदल घडवून आणणे आवश्यक आहे. व्यावसायिकता, स्पर्धात्मकता, पारदर्शकता, कार्यक्षमता, इत्यादी तत्वांचा सहकारी संस्थांनी अंगीकार करावा.

## १६.१० सारांश

जुलै १९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरणांचा स्वीकार केला. उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण हे या धोरणाचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. उदारीकरणाच्या प्रक्रियेदवारे, अर्थव्यवस्थेला सरकारी बंधनातून मुक्त केले जाते. खाजगीकरणादवारे सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षम उदयोगाचे भाग खाजगी व्यक्ती व संस्थांना विकून त्यांना व्यवस्थापनात सहभागी करुन घेतले जाते. जागतिकीकरणादवारे देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी संलग्न केली जाते. या आर्थिक बदलांमुळे बाजारपेठेतील स्पर्धेत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. सहकारी संस्थांना खाजगी बडया कंपन्या व बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करावी लागत आहे. नवीन आर्थिक धोरणातून उदयास आलेल्या

जागतिक अर्थव्यवस्थेचा सहकारी चळवळीवर परिणाम होणे अपरिहार्य आहे. सहकारी संस्थांनी आपल्या कार्यप्रणालीत बदल करुन आधुनिक व्यवस्थापन व विक्री तंत्र आत्मसात करुन, अधिक भांडवल उभारुन, आत्मनिर्भर बनून अकार्यक्षमता झटकून आपली स्पर्धात्मकता सिदध केली पाहिजे. आणि बदललेल्या आर्थिक परिस्थितीत सहकार चळवळ सक्षमपणे उभी राहिली पाहिजे. असेच सर्व समाजातील सर्व घटकांना वाटते. आजही सभासद, ग्राहक, शासन, समाज, कर्मचारी यांच्या सहकार चळवळीकडून मोठया अपेक्षा आहेत. या अपेक्षांची पूर्तता सहकारी चळवळीला पूर्ण करता यावी म्हणून बदललेल्या व्यवस्थेशी मुकाबला करण्याचे सामर्थ्य सहकारी चळवळीने प्राप्त केले पाहिजे.

## १६.११ प्रश्न

१. जागतिकीकरण म्हणजे काय सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. जागतिकीकरणांचे फायदे आणि तोटे स्पष्ट करा.

३. जागतिकीकरणांचे शिक्षण क्षेत्रावरील पडलेले परिणाम स्पष्ट करा.

४. जागतिकीकरणांचे शेती क्षेत्रावर पडलेले परिणाम थोडक्यात लिहा.

५. जागतिकीकरणांचे अर्थव्यवस्थेच्या सहकारी चळवळीवरील परिणाम सविस्तर लिहा.

## १६.१२ संदर्भ


- बेडकीहाळ किशोर, प्रा. एन. डी. पाटील : व्यक्तित्व आणि कर्तृत्व, सातारा, २००५.
- सावंत दत्तात्रय, दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलन, एम. फिल. अप्रकाशित शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००९.
- प्रा. जगन कराडे, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड प्रकाशन, २००९
- नीरज जैन - जागतिकीकरण की नवी गुलामगिरी लोकायत प्रकाशन
- कॉ. गोविंद पानसरे - व्दिवर्ण शिक्षणव्यवस्था भारतीय कम्युनिष्ट पक्ष _
- आंदोलन शाश्वत विकासासाठी - अंक जाने. फेब्रु. २०१२
- भाई वैद्य - संपूर्ण शिक्षण, समाजवादी अद्यापक सभा
- प्रबोधन प्रकाशन ज्योती - दीपावली विशेषांक - ऑक्टो. २००७
- Vasant Desai-Rural Devlopement In India-Past, present and future, ___Himalaya publication, New Delhi,
- Prakash B.A.- The Indian economy since १९९१, Peason publication, Delhi.
- The Indian Economic Survey २०१५-१६.

- डॉ. जयप्रकाश मिश्र कृषी अर्थव्यवस्था,साहित्यभवन पब्लिकेशन. आया,
- ए. बी. सवदी - कृषी भूगोल. निराली प्रकाशन, पुणे.
- रुद्र, दत्त सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था', नई दिल्ली.
- योजना मासिक, 'जागतिकीकरण आणि भारतीय शेतीपुढील आव्हाने',जानेवारी-२०१०.
- संपा. राराविकर, 'यशवंत गोडबोले वि.ज.बर्जेस, जॉन्सन, 'डायमंड अर्थशास्त्र कोश', डायमंड पब्लिकेशन, पुणे-२००८.
- पंडित, नलिनी., 'जागतिकीकरण आणि भारत', लोकवाङमय गृह, मुंबई-२००३
- शिंदे, एन., 'अर्थसंवाद', खंड-२७, अंक-२, जुलै-सप्टेबर-२००३
- टकले, एस.आर., कृषी अर्थशास्त्र'.
- खांदेवाले, श्रीनिवास, महाराष्ट्रातील शेती-एक दुर्लक्षित प्रश्न', किसान सभा,२०१०.
- 'समाजप्रबोधन पत्रिका', २००३.
- जरांडे जगन, 'जागतिकीकरण व भारतासमोरील आव्हाने'


*****